।। श्रीशंकर ।।

# मनुस्मृति–भूमिका

## (आक्षेपांच्या संदर्भात)

**ॐ भगवते श्रीमनवे नमः।।**

**एतद्देशप्रसूतस्य सकाशादग्रजन्मनः।**
**स्वं स्वं चरित्रं शिक्षेरन् पृथिव्यां सर्व मानवाः।।**
**इत्यब्रवीत् मनुः श्रीमान् लोककल्याणहेतवे।**
**तस्यादेशान् यथाशक्तिः पालयेत् मनुजः सुधीः।।**

मनुस्मृतीची यथाज्ञान यथाशक्ति सिद्ध केलेली ही नवीन आवृत्ति समाजापुढे ठेवताना मला समाधान वाटत आहे.

या आवृत्तीसाठी भारतीय विद्याभवन या संस्थेने आठ टीकांसह प्रसिद्ध केलेली मनुस्मृतीची संहिता प्रामुख्याने आधारास घेतली आहे. क्वचित सटीक मराठी भाषांतरासह असलेल्या मनुस्मृतीच्या एका प्रतीचा उपयोग केला आहे. ही प्रत जीर्ण आहे. तिची पहिली पाने उपलब्ध नव्हती. त्यामुळे लेखक–प्रकाशक कोण ते समजले नाही. मी संशोधक नसल्याने त्यांची नावे हुडकण्याचा प्रयत्नही केला नाही. मनुस्मृतीचा येथील अनुवाद शब्दशः नाही. भाषा शक्यतो सरळ सुलभ व्हावी म्हणून आशयावर लक्ष ठेवून भाषांतर केले आहे. काही श्लोकांवर लहान मोठ्या टिप्पणी दिल्या आहेत. त्यांना पाहिजे तर वार्तिक किंवा भाष्य समजावे.

अलीकडे कोणत्याहि प्राचीन ग्रंथांच्या विषयी त्याचा काळ, लेखक आणि पाठसंहिता निश्चित करणे हाच एक मोठा उद्योग असतो. मी त्या भानगडीत पडलो नाही. कारण कितीहि संशोधन केले, विविध अंशांची चर्चा केली तरी साधारण संभवनीयतेपेक्षा त्यातून काही विशेष हाती लागत नाही. असा अनुभवच सगळीकडे येतो.

म्हणून सहस्रावधि वर्षाच्या परंपरेने चालत आलेली आणि प्राचीन ग्रंथांचा

सबळ पाठिंबा असलेली आपली धारणाच प्रमाणभूत मानणे मला इष्ट वाटते. तेव्हा काळ–कर्ता–पाठ, या वादात सहभागी होण्याची मला इच्छाहि नाही.

प्रक्षेप कल्पनाहि मला फारशी रुचत नाही. सर्वज्ञात ग्रंथाविषयीच्या संदर्भातहि ती यथार्थ ठरत नाही असा अनुभव आहे. ज्या कारणाकरिता अमुक ग्रंथातील अमुक भाग प्रक्षिप्त आहे, असे ठरविले जाते, ते सर्व दोष उण्याअधिक प्रमाणात ज्ञात लेखकांच्या प्रसिद्ध ग्रंथातहि अनेकदा आढळतात. निरनिराळ्या आवृत्त्यातून वा प्रतीतून आढळून येणारी वेगवेगळी श्लोकसंख्या, पूर्वापर विसंगति,चालू प्रकरणाशी सुसंगत न वाटणारे लेखन, लेखनाची शैली भिन्न वाटणे, भाषेच्या जडणघडणीत अंतर जाणवणे इत्यादि कारणे तो तो भाग प्रक्षिप्त मानण्यासाठी दर्शविली जातात. पण हे सर्व दोष ज्ञात लेखकांच्या ग्रंथातहि विद्यमान आहेत असे अनेकदा आढळून आले आहे. ते संशोधकाच्या निर्देशनाला आणून दिल्यानंतरहि ही विद्वान मंडळी आपला हट्ट सोडीत नाहीत. तुम्ही प्रक्षेपकल्पनेवर कितीहि आक्षेप घेतलेत तरी आम्ही प्रक्षेप मानणारच, असेच एका विद्वानाने मलाच सांगितले होते. तरी पूर्वी चर्चिलेलेच एक उदाहरण येथे पुन्हा उद्धृत करतो. म्हणजे माझी भूमिका निदान विचार करण्याच्या योग्यतेची आहे, इतके तरी वाचकांना मान्य होईल.

महाभारतामध्ये द्रौपदीने वस्त्रहरण प्रसंगी केलेला धावा परंपरागत सर्व प्रतीत स्वीकारलेला आहे. पण पुण्याच्या भांडारकर संस्थेने प्रसिद्ध केलेल्या आवृत्तीत हा धावा प्रक्षिप्त मानून वगळला आहे. या संशोधित भांडारकरी आवृत्तीतच उद्योगपर्वात दोन ठिकाणी द्रौपदीने धावा केला असा स्पष्ट उल्लेख आहे आणि ते दोन्ही श्लोक महाभारताच्या संशोधित आवृत्तीत आहेत. त्यातील एक जिने धावा केला त्या द्रौपदीच्या तोंडी आहे. आणि दुसरा ज्याचा धावा केला त्या कृष्णाच्या तोंडी आहे. पण माझे हे म्हणणे महाभारताचे अभ्यासक असलेल्या त्याच संस्थेशी संबद्ध असलेल्या एका पंडितानी मान्य केले नाही. आणि त्याकरिता श्रीकृष्णाच्या व्यक्तिमत्वाचाच अवमान होईल अशी भलतीच भाषा वापरली. मी याविषयीची सविस्तर चर्चा इतरत्र केलेली असल्याने येथे विस्तार करीत नाही. ‘‘महाभारताचे वास्तव दर्शन’’ किंवा ‘‘गीता प्रवेश’’ या पुस्तकात याविषयी काहीशा विस्ताराने वाचावयास मिळेल. महाभारताच्या सर्व प्रतीत स्पष्टपणे उल्लेखिलेले द्रौपदी वस्त्रहरण झालेच नाही असे अट्टाहासाने प्रतिपादिणारे विद्वानहि आहेतच. तेव्हा प्रक्षेप कल्पनेच्या भोवऱ्यात न सापडता परंपरागत विचार मान्य करणेच अधिक चांगले.

आपल्या परंपरागत धारणेप्रमाणे मनूचा काळ ब्राह्मणग्रंथाइतका तरी प्राचीन आहे. आणि ब्राह्मणग्रंथ हा वेदाचाच महत्त्वाचा भाग असल्याने तो वेदाइतकाच प्राचीन आहे. मंत्रमय संहिताग्रंथ आणि त्यांच्या विनियोगासाठी असलेले ब्राह्मणग्रंथ मिळून वेद होतो असे आपण मानतो. 'मंत्रब्राह्मणयो: वेद: ।' आपल्या कालगणनेप्रमाणे ब्रह्मदेवाचा एक दिवस चौदा मन्वंतरांचा म्हणजे सामान्यत: एकाहत्तर महायुगांचा आहे. सध्या ब्रह्मदेवाच्या आयुष्याचे एकावन्नावे वर्ष चालू आहे. आणि त्यातील (बहुधा) पहिल्या दिवसातील सातव्या कल्पातील सातव्या मन्वंतरातील वैवस्वत मनूचा काळ चालू आहे. या मन्वंतराच्या एकाहत्तर महायुगापैकी सत्तावीस महायुगे पूर्ण झाली असून अठ्ठाविसाव्या युगचतुष्कापैकी शेवटचे अठ्ठाविसावे कलियुग चालू आहे. आणि या कलियुगाच्या चार लक्ष बत्तीस हजार वर्षांच्या कालावधीतील पाच हजार एकशे तीन हे वर्ष चालू आहे. मनुस्मृतीचा काळ या संदर्भात ठरवावा लागेल. ही कालगणना लाखांनी-कोटींनी मोजावी लागेल. ख्रिस्तशकाच्या तीन-चार शतके मागे जाण्याचा प्रसंग आला तरी ज्यांचा जीव कासावीस होतो, त्या आधुनिक, इंग्रज- प्रभावित विद्वानांना आपली ही कालगणना नुसती वाचायला किंवा ऐकायलाहि सोसणार नाही. तेव्हा ती मान्य होण्याचा प्रश्नच उत्पन्न होत नाही.

मनुस्मृतीचा लेखक कोण? स्वायंभुव मनु, वैवस्वत मनु, का महर्षी भृगु हाहि वादाचा विषय होऊ शकतो. मनुस्मृति भृगुप्रोक्त आहे. पण म्हणून तिला भृगूसंहिता म्हणणे योग्य नाही. कारण भृगूने मनूचेच विचार जसेच्या तसे बहुधा स्वत:च्या शब्दात क्वचित् ठिकाणी मनूच्या शब्दात सांगितले आहेत. जेथे मनूचेच शद्ब घेतले असतील तेथे मनूचा उल्लेखहि भृगू करतो. सध्या चालू असलेले मन्वंतर सातव्या वैवस्वत मनूचे आहे. म्हणून आपली ही मनुस्मृति वैवस्वत मनूची मानणे सहज आणि सरळ आहे. येथे काही ठिकाणी ''स्वायंभुव मनू असे म्हणाला'' अशा अर्थाचा उल्लेख येतो पण तो विचारांच्या मूलभूततेचा द्योतक आहे. संहितेचा कर्ता त्यावरून गृहीत धरण्याचे कारण नाही. विद्यापीठाला सादर केला जावा असा हा काही विद्यावाचस्पति पदवीसाठी लिहिलेला प्रबंध नाही, यासाठी तो विषय चर्चिला नाही. महत्त्व वस्तुत: कालकर्त्यापेक्षा विधानाचे असते.

आपल्या परंपरेत मनुस्मृतीला जी मान्यता आहे, तिचे मुख्य कारण ती पूर्णपणे वेदावर आधारलेली आहे, हे आहे. 'प्रयोग पारिजात' या ग्रंथात म्हटले आहे की 'वेदार्थोपनिबद्धत्वात् प्राधान्यं तु मनुस्मृते:। मन्वर्थविपरीता तु या स्मृति:

सा विनश्यति।। यत् पूर्वं मनुना प्रोक्तं धर्मशास्त्रमनुत्तमम्। न हि तत् समतिक्रम्य वचनं हितमात्मन:।।' यातील आशय असा की मनूने आपल्या स्मृतिग्रंथाची जी रचना केली आहे, ती पूर्णपणे वेदाच्या आदेशाशी संबद्ध आहे. म्हणून तिला स्मृतिग्रंथात प्राधान्य आहे. मनूने धर्मशास्त्र म्हणून जे काही सांगितले आहे ते श्रेष्ठ प्रतीचे आहे. त्याला धरूनच वागणे आपल्या हिताचे आहे.

आपल्या परंपरेत स्मृतिग्रंथाची रचना पुष्कळांनी केली आहे. एके ठिकाणी अठरा स्मृतिकार आणि अठरा उपस्मृतिकार यांचा उल्लेख आहे.

यापूर्वी आनंदाश्रम, नागप्रकाशक, मोतीलाल बनारसीदास इत्यादींनीहि अनेक स्मृतिग्रंथ प्रकाशित केले आहेत. त्यात मनुस्मृतीव्यतिरिक्त पंचवीस ते पासष्ट स्मृती संग्रहीत आहेत.

मनुस्मृतीच्या खालोखाल याज्ञवक्ल्य, पाराशर, देवल, वसिष्ठ यांच्या स्मृतींना मान्यता आहे.

मनूच्या अगदी विपरीत अशी विधाने बहुधा कोणत्याहि स्मृतिकारांनी केलेली नाहीत. पण काही स्मृतीतून आचार आणि प्रायश्चित्त मनूपेक्षा सौम्य आहे. हाच नियम अपराधांना मिळणाऱ्या कठोर शिक्षांच्या संबंधातहि उल्लेखिता येईल.

समाजव्यवस्थेच्या संदर्भात मनूने जे चार वर्ण, आश्रम आणि चार पुरुषार्थ सांगितले आहेत, त्याचाच अवलंब सर्वच्या सर्व स्मृतीकारांनी केला आहे, असेच आढळून येते. आणि चातुर्वर्ण्य व्यवस्था ही जन्माधिष्ठित असल्याचेच सर्व स्मृतिकार सांगतात. वर्णसंकराला सर्वांचा सारखाच विरोध आहे. वर्णसंकरामुळेच आणि त्यातील अनुलोम-प्रतिलोम मिश्रणामुळे निरनिराळ्या जाती उत्पन्न झाल्या. असेच बहुतेक स्मृतिकार मानतात. म्हणजे समाजरचनेचे मूलभूत अधिष्ठान सर्वांना सारख्याच प्रमाणात स्वीकार्य आहे असे दिसते.

आपल्या देशात राज्ये लहान लहान होती. क्वचित् आजचे तालुकेहि त्यापेक्षा मोठे असतील, त्यांची आपसात युद्धेहि होत. क्वचित् कपटांचा अवलंब करून घातपातहि होत. पण त्यामुळे कोठेहि समाजधारणेत व्यत्यय येत नसे. वर्णव्यवस्था सर्व लहानमोठ्या राज्यातून सारख्या स्वरूपात अस्तित्वात असे. आजहि केरळपासून आसामपर्यंत, तामिळनाडूपासून काश्मीरपर्यंत वर्णव्यवस्था टिकून असल्याचे आढळून येते. मधूनमधून मोठीमोठी साम्राज्ये निर्माण होत. पण त्यामुळेहि समाजधारणेच्या चौकटीला धक्का बसत नसे. अकराशे-बाराशे वर्षांच्या क्रूर आक्रमणातून हिंदुस्थानचे स्वत्त्व पुष्कळ प्रमाणात टिकून राहिले.

हिंदुस्थानचा सर्वनाश झाला नाही. याला जी काही कारणे आहेत त्यात आपली वर्णव्यवस्था, जातिव्यवस्था हेहि एक महत्त्वाचे कारण आहे. वैयक्तिक चर्चेत चांगले विचारवंत ही गोष्ट स्पष्टपणे मान्य करतात. अनेक कारणांनी ते तसे उघड बोलत नाहीत इतकेच.

आपल्या एक सहस्रयुगचतुष्कांचा (एक युगचतुष्क मनुष्याच्या त्रेचाळीस लक्ष वीस सहस्र वर्षांचे आहे) ब्रह्मदेवाचा एक दिवस होतो. आणि तेवढीच त्याची रात्रहि असते. (ब्रह्मदेवाचे एक अहोरात्र म्हणजे ८.६४ x $१०^{९}$ मानवी वर्षे) ब्रह्मदेवाचा दिवस उजाडताच त्याच्या संकल्पानेच सृष्टीरचनेचा आरंभ होतो. त्याची रात्र ही लयाची रात्र आहे. ब्रह्मदेवाच्या एका दिवसात चौदा कल्प होतात. एकेक कल्पाचा एकेक मनू असतो. म्हणजे ब्रह्मदेवाच्या एका दिवसात चौदा मन्वंतरे होतात.

ब्रह्मदेवाच्या शंभर वर्षे आयुष्यातील आतापर्यत पन्नास वर्षे पूर्ण झाली आहेत. आणि एकावन्नाव्या वर्षाचा सध्या (बहुधा) पहिला दिवस चालू आहे. या पहिल्या दिवसात एकूण चौदा मन्वंतरे व्हावयाची आहेत. चौदा मन्वंतरांची नावे पुराणादि ग्रंथातून आली आहेत. ती क्रमाने अशी– १)स्वायंभुव, २) स्वारोचिष, ३) उत्तम, ४) तामस, ५) रैवत, ६) चाक्षुष, ७) वैवस्वत, ८) सावर्णि, ९) दक्षसावर्णि, १०) ब्रह्मसावर्णि, ११) धर्मसावर्णि, १२) रुद्रसावर्णि, १३) रौच्य, १४) भौत्य

या नावासंबंधी पुराणामध्ये मतभेद आहेत. विशेषत: नऊ ते चौदा मनूंच्या नामाविषयी पाठभेद आहेत.

सध्या पहिली सहा मन्वंतरे पूर्ण झाली असून सातव्या ‘वैवस्वत’ मन्वंतराचे अठ्ठाविसावे कलियुग चालू आहे.

आज जी मनुस्मृति प्रसिद्ध आहे, ती मुळात स्वायंभुव मनूने सांगितली असून तिची मांडणी (संपादन) मनूचा पट्टशिष्य असलेल्या भृगूने केली आहे. सध्या वैवस्वत मनूने तिचीच पुन्हा मांडणी नव्याने केली असणार. आधुनिक विचारवंतांना विशेषत: इतिहासाचा मागोवा घेणारांना हे सर्व न उलगडणारे कोडे, गौडबंगाल वाटत असणार. या प्रकरणात शब्दप्रामाण्यावाचून कोणतेहि प्रमाण उपलब्ध होण्याची शक्यता नाही. सध्या तरी नाहीच नाही. त्या वादात खोल शिरण्याचे मला कारण नाही. मी सध्या उपलब्ध असलेली मनुस्मृति आहे तशी प्रमाण मानून तिच्या संबंधीचे माझे विचार वाचकापुढे मांडीत आहे.

कितीहि नाकारले तरी आपण सर्व मानव मनूचेच वंशज, म्हणून मानव

आहोत. निरनिराळ्या भाषेतील मनुष्यवाचक शब्द मनू शब्दावरूनच निघालेले आहेत. काही मतभेद असू शकतात. पण त्यासाठी सर्व परंपराच नाकारणे हे काही बुद्धिमत्तेचे खरे लक्षण नाही.

मनुस्मृतीचे महत्त्व जगतातील पुष्कळ विचारवंतांनी मान्य केले. समाज, शासन, न्याय या संबंधी सूक्ष्म विचार करून नियम सांगणारा मनू हा पहिला पुरुष आहे. त्याने मांडलेले अनेक विचार आजहि सर्वमान्य होण्यासारखे आहेत, असे मत पुष्कळांनी प्रतिपादिले आहे.

मनुस्मृतीने परलोक, पुनर्जन्म मान्य केला असला आणि त्यांच्या अनुषंगाने काही कर्मकांड, काही विधिनिषेध सांगितले असले, तरी मनूचा मुख्य भर ऐहिक जीवनहि सात्त्विक आणि समृद्ध असावे यावरच आहे. त्यादृष्टीनेच मनुस्मृतीने वर्णव्यवस्था आणि आश्रमव्यवस्था लावून दिली आहे.

मनूने वर्णव्यवस्था सांगितली, स्त्रियांच्या वर्तनाविषयी काही मर्यादा उल्लेखिली, अस्पृश्य म्हणून वर्णसंकरातून उत्पन्न झालेल्या एका गटाचा उल्लेख केला. याविषयी पूर्वी विस्ताराने लिहिले आहे.

आता नित्यकर्म, श्राद्धादीवर दिलेला भर, राजाची कर्तव्ये, शासनव्यवस्था, न्यायव्यवस्था, अर्थकारण याविषयी त्यामागील भूमिकेच्या दृष्टीने काही विचार मांडणे आवश्यक आहे.

वास्तविकरीतीने विधिनिषेधपर असलेल्या धर्मशास्त्राचे स्वरूप सांगताना मनूने प्रथम सृष्टीची उत्पत्ति कशी होते ते साांगितले आहे. हे लक्षात घेतले म्हणजे मग मनूने विस्तारलेल्या कर्मकांडाचे महत्त्व लक्षात येऊ शकते. पृथ्वीव्यतिरिक्त निरनिराळे लोक अस्तित्वात आहेत. त्यात केवळ स्वर्ग आणि नरक एवढेच दोन भाग नाहीत तर विश्वाच्या शासनात सहभागी होणारे आणि मनुष्यलोकाशीहि प्रत्यक्ष–अप्रत्यक्षपणे सहभागी असलेले अनेक देवतागण आहेत. आणि त्यांचे स्वतंत्र लोकहि आहेत. मनुष्याच्या जीवाचा मंत्रशक्तीच्या आधारे केलेल्या कर्मामुळे या देवतालोकाशी संबंध प्रस्थापित होतो. आणि त्याचा लाभ त्याला इहलोकी तसाच परलोकीहि मिळू शकतो. अशी आपली दृढश्रद्धा आहे. तिला काही आधुनिक बुद्धिवादी समजतात त्याप्रमाणे गबाळी मानण्याचे काही कारण नाही.

गुरुत्वाकर्षण, वीज, चुंबक, ध्वनि, प्रकाश या जशा शक्ति आहेत आणि त्यांचा उपयोग करून आधुनिक विज्ञानात संगणक, दूरदर्शन, अवकाशयाने, क्षेपणास्त्रे, दूरनियंत्रणाची व्यवस्था अशा वस्तुत: सामान्यत: चमत्कार वाटाव्यात अशा कितीतरी

गोष्टी आपण आज अनुभवित आहोत. कारण त्यामागील कार्यकारणांची मीमांसा शास्त्रज्ञांच्या शब्दावर विश्वास ठेवून आपण मान्य केली आहे. त्यामुळे आज तरी कोणी आश्चर्यचकित होत नाहीत.

मंत्र ही अशीच एक शक्ति आहे. आज तिच्याभोवती अद्भुततेचे एक वलय निर्माण झालेले आहे. त्याचे कारण मंत्रविज्ञान कोणी अधिकारी पुरुषाने सविस्तरपणे प्रतिपादिलेले नाही.

मंत्रशक्तीचा अनुभव यावयाचा तर त्यासाठी मुख्यत: मंत्रप्रयोग करणाराची शरीर–मन–बुद्धि आणि, देश–काल–परिस्थिति हीच महत्त्वाची साधने असतात. मंत्रामध्ये विशिष्ट अनुक्रमाने, आनुपूर्वीने स्वर–वर्ण–व्यंजनांची रचना केलेली असते. तेथे निर्माण झालेल्या शब्दाचे अर्थदृष्ट्या महत्त्व गौण असते. त्या त्या शब्दांच्या व वर्णांच्या उच्चारातून निर्माण होणारे स्वर ध्वनि, त्यांचे स्पंद, त्यांची कंपने यांना महत्त्व असते. त्यांचे स्वरूप योग्य प्रकारे नियंत्रित करावे लागते. आणि त्या वर्णाचा वा शब्दांचा उच्चार करण्याचे सामर्थ्य तसे प्रयोग करू इच्छिणाराच्या शरीर–मन–बुद्धीत असावे लागते. सतारीसारख्या तंतुवाद्यांचा विचार केला तर ही गोष्ट लक्षात येऊ शकेल. सतारीकरिता विशिष्ट जातीतेच लाकूड अधिक चांगले समजले जाते. सतारीच्या दांड्यातील पन्हळ योग्य लांबी रुंदी खोलीची असावी लागते. पन्हळीचा आकार आणि कडेची जाडी यालाहि महत्त्व असते. तीच गोष्ट दांड्याच्या खाली असलेल्या भोपळ्यासारख्या पोकळ भागाची. सोने आणि चांदी हे धातू मौल्यवान् असले तरी सतारीला तारा लागतात त्या लोखंडी पोलादाच्या. त्या तारांची जाडीहि झंकारण्याच्या दृष्टीने योग्य प्रकारची असावी लागते. खुंट्या, पडदे, मणी यांच्या रचनेत, मांडणीत विशिष्टता असावी लागते. यानंतर मग वाजविणाराच्या कौशल्याचा भाग असतो. ते उणे–अधिक असेल त्याप्रमाणे सतार वादनातील माधुर्य, आकर्षण प्रगट होत असते.

हीच गोष्ट मंत्र आणि त्याचा उच्चार करणाराच्या संदर्भात लक्षात घेतली पाहिजे. मंत्रसाधना हे एक मोठे अवघड प्रकरण आहे. त्यासाठी दीर्घकाल साधना करावी लागते. साधना करणाराचे शरीरहि साधना करण्यास योग्य असे असावे लागते. आणि वेगवेगळ्या प्रकारचे आहार–विहाराचे नियम पाळून ते तसे राखावे लागते. साधनेत काटेकोरपणा आणि सातत्य याला फार महत्त्व आहे. यासाठी दीर्घकाल वाट पहावी लागते. आणि धैर्याने प्रयत्नात थोडेहि शैथिल्य येणार नाही हे लक्षात ठेवून वागावे लागते.

मनूने सांगितलेले स्नानसंध्या-जप-पंचमहायज्ञ- आहारविहारासंबंधीचे विधिनिषेध हे सर्व मंत्र आणि शरीर यांच्या सिद्धतेसाठी उपयोगी पडावयाचे असते.

मनूने सांगितलेल्या कर्मकांडात श्राद्धाचे विशेष महत्त्व आहे. इतर स्मृतिग्रंथातूनहि हा विषय प्राधान्याने उल्लेखिला आहे. देव आणि पितर यांना उद्देशून हे कृत्य करावयाचे असते. त्यामुळे देव-लोक-पितृलोकाशी मनुष्यलोकाचा संबंध जोडला जातो. देव आणि पितर यांच्या संतोषामुळे अनिष्टाचा परिहार आणि इष्टाची प्राप्ति यांचा संभव वाढतो. हे सामर्थ्य मंत्रांचे आहे. याच्या जोडीला श्रद्धेचे भावाचे पाठबळ असल्यास अनुभव विशेष रीतीने येतो. मनुष्याच्या शक्याशक्यतेचा विचार करून याविषयीची कृति सहज आणि सोपी झालेली आहे. त्यालाहि शास्त्राचा आणि परंपरेचा आधार आहे.

श्राद्ध हे बाप-आजा-पणजा यांना उद्देशून प्रामुख्याने केले जात असले तरी ते केवळ त्यांच्यापुरतेच नसते. पितृलोकातील पितर हा जो देवतागण त्यांच्या प्रसन्नतेचा भागहि श्राद्ध या कर्माशी संबद्ध आहे. म्हणून आपले प्रत्यक्ष पितर आज आता पितरलोकात आहेत की नाहीत? ते स्वर्गलोकी गेले असतील, पुन्हा कुठे जन्माला आले असतील, अशा स्थितीत त्यांच्या नावाने केलेल्या श्राद्धाचा उपयोग काय? अशी शंका घेऊन श्राद्ध करण्याचे टाळू नये. श्राद्ध या विषयाचा इतका विस्तार आणि नेमकेपणा केवळ हिंदू परंपरेतच आहे. हे जरी खरे असले तरी यामागील भाव मनुष्य जाति जेथे कोठे आहे तेथे तेथे उपस्थित आहे, आणि त्याला अनुसरून काही विधीहि केले जातात. हिंदू धर्माने मनुष्यामध्ये नैसर्गिकपणे असलेल्या प्रत्येक गोष्टीचे एक शास्त्र निर्माण केले आहे. ते आपापल्या परीने विशिष्ट विज्ञानाशी संबद्ध आहे.

'प्रज्ञालोक' या भारतीय संस्कृतीच्या प्रचार -प्रसारासाठी वाहून घेतलेल्या त्रैमासिकात मंत्र-श्राद्ध या विषयांचा उहापोह निरनिराळ्या अंकात पुष्कळ प्रमाणात आलेला आहे. आणि त्याची उपयुक्तता पटवून देण्याचाहि प्रयत्न साक्षेपाने केला आहे. सर्वसामान्य मनुष्याच्या दृष्टीने हे दोन्ही विषय अतीन्द्रिय आहेत. हे खरे पण सात्त्विक बुद्धीच्या प्रज्ञावान् पुरुषाने हे विषय कळकळीने प्रतिपादिले आहेत. ते महापुरुष तपस्वी, निस्पृह आणि सर्व भूतांच्या हिताची चिंता वाहणारे असेच होते. प्रामाणिक राहून त्यांच्या आदेशाचे यथाशक्ति पालन करणे हेच हिताचे आहे.

श्राद्ध हे कृतज्ञतेचे प्रतीक आहे. कृतज्ञता हा माणसाचा सर्वात मोठा सद्‌गुण आहे. कृतघ्नपणाला प्रायचित्त नाही असे आपले शास्त्र सांगते. घरामध्ये सुख-शांति-समाधान नांदावे अशी अपेक्षा सर्वांचीच असते. तशी असावी. पण त्यासाठी घरामध्ये परंपरागत कुळधर्म-कुळाचार, पंचमहायज्ञ, श्राद्ध -पक्ष, वडिलांचा, गुरुजनांचा आदर-सन्मान, या गोष्टी कटाक्षाने घडत राहिल्या पाहिजेत. त्यामुळे अनिष्ट दूर राहण्यास, नाहीसे होण्यास मोठे सहाय्य होते.

जो नास्तिक आहे, ईश्वरी सत्तेवर, परलोकावर, कर्मविपाकाच्या त्रिकालाबाधित सिद्धांतावर ज्याची श्रद्धा नाही त्याला या गोष्टी पटणार नाहीत. पण त्याला पटत नाहीत म्हणून या सर्वांचे सत्यत्व काही नाहीसे होत नाही. वास्तवात असणाऱ्या सगळ्याच गोष्टी अनुभवास येतात, असे नाही. गुरुत्वाकर्षणाची जाणिव होत नाही. शरीरावर असणाऱ्या वायुमंडलाच्या मणावधि भाराचे भान कोणासच नसते. पृथ्वीचा स्वत:भोवतीचा ताशी एक सहस्र मैलाचा आणि सूर्याभोवतीचा ताशी सहासष्टसहस्र मैलाचा प्रचंड वेग, कोणाच्याहि कधीच अनुभवास येत नाही. शास्त्रज्ञाच्या शब्दावर विश्वास ठेवूनच या सर्वांचा स्वीकार करावा लागतो. अशा परिस्थितीत श्राद्ध संकल्पना, परलोक या गोष्टी अमान्य करणे हे काही बुद्धिमत्तेचे लक्षण नाही.

परलोकाची संभवनीयता तर अलिकडे काही भौतिकशास्त्रज्ञ, खगोलशास्त्रज्ञहि मान्य करू लागले आहेत. अंतराळ अनंत अपार आहे. त्यात शतावधि-सहस्रावधि आकाशगंगा, तारकामंडले आहेत. आपण ज्या पृथ्वीवर राहतो ती आपल्याला दिसणाऱ्या सूर्याच्या ग्रहमंडलातील एक ग्रह आहे. आपल्याला जी आकाशगंगा अंधाऱ्या रात्री मधून मधून दिसते, तिच्यातील आपले सूर्यमंडल हा अगदी नगण्य असा एक लहानसा भाग आहे. आपल्याच आकाशगंगेत असे सहस्रावधि सूर्य आहेत. एकमेकांपासून लक्षावधि प्रकाशवर्षे अंतरावर असलेल्या आकाशगंगातून आपल्या सूर्यमालेसारख्या कितीतरी सूर्यमाला आहेत. त्यात पृथ्वीसारखे समृद्ध, विकसित अनेक ग्रह असणे संभवनीय आहे. आपल्या परंपरेमध्ये 'भू: भुव: स्व: मह: जन: तप: सत्यम्' असे सात वरचे; तर, 'अतल वितल सुतल तलातल रसातल महातल पाताल' असे सात खालचे लोक मानलेले आहेत. उपनिषदे, स्मृतिग्रंथ, पुराणे यातून यांचा उल्लेख येतो. यातील भूर्लोक म्हणजे पृथ्वी. तिच्या दृष्टीने वर आणि खाली असे शब्द सोयीसाठी वापरले आहेत. ते

स्थूलदृष्टीने दिग्दर्शक आहेत. यामधील अंतरे लक्षावधि प्रकाशवर्षाची आहेत. म्हणून भौतिक दृष्टीने त्या सर्वांचे प्रत्यक्ष ज्ञान होणे अशक्यप्राय आहे. पण 'त्यांचे अस्तित्वच नाही' हे म्हणणे मात्र साहसाचे आहे. पतंजलीने आपल्या योगशास्त्रात या विविध लोकांचे ज्ञान होणे अशी एक सिद्धी सांगितली आहे आणि तिच्या प्राप्तीसाठी एक विशिष्ट साधनाहि सांगितली आहे. अर्थात् ते प्रकरण फार कठीण आहे. पण महामुनी पतंजलीसारखा एक थोर अधिकारी असलेला तत्त्ववेत्ता हे सांगतो आहे. त्यावर अविश्वास दाखविण्याचे काहीच कारण नाही. जी गोष्ट परलोकाची तशीच काहीशी ईश्वरी सत्तेची. कार्याच्यामागे कुणीतरी समर्थ कर्ता असणे ही गोष्ट प्रत्यक्षगम्य अशा व्यावहारिक सत्तेत कधीच नाकारता येत नाही. वेरूळचे लेणे बांधणारा स्थापत्यविशारद कोण? शिल्पशास्त्रज्ञ कोण? याचे ज्ञान आज कोणालाच नाही. ते तसे होण्याची शक्यताच नाही. म्हणून कैलासासारखे लेणे आपोआप घडले, भूमीतून स्वयंभूपणे प्रगटले हे म्हणणे जसे हास्यास्पद आहे, तसेच सृष्टित आपोआपी नाही. सर्व काही योजनाबद्ध रीतीने चाललेले असते. ही योजना ज्याने आखली तोच ईश्वर.

सृष्टि आपोआप झाली वा आपोआप चालते, असे वाटत असेल तर तो त्या सर्वसमर्थ, सर्वज्ञ असलेल्या ईश्वराच्या अपार कौशल्याचा एक सहज आविष्कार आहे. विचार करणे सोयीचे जावे म्हणून दोन उदाहरणे वाचकापुढे ठेवतो.

वस्तूचा आकार उष्णाने वाढतो आणि शीताने संकोच पावतो असा सृष्ट पदार्थांचा सामान्य नियम आहे. पण पाणी हे एका विशिष्ट मर्यादेपलीकडे या नियमाला अपवाद आहे. सामान्यत: चार तापमानापर्यंत पाण्याचा आकार हा सामान्य नियमाप्रमाणे उणावत जातो. पण त्यानंतर मात्र त्याचा आकार वाढू लागतो. जेव्हा पाण्याचे हिम होऊ लागते तेव्हा वस्तुमान तेवढेच राहून आकार वाढल्यामुळे हिम हलके होते आणि पाण्यावर तरंगू लागते. ही गोष्ट सामान्य नियमाच्या नेमकी विरुद्ध आहे. हा अपवाद झाला नसता तर समुद्राच्या गोठलेल्या पाण्याचा एक हिमरूप ठोकळा झाला असता आणि जलचर नाश पावले असते. त्यांच्या संरक्षणाकरिता हा अपवाद झाला आहे. अर्थातच ते ईश्वरी कर्तृत्व आहे.

दुसरे उदाहरण अणुगर्भाचे आहे. तेथेहि असेच विलक्षण घडते. अत्यंत अत्यंत सूक्ष्म असलेल्या अणूच्या केंद्रात विशिष्ट संख्येत घनाणु(प्रोटॉन) जडाणु

(न्युट्रॉन ) एकत्र असतात. आणि त्याच्या भोवती सामान्यत: धनाणुच्या संख्येइतके ऋणाणु केंद्राच्या आकाराच्या पंधराशेपट अंतरावरून अत्यंत वेगाने परिभ्रमण करीत असतात. ऋणाणूंच्या या परिभ्रमणाला उद्देशून 'म्हणले तर आहे म्हटले तर नाही' अशी मायावादाला शोभणारी भाषा शास्त्रज्ञ वापरीत असतात. समानभार असलेल्या कणांची प्रवृत्ति एकमेकांपासून दूर जाण्याची असते. आणि विषमभार असलेले कण एकमेकांकडे आकृष्ट होतात. अणुकेंद्रामध्ये हा नियम नेमका उलटा होतो. तेथे समानभार असलेले धनकण एकत्र राहतात आणि त्यांच्याशी असमान असलेले ऋणकण पुष्कळ अंतरावरून वावरतात. हे असे घडले नसते तर कोणत्याहि वस्तूला वस्तुत्व म्हणून काही अस्तित्व प्राप्तच झाले नसते. या अपवादामुळेच सृष्ट पदार्थांना अस्तित्व प्राप्त झाले आहे. ईश्वराच्या अगाध सामर्थ्याचाच वास्तविक हा साक्षात्कार आहे.

या दोन उदाहरणावरून तार्किकांनाहि विश्वनिर्मितीच्या मागे जाणिवयुक्त अशा समर्थ शक्तीचे अस्तित्व असल्याचे मान्य करावे लागेल. विश्वातील सर्व घटनांच्या मागे एक विलक्षण योजनाबद्धता आहे. ती कोण्यातरी जाणिवयुक्त महाशक्तीची संयोजना आहे. आम्ही परंपरावादी त्या शक्तीलाच ईश्वर म्हणतो.

या ईश्वरी शक्तीचा लाभ मनुष्यजीवाला मिळावा यासाठीच सर्व कर्मकांडे, उपासनापद्धति, जपध्यानादि साधना हे सर्व अस्तित्वात आलेले आहे. मनुष्य हा साच्यात घालून विटा पाडाव्या तसा कधी घडत नाही. त्याची शरीररचना, शरीरक्रिया जरी एकसारखी असली तरी देश-काल-परिस्थिति आणि जन्मजन्मांतरीचे संस्कार यामुळे त्याच्या मनबुद्धीच्या जडणघडणीत आणि अहंकाराच्या बलाबलात पुष्कळ अंतर असते. तेथे अनेक प्रकारची विविधता अस्तित्वात असते. त्यामध्ये आवडीनिवडीहि वेगवेगळ्या राहतात. नानाप्रकारच्या उपासनापद्धति निर्माण झाल्या त्या सर्व मनुष्यमात्राची प्रगति उन्नतीच्या दृष्टीने सोय व्हावी म्हणूनच. शास्त्रदृष्टीने या उपासनांमध्ये महाविद्यालयीन पद्धतीच्या इयत्तांची ही श्रेणीहि असते पण अहंकारभावनेला इयत्तांची ही श्रेणी मानवत नाही. म्हणून साधकाची श्रद्धा दृढावण्यासाठी 'तुला सांगितले गेलेले, तू करतोस ते, तुला भावते ते, तेच श्रेष्ठ आहे, इतरांची योग्यता तेवढी नाही' असे आवर्जून उपदेशावे लागते. त्यामुळेच तत्त्वज्ञान आणि उपासनापद्धति यात कधीकधी वेगळेपणाच नव्हे तर विसंगति वा विरोध असल्याचेहि आढळून येते. प्रामाणिक जिज्ञासूने व्यापक प्रमाणात शास्त्रांचे अध्ययन केले, नि:पक्षपातीपणाने, तटस्थपणे ग्रंथवचनांचे सखोल अध्ययन केले

तर समन्वयाची दृष्टी लाभून सुसंगति उलगडते. सोलीव सत्याचा उमज पडतो. सर्व संशयाचा निरास होतो. संभ्रम मावळतात. बुद्धि स्थिरावते. अंत:करण शांत आणि प्रसन्न होते, राहते.

पूर्वी आपल्या भाषेत असे केले, असे वागलो तर ते कुठे फेडू असा वाक्प्रचार रुढ होता. तो सुशिक्षितात, अशिक्षितात, नागरजनात, खेड्डुतात जवळजवळ सारख्याच प्रमाणात रुढ होता. त्यामागे ईश्वरनिष्ठा, कर्मविपाक आणि पुनर्जन्म (पूर्वजन्महि) याविषयीची धारणाच मूलभूत होती.

पूर्वजन्म–पुनर्जन्म हा कर्मविपाक या सिद्धांताचाच उपसिद्धांत आहे. काही संप्रदाय ईश्वर मानीत नाहीत, पण जीव मानतात. काही जीव वा आत्माहि मानीत नाहीत. तरी पूर्वजन्म आणि पुनर्जन्म मात्र मान्य करतात हे आश्चर्यकारक असले तरी वास्तव आहे.

अलिकडे 'पुनर्जन्म' या विषयावर विदेशात आणि आपल्याकडेहि पुष्कळ लेखन उपलब्ध आहे. मृत्यूनंतरचे जीवन हा अनेक बुद्धिमंतांच्या संशोधनाचा विषय आहे. अनुभवास आलेल्या काही घटनांमुळे जन्मजन्मांतर मान्य करावे लागते. ते अनेक ग्रंथातून प्रसिद्धहि झाले आहे. पुनर्जन्म प्रतिपादिणाऱ्या या पुस्तकांचे लेखक कोणी सनातनी धर्ममार्तंड नाहीत. परंपरावादी तर नाहीतच नाही. ते आधुनिक विद्याभूषित आहेत. साहित्यिक आहेत. तेव्हा आता कर्मविपाक, पुनर्जन्म हा वादाचा विषय होऊ नये. त्यांच्यावर श्रद्धा ठेवून सत्कर्माचे आचरण करावे. त्यासाठी यथाशक्ति विधिनिषेध पाळावेत. हेच मनुष्याच्या हिताचे आहे.

कर्माचा विपाक असतो, परिणाम असतो. तो बरा–वाईट जसा असेल तसा अपरिहार्यपणे भोगावाच लागतो. पण ईश्वरी योजनेत मनुष्याला काहीप्रमाणात कर्मस्वातंत्र्य लाभले आहे. कार्यामागचे कारण शोधण्याची बुद्धि त्याला मिळालेली आहे. त्याचा लाभ घेऊन त्याने आपला आचारविचार सुधरावा आणि त्या बळावर उन्नति–प्रगति–विकास साधावा. पण खेदाची गोष्ट अशी की प्रगति आणि विकासाची ही घोडदौड विज्ञानाच्या वाटेने आणि केवळ सुखसोयींच्या दृष्टीने होते आहे. त्यात मानवी जीवनाच्या उन्नतीचा विचार दुर्लक्षित होतो आहे. पंचज्ञानेंद्रियांची आणि कर्मेंद्रियांची सोय वाढविणारी जी साधने उपलब्ध होत आहेत, त्याच मापाने प्रगति वा विकास मोजला जातो आहे. हे वस्तुत: योग्य नाही. मनुष्याचे अंत:करण किती उदात्त झाले, किती सात्त्विक झाले, किती निस्वार्थी झाले त्या

प्रमाणात मानवी उन्नति मोजली पाहिजे. हे माप पुरविणे हेच धर्मशास्त्राचे इतिकर्तव्य आहे. स्मृतिग्रंथ, पुराणे, महाभारत, रामायणासारखे इतिहास, आणि ज्ञानेश्वरादि संतांची बोधवचने, हेच कार्य करीत असतात. स्मृति या सर्व वाङ्मयात प्रमुख. स्मृतिग्रंथात कार्य-अकार्य, विधिनिषेध, पुण्य -पाप, ग्राह्य-त्याज्य, क्षम्य-निंद्य यांचा विचार अनेक प्रकारांनी येतो. तो मानवी जीवन उन्नत होत होत परमपदाला प्राप्त व्हावे, हाच असतो.

वर्णव्यवस्था, आश्रमव्यवस्था, पुरुषार्थकल्पना आणि साधनामार्ग या पद्धतीने मनुष्याच्या कर्माला योग्य ते वळण लागावे याच भावनेने मुख्यतः स्मृतिग्रंथांची निर्मिती झालेली आहे. पण हे सर्व परलोकसाधनेसाठी आहे, असा अपसमज मात्र कुणी करून घेऊ नये. स्मृतिग्रंथात शासनव्यवस्था, न्यायसंस्था, कुटुंबव्यवस्था, तदंतर्गत नाते संबंध, या संबंधीहि पुष्कळ विचार मांडला गेला आहे.

आज मनुस्मृतीविषयी काही बरे बोलणे एका गटात चांगले मानले जात नाही. हा गट स्वत:ला बुद्धिवादी समजतो. त्यांच्यापेक्षा वेगळे मत असलेल्यांना बुरसटलेले, अंधश्रद्ध, गतानुगतिक असे काही काही म्हणत असतो. या गटाचा प्रचारमाध्यमावर प्रभाव आहे. जातायेता काही निमित्त सापडल्यामुळे वा कारणा-वाचूनहि मनूवर आक्षेप घेणे, त्याच्या विचारांना कालबाह्य, तुच्छ इतकेच नव्हे तर निंद्यहि ठरविणे हा या बुद्धिमंतांचा आवडता उद्योग आहे. मेकॉलेने पुरस्कारिलेल्या पाश्चात्य प्रभावाच्या शिक्षणातून पदवीधर झालेल्या तथाकथित पुढारलेल्या लोकांचा एक मोठा गट हिंदू समाजात नांदतो आहे. सर्वत्र त्यांचेच वर्चस्व आहे. राजकीय पुढारीहि स्वत:ची प्रासंगिकता प्रगट करण्यासाठी मनूला कालबाह्य ठरविणेच आवश्यक समजतात. 'मनुवादी' ही आजकाल एकप्रकारे शिवी झालेली आहे.

कोणी उघडपणे मान्य करो वा न करो, मनूची धारणा हिंदू समाजात अजूनहि तशी कालबाह्य झालेली नाही. कारण ती धारणा मुळात समाजजीवनाच्या दृष्टीने हितकर आहे. समाज संघर्षरहित असावा, त्यातील लहानमोठ्या गटाला, व्यक्तीला वा कुटुंबाला सुखी-समाधानाने शांतपणे जगता यावे अशी व्यवस्था मनूच्या योजनेत आहे. कालाच्या ओघात विशेषत: पारतंत्र्याच्या प्रभावाने मनुप्रणित व्यवस्थेत काही दोष निर्माण झाले आहेत, हे खरे. पण त्यामुळे मूळ व्यवस्थाच त्याज्य मानणे, हे अज्ञानी अहंकाराचे द्योतक आहे. निर्माण झालेले दोष काढून टाकले पाहिजेत यात लवमात्र शंका नाही. पण निर्माण झालेल्या दोषामुळे मूळची व्यवस्थाच नष्ट करण्यास योग्य म्हणणे म्हणजे रोग झालेल्या व्यक्तीला मारून टाकले पाहिजे म्हणण्यासारखे

आहे. मनूची व्यवस्था सामाजिक क्षेत्रात आज दुखणाईत आहे. मुमुर्षु नाही. तिला मारून टाका म्हणणे हे अन्यायाचे आहे. स्वत:च्या पायावर धोंडा पाडून घेण्यासारखे आहे. शहाण्या माणसाने हिताचे काय आणि वरवर सोयीचे वाटते ते काय, याचा विचार केलाच पाहिजे. जे आपल्या हिताचे ते निदान स्वत:च्या हाताने नष्ट करण्याचे पाप तरी करू नये. मनुस्मृतीतील विचार मान्य नसणे शक्य आहे. पण मला जे मान्य नाही ते तुम्हालाहि मान्य असता कामा नये, ही अरेरावी शोभणारी नाही. मनुस्मृति जाळण्यास योग्य मानणे वा जाळणे हे तर फारच दोषास्पद आहे. आपला (आपल्या संस्कृतीचा) तो स्वभाव नाही. वेदाला पवित्र, पूजनीय, प्रमाण मानणाऱ्यांनी चार्वाकाचा ग्रंथ जाळला नाही. चार्वाक नास्तिक आहे. तो ईश्वर, परलोक मानीत नाही. यज्ञयाग–श्राद्धपक्ष निरर्थक आहेत म्हणतो. त्यांची टवाळी करतो. वेदाला अप्रमाण मानतो. इतकेच नव्हे तर वेदांची अत्यंत कटु शब्दात निंदा करतो. तरी वेदानुयायी त्याचे मत त्याच्या सर्व भल्या–बुऱ्या विधानांसह आपल्या तत्त्वज्ञानाच्या क्रमिक पुस्तकात स्वीकारतो आणि तत्त्वज्ञानाच्या क्रमिक पाठ्यक्रमात शिकवतो. 'सर्वदर्शनसंग्रह' हे तत्त्वज्ञानविषयक सर्वप्रसिद्ध असे पाठ्यपुस्तक अवश्य पहावे. त्यातले पहिले प्रकरण चार्वाकाचे आहे. मग जैन–बुद्ध–वेदान्ती इत्यादींची आहेत. तेव्हा मनूचे विचार मान्य नाहीत हे म्हणणे निराळे आणि मनुस्मृति जाळणे निराळे.

मनुस्मृतीने सांगितलेली धर्मकृत्ये उण्याअधिक प्रमाणात आजहि समाजात पुष्कळ प्रमाणात रुढ आहेत. साधारणत: दोन–एक वर्षापूर्वी पुण्यात मनुस्मृतीवर एक परिसंवाद झाला. त्यात मनुस्मृति कशी कालबाह्य झाली आहे हे सांगताना श्राद्ध पक्षाचा उल्लेख केला. पण आश्चर्य म्हणजे स्वत:ला पाखंडी म्हणवून घेण्यात भूषण मानणारे त्या परिसंवादाचे अध्यक्ष स्वत: ' मी परंपरागत पद्धतीने वडिलांचे श्राद्ध करतो.' असे लेखरूपाने प्रकट करणारे होते. भूमिका तीच राहते. ती स्वीकारावीच लागते. बाह्यतंत्र थोडे उणे अधिक होते इतकेच.

एखादा मनुष्य निरोगी, सशक्त आणि कार्यक्षम असताना त्याचा जो आहारविहार असतो तो रुग्णस्थितीत जसाच्या तसा कधीच रहात नाही. हिंदू समाजाची स्थिती तशीच आहे. मनू सशक्त, समर्थ आणि साक्षेपी समाजाचे स्वस्थवृत्त सांगत आहे. त्यातील विधिनिषेध नीतिनियम समाजाचे परिपूर्ण स्वास्थ्य टिकवून ठेवण्याच्या दृष्टीने सांगितलेले आहेत. आजचा समाज व्याधिजर्जर आहे. तेव्हा मनुस्मृतीतील काही विधिनिषेध त्याला सोसणार नाहीतहि. प्रश्न आज, आता, काय,

कसे, कोणी, किती करावे हा नाही. मनूने समाजरचनेची जी योजना मांडली आहे ती समाजाच्या परिपूर्ण स्वास्थ्याच्या दृष्टीने हितकर आहे की नाही याचा विचार कर्तव्य आहे.

मनूने विषमतेचा पुरस्कार केला आहे, स्त्रीला दास्यात ठेवून स्त्रीवर्गावर अन्याय केला आहे, अस्पृश्यता मानून त्यांना हीन लेखले आहे, चातुर्वर्ण्य व्यवस्था सांगून समाजातील समरसतेची हानी केली आहे, उच्चनीच भेदाचे समर्थन केले आहे, चातुर्वर्ण्य जन्मावर ठेवले आहे, इत्यादि इत्यादि आक्षेप मनूवर घेतले जातात. त्यासाठी वेद प्रमाण असल्याचा आव आणून वेदात चातुर्वर्ण्य व्यवस्था नाही असे प्रतिपादिले जाते. या सर्व आक्षेपांच्या संदर्भात येथे यथाशक्ति विचार मांडले आहेत. वाचकांनी मोकळ्या मनाने त्यावर चिंतन करावे. अशी अपेक्षा आहे.

चातुर्वर्ण्य व्यवस्था ही समाजाची नैसर्गिक स्वाभाविक अशी व्यवस्था होती, आहे. समाज परिपूर्ण समृद्धतेने वैभवसंपन्न व्हावयाचा तर त्यासाठी कोणताहि अगदी कोणताहि, एक वर्ग तेवढाच असणे हे पुरेसे नाही. बृहदारण्यक उपनिषदामध्ये म्हटले आहे की, ब्रह्माने ( ईश्वराने ) आधी ब्राह्मण मग त्यानंतर क्रमाने एकेक वर्ग निर्माण केले. कारण प्रत्येकवेळी यावी तेवढी वैभवसंपन्नता प्राप्त झाली नाही. शूद्र वर्ग निर्माण केल्यानंतरच वर्णनिर्मितीची ही प्रक्रिया थांबली. समाज सर्वांगाने सर्वप्रकारे परिपूर्ण झाला. समृद्ध झाला.

यावरून एक गोष्ट लक्षात घेणे शक्य होईल की चातुर्वर्ण्य व्यवस्था ही कोण्याहि एका गटाच्या स्वार्थासाठी वा इतरांच्या शोषणासाठी दुष्ट हेतूने निर्माण झालेली व्यवस्था नसून समाजाच्या सर्वांगीण पूर्ततेसाठी निर्माण झालेली ती एक चांगली व्यवस्था आहे. स्वा.सावरकरांसारख्या सुधारकाग्रणीने ‘मनुस्मृति दुष्टाव्याने लिहिली गेली नाही’ ही गोष्ट नि:संकोचपणे मान्य केलेली आहे. आता नाठाळ बुद्धिवादी ‘काही झाले तरी सावरकर ब्राह्मण होते म्हणून त्यांनी असे म्हटले’ असे म्हणणारच नाहीत असे नाही. ‘ब्रह्मापि तं नरं न रंजयति’ अशा वर्गातील महाभागांचे समाधान कोण करू शकणार ?

मोठी लोकसंख्या असलेल्या कोणत्याहि राज्यात वा राष्ट्रात, धर्मात वा संप्रदायात चार वर्ग असतातच. विद्यासंपादन, विद्यादान, ज्ञानाची जपणूक, त्याचे संवर्धन, समाजाचे प्रबोधन, मार्गदर्शन अशा गोष्टी करणारे लोक हा एक गट. देशाचे– समाजाचे रक्षण करणे, कोणी अपराधी प्रवृत्तीने उद्दंड वागणार नाही असे

पाहणे, अपराध्याला पकडणे, त्याला शिक्षा करणे, शासन चालविणे असे करणारांचा दुसरा गट. अन्नासकट अनेक उपभोग्य वस्तू निर्माण करणे, त्यांचा विनिमय करणे, समाजाचे अर्थकारण संभाळणे, ते वाढविणे हे करणारा तिसरा गट. आणि समाजातील सर्व थरातील लोकांना शरीरकष्टाने व हस्तकौशल्याने सहाय्य करणारे, निरनिराळ्या सेवा (सर्व्हिसेस्) उपलब्ध करून देणारे यांचा चौथा गट.

चातुर्वर्ण्य व्यवस्थेत उद्योग व्यवसायांची श्रमविभागणी अशीच आहे. तिचे वैशिष्ट्य असेल तर ते इतकेच की ती जन्माधिष्ठित आहे. जाति-कुळ-परंपरेने ती वंशाधिष्ठित असावी अशी धारणा आहे. कारण अनुवंश हा त्यासाठी सर्व दृष्टीने लाभदायक होत असतो. अनुवंशातून बावन्न प्रतिशत गुण संततीत उतरतात असे तज्ञ सांगतात. 'अनुवंशिकता वाहक जनुके कोणत्याहि प्रकारची स्वभाव वैशिष्ट्ये ठरविण्यात मोठ्या प्रमाणावर भूमिका बजावतात. यात मद्यासक्ति, अपराधी प्रवृत्ती, बुद्धिमत्ता, राजकीय दृष्टिकोन, मनोविकृति, सौजन्य इत्यादींचा समावेश आहे', असेच त्या तज्ञांचे प्रतिपादन आहे. म्हणून अनुवंश सुरक्षित ठेवण्याचा येथे आग्रहहि धरण्यात आला आहे. चातुर्वर्ण्य इत्यादी संबंधीचे नियम काटेकोरपणे पाळले जातात की नाहीत हे पाहणे हे काम शासनाचे असे. आणि चांगले राज्यकर्ते त्यादृष्टीने कर्तव्यदक्ष असत. कालिदासाने श्रीरामचंद्राचा पूर्वज जो दिलीप त्याच्या राजवटीचे वर्णन करताना म्हटले आहे की **'रेखामात्रमपि क्षुण्णां आमनोर्वर्त्मन: परम्। न व्यतीयु: प्रजा: तस्य नियन्तुर्नेमिवृत्तय:।।'** मनूपासून चालत आलेल्या परंपरेच्या चाकोरीबाहेर त्याची (दिलीपाची) प्रजा एक रेसभरहि जात नसे. सर्व मळलेल्या पायवाटेने सुरक्षितपणे चालत राहात आणि त्यामुळे सुखी असत, समाधानी असत. 'कांहीतरी नवेच करा' हे कुणाचे घोषवाक्य नव्हते. आणि तसे खूळ कोणाच्या डोक्यातहि शिरलेले नव्हते. आज मात्र प्रचारतंत्रामुळे केवळ नवेपणाला भाळलेला गट (विशेषत: तरुणांचा) आहार, विहार, विचार, भाषा, वेष या सर्व दृष्टीनी कोणत्या थरापर्यंत पोचू पहात आहे ते पाहिले की समाजाच्या हिताची चिंता असणाऱ्या बहुतेकांना भविष्यकालीन अंधाराचे भय जाणवते. असो.

मनूने जशी वर्णव्यवस्था पुरस्कारलेली आहे त्याप्रमाणेच आश्रमव्यवस्थाहि आवर्जून प्रतिपादिली आहे. ब्रह्मचर्य, गृहस्थ, वानप्रस्थ आणि संन्यास असे ते चार आश्रम. या चारातहि गृहस्थाश्रमाचे वर्णन मनूने तो अत्यंत महत्त्वाचा म्हणून विस्ताराने केले आहे. गृहस्थाश्रम म्हटले की स्त्री-पुरुष संबंध पतिपत्नीच्या नात्याने येणे स्वाभाविक

आहे. त्यामुळेच पुढे वंशसातत्य राखले जाते आणि जिव्हाळा देणारी, अंत:करणाची प्रसन्नता राखू शकणारी, व्यक्तिविकासास पोषक असलेली मातापिता, भाऊबहिण इत्यादि नाती निर्माण होतात. कुटुंब व्यवस्था आणि गृहस्थाश्रम हे दोन शब्द वेगवेगळे असले तरी ते एकमेकांचे पर्यायवाचक आहेत असे म्हणण्याइतके एकरूप आहेत. गृहस्थाश्रम म्हटला, कुटुंब व्यवस्था म्हटले की तेथे स्त्री-पुरुष, पति-पत्नी यांचे परस्पर संबंध कसे असावेत, त्यांच्या व्यक्तित्व विकासाचे स्वरूप कोणते असावे हे ठरविणे आणि सांगणे ओघानेच येते. तेव्हा मनूने स्त्रीच्या संदर्भात काही म्हटले असेल, काही विधिनिषेध सांगितले असतील तर ते गृहस्थाश्रम सुस्थितीत राखण्यासाठीच सांगितलेले आहेत असे मानले पाहिजे.

आपण आज समतेचा उद्‌घोष वारंवार करित असतो पण तो किती अवास्तव आहे, पोकळ आहे हे आपण लक्षात घेत नाही. आपण जिला विषमता म्हणतो, ती निसर्गत: केवळ विविधता आहे. विषमता म्हणण्यात एक दंश आहे, एक बोच आहे. 'विविधता' शब्द तसा नाही हे पटणे शक्य आहे. निसर्गात कुठेही एकता वा एकरूपता नाही. उद्‌भिज्ज, स्वेदज, अंडज, आणि जारज या जीवसृष्टीच्या कोण्याहि गटात एकता तर नाहीच पण एकरूपताहि नाही. निसर्गात काही प्रमाणात परस्परोपकारिता आणि परस्पर सहकारिता या विविधतेशी जोडलेली असते. तेथेहि 'बळी तो कान पिळी' हा प्रकार असतोच. सशाने, मेंढराने, हरिणाने, वाघसिंहांना, लांडग्या-कोल्ह्यांना भिऊनच वागले पाहिजे. लपून राहण्याचे वा पळून जाण्याचे साधन उपयोगी पडले नाही, तर हिंस्र पशूंच्या भक्ष्यस्थानी पडण्यावाचून त्या बापड्यांना दुसरा मार्गच उरत नाही.

मानवी समाजाला हे शोभणारे नाही म्हणणे ठीक आहे. पण प्रत्यक्षात काय घडते ? धनबली, बाहुबली, आणि संख्याबली कोणत्याहि मार्गाने निवडणुका जिंकतात, सत्तेवर येतात, प्रतिष्ठा पावतात, अधिक संपत्ति मिळवितात आणि त्यांच्या बळावर अधिक भ्रष्टाचारी, अधिक अत्याचारी होतात. फूलन निवडून येते. आपल्या अधम हिंस्र कृत्याचे समर्थन करते. तिच्या जवळ १०-११ कोटीची संपत्ती गोळा होते. मारली गेली तर तिचे महिमामंडन होते. काही दिवस वृत्तपत्रांना दुसरा विषय रहात नाही. ही नैतिकतेची हिंसा कोण्याहि बकरी-मेंढीच्या हिंसेपेक्षा अधिक हिंस्र आहे, घातक आहे. सामाजिक हिताची हानी करणारी आहे. वाघसिंह हिंस्र असतात पण त्यांचे पोट भरलेले असेल तर त्या स्थितीत बव्हंशी निरुपद्रवी असतात. म्हणून शेळ्यामेंढ्यांचे, सशा हरणांचे नि:संतान झाले नाही. पूर्वी त्यांच्या करिता कधी

अभयारण्ये निर्माण करावी लागली नाहीत. उलट स्वार्थाने, लोभाने क्रूर बनलेल्या माणसामुळे तथाकथित अभयारण्यातील पशूहि निर्भय राहिले नाहीत. आता हे हत्त्यारे चातुर्वर्ण्यामुळे जन्माला आले की जातिसंस्थेमुळे जन्माला आले ?

अमेरिकेसारखे बलदंड राष्ट्र अविकसित वा विकसनशील राष्ट्रांचे शोषण केवढ्या मोठ्या प्रमाणावर करते आहे हे किती लोकांना ठाऊक आहे ? एका आधुनिक लेखकाने लिहिले आहे की अमेरिकेची लोकसंख्या जगाच्या चार प्रतिशत (४ %) आहे, आणि अमेरिका जागतिक उत्पादनाच्या चाळीस प्रतिशतांचा (४० %) उपभोग घेते. ही विषमता, हे शोषण कोठून निर्माण झाले ? वर्णव्यवस्था वा जातिव्यवस्था काही या शोषणाला कारणीभूत नाहीत.

शेतात राबणाऱ्या श्रमिकाला, कर्मचाऱ्याला दिवसाकाठी चाळीस-पन्नास रुपयांची मजुरी मिळणे म्हणजे पुष्कळ झाले म्हणण्याचा प्रसंग येतो. सुतार-गवंडी असे कुशल कर्मचारी दिवसाकाठी फार तर दीडशे-दोनशे रुपये मिळवितात. आणि हेहि काम वर्षाचे ३६५ दिवस त्यांना मिळते असे नाही. आता या पार्श्वभूमीवर प्रतिमासी लाखाने मोजावे असे वेतन असणारे, या प्रचंड वेतनाव्यतिरिक्त त्यांच्या इतर सोयी सवडीसाठी कोटी कोटीचा व्यय करावा लागणारे उद्योग-व्यवसायातील वरिष्ठ संचालक वा व्यवस्थापक अत्यंत विलासी, क्वचित् दुर्वर्तनी जीवनहि जगत राहातात. उद्योग-व्यवसायी निदान काही निर्माण तरी करतो. त्याची उपयुक्तता अनेक थरावरील व्यक्तींना लाभ देणारी असते. पण थोडावेळ मनोरंजन होण्यापलीकडे ज्यांचा काही उपयोग नाही अशा नटनट्या-खेळाडूंचे वार्षिक उत्पन्न वर्षाकाठी ५ ते ५० कोटीचे वा त्याहूनहि अधिक असते. त्यांच्याकडे नैतिकदृष्टीने बघण्याची तर सोयच नसते. त्यांची छायाचित्रे वर्तमानपत्रातून मोठ्या आकारात भारताचे सुपुत्र म्हणून प्रकाशित होतात. त्यातील बहुतेकांनी लाखालाखाचा कोटीकोटीचा आयकर चुकविलेला असतो. ही विषमता केवढी भयानक, किती जीवघेणी आणि कशी अन्यायकारक आहे हे समाजाच्या प्रगतीची चिंता वाहतो म्हणणारे बुद्धिवादी कधी विचारात घेतील काय ? पूर्वीच्या काळी नटनट्या, खेळाडू, नर्तक असे कलावंत नव्हते असे नाही. त्यांची संख्या सुद्धा लहान नव्हती. गावोगाव हिंडून ते कार्यक्रम करीत. त्यांना 'रोटी कपडा और मकान' यांची पुरेशी सोय उपलब्ध होती. पण त्यांना आज मिळणारी प्रतिष्ठा नव्हती. प्रवासात तर काही वेळेला त्यांना रस्त्याच्या कडेला झोपावे लागे. उघड्यावर निजलेल्या त्यांच्यातील नटी-नर्तकी-गायिकेला आपला विनय भंग होईल याचे भय नसे. अफाट संपत्ति

आणि असाधारण प्रतिष्ठा यापैकी काहीहि नसल्याने चारी वर्णातील कुलवंताच्या मुलामुलींना आपण नटनटीनर्तक गायक व्हावे असे वाटत नसे. अशा स्थितीत, या सुपारी लेखकांचे सगळे बळ नटनट्यादीचे कौतुक करण्यात आणि धर्म, परंपरा, जाति, संस्कृति यांच्या विरोधातील भडक लेखनातच बहुधा वेचले जाते. आणि त्यामुळे समाजातील उगवत्या पिढीला तरी सदाचाराचे, संयमाचे, स्वत्वाभिमानाचे शिक्षण मिळतच नाही. ही भविष्याचा एकमात्र आधार असणारी युवा पिढी निराधार झाल्यासारखी स्वैर वर्तनाने वागत आहे. विचित्र,ओंगळ, अनैतिक आचार-विचाराला बळी पडत आहे. कोणतेही उदात्त ध्येय तिच्यापुढे नाही. ईश्वरनिष्ठा राहोच पण देशभक्ति, समाजसेवा, शिकलेल्या विद्येतील अधिकाधिक ज्ञान आणि कौशल्य प्राप्त करून घेणे, संशोधन करणे, कुटुंबाची उन्नति याहि गोष्टी यांना आकर्षक वाटत नाहीत. स्वत:च्या आरोग्याची सुद्धा ते काळजी घेत नाहीत. काहीहि खावे, काहीहि प्यावे आणि कसेही वागावे हेच जणु त्यांचे जीवन बनलेले असते. धर्माचे, परंपरेचे नियम शिथिल झाले, नानाप्रकारच्या प्रचार माध्यमातून त्यांना सैल केले गेले वा ते अनिष्ट-अयोग्य असल्याचेच प्रचारिले गेले, म्हणजे काय होते, हे लक्षात येण्यासाठीच एवढा उल्लेख पुरेसा आहे.

मनुस्मृति जेव्हा समाजामध्ये संतोषाने स्वीकारली जात होती, तिला धरून वागणे-बोलणे समाजमान्य होते, त्यालाच धर्म समजत, तेच कर्तव्य समजत, त्यावेळी चातुर्वर्ण्य व्यवस्था रूढ होती. पण राज्यकर्ते मनूच्या आदेशाप्रमाणे नीतिमान्, धार्मिक, प्रजाहितदक्ष असत. दुर्वर्तन करणाराला शासनाचा विलक्षण धाक असे. एखाद्याला दुर्वर्तनाने वागण्याची इच्छा झाली तरी त्याच्या अंत:करणात, मनश्चक्षूंपुढे उग्रदंड धारण करणाऱ्या राजाची प्रतिमा उभी रहात असे. त्याची ती वाईट इच्छा उत्पन्न होताच बसल्याठायीच जिरून जाई, विरून जाई. इच्छेप्रमाणे दुष्कृत्य करण्याचा, घडण्याचा संभवच नष्ट होई, असे यथार्थ वर्णन कालिदासाने केले आहे.

अस्पृश्यता मनुस्मृतीमध्ये उल्लेखिली गेली आहे. विशेषत: ब्राह्मणाच्या दृष्टीने त्या विषयात कटाक्ष पाळला जात असे. पण त्यामागची भावना द्वेषाची किंवा तुच्छतेची नव्हती. स्वत:चे शरीर मंत्रशास्त्राच्या दृष्टीने उपयुक्त व्हावे, राहावे, त्याची कार्यक्षमता वंशानुवंश टिकावी म्हणून आहार-विहाराविषयी, स्पर्शास्पर्शाचे नियम कटाक्षाने पाळावे लागत. हरिजनांना अस्पृश्य मानले गेले ते सोवळे

पाळण्याच्या श्रेष्ठ कल्पनेतून. आता असे सोवळे पाळण्याचा अधिकार अस्पृश्यता पाळावी असे म्हणणारातील बहुसंख्यांकाना नाही. आज विज्ञानाने साधलेल्या यांत्रिक, तांत्रिक-बळावर अस्पृश्यांकडे असलेले, इतरांना अस्वच्छ वाटणारे, क्वचित् किळस आणणारे उद्योग-व्यवसाय यांत्रिक रचनेने स्वच्छ नीटनेटक्या स्वरूपात परिवर्तित करणे- सहज शक्य आहे. आणि त्याचा परिणाम म्हणून सामुदायिक क्षेत्रातील अस्पृश्यता व्यवहारत: आणि भावनिक पातळीवर नष्ट करणे सहजपणाने घडू शकेल.

अर्थशास्त्रामध्ये स्पर्धेला जीवघेणे स्वरूप येऊ नये, तेजी-मंदीला येणारे चढउतार बेताचे असावेत, व्यवहारात प्रामाणिकपणा टिकावा, सगळ्याच उद्योगधद्यांना सामान्यत: समान वाव असावा, धनलाभाकडे लक्ष ठेवून या ना त्या क्षेत्रात प्रवेशाची दाटी व्हावी, सामाजिकदृष्ट्या महत्त्वाची असलेली इतर क्षेत्रे तेवढी संपत्ति मिळवू देऊ शकणार नाहीत म्हणून उपेक्षित राहावीत, ओसाड पडावीत हे अर्थिक धोरण सामाजिक हिताचे आणि ठाकठीक असल्याचे लक्षण नाही. एका प्रतिष्ठित नियतकालिकाने नुकताच 'शेती करे सो मरे ' या विषयावर एक विस्तृत लेख प्रकाशित केला होता. शेतीची उपेक्षा झाली तर समाजाचे मरणच ओढवेल, असे म्हणण्याचा प्रसंग येईल. व्यवसाय लहान-मोठे असतील त्यातून मिळणाऱ्या मिळकतीचे स्वरूप उणे-अधिक असेल वा होईल पण उद्योग-व्यवसायाचे कोणतेही क्षेत्र अप्रतिष्ठित वाटता कामा नये. ते क्षेत्र स्वीकारणे अगतिकपणाचे असता कामा नये. जे करावे लागते ते लज्जास्पद आहे असे कोणालाहि वाटता कामा नये. आपल्या वाट्याला आलेले कर्तव्यकर्म सुखाने, उत्साहाने, संतोषाने पार पाडले पाहिजे. हीच परमेश्वराची सेवा आहे, ही भावना त्या त्या क्षेत्रातील कर्मचाऱ्याची प्रामाणिकपणे असली पाहिजे. या सर्व गोष्टी व्यवस्थित असतील तरच अर्थव्यवस्था योग्य त्या प्रकारची आहे असे म्हणता येईल. अर्थोत्पादन, सत्ता, संपत्ति याचे केंद्रीकरण होणार नाही अशी दृष्टी कटाक्षाने ठेवली नाही तर नगरमहानगरांची आत्यंतिक वाढ, न आवरता येणारा विस्तार आणि खेडी ओसाड अशी परिस्थिति निर्माण होते. अन् ती नाना प्रकारची प्रदूषणे, दैन्य, दारिद्र्य, अस्वास्थ्य नि संघर्ष वाढविणे यास कारणीभूत होते. तस्करांच्या टोळ्या वाढत जातात. अपहरण, हत्या, लूट, बलात्कार, विध्वंस या अपराधांचे प्रमाण वृद्धिंगत होते. कोणाला कुठेच सुरक्षितपणा वाटत नाही. वर्णाश्रम व्यवस्था आपल्या मूळ स्वरूपात ठाकठीक असणे हेच या सर्व समस्यांवरचे एक चांगले उत्तर आहे.

दुर्दैवाने ही वर्णाश्रमव्यवस्था कालबाह्य-निंद्य-त्याज्य ठरविली जात आहे. त्याकरिता त्यासंबंधीचे विचार थोड्या विस्ताराने वाचकापुढे मांडतो. त्यामुळे क्वचित् कोठे पुनरुक्ति होईल पण तसे करणे आवश्यक असल्याने ती पुनरुक्ति दोषास्पद वाटणार नाही, अशी आशा आहे.

चातुर्वर्ण्य ही समाजाच्या धारणेसाठी आवश्यक असलेली एक व्यवस्था आहे. कोणतेहि कुठलेहि मानवी जीवन वा मानव समाजाचे जीवन हे काही तरी व्यवस्था स्वीकारल्यावाचून वा निर्माण केल्यावाचून योग्यरीतीने चालू शकत नाही. म्हणून मानव जितका नैसर्गिक आहे तितकेच त्याच्या वैयक्तिक वा सामाजिक जीवनासाठी व्यवस्था असणे हेही नैसर्गिकच आहे, असे मानले पाहिजे. तसेच केवळ नैसर्गिक प्रेरणेने मानव, मनुष्य म्हणून योग्य रीतीने जगू शकत नाही, हे जाणले पाहिजे. त्याला व्यवस्थेची कृत्रिमता स्वीकारावीच लागते. तदनुरूप काही संस्कार घडावेच लागतात. या व्यवस्थेच्या स्वीकारामुळेच मानव काही अंशी सुखसाधनांच्यादृष्टीने तरी प्रगत झालेला आहे. चार हजार वर्षापूर्वीचा बैल जसा होता, तसाच आजचाहि बैल आहे. त्यात कोणताहि वेगळेपणा नाही. बैलाकरिता सुधारलेला गोठा असेल तर तो माणसांनी बांधलेला आहे. तो बैलाने बांधलेला नाही. बैल गोठा बांधणारहि नाही. गोठा जुन्या पद्धतीचा का नवीन सुधारलेला हा कोणताहि प्रश्न बैलापुढे नाही. पण माणसाचे मात्र तसे नाही. चार हजार वर्षापूर्वीचा माणूस आणि आजचा माणूस यात काही पातळीवर तरी अंतर दाखविणे शक्य आहे. ते अंतर काही प्रमाणात प्रगतीच्या मापाने मोजणे शक्य आहे.

हे जे आम्ही साधू शकतो, त्याचे कारण एकच आहे की, आम्ही माणसे निसर्गदत्त खरे तर ईश्वरदत्त बुद्धीने युक्त असलो तरी आम्हाला बहुतेक गोष्टी शिकाव्या लागतात. शिकविलेले आम्ही शिकतो. शिकलेले लक्षात ठेवतो. त्यावर विचार करून त्या ज्ञानात वा कौशल्यात यथाशक्ति भर घालतो; आणि ते विकसित ज्ञान व विज्ञान तसेच यंत्रतंत्रातील प्रगत कौशल्य पुढील पिढीला देतो. हे असे साधण्याचा गुण माणसात नसता तर आम्हीही पशूप्रमाणेच जसेच्या तसेच सहस्रानुसहस्रके राहिलो असतो.

समाज-जीवनाची काहीतरी व्यवस्था स्वीकारल्यामुळे मनुष्य मनुष्य म्हणून विकसित, प्रगत वा उन्नत होऊ शकला. मानवी प्रगतीला आणि समाजधारणेला सहाय्यभूत होणाऱ्या जितक्या काही व्यवस्था वा पद्धती जगताच्या पाठीवर असू शकतात वा आहेत, त्या सर्वात चातुर्वर्णात्मक अशी समाजरचनेची

पद्धति अधिक गुणयुक्त, चांगली आणि सर्वात अल्पदोष असलेली वा अत्यल्प वाईट आहे असे मला निश्चयाने वाटते. तत्त्वत: विचार केला तर समाजरचनेची कोणतीहि पद्धत शतप्रतिशत निर्दोष नसते. ज्याला आपण अगदी रासायनिकदृष्ट्या शुद्ध (केमिकली प्युअर) म्हणून स्वीकारतो त्यातहि एक शतांश, एक सहस्रांश असे हीण असतेच. हे हीण उणावण्याचा वा नाहीसे करण्याचा जो जो प्रयत्न करू तो तो खटपट, कष्ट आणि कटकटी अधिकाधिक वाढत जातात. आणि पुढे पुढे त्याला असे महाग स्वरूप येते की, त्या अधिक शुद्धतेपेक्षा ते थोडेसे अशुद्ध परवडले असेच म्हणावे लागते. आज आपण जे चोख सोने म्हणून घेतो, अगदी शासकीयदृष्ट्या अधिकृत म्हणून घेतो त्यावरहि ९९.५ असाच ठसा असतो. यापेक्षा चोख करता येईल पण तसे करण्याच्या प्रयत्नात त्या सोन्याचा भाव आहे त्यापेक्षा तिप्पट चौपट किंवा अधिकहि होईल. शेवटी हा प्रश्न व्यावहारिक पातळीवरच सोडावावा लागतो. कोणत्या व्यवहारात किती वा केवढ्या दोषाची उपेक्षा करावयाची ते शेवटी विवेकानेच ठरवावे लागते. लाकूड–कोळसा– दगडी कोळसा– रॉकेल– डिझेल– पेट्रोल ही सर्व इंधनेच, पण त्याच्या शुद्धतेचे प्रमाण उपयोगाच्या दृष्टीने वा तंत्रयंत्राच्या दृष्टीने वेगवेगळ्या पातळीवरचे असते. रस्ता, अंगण, ओसरी, बैठक, अंथरुण, कपडे , भोजनपात्रे यांची स्वच्छता सारखीच नसते. तत्त्व एकच असले तरी त्याच्या व्यावहारिक स्वरूपात दोषाचे वा अशुद्धीचे अधिक–उणे अंश असतात आणि ते अपरिहार्यहि होतात. तराजूचे उदाहरण यादृष्टीने विचारात घेण्यासारखे आहे. लाकडे मोजावयाचा वखारीतील काटा, तेल, तूप, साखर मोजण्यासाठी असलेला दुकानातील तराजू, सोने–चांदी मोजावयाचा सराफाचा तराजू आणि उच्च प्रतीचे शास्त्रीय प्रयोग करण्यासाठी वापरला जाणारा प्रयोगशाळेतील काटा (केमिकल बॅलन्स) या सर्वांमागील तोलण्याचे शास्त्र एकच असले तरी त्यातील दोष वाढत्या प्रमाणात उणावत गेलेले असतात. प्रयोगशाळेतील तराजूची सुद्धा तिसऱ्या–चौथ्या–पाचव्या दशांशा(डेसिमल) पर्यंतच तंतोतंतता असते; या मर्यादेपलिकडे त्यातहि दोष राहातोच, असे म्हणतात.

हे सगळे सांगण्याचे कारण इतकेच की एखाद्या व्यवस्थेत काही दोष आहेत एवढेच सांगून वस्तुत: भागत नाही. दुसऱ्या प्रकारच्या व्यवस्थेमध्ये तो किंवा त्याच प्रकारचा किंवा वेगळा दुसरा दोष नाही, असला तर तो पहिल्या व्यवस्थेपेक्षा अल्प आहे, त्याचे परिणामहि दीर्घकालीन लाभाचे आहेत, असे

सांगता आले पाहिजे, तरच ती व्यवस्था चांगली ठरेल. ‘आपण हसे लोका आणि शेंबूड आपल्या नाका’ हे वागणे काही शिष्टसंमत नाही, सभ्यपणाचे नाही. ज्यावेळी एखादा मनुष्य माझ्यामधील दोष सांगतो, त्यावेळी एक उलट प्रश्न लगेच विचारला पाहिजे की तुझ्या संतोषाकरिता मी माझा दोष मान्य करतो. पण तुझा आचारविचार निर्दोष आहे का? तसे जर नसेल तर माझ्या वैगुण्याची अवहेलना करण्याचे काही कारण नाही. ज्यांचे गुणदोष सारखे असतील त्यांनी परस्परांना तुझे त्याज्य आणि माझे ग्राह्य हे म्हणणे अशास्त्रीय आहे; उलट ज्या पक्षात इतरांच्या अपेक्षेने दोष अल्प आणि गुण अधिक आहेत, असे सांगोपांग विचाराने सिद्ध करता आले तर तो पक्ष सर्वांनाच स्वीकारार्ह ठरेल. यादृष्टीने समाजरचनेची चातुर्वर्ण्य पद्धति ही श्रेयस्कर म्हणूनच स्वीकारार्ह आहे असे मला वाटते.

चातुर्वर्ण्य पद्धतीपेक्षा एकच पद्धति श्रेष्ठ ठरणे शक्य आहे. ती म्हणजे अलिकडच्या एका प्रसिद्ध व्यक्तीने–गांधीजींनी सांगितलेली. गांधीजींच्या आदर्श समाजव्यवस्थेत प्राध्यापक, वकील, डॉक्टर, इंजिनिअर, मंत्री, सचिव, व्यापारी, शेतकरी, कामकरी आणि भंगी यांचे उत्पन्न वा वेतन अगदी सारखे असले पाहिजे; त्या सर्वांना सुखसोयीहि सारख्याच मिळाल्या पाहिजेत, असे म्हटले गेले आहे. या पद्धतीचा समाज ज्या क्षणी निर्माण होईल, तो बाह्य दडपणावाचून सुखाने नांदेल, त्या क्षणी मी म्हणेन की चातुर्वर्ण्य मानण्याचे काही कारण नाही. पण असा समाज जर निर्माण करता आला नाही तर चातुर्वर्ण्याला नावे ठेवणे अयोग्य आहे. प्रत्येक व्यक्ति परिपूर्णपणे स्वावलंबी आहे. कुणीही कुणावर कशाकरिताहि अवलंबून नाही. कोणी कोणाचे कोणतेहि श्रम वापरीत नाही आणि तरी मानवी समाज म्हणून सुखाने नांदतो असे घडले तरी वर्ण व्यवस्थेची आवश्यकता उरणार नाही. पण असे होणे संभवनीयतेच्या पलिकडे आहे.

समाजव्यवस्थेमधे विषमता राखली वा तिला प्रोत्साहन दिले म्हणून अलिकडे मनूची फार अवहेलना झाली आहे. त्याच्याविषयी अकारण तिरस्काराची आणि द्वेषाची भावनाहि बुद्धिमंतांचा एक मोठा गट बाळगीत असतो. कोणत्या ना कोणत्या स्वरूपाची विषमता जगातील सर्व राज्यात, राष्ट्रात, समाजात पूर्वीहि पसरलेली होती. आणि अजूनहि खऱ्या अर्थाने ती कुठेहि नष्ट झालेली नाही. उण्या अधिक प्रमाणात ती या ना त्या स्वरूपात सर्वत्र नांदते आहे.

सॉक्रेटीस, प्लेटो, ॲरिस्टॉटल असे पाश्चात्य तत्त्वज्ञानाचे मूळ पुरुष सामाजिक विषमतेचे घोर पुरस्कर्ते होते. सामान्य नागरिक आणि दास (गुलाम) यांच्यातील विषमता भयानक होती. दासांना (गुलामांना) अत्यंत क्रूरतेने वागविले जात असे. त्यांना कोणताहि अधिकार नव्हता. त्यांच्या धन्याचे त्यांच्यावर सर्वतोपरी स्वामित्व असे. त्यांना स्वत:ची बायकापोरे असली तरी त्यांच्यावरहि स्वामित्व असे ते दासाच्या धन्याचे. आपल्या परंपरेतील शूद्राची या दासांच्यासवे तुलनाच होऊ शकत नाही. म्हणून मेगॅस्थेनिस सारखा हिंदुस्थानात दीर्घकाल राहिलेला अलेक्झांडरचा एक दूत 'हिंदुस्थानात दास-प्रथा नाही' असे आवर्जून म्हणतो. खरे तर आपल्या परंपरेत सेवक या अर्थाने दासहि होते. पण धनी त्यांच्या अन्न-आच्छादनाची सोय चांगल्या प्रकारे करीत होता. त्यांचा छळ होत नसे. त्यांना क्रूरतेने वागविले जात नसे. म्हणून मेगॅस्थेनिसने त्याच्या देशात असलेल्या प्रथेच्या तुलनेने 'हिंदुस्थानात कुणी दास (गुलाम) नाही.' असे म्हटले. त्याच्या या म्हणण्यामुळे वर्णव्यवस्थेत विषमता असली तरी ती कशी सौम्य होती, समाजव्यवस्थेसाठी आवश्यक तेवढीच होती या गोष्टीवर चांगला प्रकाश पडतो.

अलिकडच्या काळातील एकांतिक समतेचा खंदा पुरस्कर्ता म्हणजे कार्ल मार्क्स! त्याने अगदी स्पष्ट शद्वात परिपूर्ण समतेचा पुरस्कार केला आहे. त्यासाठी अर्थोत्पादनावरील स्वामित्वाचा आणि अतिरिक्त श्रममूल्याचा एक अभिनव सिद्धांत मांडलेला आहे. श्रमसत्तेला गौरवून धनसत्तेची तो नानाप्रकारे निंदा करतो. त्याला ठाऊक असलेला धर्म, धनसत्तेला अनुकूल असल्याचे आढळून आल्याने त्याने धर्माला अफूची गोळी म्हटले. धनसत्तेचे अधिष्ठान असलेली स्वामित्वाची कल्पना ही कुटुंबसंस्थेमुळे साकारते. म्हणून त्याने भांडवलशाहीची जननी या नात्याने कुटुंबसंस्थेलाच त्याज्य ठरविले. पण कुटुंबसंस्थेला तर लेनिनच्या काळातच मान्यता द्यावी लागली होती. 'पाणी पिण्याचा पेला' हे स्वरूप स्त्री पुरुष संबंधाला येणे त्याज्य ठरविले गेले.

जे व्यवसाय उत्पादक नाहीत त्यांना सर्वतोपरी तुच्छ लेखले. आर्थिक समता हीच खरी समता असल्याचे गृहीत धरून, 'प्रत्येकाकडून त्याच्या योग्यतेप्रमाणे घ्यावे, आणि प्रत्येकाला त्याच्या आवश्यकतेप्रमाणे द्यावे', असा सिद्धांत त्याने व्यवहारासाठी पुरस्कारिला.

मार्क्सने मांडलेला बुद्धिवाद, त्याची तर्कप्रणाली, त्यावेळच्या युरोपातील परिस्थितीप्रमाणे बुद्धिमंतांना आकर्षक वाटली आणि सर्व जगतातील विचारवंतांनी

तिला सन्माननीय मानले, स्वीकारार्ह मानले. सर्व जगतातील बुद्धि जणू मार्क्सवादाने प्रभावित झाली होती. त्या विचारसरणीचे स्वत:ला साम्यवादी म्हणवून घेणारे गट सर्वत्र निर्माण झाले. ते आपापल्या विचारसरणीचा तीव्रतेने प्रचार करु लागले. समाजामध्ये स्वभावत:च बहुसंख्य असलेला कर्मचारी वर्ग या साम्यवादी विचाराकडे आकर्षित झाला. कारण त्यामुळे त्यांची त्यावेळी अत्यंत दयनीय असलेली अवस्था सुधारण्याची शक्यता त्यांना प्रत्यक्षात येणे शक्य वाटू लागले. काही प्रमाणात तसे झालेहि. पण हे फार काळ टिकले नाही. सगळीकडे असलेल्या कामगारांना पूर्वीच्या मानाने अधिक चांगली वागणूक मिळू लागली. त्यांचे उत्पन्नहि काही प्रमाणात वाढले. पण मार्क्सच्या स्वप्नाप्रमाणे सर्व जगतातील कामगार काही एकजूट झाले नाहीत. आणि साम्यवादी राजवट भांडवलवादी देशात आधी उत्पन्न व्हावयाची होती, ती तशी न होता रशियासारख्या सामंतवादी देशात उत्पन्न झाली.

सन एकोणीसशे सतरामध्ये लेनिनच्या प्रभावाने रशियात साम्यवादी राजवट उदयास आली. जवळपासचे अनेक देश तिने गिळंकृत केले. जगतातील एक श्रेष्ठ प्रभुसत्ता म्हणून रशिया उभा राहिला. त्याची वैज्ञानिक प्रगति अंतराळयानाच्या रूपाने आकाशात ग्रहगोलापर्यंत झेपावली. पण सर्व प्रकारची क्रूरता अवलंबूनहि ही राजवट सत्तरपंचाहत्तर वर्षात सन एकोणीसशे नव्वद–एक्याण्णवमध्ये पूर्णपणे कोसळली. साम्यवादाविरुद्धच्या वावटळीने बहुतेक सर्व युरोप घेरला गेला. मार्क्सचे 'कॅपिटल' ग्रंथ जाळले गेले. मार्क्सचे, लेनिनचे, स्टॅलिनचे पुतळे उखडून टाकले गेले. साम्यवादातील समतेची वरवर सुंदर वाटणारी कल्पना प्रत्यक्षात कधीच येऊ शकली नाही. धर्माला अफू म्हणणारा साम्यवाद कोसळताच चर्चेस् भरभराटली, नवी उभारली गेली. ''साम्यवादाचा हा प्रयोग आमच्या देशात झाला, ही आम्हा लोकांची एक केविलवाणी शोकांतिका आहे.'' असे उद्गार मिखाईल गोर्बाचेव्ह आणि बोरिस येल्तसिन यांनी काढले. विषमता ही नष्ट होणारी वस्तू नाही हेच या घटनेने सिद्ध केले आहे. विषमता स्वीकारणे जर अपरिहार्यच असेल तर उद्योग व्यवसायाचे विकेंद्रीकरण करणारी वर्णव्यवस्था स्वीकारणेच उपयुक्त ठरते. ती मुळात जन्माधिष्ठित आहे, म्हणूनच केवळ त्याज्य मानणे इष्ट नाही.

संपूर्ण समता असलेला समाज निर्माण करण्यासाठी साम्यवादी विचारसरणी स्वीकारली गेली. त्यासाठी क्रांति घडवून – साम्यवाद्यांनी सर्व शासन आपल्या

पद्धतीप्रमाणे निरंकुशपणे चालविले. शासनाचे निष्ठुर आदेश न मानणारांचे निर्घृणपणे शिरकाण केले. भिन्न विचारसरणीचा उच्चार करणारांना दीर्घकाळपर्यंत अनन्वित यातना दिल्या. तरी साठाहून अधिक वर्षाच्या एकछत्री साम्राज्यात आर्थिक समता आणता आली नाही ती नाहीच. उलट आर्थिक विषमता थोडी थोडी वाढूच लागली आहे. अशा वार्ता पोलादी बंधनातूनहि (पडद्यातूनहि) पाझरू लागल्या होत्या. आता तर त्या सर्वांना ठाऊक झाल्या आहेत. युगोस्लाव्हियाचा दीर्घकाल प्रमुख असलेला मार्शल टिटो अगदी वृद्ध होऊन मेला. तेव्हा अनेक ठिकाणी 'जगातील सर्वात श्रीमंत साम्यवादी' (कम्युनिस्ट) नेता मेला असा उल्लेख झाला. टिटोच्या माघारी युगोस्लाव्हिया या एका देशाचे तुकडे उडाले, आणि दोन चार स्वतंत्र राष्ट्रे जन्माला आली. त्यांच्यात तीव्र स्वरूपाचा संघर्ष होतो आहे. मला वाटते साम्यवादाची (कम्युनिझमची) यापेक्षा अधिक विटंबना संभवत नाही.

चातुर्वर्ण्यात विषमता आहे, असे आपण म्हणतो ते वरवर पाहता खरे दिसते; पण त्या विषमतेचे स्वरूप आपण गृहीत धरतो तसे नाही. ते मुख्यत: मानसन्मानाचे आहे. मुळात तरी ते आर्थिक नाही, की ज्यामुळे सारे आयुष्य कष्टमय होऊन राहील. अलीकडे एक मोठा अपसमज पसरलेला आहे, नव्हे पसरविलेला आहे की चातुर्वर्ण्यात ब्राह्मणाला सगळ्यात जास्त सुखसोयी उपलब्ध आहेत. पण हे दिसते किंवा वाटते तसे खरे नाही. मनुस्मृतीच्या संदर्भात विचार करावयाचा तर असे म्हणावेसे वाटते की एक अपघात म्हणून 'मनूच्या नियमाप्रमाणे राज्य करू', असे म्हणणारे शासन निर्माण झालेच तर आजचे ब्राह्मण मनुस्मृती जाळतील आणि शूद्र ती डोक्यावर घेऊन नाचतील. खरे म्हणजे सगळे काढून घेऊन तोंडाला पाने पुसावीत तसे मनूने ब्राह्मणांच्या संदर्भात केले आहे. मनूने ब्राह्मणांना सन्मान दिला आहे. शूद्रांना सन्मान देऊ नये असे म्हटले आहे. अगदी लहान वयाचा ब्राह्मणहि वृद्ध शूद्रापेक्षा आदरणीय आहे. अशा अर्थाचे मनूचे एक वचन आहे. ब्राह्मणाला देहान्ताची शिक्षा देऊ नये, प्रसंगविशेषी केवळ निर्वासित करावे असे म्हटले आहे. शूद्राला ही संधी नाही. शूद्रासाठी सांगितलेल्या काही शिक्षा फार कठोर आहेत. या अशा उल्लेखाकडे पाहिले की मनूचा राग येणे शक्य आहे पण जरा खोलवर आणि सर्वांगिण असा मनुस्मृतीचा विचार केला म्हणजे या मनूने ब्राह्मणांना चकविले आहे असेच आजच्या ऐहिक (बुद्धिवादी) विचारसरणीप्रमाणे म्हटले पाहिजे. त्याने ब्राह्मणाला सन्मान द्यावा असे म्हटले आहे. पण कोणत्या ब्राह्मणाला सन्मानावे

यासंबंधात जे सांगितले आहे ते आपण लक्षात घेत नाही. जो ब्राह्मण सच्चरित्र आहे, सत्त्वशील आहे, निरिच्छ आहे, असंग्रही आहे, विद्वान आहे, समाजामध्ये परोपकारशीलतेने राहतो, त्यालाच आदराने वागवावे, वंदनीय मानावे. ब्राह्मणाच्या योग्यतेची भौतिकदृष्ट्या प्रतवारी करताना मनूने ब्राह्मणाजवळ संचय किती आहे त्याचे माप वापरले आहे. एक दिवसाचा संचय ज्याच्याजवळ आहे तो उत्तम ब्राह्मण. हा ब्राह्मण गृहस्थाश्रमात असणारा आहे. कुटुंबवत्सल आहे. कुणी संन्यासी नाही. संचय किती असावा याचा गृहस्थाश्रमातील आदर्श आहे. एक मास पुरेल एवढा संचय ज्याचे जवळ आहे तो मध्यम ब्राह्मण. एक वर्षाचा संचय ज्याच्या जवळ आहे तो कनिष्ठ ब्राह्मण. यापेक्षा अधिक असेल तर काय म्हणावे ते बोलावयासच नको. तीन वर्षांचा धनसंचय असेल तर त्याने सोमयाग केला पाहिजे, (म्हणजे स्वत:चे दिवाळे काढले पाहिजे) असे मनू सांगतो. मनूचे नियम तंतोतंत पाळावयाचे तर ब्राह्मणांनी कोणत्याहि प्रकारचा धंदा करता कामा नये. अगदी विद्या शिकविण्याचा सुद्धा त्याचा व्यवसाय असता कामा नये, की ज्यात तो, 'इतके शिकविले, इतके धन दे' असे म्हणेल. त्याने अयाचित वृत्तीने दान-दक्षिणेवरच जगले पाहिजे. दक्षिणेवर जगावे हा एक नियम आणि फार संग्रह करू नये हा दुसरा नियम. समतोल राखण्याची केवढी सूक्ष्म दृष्टी आहे ही! दक्षिणाहि कोणाकडून घ्यावी याविषयी कठोर नियम मनूने घालून दिलेले आहेत. ब्राह्मण श्रम न करता दक्षिणेवर आयते जगतात आणि वर सन्मान मिळवितात असे कुणी म्हणावे? खरा निस्पृह, अकिंचन असेल त्याने. शिष्यवृत्तीवर (स्कॉलरशिप) विलासी आयुष्य घालविणाऱ्यांनी तरी असे उद्गार काढू नयेत. एकच किंवा सारखा अपराध ब्राह्मणाने किंवा शूद्राने केला तर मनूने ब्राह्मणाला शूद्रापेक्षा चौसष्टपट किंवा एकशेअठ्ठावीसपट अशी शिक्षा सांगितली आहे. जो ब्राह्मण ब्राह्मणधर्माने राहत नसेल; केवळ जातीने ब्राह्मण असेल तर त्याला मान देण्याची काहीहि आवश्यकता नाही. महाभारताने तर अशा ब्राह्मणाच्या संदर्भात 'तान् सर्वान् धार्मिको राजा बलिं विष्टिं च कारयेत्' असा स्वच्छ आदेश दिला आहे. जो ब्राह्मण्याचे नियम पाळीत नाही, केवळ जातीने ब्राह्मण आहे, त्याच्याकडून धार्मिक राजाने योग्य तो कर घ्यावा आणि त्याला वेठीलाहि जुंपावे. प्रसंगविशेषी अशा केवळ जन्मानेच ब्राह्मण असलेल्याला मृत्युदंडसुद्धा द्यावा असे महाभारताचे वचन आहे. आततायी ब्राह्मणाला, तो चांगला विद्वान असला तरी ठार मारावे असेच मनूहि म्हणतो. आता वैश्य-शूद्रापेक्षा केवळ जन्माने ब्राह्मण असणाराचे कोणते वैशिष्ट्य राहिले?

जातीचे महत्त्व आपल्या परंपरेमध्ये विशेष मानलेले आहे. कारण अनुवंशामुळे होणाऱ्या लाभ-हानीवर आपण विश्वास ठेवतो आणि तो बहुतांशी शास्त्रीयतेवर आधारलेला आहे. अनुवंश मानणे गबाळेपणाचे आहे, असे आपण म्हणणार आहात का? हा खराच गबाळेपणा असेल तर स्पर्धेत धावणारे घोडे, दुधाळ गायी, वास येणारी कुत्री, लांब मऊ लोकर देणाऱ्या मेंढ्या यांच्या विषयात वंशशुद्धि राखण्याचे प्रयत्न कटाक्षाने केले जातात, ते का? वास येणाऱ्या कुत्र्याच्या जातीत थोड्याहि संकराने त्यांची अपराधाच्या अन्वेषणाकरिता असलेली कुशलता नष्ट होते असे म्हणतात. पशूंच्या संबंधात अनुवंश मानावयाचा, पिढ्यान्‌पिढ्या इतिहास लक्षात ठेवून मानावयाचा आणि माणसाने मात्र अनुवंशाचे नियम मोडावयाचे हे केवळ तशी शक्यता आहे म्हणूनच ना! पण सुधारक म्हणविणारे आजचे बुद्धिवादी हे शास्त्रीय सत्य दुर्लक्षिले पाहिजे, ते प्रगट सुद्धा करू नये असे म्हणतात हा दंभ नाही का? जातीने ब्राह्मण असणे हेहि महत्त्वाचे आहे, ते केवळ अनुवंशाकरिता. कारण ५२% गुण अनुवंशातून येतात. एखादी व्यक्ति स्वत:पुरती अयोग्य आणि अनधिकारी असली तरी अनुवंशाने आलेले त्याचे रक्त चांगले आहे, ते पुढच्या पिढीत लाभदायक होईल अशी धारणा वंशशुद्धीच्या मागे आहे आणि ती योग्य आहे हे समाजाच्या नीट लक्षात आणून द्यावे म्हणूनच कदाचित श्रीतुकाराम महाराजांसारख्या ब्राह्मण नसलेल्या महात्म्यांनी 'जरी ब्राह्मण झाला कर्मभ्रष्ट । तुका म्हणे श्रेष्ठ तिही लोकी ।।' असे म्हटले असावे.

अनुवंशाच्या विचाराने सर्वदा निकृष्ट अवस्थेतच राहावे लागते. त्यामुळे पिढ्यान्‌पिढ्या अवहेलनाच वाट्याला येते असे मानावयाचे कारण नाही. सात पिढ्या दक्षतेने विवाहबंधन नियंत्रित केले तर कोणालाहि अगदी शूद्रालाहि कोणत्याहि वर्णात, ब्राह्मणवर्णातहि समाविष्ट होता येईल. पण याकरिता सात पिढ्या थांबावे लागेल. २०-२५ वर्षाची एक पिढी या मापाने दीडशे पावणेदोनशे वर्षे थांबले पाहिजे. सामाजिकदृष्ट्या हा काळ फार मोठा आहे असे म्हणता येणार नाही. पण एवढा धीर धरवत नाही. इतक्या दीर्घकाळपर्यंत काटेकोरपणे दक्षता ठेवणे अशक्यप्राय होते इतकेच काय ते! पशूंच्या पिढ्या चार-पाच वर्षात पालटतात म्हणून आपण प्रयोग करून पाहू शकतो. माणसाच्या संदर्भात हे शक्य नाही. व्यक्तीव्यक्तीच्या संदर्भात असेच होणार. परिणामाचे मूल्यमापन करण्यासाठी परंपरा निर्माण करावी लागेल आणि आपण तर परंपरा हाच उपहासाचा विषय केला आहे. मी आज कुकर्म करणार.

त्याचे परिणाम पुढच्या पिढीवर काय होणार आहेत ते पाहण्यास मी उरणार नाही. म्हणजे मला लाज उरलेली नाही. कारण वाईट परिणाम दिसून आल्यानंतर शिव्या खाव्या लागणार तेव्हा मी असणार नाही परंतु सामाजिकदृष्ट्या हानी व्हावयाची, ती होऊन जाईलच की नाही ! काही वेळा संकर लाभदायक ठरतो असे दिसते, पण त्या संकराची परंपरा निर्माण होत नाही. चांगले परिणाम देणाऱ्या संकरासाठीहि बीजशुद्धि कटाक्षाने राखावी लागते. मानवी संततीच्या क्षेत्रात ही दक्षता कोण घेणार? हे अनायासे घडावे म्हणून आपल्याकडे वंशशुद्धीचा आग्रह धरण्यात आला आहे. वर्णसंकर निंद्य, त्याज्य ठरविला आहे. त्याचा उपहास करणे उथळपणाचे आहे.

विशिष्ट गटाला किंवा व्यक्तीला विशिष्ट सुखसोयी (फॅसिलिटी) ही वस्तू केवळ चातुर्वर्ण्यातच आहे का? सगळ्यांना समान संधी आहे असे आपण जिथे म्हणतो, त्या लोकराज्यात किंवा लोकसत्तेत सोयी सवलतीची विषमता निरनिराळ्या पातळीवर नांदते आहे की नाही? नुकतेच एक आर्थिक प्रतिवृत्त वाचावयास मिळाले. त्यात म्हटले होते की, मंत्री वेतन म्हणून प्रतिमासी पाच हजार घेत असला तरी प्रत्येक मंत्र्यावर वर्षाकाठी नव्हे तर प्रतिमासीहि तीन ते पाच लाख रुपये, कदाचित अधिक खर्च होतात. आपण लोकसत्ता मानतो ना! मग बहुसंख्य जनता दारिद्र्यात पिचत असताना मंत्री तीन चार लाख रुपये कोणाच्या जीवावर उधळतो? शासकीय अधिकाऱ्यांना अनेक सोयी उपलब्ध असतात. आगगाडी विभागात काम करणाऱ्यांना वर्षातून दोनदा फुकट प्रवास करता येतो. ही सोय त्यानाच काय म्हणून? डाक विभागात काम करणाऱ्यांना तीच सोय का नाही? शंभर कोटी लोकसंख्येतून लोकसभेत साधारणत: पाचशे साडेपाचशे माणसे निवडली जातात. लोकसंख्येशी हे प्रमाण किती लहान आहे? आणि या लोकसभा-सदस्यांना अनेक प्रकारच्या सुखसोयी उपलब्ध आहेत, त्या वरचेवर वाढत्या प्रमाणात आहेत आणि तेथे (असे करण्यात) सत्ताधारी व विरोधी पक्षाचे एकमत आहे. या सोयी उरलेल्या नव्याण्णव कोटी नव्याण्णव लक्ष नव्याण्णव हजार पाचशे लोकांना मिळत नाहीत. सगळ्याच कर्मचाऱ्यांना सारखे वेतन असणे ही समानतेची आदर्श व्यवस्था सोडून देऊ पण निदान सारख्या प्रकारचे, सारख्या श्रमाचे, त्याच योग्यतेचे काम करणाऱ्याचे तरी वेतन सारखे असावे की नाही? तेहि आपण साधू शकलो नाही. बँकेतल्या चपराशाला जे वेतन मिळते ते जिल्हा परिषदेतल्या

कारकुनाला मिळत नाही. दोघेहि एम.ए. असले तरी प्रशालेतील शिक्षक आणि महाविद्यालयातील प्राध्यापक यांच्या वेतनात अंतर राहते. त्यात पुन्हा प्राध्यापकाला तास थोडेच आणि शिक्षकाला त्याच्या दीडपट- दुप्पट! पाट्या टाकण्याचे साधे काम करणाऱ्या बड्या उद्योगातील कामगाराला मिळणारे वेतन शेतावर त्याहिपेक्षा अधिक राबणाऱ्याला मिळत नाही. असे का असावे? या सर्वाला समताच म्हणावे काय? वरिष्ठ शासकीय अधिकारी, मंत्री यांच्यावर खटला भरण्यासाठी राज्यपालाची संमति आधी मिळवावी लागते. असे का? ही विषमता तर अत्यंत कृत्रिम आहे. ती नाहीशी करण्याची साधने तुमच्या हातातील आहेत. हा प्रयोग जाती नष्ट करण्याच्या प्रयोगापेक्षा अधिक सोपा आहे. अशा रितीने सगळ्या विशेष सुखसोयी नाहीशा कराव्या. आर्थिक पातळीवर तरी समानता सर्वंकष असलेल्या शासनयंत्रणेत आणून दाखवावी. तरच चातुर्वर्ण्यातील विषमतेला नावे ठेवण्याचा थोडातरी नैतिक अधिकार आपणास प्राप्त होईल.

चातुर्वर्ण्य व्यवस्थेमधे उद्योगधंदे जन्मावर अवलंबून ठेवलेले आहेत. तेथे व्यवसायाचे स्वातंत्र्य नाही हे म्हणणे शास्त्रातील वचनांचा विचार करता खरे आहे. आपण आज जी समाज स्थिती पाहतो आहोत त्यात तरी प्रत्येकाला उद्योगधंद्याचे खरे खरे स्वातंत्र्य आहे काय? तेथील संमती पत्रे आणि अनुमोदने (लायसेन्स - परमिट) याचे प्रकरण हे काही स्वातंत्र्य असण्याचे निदर्शक नाही. कोणताही नवीन उद्योग आरंभिणाराला विचारा की त्याच्यावर किती आणि केवढी अप्रत्यक्ष बंधने असतात ते! सुशिक्षित तरुण यामुळे वैतागतात, टेकीला येतात. काही वेळा तर हताश होऊन बसतात. संमतिपत्रे आणि अनुमोदने ही तरी पात्रता पाहून सरळपणाने मिळतात का? त्यासाठी कोणाला तरी संतुष्ट करणे, त्याचे जे असतील ते राग-द्वेष सांभाळणे हे करावेच लागते ना? ते प्रत्येकाला परवडते काय? ज्याला परवडते तो योग्यता असणाराला मागे सारून अनधिकाराने पुढे घुसतो आणि आपले काम करून घेतो. असे होतेच ना! भाचा-पुतण्या-जावई-नातू-मुलगा-मुलगी यांच्या संबंधातील अवघड कामेही सोपी होऊन जातात. तेथे अन्यायहि सन्मानाने वावरतो. आणि हे सर्व सातत्याने सर्व क्षेत्रात चालू असते. चातुर्वर्ण्य व्यवस्थेने हे सर्व मुळातच नाहीसे केले आहे. तेथे मी जन्माला आलो की व्यवसायाचे संमतीपत्र आणि अनुमोदन घेऊनच जन्माला आलेलो आहे. तेथे कोणाला संतुष्ट करणे इत्यादि अन्याय्य विकृतींना वावच नाही. तिथे बेकारी ही वस्तूच नाही.

जातीप्रमाणे व्यवसायाचे बंधन असणाऱ्यामध्ये खरा तोटा ब्राह्मणाचाच आहे. त्याला अध्ययन-अध्यापन, भिक्षुकी आणि न्यायदान येवढेच व्यवसाय आजच्या काळात उरले असते. जातीबंधन नसल्यामुळे ब्राह्मणाने जे व्यवसाय शूद्राचे आहेत, पण अधिक धन मिळवून देणारे आहेत, ते अतिक्रमण करून हस्तगत केले आहेत. नट-नर्तक-गायकामध्ये जे नामवंत आहेत, ते बहुतांशी ब्राह्मणच आहेत. सत्तापदावरही ते मोठ्या प्रमाणात आहेत. ब्राह्मण जर खरोखरीच ब्राह्मण्याने राहिला असता, ब्राह्मणाच्या अधिकृत उद्योगधंद्यात वावरला असता तर आज वाढला आहे एवढा ब्राह्मणद्वेष कदाचित वाढला नसता. इतरांचे उद्योगधंदे करणारा ब्राह्मण निदान त्या त्या व्यवसायातील इतरांपेक्षा अधिक प्रामाणिक आहे, भ्रष्टाचारी मुळीच नाही, येवढे जरी राहिले असते तरी ब्रह्मद्वेष पुष्कळ उणावला असता पण तसेहि झाले नाही.

विषमतेच्या आणि त्यामुळे होणाऱ्या अन्यायाच्या संदर्भात भगवान श्रीरामचंद्रांवर एक मोठा दोषारोप केला जातो. रामाने तपश्चर्या करणाऱ्या एका शूद्राचा वध केला असे वर्णन रामायणाच्या उत्तरकांडात आहे. काही लोक हा प्रसंग किंबहुना सर्व उत्तरकांडच प्रक्षिप्त मानतात. मी तसे मानीत नाही. शूद्रवधाचा हा प्रसंग मी वास्तव मानतो. कारण शूद्राने तपश्चर्या करू नये असा निर्बंध त्यावेळी होता. रामचंद्र राजा आहे. त्याने निर्बंध मोडणाऱ्याला शासन केले. हा निर्बंध काही रामाने पाशवी बहुमताच्या बळावर स्वत:च्या लाभासाठी नवीन निर्माण केला नव्हता. निर्बंध पूर्वीपासूनच अस्तित्वात होता. रामाने त्याची कार्यवाही केली इतकेच. त्या काळी अपराधासाठी दिल्या जाणाऱ्या शिक्षा कठोर होत्या. शिक्षा जितक्या कठोर, त्याप्रमाणात अपराध घडण्याचे प्रमाण कमी असते. हा समाजव्यवस्थेतील कालसापेक्ष नियम असतो, असा सिद्धान्त बांधता येईल. पण ते असो. या शूद्रवधामागची पार्श्वभूमी नीट जाणून घेतली पाहिजे.

समाजाच्या योग्य धारणेसाठी अनुत्पादक व्यवसाय करणाऱ्यांच्या गटामध्ये वाढ होता कामा नये, असा नियम असणे आवश्यक आहे. आपले व्यवसाय प्रामाणिक निष्ठेने करीत राहणे हेच ज्याच्या त्याच्या पुरते तपाचरण आहे. हे लक्षात न घेता त्या शूद्राने मर्यादातिक्रमण केले म्हणून त्याला शिक्षा झाली. हा प्रसंग त्रेतायुगातला आहे. आज कलियुगाची पाच हजार वर्षे उलटून गेली आहेत. आज तपश्चर्या कुणीहि करू शकतो म्हणून आज तशी शिक्षा होण्याचे भयहि नाही. समजा काही अतिभूतदयावाद्यांच्या प्रयत्नाला यश येऊन मृत्युदंडाची शिक्षा नाहिशी झाली

तर उद्याचा न्यायाधीश कोणालाहि फाशी द्यावे असा निर्णय देणार नाही. म्हणून तो दयाळू आणि निर्बंधानुसार आजवर ज्या न्यायाधीशांनी मृत्युदंडाच्या शिक्षा दिल्या ते सगळे क्रूर असे म्हणणे न्यायाचे होणार नाही. श्रीरामचंद्राने शूद्राचा वध केला हे आपण प्रचाराच्या सोयीसाठी पुन:पुन: उल्लेखित असतो. भंडाऱ्या डोंगरावर भजनानंदात रंगलेल्या म्हणजेच तपश्चर्या करणाऱ्या श्रीतुकोबांच्या चरणावर रामेश्वरभट्टासारखा एक विद्वान धर्माधिकारी ब्राह्मण 'तुकिता तुलनेसी ब्रह्म तुकासी आले' असे म्हणत भक्तिभावाने लोळण घेतो. निळोबासारखे सहस्रावधी ब्राह्मण नामदेव-तुकोबांना सद्गुरुस्थानी मानतात. चोखोबारायासारख्या एका अस्पृश्य जातीतील संतांच्या अभंगलेखनाचे काम एक ब्राह्मण आदरपूर्वक करीत असे, हे मात्र आपण सोयीस्करपणे दृष्टिआड करतो. तपश्चर्या करतो म्हणून रामचंद्राने केलेला शूद्राचा वध हा त्याप्रकारचे एकुलते एक उदाहरण आहे. त्यानंतर पुन्हा तशी गोष्ट घडल्याचा इतिहास नाही. रामचरित्राचे महात्म्य सर्व भारतभर आजहि विस्तारले आहे. तरी कोणत्याहि शूद्राला परमार्थापासून वंचित केल्याचे आढळत नाही. महाभारतात तर एक ब्राह्मण ज्ञान घेण्यासाठी एका धर्मव्याधाकडे, एका खाटकाकडे गेला अशी कथा आहे. शूद्रांना हालात, दैन्यात जीवन कंठावे लागे ही गोष्ट मुसलमान राजवटीपूर्वी विशेषत: इंग्रजी शासनापूर्वी अस्तित्वातच नव्हती. गावगाड्यात त्याला सुखसमाधानाने राहता येत असे. प्रसंग विशेषी त्याला सन्मानहि मिळे. तो संपन्नहि असे.

एकंदरित जन्माने व्यवसायाचे क्षेत्र ठरवणे ही गोष्ट खरोखरीच फार चांगली आहे. त्यामुळे बुद्धि, शक्ति, संपत्ती आणि श्रमकौशल्य यांच्यामध्ये व्यवसायाचे विकेंद्रीकरण होते. आणि मग कोणीहि एकाच्या बळावर दुसऱ्याचे शोषण करू शकत नाही. त्यादृष्टीने आजची परिस्थिती घातक झाली आहे. भल्याबुऱ्याचा विचार न करता कोणत्याहि मार्गाने पैसा मिळवावा आणि मिळालेल्या पैशाच्या बळावर इतरांचे अधिकाधिक शोषण करीत राहावे, सत्ता मिळवावी. संघटित बळ याला तोंड देईल असे वाटत होते पण त्या संघटनाच उन्मत्त होऊन शोषण करू लागल्या आहेत. त्याहि केवळ आपल्यापुरते पाहतात. सर्व समाजाचा विचार करीत नाहीत. ही सारी आपत्ति उद्योगधंद्याच्या मोकळिकेतून निर्माण झाली आहे.

श्रीमनुप्रणीत चातुर्वर्ण्याची जी रचना आहे ती आदर्श आहे. आजच्या परिस्थितीत ती लगेच कार्यवाहीत आणता येणार नाही हे खरेच. त्याकरिता

अतिदक्षतेने, चातुर्याने दीर्घकाल प्रयत्न करीत रहावे लागेल.

चातुर्वर्ण्य व्यवस्थेचा आणखी एक फार मोठा लाभ आहे. तो म्हणजे विकेंद्रीकरण. विद्या वा ज्ञान, शौर्य, संपत्ति, आणि श्रमकौशल्य या चारहि गोष्टी समाज धारणेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या आहेत. चातुर्वर्ण्य व्यवस्थेत या गोष्टीचे पूर्ण विकेंद्रीकरण झालेले आहे. त्यामुळे कोणीहि एक, इतर तिघांचे शोषण म्हणून फारसे करू शकत नाही. क्वचित् कोणी तसे करतो म्हणाला तरी त्याला सहाजिकपणे एक प्रकारची मर्यादा येते. आजमात्र वर्णव्यवस्था अशी काही न राहिल्याने सत्तासंपत्तीचे केंद्रीकरण होत आहे. आणि त्यामुळे भ्रष्टाचार आणि शोषण या समाजघातक प्रवृत्तीला ऊत आल्यासारखे झाले आहे.

चातुर्वर्ण्यातून निर्माण झालेल्या दोषांचा अस्पृश्यतेचा विचार आपणापुढे ठेवणार आहेच.

समाजजीवनाचे ध्येय काय हे जर निश्चित असेल, तर मग त्याची साधने कोणती असावीत ते ठरविता येईल आणि साध्याच्या अनुसार देश काल परिस्थितीचा विचार करून साधनांच्या मध्ये थोडाबहुत पालटहि करता येईल. आपल्या शास्त्रातून या दृष्टीने मार्गदर्शन केले आहे. आपद्धर्माचा (आपत्तीकालीन धर्माचा) विचार झालेला आहे.

मूळचे आरोग्य कितीहि चांगले असले तरी दुर्धर व्याधि निर्माण झाल्यानंतर तो बरा होऊन प्रकृति पुन्हा मूळ पदावर येऊन चांगले स्वास्थ्य लाभण्यास पुष्कळ दिवस लागतात. पीडाकर लक्षणे घालविणारी औषधे, रोग घालविणारी औषधे, रुग्णावस्थेतील इतर उपचार व पथ्य, रोग गेल्यावर आरोग्य लाभासाठी द्यावी लागणारी औषधे, शक्ति वाढविणारा योग्य आहारविहार आणि स्वास्थ्यलाभासाठी प्रत्येक अवस्थेत करावी लागणारी कालप्रतीक्षा या सर्वांचा अवलंब शांतपणाने व योग्य त्या मार्गदर्शनाखाली, घायकुतीला न येता, न कंटाळता करावा लागतो.

चातुर्वर्ण्याच्या पुन:प्रस्थापनेसाठी याच पद्धतीचा अवलंब करावा लागेल. सात आठ पिढ्यांचा काल तरी त्यासाठी द्यावा लागेल. तो सलग आणि सुसूत्र असावा लागेल. हे सर्व घडण्यासाठी समाजाच्या बहुसंख्य घटकात याविषयी आस्था निर्माण होऊन त्याची आवश्यकता तीव्रतेने वाटू लागली पाहिजे. मी आशावादी आहे. पण सध्या तरी अशी उत्कटता कोठे निर्माण झालेली दिसत नाही. आपल्यातले बहुतेक सुशिक्षित आणि सुसंस्कृतीची आस्था असलेले बुद्धिवादीहि विरुद्ध

विचाराच्या दडपणाखालीच आहेत. त्यामुळे अनुकूल विचार सर्वदृष्टीने आणि सर्वांगिण होऊ शकत नाही. तरीपण चातुर्वर्ण्य ही समाजरचनेची अधिक चांगली पद्धती आहे असे ज्यांना वाटते, त्यांच्या विचारांना एक दिशा मिळावी यासाठी हे सर्व सांगितले पाहिजे.

आज आपला समाज वर्णापेक्षा जातीजातीत विभागला गेलेला आहे. या जाति आणि पोटजातींचा विचार करता त्यातल्या त्यात वर्णनामाने प्रसिद्ध असलेल्या ब्राह्मणवर्गासकट सर्वत्र जाति आणि उपजातींची भरमार आहे. आपल्या स्मृति इत्यादि ग्रंथात वर्णाप्रमाणेच काही जातींचाहि उल्लेख आहे. त्यातल्या बहुतेक संकरज आहेत. (काही समाजशास्त्रज्ञांना हे मान्य नाही.) या वर्ण आणि जातींचे व्यवसायहि उल्लेखिलेले आहेत. शंभर-सव्वाशे वर्षांपूर्वीपर्यंत सामान्यत: जात आणि तिचा व्यवसाय हा निश्चितपणे बांधल्यासारखा असे. या व्यवसायमर्यादेचे अवशेष अद्यापीहि टिकून आहेत. या जाती आणि व्यवसायांचे व्यापक प्रमाणात सर्वांगिण सर्वेक्षण करून वर्णव्यवस्थेप्रमाणे कोणत्या वर्णाच्या उद्योगात कोणत्या व्यवसायाचा समावेश करता येणे शक्य आहे ते पाहून त्या त्या जाती ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र आणि अतिशूद्र किंवा निषाद अशा चार किंवा पाच गटात समाविष्ट करता येतील. हे करण्यासाठी व्यक्तीच्या वा कुटुंबाच्या आवडीनिवडीपेक्षा आणि उद्योगव्यवसायापेक्षा त्याच्या कुलपरंपरेचा आणि पूर्वापार चालत आलेल्या त्या जातींच्या उद्योगाचा विचार केला पाहिजे.

अशी वर्णव्यवस्था तात्त्विकदृष्ट्या एकदा निश्चित झाली की मग त्या व्यक्तीचा उल्लेख त्याच्या जातीपेक्षा वर्णाला प्राधान्य देऊन करावा. आणि व्यवहारातून वा शिक्षणातून तसेच संस्कार घडवावेत. या पद्धतीने वर्णांची आणि त्यांना उचित असलेल्या सर्व उद्योगधंद्यांचीहि वर्गवारी निश्चित होईल. वर्ण आणि त्यांचे व्यवसाय उद्योग असे निश्चित ठरले की व्यावसायिक शिक्षणाची व्यवस्था करताना त्या त्या वर्णातील व्यक्तीला प्राधान्य द्यावे लागेल. आणि इतरांना काही अटी घालून वा योग्यतेची विशिष्ट प्रतवारी पाहून नंतरच त्या शिक्षणक्रमात प्रवेश घेता येईल, असा नियम करावा लागेल. शिक्षण पूर्ण होऊन व्यवसायानुसार धनार्जन करावयास लागल्यानंतरहि त्या त्या वर्णाप्रमाणे व्यवसाय निवडलेला असेल तर मोकळिक अधिक प्रमाणात असेल आणि तसे नसेल तर करादींच्या दृष्टीने अधिक आकारणी वा विशिष्ट नियमांची बंधने त्या त्या व्यक्तीवर असतील त्यामुळे आज ज्याचा देखावा केला जात आहे ते उद्योग-स्वातंत्र्य मर्यादित होईल हे खरे पण त्याला उपाय नाही.

उद्योग-स्वातंत्र्य आज आहे असे आपण म्हणतो, कुणी कोणताहि व्यवसाय करू शकतो व कोणतेहि शिक्षण घेऊ शकतो असे वरवर दिसते, पण त्यामुळे सामाजिकदृष्ट्या काही लाभ झाला असे निश्चयाने सांगता येते काय? उलट ज्यांना बुद्धिमत्ता, सत्ता वा संपत्ति यांचे पाठबळ आहे. अशा मूठभर व्यक्तींनी सर्व समाजाचे शोषण करून भल्या-बुऱ्या मार्गाने सन्मान वा ऐश्वर्य संपादिले आहे. मग फारसा लोकक्षोभ होऊ नये म्हणून समतेच्या नावाखाली प्रतिष्ठा-पद-पैशाचे चार तुकडे समाजाच्या तोंडावर फेकले आहेत, असेच आढळते.

कोणतेहि शिक्षण घेण्याचे, व्यवसाय करण्याचे स्वातंत्र्य आहे हे खरे; पण त्याला कसे स्वरूप प्राप्त झाले आहे ते पाहिले आहे काय? एकेकाळी वकिलीला फार चांगले दिवस होते. जो उठे तो वकील होई. वैभव त्याच्या पायावर लोळण घेत असे. पुढे त्यांचे दिवस फिरले. मग शिल्पशास्त्राला (इंजिनियरिंग) महत्त्व आले. त्या शिक्षणाला एके काळी घिसाड्याचा धंदा म्हणून हिणवले जात असे. आता शिल्पशास्त्रापेक्षा थोडे अधिक महत्त्व वैद्यकाला आलेले आहे. नाना मार्गांनी श्रीमंत झालेल्यांची मुले या शिक्षणक्रमात प्रवेश मिळविण्यासाठी दहा वीस लाख रुपयेहि सुविधाशुल्क म्हणून देतात आणि शिक्षणशुल्क म्हणून प्रतिवर्षी लाख दीडलाख रुपयेहि भरावयास सिद्ध असतात. उद्या आणखी कशाला महत्त्व येणार आहे कोणास ठाऊक! ज्या शिक्षणक्रमातून प्राप्त होणाऱ्या व्यवसायामुळे पुष्कळ पैसे थोड्या श्रमात मिळतात त्या शिक्षणासाठी दाटी होते. हे त्या त्या शिक्षणात प्रविष्ट होणाऱ्या व्यक्तीच्या पात्रतेचा विचार करून होते असे आपण म्हणू शकू काय? ही पात्रता आहे की नाही हे केवळ मागच्या साधारण परीक्षेतील गुणसंख्येवरून ठरविणे योग्य आहे काय? केवळ धनावर दृष्टी ठेवून शिक्षणाची ओढ निर्माण होत असल्याने शास्त्र आणि विद्या यांची वाढ होत नाही. समाजाच्या शोषणाला कारणीभूत असणाऱ्या सत्ता आणि संपत्तीचे केंद्रीकरण मात्र होते. वैद्यकाच्या अभ्यासक्रमामध्ये जेव्हा एखादा विद्यार्थी प्रविष्ट होतो, तेव्हा त्याचेसाठी शासनाने प्रत्येकी साधारणत: चार पाच लाख कदाचित अधिकहि रुपये वेचलेले असतात. स्थापत्य आणि शिल्पाचेहि असेच होत असणार. त्यातून मग परतफेडीच्या दृष्टीने समाजाचा काय लाभ होतो, याचा विचार करावयास नको का? कारण शासनाचे पैसे जातात म्हणजे तुमचे आणि आमचेच जातात. आपण हा भार कशासाठी सोसायचा? महागड्या वैद्यकशिक्षणातून बाहेर पडलेले आरोग्यतज्ज्ञ लोकांना जगवतात, का नागवतात असा प्रश्न त्यांच्यातीलच बुद्धिवादी उघडपणे विचारू लागले आहेत.

त्यांचे तोंड बंद करण्याचा मात्र प्रयत्न होतो आहे. परिस्थितीत काही सुधारणा होत नाही. तीच स्थिती स्थापत्याच्या वा शिल्पांच्या तज्ञांची. या शास्त्रावर आधारलेले जवळजवळ सर्व सरकारी उद्योग तोट्यात चाललेले आहेत. हे वार्षिक तोटे लाखानेच नव्हे तर कोटीने मोजावे लागत आहेत. आणि त्या शास्त्रातील तथाकथित तज्ञ अधिकारी मात्र ऐश्वर्याने विलासी जीवन जगत आहेत.

**धरण कोसळे, पूल तडकतो, उखळे रस्ता, भिंत पडे ।**
**कोलमडे छत नवी बांधणी, विकास नेई खिशाकडे।।**

असा कारभार सार्वजनिक निर्माण-विभागाचा चालू आहे. शिक्षणाच्या शंभर-सव्वाशे वर्षानंतर आणि स्वराज्यप्राप्तीच्या पन्नास वर्षानंतरहि कोणतीहि तांत्रिक अडचण उत्पन्न झाली की तिच्या सोडवणुकीसाठी आपल्याला परकीय तज्ञांच्या तोंडाकडे पाहावे लागते. हेच शिक्षणस्वातंत्र्याचे फलित काय? या स्वातंत्र्य कल्पनेमुळेच प्रत्येक विद्या आणि व्यवसाय हा केवळ धंदा झाला आहे. आपुलकी, जिव्हाळा, कर्तव्यनिष्ठा कोणालाच नाही. प्रामाणिकता, प्रयत्नशीलता, कुशलता, नवसंशोधन यांची उभारी कुठेच नाही. एखाद्याजवळ यातील काही असेलच तर त्याला परदेशात धाव घ्यावी लागते. स्वदेशात तो पूर्णपणे उपेक्षिला जातो. तो पुरेसा धूर्त नसतो. म्हणून इतर चांगले गुण असून नसल्यासारखे होतात.

मागणी-पुरवठ्याच्या अर्थशास्त्रावर उभारलेल्या सगळ्या उद्योगाचे हे असेच होणार. मागणी वाढविता येते. पुरवठा रोखता येतो. आणि स्वार्थलाभाची चंगळ साधता येते. निर्बंध कितीहि कडक असले तरी ते कागदावर राहतात. त्यातून पळवाट काढता येते. आणि भ्रष्टाचारामुळे ही पळवाटच राजमार्ग होऊन बसते. समाजधारणेकरिता अर्थशास्त्राचा विचार काही शाश्वत मूल्यावर केला पाहिजे. आणि त्यासाठी बुद्धिमत्ता, सत्ता, संपत्ति, कौशल्य आणि श्रम या अर्थोत्पादनासाठी उपयुक्त साधनांचे पूर्णपणे विकेंद्रीकरण केले पाहिजे. चातुर्वर्ण्यपद्धतीने हे विकेंद्रीकरण चांगल्या प्रकारे कार्यवाहीत आणलेले होते. वर्णव्यवस्थेमध्ये वर्ण आणि उद्योगधंदा यांचा मेळ घातलेला होता. आज प्रगत झालेल्या भौतिक विज्ञानाच्या माध्यमाने ही व्यवस्था थोड्या श्रमात, थोड्या पैशात उत्तम प्रकारे कार्यक्षम करता येईल. विज्ञानाचे सगळे लाभ पदरात पाडून घेता येतील; ऐहिक प्रगति अधिक चांगल्या प्रकारे साधता येईल. अस्वास्थ्य राहणार नाही. संघर्ष उरणार नाही. प्रगतिकरिता आवश्यक ती स्पर्धा राहील पण तिचे स्वरूप मर्यादित असेल. ती जीवघेणी होणार नाही. चातुर्वर्ण्य

व्यवस्थेत सर्वच दरिद्री राहतील. वैभव येणारच नाही, हा आरोप हट्टीपणाचा आहे. गेली बाराशे वर्षे परकीयांची आक्रमणे झाली, ती काही ते दारिद्र्य वाटून घेण्यासाठी झाली नव्हती. त्या क्रूरांनी वारंवार हिंदुस्थानची संपत्तीच प्रचंड प्रमाणावर लुटून नेली आहे. तेव्हा चातुर्वर्ण्यव्यवस्था समाजाला, देशाला दरिद्री करील हे म्हणणे अवास्तव आहे.

आज समानतेच्या खुळ्या कल्पनेमुळे ज्याला एखादी गोष्ट प्राप्त झाली आहे तो तिच्या बळावर संपत्ति आणि सत्ता या दोन्हीवरहि स्वामित्व मिळवितो. बुद्धि आणि श्रम विकत घेतो. आणि अधिकाधिक श्रीमंत होत जातो. त्यातून मग इतरांचे शोषण होते आणि व्यसने, अपराधी प्रवृत्ति, दैन्य, दारिद्र्य यांचे पीक फोफावत जाते. समाजाची देशाची स्थिति केविलवाणी होते.

वर्णव्यवस्थेचा विचार केला तर श्रीमंत होता येईल असा एकहि धंदा ब्राह्मणाला उपलब्ध नाही. केवळ अध्ययन-अध्यापन यावर कुणीहि श्रीमंत होत नाही. एखादा प्राध्यापक पुष्कळ प्रयत्न करून, त्यातहि अनेक वेळा परीक्षक म्हणून नेमला गेला असला व त्याची काही पुस्तके अभ्यासक्रमात लागली असली तर वीस वर्षांच्या शेवटी छोटे घर बांधू शकतो. परीक्षक होता आले नाही वा अभ्यासासाठी पुस्तक लागले नाही तर चांगला विद्वान असूनही आयुष्यभर भाड्याच्याच दोन-तीन खोल्यात राहावे लागते. याउलट एखादा चिवडेवाला मात्र दहा-पंधरा वर्षात चांगला संपन्न होतो. त्या बळावर नगरपालिकेत निवडून येतो व मग एखाद्या विद्वान प्राध्यापकाला नोकरीवर ठेवावे की नाही हे ठरवू शकतो, वा आपल्या संबंधातील एखाद्या अपात्र व्यक्तीलाहि प्राध्यापक वा प्राचार्यहि नेमू शकतो. उद्योगस्वातंत्र्यामुळे ही परिस्थिती निर्माण झाली आहे. ती समाजाच्या हिताची आहे की नाही याचे उत्तर कोण देणार? मग श्रीमंत होण्यासारखा कोणताहि धंदा ब्राह्मणाला उपलब्ध नसताना वर्णव्यवस्थेविषयी बहुजन समाजाच्या अंत:करणात विपरीत धारणा का निर्माण व्हावी? जन्माने ब्राह्मण असल्याचे काही लाभ आहेत. पण विविध प्रकाराने ते कोणत्याहि वर्णात जन्माला येणारासाठी आहेत. त्याची स्वरूपे वेगवेगळी आहेत. इतकेच. मोठेपणा आहे तो ब्राह्मण्यामुळे. हे ब्राह्मण्याचे गुण कोणते? शम-दम-तप-पवित्रता-क्षमाशीलता-सरळवृत्ती-ईश्वरनिष्ठा-ज्ञान-विज्ञानतज्ञता हेच ना! हे ज्यावेळी इतर वर्णात जन्मास आलेल्या व्यक्तीच्या ठिकाणी असतात तेव्हा आम्ही त्यांना संत म्हणतो. आणि संतांची योग्यता, त्यांना मिळणारा

आदर हा कोण्याहि ब्राह्मणापेक्षा कितीतरी पटीने अधिक असतो. मी प्रत्यक्ष पाहिलेली एक गोष्ट आपणास सांगतो. पंढरपुरात हरिपूरकरशास्त्री म्हणून एक वैष्णव पंडित होते. अत्यंत विद्वान, सत्‌शील ब्राह्मण, कट्टर वैष्णव, वैष्णवांचे सोवळे स्मार्तांच्या सोवळ्यापेक्षा अधिक कडक असते. सोवळ्यातहि जाती आहेत. असे कडक सोवळे पाळणारा हा निष्ठावंत वैष्णव ब्राह्मण पांडुरंगाच्या दर्शनाला जाताना आधी चोखोबारायांच्या समाधीपुढे वाकून नमस्कार करीत असे. मग श्रीनामदेवांच्या पायरीला वंदन करी. नंतर पुढे पांडुरंगाच्या दर्शनास जाई. तेव्हा मानच मिळवावयाचा असेल तर तो कोणत्याहि वर्णाला मिळू शकतो, पण त्यासाठी संत झाले पाहिजे. आणि तोच खरा संत होतो, जो जगाचे आघात सोसतो.

शूद्राला कठोर शिक्षा आहे आणि ब्राह्मणाला नाही असे म्हणता यावयाचे नाही. **'द्वावंभसि प्रवेष्टव्यौ कंठे बध्द्वा दृढां शिलां । धनवन्तमदातारं ब्राह्मणं चातपस्विनम्।।'** दानधर्म न करणाऱ्या श्रीमंताला आणि तपस्वी नसलेल्या ब्राह्मणाला गळ्यात दगड बांधून पाण्यात बुडवावे. असे सांगितले आहे. यावरून ब्राह्मणालाहि क्षमा नाही; त्यालाहि क्रूर शिक्षा आहे हे लक्षात येईल. ज्याने आपले ब्राह्मण्य टिकविलेले नाही त्याला ब्राह्मण म्हणून मान देण्याचे काहीच कारण नाही. त्याला शूद्रासारखेच लेखावे असे सांगितले आहे. ब्राह्मणाने मानसन्मानाची अपेक्षा करू नये. त्याच्यावर अन्याय झाला तरी त्याने न्यायालयात जाऊ नये. राजाचा आश्रय मागू नये. असाहि दंडक मनूने सांगितला आहे. आपण हे सगळे व्यापकपणे विचारात घेत नाही. आणि मग मनुस्मृति जाळायला निघतो.

शूद्राने वेदमंत्र ऐकू नयेत, वेदाध्ययन करू नये असा नियम धर्मशास्त्राने सांगितला आहे. आणि तो मोडला तर कठोर शिक्षाहि सांगितली आहे. यावरून ब्राह्मणांनी शूद्राला अज्ञानात ठेवले, त्याला शहाणे केले नाही, होऊ दिले नाही, त्याच्या अडाणीपणाचा लाभ उठवून स्वत:ची सेवा करावयास लावले, स्वार्थ साधला इत्यादि आरोप केले जातात पण ते खरे नाहीत. शूद्राने वेदाध्ययन करू नये असे म्हटले असले तरी त्याला ज्ञानच मिळू नये, अशासाठी ही व्यवस्था होती हे म्हणणे योग्य नाही. इतिहास-पुराणे- महाभारत- रामायणासारखे ग्रंथ यांच्या अध्ययनाने शूद्रालाहि ज्ञान मिळविण्याचा मार्ग मोकळा होता. ज्ञानप्राप्तीच्या दृष्टीने तुलनाच करावयाची तर वेदांपेक्षा महाभारतातील ज्ञानविषय अधिक

व्यापक, स्पष्ट आणि सर्वांगीण आहे. वेदांचा अर्थ कळत नसला तरी त्यांची भाषांतरे उपलब्ध आहेत. त्यातील आशयांची महाभारतासारख्या ग्रंथातील प्रतिपादनाशी तुलना करून पहावी म्हणजे लक्षात येईल की तत्त्वज्ञान, आश्रमधर्म, वर्णधर्म, कुटुंबधर्म, राजधर्म, नीति, सदाचार यांच्याविषयीचे जे ज्ञान महाभारतामध्ये आहे, त्यामानाने वेदामध्ये दोन-पाच टक्के सुद्धा नाही. क्वचित कोठे असेल तर अत्यंत संक्षिप्त, सूत्रमय भाषेत आणि दिग्दर्शनापुरतेच असेल. आता अशा स्थितीत वेदाध्ययनाविषयी बंधन असले तरी ज्ञानापासून वंचित ठेवले असे कसे म्हणता येईल? वेदांचे स्वरूप मुख्यत: मंत्रमय आहे. आणि त्याच्या उच्चारासाठी शरीराच्या पावित्र्याची आवश्यकता आहे. अशी धारणा असल्याने वेदाध्ययनासंबंधी बंधने होती. ज्ञानप्राप्तीच्या दृष्टीने वेदांपेक्षा उपनिषदे, उपनिषदांपेक्षा महाभारत हे अधिकाधिक उपयुक्त आहे. जे अत्यंत स्पष्ट आहे, सविस्तर आहे. ते अध्ययनासाठी उपलब्ध असताना जे क्लिष्ट आहे, संक्षिप्त आहे, त्रोटक आहे, ते इतर काही महत्त्वाच्या कारणासाठी वर्ज्य म्हणून सांगितले असले तर त्यामुळे राग येऊ नये. उलट संतोषच मानावा. विवेकी व्यक्तींनी तसे मानले आहे. श्रीतुकोबाराय समाधान व्यक्त करतात की बरे झाले देवा मी ब्राह्मण झालो नाही. कुणबी झालो, ब्राह्मण झालो असतो तर अभिमानाने फुकट मेलो असतो. वेदांची अक्षरे मला घोकता येत नसली तरी वेदाचा अर्थ मलाच ठाऊक आहे. इतरांनी मात्र शब्दांच्या पाठांतराचे नुसते ओझे डोक्यावर वागवलेले असते.

वर्णव्यवस्थेचा असा सर्वांगीण विचार केला म्हणजे ही पद्धति समाजरचनेच्या दृष्टीने आदर्श आहे, हे मान्य करावे लागेल. देशकाल परिस्थितीप्रमाणे काही किरकोळ पालट फार तर करावे लागतील आणि त्यामुळे सुधारणावाद्यांचा अहंकारहि काहीसा सुखावला जाईल. शूद्राने कष्टाने आणि कौशल्याने संपत्ति निर्माण करावी. वैश्यांनी विनिमयाच्या, व्यापाराच्या द्वारा ती सर्वांपर्यंत पोचवावी. क्षत्रियाने सर्वांचे, सर्वांच्या व्यवहाराचे दक्षतेने संरक्षण करावे. ब्राह्मणाने अध्ययन-अध्यापन हीच आपली इतिकर्तव्यता मानावी. असे या व्यवस्थेचे मूळ स्वरूप आहे.

शूद्राच्या संदर्भात आलेला सेवा हा शब्द बोचतो पण श्रेष्ठ अधिकारपदावर ज्यांची नियुक्ति केली जाते, त्यांनाहि सेवक (सर्व्हंट) हीच पदवी असते हे लक्षात घेतले तर सेवा शब्दातील बोच नाहीशी होईल. शिंपी, सुतार, लोहार यांची कामे ही सेवेचीच कामे आहेत.

'चातुर्वर्ण्य पद्धती ही पायऱ्यांसारखी आहे. इतर पद्धतीत वर्ग असले तरी ते खांबासारखे आहेत. त्यामुळे चातुर्वर्ण्यपद्धतीत श्रेष्ठ-कनिष्ठ, उच्च-नीच भाव असतो; इतर पद्धतीत समानता असते. पायऱ्या खाली-वर असतात; खांब सारखे असतात.' हे प्रतिपादन वरवर मोठे यथार्थ वाटले तरी ते प्रचारकी आहे. आणि फसवणूक करणारे आहे. उपमा गृहीत धरूनहि उपयुक्ततेचा विचार केला तर माडी बांधण्यासाठी खांब उपयोगी पडत असतात, तर माडीवर जाण्यासाठी पायऱ्या आवश्यक होतात. घराला माडी नसली तरी जोते असते. आणि जोत्यावर चढण्यासाठीहि पायऱ्या लागतातच. तेव्हा पायऱ्यासारखे म्हटले तर ते वाईट, असे काही मानता यावयाचे नाही. जिला आपण वरची पायरी म्हणतो तीहि खालपर्यंत आलेलीच असते आणि खांबालाहि खालचे टोक, वरचे टोक असतेच. वरच्या टोकाला जळमटे साचतात, खालच्या टोकाशी सारवण लागते, केर साठतो, केरसुणीचा स्पर्श होतो. आणि मधल्या भागाला घाण पुसली जाते. थट्टाच करावयाची तर ती कशाचीहि करता येते. कोणत्याहि तऱ्हेची विषमता नाही, उच्चनीच भाव नाही अशी व्यवस्था कोठेहि अस्तित्वात नाही. प्रकार वेगवेगळे असतात.इतकेच.

चातुर्वर्ण्य पद्धतीत वस्तुतः उच्च-नीच भाव नाही. कोठे तो दिसत असेल तर तो व्यक्तीच्या स्वार्थी अहंकारातून निर्माण झालेला असतो. तो वैयक्तिक उद्दामपणा असतो. असा हा अहंकार कोठेहि, केव्हाहि व कोणाचाहि ठेचून काढावयास मुळीच प्रत्यवाय नाही. श्रीतुकोबांनी त्याला भारवाही म्हणून हिणविले आहे तर त्याच्या पुष्कळ आधी कुंतीने केवळ वेद घोकणाराला तुच्छ ठरविले आहे. तेव्हा केवळ ब्राह्मण म्हणजे पुढारलेला हे खरे नाही. हिंदुस्थानातील महाराष्ट्रात अहिंसक गांधीभक्तांच्या कृपेने बह्वंशी ब्राह्मण खेडी सोडून नगराकडे धावला असला तरी इतर काही प्रांतातील खेड्यातील ब्राह्मण कुटुंब आजहि केविलवाणे दैन्य दारिद्र्य भोगीत आहेत.

जे खरोखरीच मागासलेले आहेत, त्यांची काही सोय करावीच लागेल. एका अवस्थेपर्यंत त्यांना विशेष संधी द्यावीच लागेल. पण सोय-संधीच्या लोभाने मागासलेलेच राहणे चांगले असे वाटणार नाही. याची मात्र दक्षता घ्यावीच लागेल. घरामध्ये कुणी दुखणाईत असला की इतर कुटुंबीयांनी स्वतः अडचण सोसून त्याला बरे करण्याचा प्रयत्न करावा लागतो. त्याला शक्ति यावी म्हणून आपल्या वाट्याचेहि पौष्टिक पदार्थ त्याचेसाठी राखून ठेवावे लागतात.

पण असे कौतुक होते म्हणून दुखणे यावे अशी इच्छा कोणी करू नये. 'पडू आजारी हीच मौज वाटे भारी' अशी कविता पूर्वी एका क्रमिक पुस्तकात होती, तसे वाटू नये. परंतु या प्रकारची प्रवृत्ति निर्माण होण्यास आरंभ झाला आहे असे वाटते. समाजातले अनेक गट 'आम्हाला मागासलेल्या वर्गातले समजा' असा आग्रह धरू लागले आहेत. जे विशिष्ट व्यवसायामुळे पिढ्यान्‌पिढ्या सुस्थितीत आहेत, तेहि विशिष्ट जातीच्या नावाखाली मागासलेपणाच्या सोयी संधी मिळवू लागले आहेत. सोय वंशपरंपरेने चालू रहात आहे. हा सर्व प्रकार घातक आहे आणि निराळ्या प्रकारे संघर्ष पेटण्यास कारणीभूत होऊन समाज स्वास्थ्य नष्ट करणारा ठरणारा आहे. यासाठी विचारवंतांनी, बुद्धिवाद्यांनी, पुढाऱ्यांनी आणि शासनानेहि फार सावध राहणे आवश्यक आहे.

चातुर्वर्ण्यात्मक समाजरचना ही आदर्श स्वरूपात जिवंतपणे नांदत होती, असा काळ फार प्राचीन आहे. महाभारतकाळ हा सुद्धा त्यादृष्टीने आदर्श काळ नव्हे, घसरणीला तेव्हाच आरंभ झाला होता. परंतु भगवान श्रीकृष्णांच्या असामान्य आणि सर्वंकष व्यक्तिमत्त्वामुळे या घसरणीचा वेग वाढला नाही. श्रीकृष्णाने आपल्या सामर्थ्याने ती थोपविली आणि त्यामुळे त्यानंतरचा अडीच तीन हजार वर्षांचा काळ सुखसमाधानाचा आणि वैभवसंपन्नतेचा राहिला. त्या आदर्शापर्यंत जाऊन पोहोचण्यास क्रांतीची आणि समग्र क्रांतीची भाषा उपयोगाची नाही. (क्रांति शब्दाचा मूळ अर्थहि चांगला नाही.) आपणास क्रमाक्रमाने दीर्घकालाचा विचार करूनच पाऊले टाकावी लागतील. नि:स्पृह आणि शाहणी राजवट लाभली तर हेच थोड्या श्रमाने त्या मानाने लवकर साधेल. पण अशी आशा करण्यासारखी परिस्थिती आज तरी दिसत नाही. आपणाला व्यक्तिश: प्रयत्न करणे आवश्यक आहे. लहान मोठ्या गटातील काही थोड्या व्यक्तींना जरी आपण या दृष्टीने विचारी आणि समंजस बनवू शकलो तरी ते पुष्कळच लाभदायक ठरेल. त्यामुळे निदान बीज तरी सुरक्षित राहील. अनुकूल काल लाभेल. तेव्हा ते तरारेल, फोफावेल. त्याचा मोठा वृक्ष होईल. आणि त्याच्या सावलीत सुखशांतता समृद्धि निरामयपणे विसावेल.

चातुर्वर्ण्य व्यवस्थेवर आक्षेप घेताना काही सुधारक आम्ही ब्राह्मणांचे विरोधक नसून ब्राह्मण्याचे शत्रू आहोत. अशा प्रकारची विधाने करताना वाचले आहे, ऐकले आहे. पण यात काहीतरी समजुतीचा घोटाळा झाला असावा असे वाटते. ब्राह्मण हा शब्द जातिवाचक आहे. ब्राह्मण्य हे ब्राह्मणाचे ठिकाणी आदर्शरूपाने

अपेक्षित असलेल्या गुणसमुच्चयाचे वाचक आहे. शम, दम, पवित्रता, तप, सोशिकपणा, सरळपणा, ज्ञान, ईश्वरनिष्ठा हे गुण असणे म्हणजे ब्राह्मण्य असणे. ब्राह्मण म्हणविणाऱ्याने या गुणांनी युक्त असले पाहिजे. आणि कोणी तसा नसेल आणि ब्राह्मण म्हणून ताठा मिरवीत असेल किंवा लाभ उठवित असेल तर जाणत्याने त्या ब्राह्मण व्यक्तीच्या विरोधात असले पाहिजे, तेच योग्य आहे आणि आवश्यक आहे. तसे न करता ब्राह्मण्याला दोषी ठरविणे हे सामाजिकदृष्ट्या हिताचे नाही, हे सुधारक म्हणविणाऱ्यांनी लक्षात ठेवले तर बरे!

आत्तापर्यंत आपण ज्या विषयांचा विचार केला त्यामध्ये अस्पृश्यता, उच्चनीचता व तज्जन्य वैषम्याची भावना हा विषय एका ज्वलन्त समस्येशी संबद्ध असा आहे. समाजात कार्य करणाऱ्याला, कार्यकर्त्याला आणि समाजाचे भले व्हावे अशी अपेक्षा बाळगून त्या दृष्टीने चिंतन करणाऱ्या विचारवंताला पदोपदी अडचणीत टाकणाऱ्या ज्या काही गोष्टी आहेत त्यात अस्पृश्यता व तिच्या संबंधीचा ऊहापोह ही गोष्ट फार महत्त्वाची आहे. हिंदू समाजरचनेत हा मोठा दोषच आहे. अद्वैत तत्त्वज्ञान मानणाऱ्या समाजावर हा लज्जास्पद कलंक आहे. पराकोटीची विषमता त्यानेच निर्माण झाली आणि आपले राष्ट्र पराभूत होऊन सातत्याने दैन्य भोगीत आहे असे सदैव मांडले जाते.

या विषयासंबंधी माझे विचार वाचताना आपण ते शांत डोक्याने व मोकळ्या मनाने वाचले पाहिजेत. कारण या विषयासंबंधी आज समाजातील अनेक लोक आणि गट फार प्रक्षुब्ध आहेत. काही सांगू गेले तर धडपणे ऐकण्याच्याहि मन:स्थितीत ते नाहीत. मात्र जे केवळ जिज्ञासूपणे व पूर्वग्रहविरहित विचाराने या प्रश्नाचे उत्तर शोधू पाहतात त्यांचेसाठी मी थोड्या विस्ताराने काही सांगू इच्छितो, मांडू इच्छितो. आग्रही नवमतवादी आणि कट्टर परंपरावादी या दोघांनाही माझे विचार फारसे पटणारे नाहीत, आवडणार तर नाहीतच नाहीत याची मला जाणीव आहे. पण तरी मी स्पष्टपणे लिहिणार आहे. ही सर्व चर्चा मनमोकळ्या वातावरणात व्हावयास पाहिजे. येथे कोणताहि हट्ट वा दुराग्रह उभयपक्षी नसावा. यासाठी थोडे लक्ष देऊन सावधपणे वाचकांनी विचार करावा. अशी विनंती मी करीत आहे.

या विषयासंबंधी मागे एका स्नेह्यासवे माझी चर्चा झाली होती. त्याने विचारले – अस्पृश्यता हिंदू संस्कृतीला मान्य आहे का? मी उत्तर दिले– – हो मान्य आहे. पुढाऱ्यांच्या प्रचारासाठी असलेल्या वक्तव्याप्रमाणे नाही म्हणणे (हिंदू धर्मात अस्पृश्यता नाही हे म्हणणे) मला शक्य नाही. त्याने नंतर विचारले – ''आज ज्या

स्वरूपात अस्पृश्यता पाळली जाते त्या पद्धतीने पाळावी का?'' मी म्हटले ''पाळू नये.'' त्याने लगेच तिसरा प्रश्न विचारला– ''हिंदु धर्मात अस्पृश्यतेला स्थान असताना स्वत:ला हिंदू म्हणवून घेण्यात भूषण मानावे काय?'' मी म्हटले – ''होय. हिंदू म्हणवून घेणे गौरवाचे आहे, भूषणाचे आहे. मी हिंदू आहे याचा मला अभिमान वाटतो.''

ही प्रश्नोत्तरे परस्परांना छेद देणारी आहेत, असे अनेकांना वाटण्याचा संभव आहे. कारण आज वातावरण एका विशिष्ट प्रकारच्या प्रचाराने भारावलेले आहे. आणि त्यामुळे वेगळ्या प्रकारचे ऐकणे हे सहजपणे मानवणारे नाही. म्हणून अस्पृश्यता या संकल्पनेसंबधीच्या काही गोष्टी थोड्या व्यापक प्रमाणाने जाणून घेतल्या पाहिजेत.

पहिल्या प्रथम एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की अस्पृश्यता ही कोणत्याहि सूडबुद्धीतून निर्माण झालेली नाही. ती असावी म्हणण्यामागे कोणताहि दुष्ट हेतू नाही. तसेच ती कोण्या जिंकलेल्या लोकावर भिन्न वंशाच्या जनसमूहावर जेतेपणाच्या अहंकारात लादलेली नाही. अस्पृश्यता ही विशिष्ट वर्गाविषयी, विशिष्ट जातीसंबंधी, विशिष्ट स्वरूपात व्यक्त होत असते वा व्यक्त होत होती म्हणून आपण तेवढ्यापुरत्या मर्यादित दृष्टिकोणाने विचार करतो. अस्पृश्यतेचा विचार हा आपण समजतो त्यापेक्षा अधिक व्यापक आणि सर्वस्पर्शी आहे. अस्पृश्यता ही केवळ व्यवस्था नाही. ती एक संस्कृति आहे. जुन्या पद्धतीच्या धार्मिक कुटुंबाचा विचार केला तर स्पृश्यास्पृश्यासंबंधीचा विचार त्यांच्या रोमारोमात भिनला आहे असे आपणास दिसेल. त्यामुळे लक्षात येईल की अस्पृश्य हा दलित किंवा पददलित समजण्याचे कोणतेहि कारण नाही.

जुन्या वळणाच्या गृहस्थाच्या घरामध्ये तो आपली आई, बहीण, मुलगी, पत्नी यांना महिन्यातून काही दिवस तरी अस्पृश्य समजतो. त्याचे सर्व घर समजते. त्या त्या वेळी ती ती स्त्रीहि स्वत:ला तसेच समजते. आणि त्यात कोणालाही काही विशेष वा अस्वाभाविक वाटत नसे. वाटत नव्हते. तेथे कोणतीहि सूडबुद्धि वा दुष्टबुद्धि नव्हती. माझी लहानपणची एक आठवण सांगतो.– माझी मुंज झाल्यावर मी अनवधानाने एकदा ही अस्पृश्यता दुर्लक्षिली म्हणून माझ्या आईच्याच हातचा मार खाल्ला आहे. आईच्या संबंधीची अस्पृश्यता मी पाळली नाही म्हणून आईने मला मारले. आता न्यूनगंड असावयाचा तर तो कोणाच्या ठिकाणी असावा? अस्पृश्यता आईच्या ठिकाणी, ती मी पाळली नाही, म्हणून आई मला मारते की तू हे काय केलेस? ही अशी स्थिती घरोघर होती. अद्यापीहि

मोठी नगरे वगळली तर इतरत्र विद्यमान् आहे. महानगरांतूनहि काही ठिकाणी अस्तित्वात आहे. अडाणी समाजातहि हा आचार पाळला जातो. हिमालयातल्या अगदी दूरच्या लहान खेड्यातहि ही पद्धती आहे. आणि हा आचार मुळीच न पाळणारे काही संप्रदायहि हिंदू धर्मात आहेत. जिथे आहेत तिथे त्याची बोच कोणाला नाही. ज्या संप्रदायात ते नाहीत, त्या संप्रदायातील व्यक्तीला कुणी तेवढ्यासाठी तिरस्करणीय मानलेले नाही.

एखाद्याचे स्नान झालेले नसताना घरात स्नान करून वावरणारी व्यक्ति त्याला अस्पृश्य समजते. स्वयंपाकगृहात असलेली आई कपडे घातलेल्या आपल्या मुलाला अस्पृश्य समजते. एकाच व्यक्तीचा डावा हात उजव्या हाताइतका स्पृश्य मानला जात नाही. ती स्वत:हि तसे मानीत नाही. सोयर आणि सुतकाचेहि तसेच आहे, फार तर होते म्हणा. रुढीने सोयर काहीसे सौम्य तर सुतकाविषयीची अस्पृश्यता बरीच कडक मानली जाते. एखाद्याच्या पायात पादत्राणे असतील तर त्याने घरात कुठपर्यंत जावे हे ठरलेले असे. सोवळे नेसून वावरणाऱ्या व्यक्तीने कुठे वावरावे याची मर्यादा होती. जुन्याकाळी या मर्यादा कडकपणे पाळल्या जात. यावरून लक्षात येईल की अस्पृश्यता ही एक विचारसरणी आहे. ती एक जीवनपद्धती आहे. संस्कृतीची ती एक धारणा आहे. ती चांगली का वाईट? आज ती योग्य का अयोग्य? हे प्रश्न उपस्थित होऊ शकतात. पण तो दुष्टावा नाही, सूडबुद्धि नाही. एवढे तरी मान्य करावयास अडचण नाही.

सोवळ्याओवळ्याच्या कल्पना व्यक्तिपरत्वे आणि संप्रदायपरत्वे मोठ्या विलक्षण असतात. माझ्या आधीच्या पिढीत किंवा त्याच्याहि थोड्या आधी श्रीवासुदेवानंद सरस्वती टेंबे स्वामी या नावाने प्रख्यात असलेले एक अधिकारी सत्पुरुष महाराष्ट्रात होऊन गेले. त्यांचे सोवळे फार कडक असे. त्यांच्या दर्शनाला जावयाचे तर धोतर-उपरणे परिधान करूनच जावे लागत असे. ब्राह्मण व्यक्तीहि त्यांना पादस्पर्शपूर्वक नमस्कार करू शकत नसे. इतरांना तर कितीतरी दूर उभे राहून दर्शन घ्यावे लागत असे. अस्पृश्य समाजातहि त्यांचा भक्तगण होता. त्यातील एकाची व माझी मनमाड स्थानकावरील विश्रामालयात पंचेचाळीस-पन्नास वर्षांपूर्वी भेट झाली होती. जातीने चांभार असलेले हे गृहस्थ सरकारी अधिकारी होते. ब्राह्मणांची यथेच्छ निंदा करीत होते. पण काही वेळानंतर बोलण्याच्या ओघात टेंबे स्वामींचे नाव निघताच त्या गृहस्थाचे अंत:करण भरून आले, आणि मी त्यांचा भक्त आहे असे त्यांनी मोठ्या

अभिमानाने मला सांगितले. मी विचारल्यावरून ते गृहस्थ ओघाओघाने म्हणाले – ''स्वामी महाराजांसारखी सत्चरित्र, पवित्र व्यक्ति सोवळे पाळीत असेल तर कोणाला झाले तरी त्यांचा राग कसा येईल?'' मला वाटते या प्रसंगावर भाष्य करण्याची आवश्यकता नाही.

सोवळे या संकल्पनेचा सांप्रदायिकपणा लक्षात येण्यासाठी माझ्या अनुभवाचा एक प्रसंग आपणास सांगतो – गुलबर्गा येथील कै. पांडुरंगराव देशमुख यांनी मला त्यांच्याकडील आषाढी उत्सवासाठी सन्मानाने कीर्तनासाठी बोलाविलेले होते. श्री.पांडुरंगराव देशमुख हे मध्वसंप्रदायी वैष्णव. या वैष्णव संप्रदायात सोवळे फार कडक. व त्यांच्या त्यासंबंधीच्या धारणाहि मोठ्या विलक्षण असतात. उत्सवाच्या मुख्य समाराधनेच्या दिवशी श्री.पांडुरंगराव माझ्याकडे आले आणि मला म्हणाले, ''आपण मागच्या पंगतीला बसलो तर चालेल ना?'' मी म्हणालो ''चालेल''. ठीक आहे म्हणून ते गेले. पण नंतर त्यांना काय वाटले कोणास ठाउक, ते मला पहिल्या पंगतीला जेवणासाठी घेऊन गेले. जेवणाचे स्थळ चौसोपी होते. त्यातील एका कडेला पहिल्या पानावर त्यांनी मला नेऊन बसविले. मी सोवळे नेसून जेवावयास बसलो होतो. माझ्याशी काटकोनात असलेल्या जवळच्या उजवीकडील सोप्यात त्यांची वैष्णव मंडळी ओले पंचे नेसून जेवावयास बसली होती. ते एक पदलालित्याने परिपूर्ण असे संस्कृतातले दशावतार स्तोत्र सुस्वर पद्धतीने म्हणत होते. वाढप चालू होते. ते संपून भोजनास आरंभ होणार तेवढ्यात त्या वैष्णवांच्या पंगतीतले प्रमुख (आचार्य) उठून माझ्यासमोर आले. त्यांनी माझ्या डोक्यावर व इतरांच्यावर आपल्या जवळील लहान गिंडीतील पाणी तुळशीपत्राने दोनतीन वेळा शिंपडले. आणि मग भोजनास प्रारंभ झाला. भोजनोत्तर मी माझ्या खोलीत वाचीत बसलो होतो. श्री.पांडुरंगराव माझ्या खोलीत आले आणि मला म्हणाले. 'मला क्षमा करा. आमच्या आचार्यांनी असे वागावयास नको होते.' ते क्षमा का मागत आहेत ते माझ्या लक्षात येईना. मी कारण विचारले. तेव्हा कळले की मी स्मार्त आहे. मध्व संप्रदायी नाही. त्यामुळे मध्वांच्या पंगतीला बसणे योग्य नाही. तेव्हा इतर काही मार्ग नसल्याने त्यांनी मला शाळिग्रामाचे तीर्थ माझ्यावर शिंपडून तेवढ्यापुरते पंक्तिपावन करून घेतले. मी कोकणस्थ ऋग्वेदी ब्राह्मण, तरी मध्व सांप्रदायिकांच्या मताने पंक्तीला बसण्याच्या दृष्टीने अपवित्रच होतो.

एक लिंगायत गृहस्थ आमच्या ती.दादांचे (श्रीदासगणु महाराजांचे) भक्त

होते. ते आमच्या घरी येत. दादांना नमस्कार करीत पण आमच्या घरी जेवत नसत. आमचे पाणीहि त्यांना चालत नसे. स्वत: शिजवून खात. आता येथे द्वेषबुद्धि आहे असे समजण्याचे काय कारण? ही एक सांप्रदायिक रूढी आहे इतकेच. जेवावयास बसलेले दोन ब्राह्मणहि एकमेकांस स्पर्श करणे योग्य मानीत नाहीत. तेव्हा अस्पृश्यतेची कल्पना द्वेषबुद्धीतून वा वंशभेदातून निर्माण झाली आहे असे समजू नये. आत्यंतिक स्वच्छता आणि उच्च प्रतीचे पावित्र्य राखण्याचा तो एक मार्ग आहे. इतकेच. मंत्रशास्त्रापासून प्राप्त होणारी सिद्धि मिळविण्यासाठी ते आवश्यक होते.

वैद्यक शास्त्रामध्ये विशेषत: शस्त्रकर्मशालेमध्ये (ऑपरेशन थिएटर) जंतुसंसर्ग टाळण्यासाठी किती दक्षता घेतली जाते, ते जर पाहिले तर ज्यांना जंतुसंसर्ग म्हणजे काय आणि त्याचे दुष्परिणाम किती होतात याचे ज्ञान नसते त्यांना, घेतली जाणारी ही दक्षता हास्यास्पद आणि अपमानास्पदहि वाटते. शस्त्रकर्मशालेमध्ये कुणीहि प्रवेश करू नये, तेथील वस्तूला हात लावू नये, इत्यादि नियम असतात. ही एक प्रकारे अस्पृश्यता पाळणेच आहे. जंतुशास्त्र आपणास माहीत आहे म्हणून त्याचे काही वाटत नाही. तसेच अधिदैवतावर आधारलेले मंत्रशास्त्र श्रद्धाविषय वाटले तर धार्मिक कारणाकरिता पाळल्या जाणाऱ्या अस्पृश्यतेचीहि बोच जाणवणार नाही. अस्पृश्य म्हणून गणल्या गेलेल्या गटांचे काही प्रमाणात हाल झाले असतील. दीर्घकालीन पारतंत्र्याने निर्माण झालेली संकुचित विचारसरणी त्या परिस्थितीला कारणीभूत असेल. पण अस्पृश्यांचे बुद्धिपुरस्सर हाल केले, त्यांचा छळ केला हे म्हणणे खोटे आहे. त्यांच्या छळाची, गळ्यात मडके बांधून हिंडावे लागण्यासारखी जी उदाहरणे म्हणून सांगितली जातात, ते सर्व प्रचारकी थोतांड आहे. त्याला कोणताहि ऐतिहासिक आधार नाही. पण समाज शांततेने राहणे हे ज्यांना अनिष्ट होते त्यांनी विशिष्ट वर्गामध्ये चीड उत्पन्न करण्यासाठी धादांत असत्य प्रचारिले. बाहेरून आलेल्या आर्यांनी भारतातील मूळच्या स्थानिक लोकांवर शूद्रातिशूद्रत्व लादले आणि त्यांना अस्पृश्य ठरविले हे विधान वस्तुत: ऐतिहासिक नाही. आर्य हा वंश असा कधीच नव्हता, ती एक संस्कृति होती. डॉ. आंबेडकरांनीहि शूद्र हे मुळात क्षत्रिय होते असे मत आपल्या एका ग्रंथात विस्ताराने प्रतिपादिले आहे. अस्पृश्य मानल्या गेलेल्या अनेक जातीजमाती सवर्णापेक्षा वंशदृष्ट्या वेगळ्या आहेत, असे काही शास्त्रीय पद्धतीने सिद्ध करता येत नाही. तेव्हा

अस्पृश्यतेच्या पाठीमागे उच्चवर्णीयांचा अहंकार आणि द्वेषबुद्धी नाही, हे निश्चित. अस्पृश्यता हा सांस्कृतिक कल्पनेतून निर्माण झालेला एक आचार आहे.

अधिदैवतावर आधारलेली मंत्रसिद्धि ही एक विद्या आपल्याकडे फार फार पूर्वी व्यापक प्रमाणात प्रचारात होती. या मंत्रसिद्धीसाठी शरीराच्या शुद्धीची आवश्यकता असे. शरीरशुद्धीसाठी आहारशुद्धि आणि विहारशुद्धि अपेक्षित आहे. अस्पृश्यता ही या प्रकरणातून जन्माला आली. ज्यांचे व्यवसाय घाणीशी संबंध असलेले होते, ज्यांचा जन्म त्याज्य अशा प्रतिलोम संकरातून आलेला होता, त्यांना स्वभावत:च समाजात अस्पृश्य म्हणून वावरावे लागे.

शरीरस्पर्श, अन्नग्रहण आणि विवाह यांच्या संबंधी काही नियम कटाक्षाने पाळावे लागत असत. तरच ते शरीर मंत्रसिद्धी प्राप्त करून घेण्यास योग्य ठरे. चार वेदांपैकी चौथा अथर्ववेद बहुतांशी निरनिराळ्या प्रकारच्या सात्त्विक–राजस–तामस अशा अभिचारमंत्रांनी युक्त आहे. ब्राह्मणाला स्वसंरक्षणासाठी आणि राजाच्या पर्यायाने समाजाच्या–देशाच्या संरक्षणासाठी या वेदाचे अध्ययन आवश्यक असे. राजपुरोहित अथर्ववेदात निष्णात असावा असे मानले जाई. यज्ञामध्येहि एक प्रमुख ऋत्विज अर्थववेदी असावा असा नियम होता. सोवळे ही कल्पनाहि या मंत्रशास्त्रासाठीच आलेली आहे. शरीर पवित्र आणि निर्मल राखण्यासाठी आवश्यक असलेले आहार विहाराचे नियम फार कडक असत. आणि ज्याला अशी मंत्रसिद्धी अपेक्षित असे त्याला त्याचे पालन कटाक्षाने करावे लागत असे. यातील काही नियम अंतरंग असत. आणि काही प्रगट असत. प्रगट नियमांचा संबंध इतर लोकांशी येत असल्यामुळे ते सर्वांच्या लक्षात येत. स्पर्शास्पर्शाचा नियम असा बाह्य आहे. आणि अस्पृश्यता हा त्यातील एक भाग आहे.

ही मंत्रविद्या जवळजवळ नष्टप्राय झाल्यासारखी आहे. निदान वैदिकमंत्रसिद्धि तरी लुप्त आहे असे म्हणता येईल. क्षुद्र साबरी विद्यांतील काही मंत्रसाधना कोठे कोठे प्रचलित आहे. पण त्यात वास्तवता किती आणि दंभाचार किती हा संशोधनाचा विषय आहे. पण तेथेहि वर्ज्यावर्ज्याचे काही संकेत पाळले जातातच. बुद्धिवाद्यांचा या मंत्रसिद्धीवर आणि अधिदैवतावर विश्वास नाही; त्यांनी तो ठेवला पाहिजे असा माझा आग्रह नाही. व्यक्तिश: मी मंत्रशक्ति मुळातच खोटी मानीत नसलो तरी मला तिच्या विषयी थोडेहि आकर्षण नाही. आणि मंत्रसिद्धीच्या बळावर कोणी काही लहान मोठे चमत्कार करीत असला तरी तेवढ्यामुळे तो कुणी थोर पुरुष आहे

म्हणून आदरणीय, वंदनीय आहे असे मला कधी वाटले नाही. पण आपला प्रस्तुत विषय मुळात अस्पृश्यतेसंबंधीचा आहे.

मंत्रसिद्धि राखण्यासाठी अस्पृश्यता पाळावी लागत असली तरी गेल्या हजार अकराशे वर्षात ही मंत्रविद्या विशेषत: वैदिकमंत्रविद्या प्रगट नाही, हे खरे. समुदायाच्या कल्याणासाठी तिचा उपयोग झाला आहे, वा कोण्या व्यक्तीवरील अन्याय मंत्रसामर्थ्याने दूर केले गेले आहेत, असेहि ऐतिहासिकदृष्ट्या माझ्यातरी वाचनात आलेले नाही. तेव्हा ज्या प्रकारची अस्पृश्यता आज पाळली जाते, त्या प्रकारची अस्पृश्यता पाळण्यास योग्य असा पुरुष सहस्रावधीत एखादा तरी असेल की नाही याची मला शंका आहे. अन्न कुणी शिजविले आहे, आणि अन्नाला कोण शिवले आहे हे लक्षात घेण्याचे काही महत्त्व आहे हे निश्चित. पण अन्न कुणी मिळवले आहे? कसे आणि कोणत्या मार्गाने मिळविले? याचा विचार अन्नाच्या पावित्र्याच्या दृष्टीने करणे अधिक महत्त्वाचे आहे. ते न करता जर कुणी केवळ स्पर्शापुरता विचार करील तर ते शास्त्रदृष्ट्या अयुक्त ठरेल. आणि म्हणून काहींच्या संबंधात तो प्रामाणिक भाबडेपणा असला तरी पुष्कळांच्या संबंधात तो दंभाचारच असेल.

अस्पृश्य समाज जो चिडल्यासारखा दिसतो त्याला मुख्यत: हा दंभाचारच कारणीभूत आहे. ब्राह्मणाने उद्योगधंद्याविषयीचे बहुतेक सर्व नियम मोडले. त्यातील वर्ज्यावर्ज्य लक्षात घेतले नाही. आणि सोवळे ओवळे सांभाळण्याची रूढी मात्र कटाक्षाने पाळली. **पेशवाईच्या उत्तरार्धात ब्राह्मण्याचा विशेष अध:पात झाला.** ब्राह्मण राज्यकर्ते झाले ते एकवेळ क्षम्य मानले तरी अधिकारपदस्थ ब्राह्मणांनी आपले पावित्र्य कोणत्याहि स्वरूपात सांभाळले नाही. सत्तेचे पालन काही वेळा तरी न्यायाला धरून केले नाही. मोंगल परवडले, मुसलमान परवडले पण ही ब्राह्मणी राजवट नको असे लोकांना त्यावेळी वाटू लागले होते. इंग्रजांचे स्वागत आरंभी महाराष्ट्रात झाले ते यामुळेच. याला इंग्रजांची धूर्तता आणि लोकांचा अविवेकी, अविचारी, भाबडेपणा कारणीभूत असला, तरी सत्ताधारी ब्राह्मणांच्या काही अनाचाराचा आधार, या अविचारी स्वागताला हेतुभूत होता हे विसरता येणार नाही. या अध:पतित काळाला जवळचे असल्यामुळे लोकहितवादी आणि श्री.जोतीबा फुले ब्राह्मणावर चिडले असले तर नवल नाही. त्यांच्या लिखाणाला या चिडीचेच अधिष्ठान प्रामुख्याने आहे. चिडलेल्या माणसाचा तोल सुटणे स्वाभाविक आहे. त्याचा प्रत्यय या दोघांच्याहि लेखनात उदंडपणे येतो.

अस्पृश्यता-पालनामागची शास्त्रीय भूमिका सुटली. ती एक रूढी राहिली. आणि तिचा काहीसा ताप केवळ हिंदूधर्मीय अस्पृश्यापुरता मर्यादित राहिला. उच्चवर्णीय हिंदू व्यक्तीच्या बैठकीवर ख्रिश्चन आणि मुसलमान वावरू शकत. ते स्पृश्य गणले जात. आणि महार-मांगादींना मात्र अस्पृश्य मानले जाई. गावातल्या सार्वजनिक विहिरीवर मुसलमानांनी पाणी भरले तर ती बाटत नाही. पण अस्पृश्यांनी पाणी भरताच ती अपवित्र होते हे कसे योग्य ठरावे? उच्चवर्णीय म्हणविणाऱ्या समाजाकडून ही फार मोठी चूक झालेली आहे. अगदी ब्राह्मणाच्याहि घरात मुसलमान नोकर असत. आणि आहेत. तो घरात सगळीकडे (क्वचित स्वयंपाकघराव्यतिरिक्त) मोकळेपणाने वावरे आणि अस्पृश्यांनी अंगणातच उभे राहिले पाहिजे हा कोणता न्याय आहे? या अन्यायाचेच प्रायश्चित्त आज आपण भोगतो आहोत.

आज अस्पृश्यतेचा प्रश्न जो मुळात निर्माण झाला त्याचे मुख्य कारण आर्थिक आहे. सामाजिक उपेक्षेतून जन्माला आलेली दीन-दरिद्री अवस्था आणि तज्जन्य हालअपेष्टा, जर अस्पृश्य समाजाला भोगावी लागली नसती तर तो समाज कदाचित इतक्या चिरडीला आला नसता. पुढारी म्हणविणाऱ्यांनी त्या समाजाच्या मन:स्थितीचा नेमका लाभ उठविला आणि सर्वच समाजाला संघर्षाच्या गर्तेत ढकलले. परंतु यामुळे हा प्रश्न सुटण्याऐवजी तो अधिक अवघड होऊन बसला आहे. इंग्रजांनी हिंदुस्थानातील बहुतेक उद्योग धंदे बळाने नष्ट केले. ते सर्व बहुतांशी शूद्रातिशूद्र जाति-उपजातीतील लोकांनीच चालविलेले होते. परिणाम म्हणून हा वर्ग व्यवसायहीन झाला. त्यांचा लाभ पुष्कळ प्रमाणात घटला. आणि दैन्य दारिद्र्य त्यांच्या वाट्याला आले. पारतंत्र्यामुळे ज्याला त्याला आपल्यापुरतेच पाहून कसे तरी जगावे लागत होते. तेव्हा समाजाच्या इतर घटकाकडे आवर्जून लक्ष देणे अवघड होते. म्हणून अस्पृश्य वर्गाची अधिकच उपेक्षा झाली. त्यांना दैन्य भोगावे लागले. वैयक्तिक स्वभावामुळे क्वचित् त्यांच्या वाट्यास छळहि आला.

अस्पृश्य समाजातील काही चळवळ्या लोकांच्यामध्ये जे द्वेषबुद्धीचे विष भरलेले दिसते ते मुळात परकियांनी टोचलेले आहे. त्यामुळे शासन आणि समाज यांनी समंजसपणा दाखविला, आपुलकीचा प्रत्यय आणून दिला, तर संघर्षाला निर्माण करणारा द्वेष नाहीसा होण्यास वेळ लागणार नाही. अस्पृश्यामध्ये जे शैक्षणिक आणि आर्थिकदृष्ट्या सुधारलेले आहेत, (तसे आता पुष्कळ आहेत)

त्यांनी आधीच सुधारलेल्या वर्गात समाविष्ट होण्याचा प्रयत्न न करता आपल्याच ज्ञातिबांधवात राहून त्यांना खाणे-पिणे-राहणे-बोलणे-वागणे यादृष्टीने सुसंस्कृत करण्याचा प्रयत्न केला पाहिजे; पण दुर्दैवाने तसे घडताना दिसत नाही. पुढारलेले अस्पृश्य स्वत:पुरते पाहतात. ब्राह्मणाहून ब्राह्मण होतात. दैनंदिन व्यवहारात आपल्याच बांधवात मिसळत नाहीत. आपल्यातीलच मांग, ढोर, चांभार या इतर अस्पृश्यामध्ये समता, समरसता निर्माण करण्याचा प्रयत्न तर करीतच नाहीत. त्यामुळे समस्या अधिकच जटिल झालेली आहे. पुढारीपण टिकविण्यासाठी चीड आणि द्वेष यांनाच प्रोत्साहन देण्याची वृत्ती आढळून येते पण यामुळे हा प्रश्न सुटणारा नाही. हे लक्षात घेतलेले बरे!

खरे तर सार्वजनिक ठिकाणची अस्पृश्यता जवळजवळ नष्ट झालेलीच आहे. सार्वजनिक विहिरींचा प्रश्न 'एक गाव एक पाणवठा' या न्यायानेच सोडविला पाहिजे. अस्पृश्य मानल्या गेलेल्या वर्गाची आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक उन्नति होईल असा प्रयत्न केला गेलाच पाहिजे पण मतांच्या राजकारणासाठी या प्रयत्नांना इतरांवर केल्या जाणाऱ्या अन्यायाचे स्वरूप येते; तसे होणार नाही याची दक्षता घेतली पाहिजे. सोय पाहताना आणि संधी देताना जातीसवेच, परिस्थितीचाहि विचार केला गेला पाहिजे. सोय आणि संधी थोडक्यात आरक्षण हा अनुवंशाने प्राप्त होणारा अधिकार होऊ नये. तसेच गुणवत्ता अगदीच दुर्लक्षिली जाईल असेहि स्वरूप या आरक्षणाला येता कामा नये. आरक्षण एकदाच उपयोगात आणावे. अधिकार-क्रमाच्या प्रत्येक पातळीवर त्याचा विचार करू नये; अन्यथा उलट दिशेने चीड आणि संघर्ष निर्माण होईल आणि तेहि धोक्याचेच ठरेल.

हिंदू समाजात जाति-उपजातींचा प्रकार फार मोठा आहे. पण तो जातिभेद हिंदू-संघटनेच्या आड येतो, असे समजण्याचे काही कारण नाही. कोणत्याहि प्रकारचे भेद असणार नाहीत, असा समज निर्माण करणे शक्य नाही. जेथे जातिभेद नाहीत, तेथे संघर्ष नाही, असेहि काही आढळून येत नाही. तसेच जातीवरून संघर्ष झाले आहेत, अशी उदाहरणे आपल्या इतिहासात नाहीत. परशुरामाचे प्रकरण जसे दाखविले जाते तसे ते मुळात नाही. उन्मत्त राज्यकर्त्याविरुद्धचा तो उठाव आहे. १९१७ च्या सुमारास रशियात क्रांति झाली तेव्हा सामंत-सत्तेला वा तिच्याशी संबधित असलेल्यांना जी वागणूक मिळाली, त्यापेक्षा काही परशुरामाचे वर्तन अधिक क्रूरतेचे नव्हते. परशुरामाच्या हातून जे काही घडले त्यातील दोषार्ह भागासाठी त्यालाहि प्रायश्चित्त भोगावे लागल्याचा उल्लेख आपल्या इतिहासात

मिळतो. रशियन क्रांतीच्या वेळी लेनिन जसा वागला त्यापेक्षा परशुराम काही वेगळा वागलेला नाही. फ्रेंच क्रांतीसुद्धा अशीच होती.

संघटनेसाठी जातिभेद नष्ट केले पाहिजेत. व त्यासाठी आंतरजातीय विवाहाला प्रोत्साहन दिले पाहिजे हे म्हणणे अयोग्य आहे. येथे जात शब्दाने मला वर्ण अभिप्रेत आहे. आपल्या देशात अलिकडे जातीजातींचा फार बुजबुजाट झाला आहे. तो नाहिसा होऊन समाज चार किंवा पाच वर्णात विभागला गेला पाहिजे. आणि जातीचा समावेश त्या त्या वर्णात होऊन वर्णदृष्ट्या त्यांना एकरूपता आली पाहिजे. अर्थात् हेहि घाईघाईने घडणारे नाही. त्यासाठी शांतपणे विचार करून समंजस मार्गाचाच अवलंब केला पाहिजे. मग त्यासाठी दुसऱ्या किंवा तिसऱ्या पायरीवर विवाह-संबंधाचाहि उपयोग होऊ शकेल. आपल्या समाजशास्त्राने वर्णसंकर होऊ नये अशी दक्षता घ्यावयास सांगितले आहे. हे वर्ण ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र आणि निषाद असे पाचच आहेत. यांनाच 'पंचजन' अशी संज्ञा होती. फार प्राचीन काळी अनुलोम विवाहपद्धति समाजमान्य होती. तिचीहि मान्यता पुढे काढून घेण्यात आली. कारण वंशशुद्धीसाठी तसा कटाक्ष ठेवणे अत्यावश्यक आहे असे लक्षात आले.

विवाह ही संस्थाच मुळात सामाजिक आहे. तिचे महत्त्व वैयक्तिक नाही. कारण ती सामाजिक कारणाकरिता निर्माण झाली आहे. विवाह दोन व्यक्तींचा व्हावयाचा असला तरी 'विवाह आमचा व्हावयाचा आहे, त्यात इतरांनी वा समाजाने लक्ष घालण्याचे कारण काय?' असे म्हणण्याचा उद्धट विचार युवक-युवतींनी मनातहि आणू नये. मी हे असे का म्हणतो हे लक्षात येण्यासाठी वेगळ्या प्रकारचे एक उदाहरण सांगतो. समजून घेण्याच्या दृष्टीने ते सोपे जाईल आणि त्या विषयात अधिक मोकळेपणाने लिहिता येईल.

आपण प्रत्यहि जे अन्न खातो त्या खाण्यामध्ये प्रत्यक्ष जो आनंद आहे तो मुख्यत: चवीचा आहे, स्वादाचा आहे, आणि ते सुख केवळ जीभ या अवयवाला मिळत असते. पण अन्न आवश्यक वाटण्याकरिता जी भूक लागते ती काही जिभेच्या संतोषासाठी असत नाही. अन्न खाण्याची इच्छा होते, ती सर्व शरीराच्या धारण-पोषणासाठी. म्हणून अन्नाचे सेवन करताना शरीराच्या आरोग्याचा आणि तत्संबंधित धारण-पोषणाचा विचार मुख्यत: केला पाहिजे. आणि मग त्या मर्यादेत जिभेला खाद्य वस्तूंची निवड करण्याचे स्वातंत्र्य देण्यात अडचण नाही. स्वादाचे सुख मला मिळते, चव मला कळते म्हणून मी मला

आवडते तेच पाहिजे तितके, पाहिजे तेव्हा खाणार असे जीभ म्हणाली आणि तोच आग्रह धरला तर काय होईल? हे इतके स्वातंत्र्य जिभेला देता येईल काय? ते तिने घेतले तर त्याचे दुष्परिणाम काही काळानंतर भोगावे लागतात की नाही ! आणि अशा स्थितीत त्या जिभेवर नकोसा स्वाद असलेली आणि कडू चवीची औषधे सोसण्याचा प्रसंग बळाने लादावा लागतो की नाही! विवाहाच्या संदर्भातहि असेच मानले पाहिजे.

समाजाच्या अखंड धारणेसाठी वंशशुद्धीचा विचार डावलून चालणार नाही. विवाह दोन व्यक्तींचा होणार असला तरी त्यांच्या मुळाशी असलेल्या कामतृप्तीचा संबंध व्यक्तीच्या देहधारणेशी नाही. समाजजीवनाच्या सातत्यासाठी आहे. आणि या गोष्टींची सुप्तासुप्त जाणीव असल्यामुळेच परस्परांनाच केवळ सुख देणाऱ्या दोन व्यक्तींच्या विवाहप्रसंगी सर्व समाज उत्साहाने सहभागी होत असतो. कारण विवाह हा समाजाला टिकवून ठेवणारा, अमरत्व देणारा विषय आहे. म्हणून त्यात सहभागी व्हावे असे समाजातल्या घटकांना वाटते. ते दोघे वधूवर परस्परांच्या सहवासात सुखी होणार आहेत. त्यांच्याशी माझा काय संबंध असे कोणाला वाटत नाही. कारण अप्रत्यक्षपणे ते माझ्या हिताचे आहे, याची अबोध जाणीव प्रत्येकाला असते. चार लोकांमध्ये बसून कुणी एकटाच स्वादिष्ट पदार्थ खात असेल तर ते हेमटेपणाचे वाटते की नाही! तो खातो आहे, स्वादिष्ट पदार्थाच्या चवीने सुखावतो आहे. त्यामुळे दुसऱ्याला आनंद होतो असे कधीही होत नाही. पण विवाह समारंभात तसे होते त्यावरून विवाहसंस्कार हा सामाजिक आहे, समाजाकरिता आहे, हे लक्षात येईल. अर्थातच त्यासाठी समाजाच्या ज्या काही मानमर्यादा असतील त्यांच्या आतच वैयक्तिक आवडी निवडीचा विचार केला गेला पाहिजे. ही गोष्ट तरुण-तरुणींनी लक्षात ठेवणे आवश्यक आहे. प्राचीन काळी प्रेमविवाह होत असत. पण तेव्हाहि ही सामाजिक मर्यादा त्या प्रेमिकांकडून दुर्लक्षिली जात नसे. कालिदासाच्या अभिज्ञान शाकुंतलातला दुष्यंत शकुंतलेच्या सौंदर्याने मोहित झालेला असला तरी शकुंतला ही महर्षि कण्वाची मुलगी नाही, ब्राह्मणकन्या नाही, हे समजल्यानंतरच 'भव हृदय साभिलाषं' असे तो म्हणतो. हीच गोष्ट भवभूतीच्या मालती-माधवाची. माधवाच्या असामान्य देखणेपणावर भाळलेली मालतीहि माधवाच्या कुळाचा विचार करते. तो स्वत:च्या कुळाला साजेशा घरण्यातील नसेल तर असफल प्रेमप्रसंगामुळे विरहसंतप्त होऊन मृत्यूला कवटाळण्यासहि ती सिद्ध आहे. पण माधवाशीच विवाह करीन असे म्हणत नाही.

आवड-निवड ही बहुतांशी संस्कारातून निर्माण होत असते. त्यामुळे संस्कृतीच्या नियंत्रणात ती राहू शकते. आवड-निवड ही काही मूलभूत नैसर्गिक प्रेरणा नाही. त्यामुळे परिणामांचा विचार करून तिला इष्ट ते वळण लावता येते वा ती नियंत्रणातहि ठेवता येते. हृद्रोगी मनुष्य तेल-तूप टाळतो, मधुमेही मनुष्य मिष्टान्नाला स्पर्श करीत नाही. आम्लपित्त असलेला तिखट वर्ज्य करतो आणि तरी ते बऱ्या प्रकारे आनंदाने-समाधानाने जगत असतात. असे नियंत्रण विवाहाच्या संदर्भातहि पाळता येणे शक्य आहे. अन्नसेवनातले अपथ्य 'याचि देही याचि डोळा' भोगावे लागत असल्याने पथ्य पाळण्याची जशी निकड वाटते तसे विवाहाच्या परिणामामुळे घडत नाही म्हणून 'वाटेल तसा वागेन' म्हणणे शोभणारे नाही. मी करीत असलेल्या कुकृत्याचे परिणाम पुढील पिढीमध्ये दिसून येणारे असतील तर मी अधिकच सावध राहिले पाहिजे. अपराध एकाचा आणि शिक्षा दुसऱ्याला हे फारच अन्यायकारक आहे, त्याची जाणीव समाजामध्ये आहे. ती कदाचित् नेणतेपणाने असेल, पण त्यामुळेच बौद्धिक पातळीवरचे प्रचार, सरकारी पुरस्कार आणि तथाकथित पुरोगाम्यांकडून प्राप्त होणारे कौतुकाचे सत्कार यांच्यामुळेहि संमिश्र विवाहाचे प्रमाण एक टक्काहि अस्तित्वात आलेले नाही. बेटीबंदी तोडावी म्हणून सतत उद्घोष करणारे पुढारीहि स्वत:च्या मुलांचे विवाह केवळ जातच नव्हे तर पोटजात पाहूनच करतात. कोकणस्थाने कोकणस्थाशीच विवाह करावा. कऱ्हाडा ब्राह्मणसुद्धा त्यासाठी योग्य नव्हे अशी टोकाची भूमिका ते आचरणात स्वीकारतात. कारण संस्काराची समानता विवाहसमयी आवश्यकच असते असे निमित्त ते पुढे करतात.

संस्काराचा विचार व त्यांचा प्रभाव हा दीर्घकालीन परिणामाने ठरावयाचा असतो. पिढ्यान्पिढ्यांच्या सातत्याने तो कार्यकारी होत असतो हे लक्षात घेता विवाहसंबंधाच्या दृष्टीने किती सावधानता बाळगली पाहिजे ते कळेल. संकरज प्रजा गुणसातत्याच्या दृष्टीने अयशस्वी ठरते असा अनुभव आहे. म्हणून आपल्याकडचे विवाहासंबंधीचे नियम उद्दंडपणाने मोडणे हे काही योग्य नाही. संस्कृति ही काही एका दिवसात तयार होणारी नसते, घराला रंग देण्याइतके हे काम सोपे नाही. व्यक्तिस्वातंत्र्याचा प्रभावी प्रचार होत असला तरी आजही समाजमान्यतेच्या बाहेर जाऊन प्रेमविवाह करणाऱ्यांच्या वाट्याला उपेक्षा, तिरस्कार येतोच. काही वेळा तर ग्रामपंचायत अशा जोडप्याला मृत्युदंडाची शिक्षा देते. ती कार्यवाहीत येते. जवळचे आप्तही दु:खी होत असले तरी अशा घटनेला ते अन्याय मानीत नाहीत.

या सगळ्या गोष्टी जाणीवपूर्वक समाजातील सर्व घटकांनी लक्षात ठेवल्या तर परस्पराविषयी द्वेष निर्माण होण्याचे कारण नाही. आपापल्या मर्यादा सांभाळून सगळेच वागतील आणि अशी ही विवेकशील वृत्ती सहजपणे निर्माण झाली की ती संघटनेला अनूकूलच ठरेल. संघटना होणे न होणे हे बाह्य परिस्थितीपेक्षा संबंधितांच्या मनोवृत्तीवर अवलंबून आहे. मनोवृत्ती विचारी, विवेकी आणि सौजन्ययुक्त असेल तर बाह्य परिस्थिती प्रतिकूल असतानाहि संघटना टिकू शकते एवढेच नव्हे तर बलवानहि होऊ शकते आणि वृत्ति जर आपल्यापुरते पहाणारी, स्वार्थी व त्यामुळे मत्सरी बनली तर त्यातून संघर्ष उभा राहतो आणि तो दुष्टतेच्या –क्रौर्याच्या पातळीवरही पोचू शकतो. एकांगी विचार सोडून दिले आणि सर्व गोष्टींचा शांतपणे साधक–बाधक विचार केला तरच प्रश्‍न सुटू शकतात हे लक्षात ठेवले पाहिजे. अन्यथा पंजाबसारखी स्थिती निर्माण होते. शीख आणि शिखेतर हिंदू यांच्यामध्ये विवाह–संबंध होत असत. सख्ख्या भावातील एक शीख तर दुसरा वैष्णव संप्रदायी असे. थोड्याच वर्षापूर्वी तेथे वणवा पेटला होता. निर्दोष व्यक्तींची हत्या होत होती. विवाहसंबंधाने प्रश्न सुटत नाहीत हे यावरुन लक्षात येईल.

जातिभेदामुळे हिंदुस्थानच्या वाट्याला पारतंत्र्य आले आणि त्यामुळेच ते दीर्घकाळ टिकून राहिले असाहि आक्षेप घेतला जातो पण तो अवास्तव आहे. त्याला इतिहासाचा कोणताहि आधार नाही. इंग्रजांचे पांढरे पाय हिंदुस्थानाला लागण्यापूर्वी एक जात, जात म्हणून दुसऱ्या जातीच्याविरुद्ध संघर्षास उभी राहिली आहे, अशी उदाहरणे नाहीत. पेशवाईतहि तसे झाले नाही वा शिंदे होळकरांच्या मोठमोठ्या राजवटीतही तसे प्रसंग घडले नाहीत. उलट जातिभेदामुळेच क्रूर, घातकी, धूर्त अशा परकीय आक्रमणाच्या दीर्घकालीन आघातानंतरही हिंदुस्थान हिंदुस्थानच राहिला आहे. तेथील धर्म, संस्कृति, परंपरा पुष्कळ अंशी टिकून आहे. जातिभेद असूनहि जातिद्वेषाची उदाहरणे अगदी तुरळक आहेत. जी आहेत त्याची कारणेहि वैयक्तिक आहेत.

पृथ्वीराज चव्हाणाच्या विरुद्ध घोरीला आमंत्रण देणारा जयचंद राठोड हा कुणी भिन्न जातीचा नव्हता, पृथ्वीराजाप्रमाणे तोहि रजपूत होता, उच्चवर्णीय क्षत्रिय होता. राणाप्रतापाच्या विरोधात अकबरला सहाय्य करणारा राजा मानसिंग हा राणाप्रतापच्याच जातीचा होता, गोतातला होता. छत्रपति शिवाजीमहाराजांच्या विरोधात विजापुरकरांना सहाय्य करणारे मोरे, घोरपडे, निंबाळकर, हे सर्व

शिवाजीराजांच्या प्रमाणे क्षत्रियकुलावतंस मराठेच होते. राजांच्या जवळचे नातेवाईकहि त्यांच्या विरोधात होते आणि शिवाजीसाठी जीवावर उदार होऊन हौतात्म्य पत्करलेले बाजी प्रभू आणि मुरारबाजी हे जातीने परभू ( प्रभू ) होते. शिवाजीराजांचा अंगरक्षक जिवा महाल हा जातीने न्हावी होता.

विजयनगरचे साम्राज्य निर्माण झाले. ते दोनशे वर्ष टिकले. शेवटी गबाळेपणा आणि फितुरी यांनी ते नष्ट झाले. त्या कालावधीतील कृष्णदेवराय यांची राजवट समृद्ध आणि समाधानी होती. पण त्या काळात वर्णव्यवस्था आणि जातिव्यवस्था ही आपल्या वैशिष्ट्यासह टिकून होती. तीच गोष्ट शिवाजीराजांच्या स्वराज्यस्थापनेची. त्यांच्या आठ मंत्र्यांपैकी सहा ब्राह्मण, एक प्रभू आणि एक मराठा होता. पेशव्यांच्या राजवटीत त्यांच्या सरदारामध्ये ब्राह्मणेतरांचे अधिक्य होते आणि या ब्राह्मणेतर सरदारांची राज्ये आकाराने अधिक मोठी आणि श्रीमंत होती. जातीभेद विवाहापुरता विचारात घेतला जाई. राजकारणात तो पूर्वी कधी डोकावला नाही. आज मात्र लोकसत्तेच्या काळात निवडणुकीसाठी इच्छुक उभा करताना पहिला विचार जातीचाच केला जातो. आणि तरी चातुर्वर्ण्य आणि जातिभेद यांच्याविरुद्ध आरडाओरडा-अकांडतांडव चालूच असते. यातील घोर विसंगति पूर्णपणे उपेक्षिली जाते याचा खेद होतो, आश्चर्य वाटते. चातुर्वर्ण्यातील वर्ण हे शरीराच्या अवयवासारखे आहेत. समाजरचनेकरिता स्वीकारलेल्या चारी वर्णाला शरीराच्या अवयवांची उपमा फार प्राचीन काळी दिली आहे. **'ब्राह्मणोऽस्य मुखमासीत् बाहूराजन्य कृत:। ऊरू तदस्य यद् वैश्य: पद्भ्यां शूद्रो अजायत।।'** आपल्याकडील चार वर्ण हे परमेश्वराच्या विविध शरीरावयवांपासून निर्माण झालेले आहेत. शरीरावयव जसे एकमेकांशी न भांडता परस्पर सहाय्यक होऊन शरीराची धारणा करतात, आपआपली ठराविक कामेच आयुष्यभर करीत राहतात, त्या प्रमाणे समाजाच्या वर्णरूप अवयवांचेहि असावे. पण ते तसे दिसत नाही. अवयवांना विचारशक्ति नसते पण समाजघटकांना वा त्यातील प्रत्येक व्यक्तीला बुद्धि, भावना या असतात. म्हणून शरीरावयवाप्रमाणे त्यांचे सामंजस्य कसे टिकेल वा सहयोग कसा साधेल? असा प्रश्न उत्पन्न होतो आणि आजची परिस्थिति पहाता तो अत्यंत योग्य असाच आहे. प्रत्येक गट वा कोणताहि एक गट आपण समाजाचा एक भाग आहोत, म्हणून मुख्यत: सर्व समाजाकरिता आहोत हे लक्षात न घेता अहंकाराने आणि स्वार्थीवृत्तीने केवळ स्वत:पुरता विचार करील तर हे असेच होणार. संघर्ष होणार, वाढणार आणि तो अस्वास्थ्य निर्माण करणार. आपण समाजाकरिता

आहोत हा विचार करून सर्व गट त्या विचाराच्या मर्यादेत वागतील तर संघर्ष आणि तज्जन्य अस्वस्थता उत्पन्न होण्याचे कारणच उरणार नाही.

उपनिषदामध्ये या दृष्टीने एक बोधप्रद कथा आलेली आहे.

पाच ज्ञानेंद्रिये आणि पाच कर्मेंद्रिये यांचे म्हणे एकदा भांडण जुंपले की शरीराची धारणा कोण करतो आणि त्यामुळे श्रेष्ठ कोण? प्रत्येक इंद्रिय आपली भूमिका आणि महत्त्व आवेशाने प्रतिपादित होते. अर्थातच हा वादविवाद संपेना, भांडण मिटेना. कारण तेवढ्यापुरता प्रत्येकाचा पक्ष हा निरुत्तर करणाराच होता. शेवटी सगळी इंद्रिये ब्रह्मदेवाकडे गेली आणि त्याला इंद्रियामध्ये श्रेष्ठ कोण याचा निर्णय देण्यास सांगितले. ब्रह्मदेव म्हणाला– मी निर्णय देऊ शकेन, पण त्याने तुमचे कोणाचेच समाधान होऊ शकणार नाही. तुम्ही हा निर्णय पक्षपाताने दिला असेच म्हणणार. तेव्हा निर्णय तुमचा तुम्हीच घ्या. त्यासाठी तुम्हाला एक युक्ति सांगतो. तुम्ही एक एक जण काही दिवस शरीर सोडून बाहेर जाऊन या. व त्यामुळे शरीरजीवनाचे किती बिघडते, काय होते? ते पहा. ज्याच्यामुळे शरीरधारणा अशक्य होईल तो श्रेष्ठ. इंद्रियांनी त्याप्रमाणे केले. पण त्यातील एकेकाच्या अनुपस्थितीमुळे शरीरधारणा कशीतरी होतच राहिली. फारसे काही बिघडले नाही. पण इतरांप्रमाणे प्राणांनीहि जेव्हा प्रस्थान ठेवले, तेव्हा मात्र भयानक परिस्थिती निर्माण झाली. अवयव निर्बल, निस्तेज झाले. असून नसल्यासारखे झाले. तेव्हा त्या सर्वांना उजाडले व सर्वजण म्हणाले – प्राणदेवा! तुम्ही जाऊ नका. तुम्हीच श्रेष्ठ आहात. आमची जी काही शक्ती आहे, ती तुमचीच आहे. तुमच्याकरिता आहे.

इतर इंद्रियांच्या प्रमाणे वा अवयवांप्रमाणे प्राण हा काही मूर्त, साकार नाही. तो स्वतंत्रपणे अवयवावाचून कोणतेतरी कार्य करतो असे दाखविताहि येत नाही. पण तो आहे हे निश्चित. सर्व इंद्रियांनी वा अवयवांनी त्याचेसाठी आपापल्या क्षेत्रातील कामे योग्य रीतीने केली पाहिजेत. तरच प्राण कार्यक्षम राहील आणि शरीराची धारणा टिकेल ! हा या कथेचा आशय लक्षात घेऊन सर्व घटक आणि व्यक्ती वागतील तर समाज उत्कृष्ट रीतीने नांदेल. धर्म आणि संस्कृतिसंपन्न, समृद्ध आणि समाधानी समाज जीवनाच्या प्राणस्थानी समजणे उपयोगाचे आहे.

आता येथे प्रश्न येतो तो विचारशक्ति असलेल्या व्यक्तीचा. शरीराच्या अवयवाचे तसे नसते असे आपण गृहीत धरलेले आहे. याकरिता शरीरशास्त्राचाहि थोडा विचार करणे उपयुक्त ठरेल. शरीरामध्ये ज्ञानेंद्रिये आणि कर्मेंद्रिंये यांच्या

व्यतिरिक्त हृदय, यकृत, वृक्क, प्लीहा, मेंदू यांच्यासारखे कितीतरी अवयव आहेत. आपल्या प्राचीन शास्त्राप्रमाणे रसरक्तादि सात धातु यांनी शरीर बनले आहे. अर्वाचीन शरीरशास्त्रज्ञ शरीराचे मूल घटक म्हणून चार किंवा पाच प्रकारांच्या पेशी(टिश्यू) मानतात. प्रत्येक लहान मोठा अवयव वा शरीराचे भाग यामध्ये घटक म्हणून या चार पाच प्रकारातील बहुतेक सर्व गोष्टी उपस्थित असतात. आपण आपल्या शरीरामध्ये मेंदू हा सर्व प्रकारचे विचार करणारा असे मानतो. तो ज्या पेशींचा (टिश्यूंचा) घडलेला आहे त्याच पेशी शरीरात ज्ञानतंतूच्या रूपाने इतरत्रही आहेत. अगदी हातापायातही आहेत. पण शरीरातील इतर अवयवांमध्ये मेंदूच्याच जातीच्या पेशी असतात. तेव्हा त्या विचारांचे कार्य न करता फक्त आदेश आणवण्याचे व संवेदना पोहोचविण्याचे काम करतात. शरीरामध्ये असणाऱ्या आणि वेगवेगळी कामे करणारे शरीरावयव घडविणाऱ्या पेशी (टिश्यू) आणि कला (सेल) या जातीने त्याच त्या आणि तशाच असल्या तरी अवयव काही त्याच त्याच तशाच पेशींनी घडलेले असूनहि एकमेकांची कामे करीत नाहीत. प्रत्येक अवयवाचे कार्य अगदी वेगवेगळे असते. एक अवयव अन्नभक्षणाचे कार्य करतो तर दुसरा मलविसर्जनाचे कार्य करतो. डोळे पाहतात, तर कान ऐकतात. हृदय आणि यकृत दोन्ही अवयव महत्त्वाचे. पण त्यांची कामे अगदी स्वतंत्र आहेत. त्यात आलटापालट होऊ शकत नाही.

अवयवांना स्वतंत्रपणे विचारशक्ति नसल्यामुळे सगळे सुरक्षित चालते. मानवसमाजाचे तसे कसे होणार? असा संशय आपण घेतो. मेंदूमधील जी पेशी विचारशक्ति बाळगते, त्याच जातीची तशीच पेशी ज्ञानतंतूत असते आणि हे ज्ञानतंतू बोटाच्या टोकापर्यंत तसेच सर्व त्वचेवर पसरलेले आहेत. त्यांचे ठिकाणी मात्र विचारशक्ति नाही. ही विचारशक्ति नावाची गोष्ट आपण मानतो ती तरी रसायनशास्त्र (केमिस्ट्री) आणि पदार्थ-विज्ञानशास्त्र (फिजिक्स) यांच्या सहाय्याने यथार्थपणे सिद्ध करता येते काय? या दोन शास्त्राच्या आधारेच वर्णन केल्या जाणाऱ्या शरीरक्रिया-शास्त्राच्या (फिजिऑलॉजीच्या) आधारे तरी विचारशक्तीच्या निर्मितीची नीट संगती लागते काय? या शरीरक्रियेच्या मुळाशीहि तत्त्वत: रसायन आणि पदार्थविज्ञानच आहे. आणि त्या दोन्ही शास्त्राच्या आधारे केवळ क्रिया आणि प्रतिक्रिया तेवढ्या सिद्ध करता येतात. तेथे या क्रिया कोठेहि आणि केव्हाहि समान परिस्थितीत सारख्याच असतात. तेव्हा विचारशक्तीचे वर्णन या क्रिया-प्रतिक्रियांच्या स्वरूपात नीटपणे करता येईल काय ? खरे म्हणजे येणार नाही. कारण क्रिया-प्रतिक्रिया या

जड आहेत. आणि विचारशक्ति ही चैतन्याचा भाग असल्याने ती जेव्हा प्रगट होते, तेव्हा एकाच घटनेची प्रतिक्रिया म्हणून भिन्न व्यक्तीमध्ये अगदी भिन्न क्वचित परस्परविरुद्ध विचारहि व्यक्त होतात. आणि त्या विचाराचे सामान्य परिणामहि वेगवेगळे घडतात. सगळ्या माणसांना मेंदू असतो. मेंदूच्या पेशीहि सर्वत्र सारख्याच असतात. शरीररचनाशास्त्राप्रमाणे त्यांची क्रिया सर्वत्र सारखीच व्हावयास हवी, पण तसे होत नाही. याचे योग्य उत्तर काय? शिक्षण, परंपरा, प्रचार यातून घडणारे संस्कार हेच या वैचारिक भिन्नतेला कारणीभूत आहेत की नाहीत? तेव्हा संस्काराने विचारांना वळण लावता येते; आणि विचारांना योग्य वळण लागले की समाज सुखशांततेने नांदू शकतो. हे आपल्याला मान्य करावेच लागेल.

मी आपल्याला एक प्रश्न विचारतो. की इंग्रज हिंदुस्थानात येण्यापूर्वी आपल्या समाजामध्ये काय परिस्थिती होती? आज ज्या प्रकारचे संघर्ष आपण प्रत्यहि पाहतो, अनुभवतो ते तेव्हा होते का? कोणत्याहि एका जातीचे दुसऱ्या जातीशी जात वेगळी म्हणून वैर माजले नव्हते – भांडण–मारामारी–हत्या झाली नव्हती. या संघर्षाची जी कारणे आज सांगितली जात आहेत ती कारणे त्या काळी होती की नाही? कारणे अस्तित्वात असून कार्य उत्पन्न झाले नसेल तर ते का? याचा विचार आपण शांतपणे करणार आहोत की नाही?

आजच्या सर्व संघर्षाला त्या त्या गटाचे दारिद्र्य अर्थात् इतरांकडून झालेले (तथाकथित) शोषण, तशीच एका गटाकडून दुसऱ्या गटाची होत असणारी मानहानी ही कारणे आहेत, असे सांगितले जाते. आणि सर्व माध्यमांच्याद्वारे या विधानांचा पुष्कळ प्रचारहि केला जात आहे. त्यामुळे ती खरीच असावीत असा दृढ विश्वास पुष्कळांच्या ठिकाणी उत्पन्न झाला आहे. या संदर्भात मी आपल्याला माझे दोन अनुभव सांगतो.

मी हिमालयात पुष्कळ प्रवास केला आहे. तेथे साधनहीनता आणि तज्जन्य दारिद्र्य ज्यांना भोगावे लागते असा समाज फार मोठा आहे. तरी चोऱ्या–दरोडे असे प्रकार नाहीत. जेथे मोटारी गेल्या नाहीत तेथे तर मुळीच नाहीत. परिवहनाच्या माध्यमातून विकास होतो. हे जर खरे तर मग चोरीचे प्रमाण का वाढावे?

मुक्तिनाथला जाताना सत्त्याहत्तर मैल जावयाचे व सत्त्याहत्तर मैल यावयाचे असा पायी प्रवास होता. रस्ता अवघड आणि विलक्षण चढ उताराचा असे. प्रतिदिनी १४–१५ मैल चालावे लागे. त्यामुळे आम्ही अगदी दमून जात असू. लहानशा खेडेगावात एखाद्या शेतकऱ्याच्या घराच्या पडवीत आम्हाला उतरण्यासाठी

जागा मिळे. पडवी अर्थातच उघडी आणि रस्त्याच्या कडेला असे. आमच्या नेहमीच्या सवयीच्या दृष्टीने लागणाऱ्या सगळ्या वस्तू त्यात असत. श्रमाने आम्हाला इतकी गाढ झोप लागलेली असे की गावंढळ भाषेत म्हणायचे तर आम्ही मढ्यासारखे पडत असू. कोणी आम्हाला उचलून नेले असते, तरी काही वेळ त्याचे आम्हाला ज्ञान झाले नसते, अशी आमची परिस्थिति असे. असे असून सुद्धा आमच्या सामानातील सुतळीचा तोडाहि त्या बारा तेरा दिवसात इकडचा तिकडे झाला नाही. एके ठिकाणी मी माझ्या पाठीवरची पिशवी विसरलो होतो. त्यात काही कपडे, थोडे खाण्याचे पदार्थ आणि साठ-सत्तर रुपये होते. कोठे विसरलो हे आठवत नव्हते. परत येताना ज्याचे इथे मी ती पिशवी विसरलो होतो त्या खेडूताने मला पाहिले आणि तो 'बाबुजी ठहरो, यह आपकी थैली' असे म्हणत माझ्या मागे धावत येऊन त्याने मला ती पिशवी दिली.. मला आनंद वाटला; त्याहूनहि आश्चर्य वाटले. मी त्याला काही (भेट) देऊ लागलो तर तो घेईना. मी असे काय विशेष केले आहे ? तुमचीच पिशवी तुम्हाला दिली. असे तो सज्जन म्हणाला. त्याची ही वृत्ती पाहून मी थक्क झालो. माझे अंत:करण भरून आले. जेमतेम निवारा मिळेल असे चंद्रमौळी घर, लज्जारक्षणापुरते मळकट, फाटके कपडे आणि एकाद्या वेळची भूक कशीबशी भागेल एवढे साधे अन्न ज्याला उपलब्ध आहे, त्याने ती माझी पिशवी जशीच्या तशी परत करावी आणि ती परत करण्यात आपण काही विशेष सत्कृत्य केले असेहि त्याला वाटू नये; हा सुसंस्कार कसा निर्माण झाला? तो त्या सर्व प्रदेशात प्रत्येक व्यक्तीच्या ठिकाणी अगदी सहज, स्वाभाविकपणे नांदत होता. म्हणून अगदी असहाय्य असलेले आम्ही सर्व वस्तूनिशी सुरक्षित परत आलो. चोरी करण्याच्या वृत्तीमागे दारिद्र्य हे मुख्य कारण असते, असे आता कसे म्हणावयाचे?

आता दुसऱ्या संदर्भातील मी माझा अनुभव सांगतो. आमचे ती. दादा (श्रीदासगणु महाराज) पंढरपुराहून परत जाताना अरण येथील श्रीसावतेबुवा, पडसाळी स्थानकाजवळील श्रीकूर्मदास आणि परंड्याजवळील डोमगावचे श्रीकल्याणस्वामी यांच्या समाधीचे दर्शन घेऊन मग पुढे कुर्डुवाडीमार्गे इतरत्र जात असत. हा प्रतिवर्षीचा कार्यक्रम होता. अरणाहून कुर्डुवाडीला बहुधा बैलगाडीनेच जात असत. मी पायी चालत होतो. लहान होतो. माझे वय १२-१३ वर्षांचे असेल. माझी वाट चुकली. वाटचाल आणि ऊन यामुळे मला श्रमाने तहान लागली. उंचवट्यावर एक झोपडी दिसत होती. पाणी मिळेल या कल्पनेने मी तेथे गेलो. झोपडीत एक

पन्नाशीच्या वयाचा खेडूत चिलीम ओढीत बसला होता. मी त्याला प्यावयासाठी पाणी मागितले. माझेकडे निरखून पाहून तो म्हणाला– ''तू बामणाचा दिसतोस. मी धनगर आहे. माझे पाणी तू कसे पिशील?''. मी चालेल म्हणालो – तरी तो मला पाणी देईना. पण माझी स्थिति पाहून त्याला कनवळा आला आणि तो तांब्या व पोहरा घेऊन फर्लांग दीड फर्लांगावरील विहिरीवर मला घेऊन गेला. पोहरा माझ्या हातात देऊन त्याने मला पाणी काढावयास सांगितले. मी ते स्वच्छ गार पाणी प्यायलो. आणि शांत झालो. त्याने मला पडसाळीचा रस्ता दाखविला. आणि तो परत गेला. त्याच्या धार्मिक कल्पनेप्रमाणे त्याने मला पाणी दिले नाही. तो धनगर स्वत:ला ब्राह्मणाला पाणी पाजण्याच्या पात्रतेचा मानीत नव्हता. पण फर्लांग– दीडफर्लांग उन्हातून अनवाणी माझ्या समागमे येऊन माझी सोय मात्र त्याने आपलेपणाने केली. या प्रसंगाचे स्मरण मला अगदी स्पष्टपणे नुकतेच घडल्यासारखे आहे.

याच संदर्भात आणखी एक ऐतिहासिक उदाहरण सांगतो. श्री.बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर या मागच्या पिढीच्या पूर्वीच्या प्रसिद्ध थोर गायकाच्या जीवनचरित्रातील हा प्रसंग आहे. ते गाणे शिकण्याकरिता ग्वाल्हेरला पळून गेले. तिथल्या एका मुसलमान गवयाकडे त्याचे शिष्यत्व पत्करून राहिले. जातीने ब्राह्मण असल्यामुळे गावातील काही ब्राह्मणांच्या घरातून मधुकरी मागून ते पोट भरीत. तो मुसलमान गायकहि 'माझ्या हातचे खाल्ले प्यायलेस तर तुला शिकवीन नाहीतर नाही' असा हट्ट धरून बसला नाही. त्यांचे वय तेव्हा पंधरा सोळा वर्षाचे असेल. मधुकरी मागून एका घरातून बाहेर पडताना ग्वाल्हेरचे अलिजाबहादर शिंदे यांचा धक्का या मुलाला लागला. एका ब्राह्मण मधुकरी मुलाला आपला स्पर्श होऊन त्याची मधुकरी विटाळली या भावनेने श्रीशिंदे सरकारांनी खेद व्यक्त केला. आणि 'यापुढे मधुकरी मागू नकोस. तुझी सोय माझ्या मुदपाकखान्यातून होईल.' असे त्याला आपलेपणाने सांगितले . जणू आपल्या हातून अजाणतेपणाने झालेल्या चुकीच्या परिमार्जनार्थ त्या मोकळ्या मनाच्या कुलवंत पुरुषाने हे निरपेक्ष औदार्य व्यक्त केले. आता आपणच विचार करा की मधुकरी मागणाऱ्या एका लहान दरिद्री मुलाला चुकून स्पर्श झाला म्हणून ग्वाल्हेर संस्थानच्या सत्ताधारी राजाने आपली चूक झाली या कल्पनेने खेद व्यक्त करण्याचे कारण काय? हे कोणत्या बाह्य दडपणाने झाले? तसे असते तर इतक्या मोठ्या सत्ताधारी व्यक्तीला ते दडपण झुगारून देणे अशक्य होते काय? बरे, चूक झाली म्हणून आपले सर्व अधिकार

सोडून राजा मधुकरी मागावयास लागला नाही की माधुकरी अधिकारपदी चढला नाही. हे जे घडले ते नियंत्रण कोणाचे? अर्थात् हे नियंत्रण संस्कृतीने निर्माण केलेले आहे. आणि त्याची कार्यवाही अगदी सहजपणे उत्स्फूर्तरीतीने झालेली आहे. माधुकऱ्याचा अहंकार जोपासला गेला नाही किंवा राजाला आपला अपमान झाला असे वाटले नाही. याच संदर्भात श्री.गोळवलकर गुरुजींनी विचारधन या पुस्तकात सांगितलेली घटनाहि विचारात घेण्यासारखी आहे.

एक इंग्रज अधिकारी रस्त्यावरून जात असताना, समोरून नायडू नावाचा देशी अधिकारी त्याला भेटला. दोघांनी हस्तांदोलन केले. औपचारिक बोलणे झाले. इतक्यात त्या इंग्रजाचा चपराशी मागे जवळ आला. त्याला पहाताच या नायडूने पुढे होऊन त्या चपराशाच्या पायाला स्पर्श करून त्याला नमस्कार केला. ते पाहून तो इंग्रज चक्रावला. तो म्हणाला ''मी तुझा वरिष्ठ, माझ्याशी तू नुसते हस्तांदोलन केलेस ! हा माझा चपराशी, तरी त्याच्या पायाला हात लावून नमस्कार? हा काय प्रकार आहे?'' नायडूने सहज सांगितले, ''साहेब, हा ब्राह्मण म्हणून आम्हाला वंद्य आहे.'' या घटनेवर वेगळ्या विवरणाची आवश्यकता नाही. श्रीगुरुजींनी सांगितलेल्या या घटनेला लाला हरदयाळ या प्रसिद्ध क्रांतिकारकांच्या लेखनाचा आधार सांगितला आहे. एक गोष्ट येथे स्पष्ट केली पाहिजे म्हणजे बुद्धिवादी सुधारक कसे बोलतात ते कळेल.

भारतीय मजदूर संघाच्या काही नेत्यांनी-धन्याने कर्मचाऱ्यांना कसे वागवावे, त्यांना कोणत्या सोयी असाव्या, सुट्या-वेतन केव्हा किती द्यावे, याचे नियम सांगणारे शुक्रनीतीतील काही श्लोक उद्धृत केले. आपल्या आधी मजुरांची चिंता वाहणारे त्रिभुवनात कोणी नव्हते. आपणावाचून दुसरा कोणी नाही अशी दृढ (अंध) श्रद्धा असणारे साम्यवादी ते श्लोक पाहून खवळले. तंडू लागले. आणि म्हणाले – हे श्लोक आमच्या विचारांचे अनुसरण करीत श्री.भा.वर्णेकरांसारख्या संस्कृत पंडिताकडून यांनी नव्याने रचून घेतले आहेत. आणि प्राचीनतेच्या नावावर लोकांना भुरळ पाडीत आहेत. साम्यवादी संप्रदाय असाच हट्टी, दुराग्रही असतो. दुसऱ्याचे चांगले खरे असले तरी ते त्यांना सोसत नाही. प्राचीन पद्धती, संस्कृती याविषयी श्री.बा.नी.देशपांडे यांनी काही चांगले विचार मांडले. आपल्या या जावयाच्या लहानशा इंग्रजी पुस्तकाला प्रस्तावना लिहून श्री.श्रीपाद अमृत डांगे या वरिष्ठ साम्यवादी नेत्याने स्वत:ची सहमती दर्शवली. झाले! सारे साम्यवादी प्रक्षुब्ध झाले. त्यांनी आरडा-ओरडा केला, आणि देशपांडे-डांगे यांना द्रोही ठरवून

पक्षाबाहेर काढले. तेव्हा ते श्री.गोळवलकर गुरुजींना थापाडे म्हणून निंदिणारच नाहीत असे नाही. कारण हिंदूविचारसरणीचे त्या सर्वांना असात्म्य (ॲलर्जि) आहे. श्री.गोळवलकर गुरुजींच्यावर चातुर्वर्ण्यवादी म्हणून टीकेचा अर्वाच्य भडिमार करणारे साम्यवादी, गुरुजींपेक्षा अधिक चातुर्वर्ण्यवादी असलेल्या गांधीजींच्या विरोधात मात्र मूग गिळून गप्प बसले.

सुसंस्काराने संपन्न असलेली श्रद्धावंत माणसे कशी वागतात, कशी विचार करतात, आणि त्यामुळे समाज धारणेसाठी निर्माण झालेल्या वर्णव्यवस्थेतील नियमांचा तोल किती स्वाभाविकपणे सांभाळला जात होता हे या वरील उदाहरणावरून लक्षात येईल. आपण आज विचारशक्तीचे आणि विकारांचे स्वतंत्रपणे जे मूल्यमापन करतो आहोत ते इंग्रजांच्या प्रभावाखाली बुद्धिपुरस्सरपणे निर्माण केलेल्या शिक्षणाच्या व प्रचाराच्या परिणामाने उत्पन्न झालेल्या विकृत अवस्थेतील आहे. एतद्देशियांमध्ये फूट पाडून त्यातल्या त्यात सुखाने राज्य करता यावे म्हणून इंग्रजांनी हे कौशल्याने निर्माण केले आणि त्यांच्या धूर्ततेला आपल्यातील वैफल्यग्रस्त झालेली वा नेता होऊ इच्छिणारी शहाणी माणसे बळी पडली. 'कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ' व्हावा, तसे घडले.

मनुष्य स्वतःला बुद्धिमान समजतो. मनुष्याच्या बुद्धीवर एक माणूसच असल्याने माझाहि तुमच्या इतका विश्वास आहे. मनुष्येतर जीवसृष्टीचा विचार करता मनुष्य त्या सर्वात कितीतरी अधिक प्रमाणात बुद्धिमान आहे हे मान्य केलेच पाहिजे. पण आपण थोडा खोलवर विचार करा म्हणजे लक्षात येईल की, या बुद्धिमान माणसाच्या ठिकाणी एक मोठे वैगुण्यहि आहे. त्याला त्याच्या बुद्धिमत्तेचा उपयोग योग्य रीतीने करून घेण्यासाठी पदोपदी मार्गदर्शकाची, संस्कारांची आवश्यकता पडते. मनुष्येतर प्राण्यांचा जीवनक्रम मार्गदर्शकावाचूनहि आपल्या जातीच्या निसर्गधर्माप्रमाणे सहजपणे घडत राहतो. माणसाच्या समाजात लहानपणापासून वाढलेले कुत्रे कुत्र्यासारखेच वाढते. माणसावर हा प्रयोग करून पहा बरे! काय होईल? एक उदाहरण विचार करण्याच्या दृष्टीने उपयोगी ठरेल म्हणून सांगतो. ते नाकारता येण्यासारखे नाही.

मनुष्याचे स्वरयंत्र अत्यंत विकसित आणि सर्व प्रकारचे वर्णध्वनि आणि स्वर निर्माण करण्यास समर्थ असे आहे. पण मनुष्याची भाषा कोणती? सिंहाची, घोड्याची, मांजराची फार काय उंदराची जी काय असेल ती भाषा निश्चित आहे. काश्मीर ते कन्याकुमारी कुठेहि जन्माला आलेला घोडा खिंकाळावयाचाच आणि कुत्रे भुंकावयाचेच.

गंगोत्रीलाहि पुष्कळ कावळे आहेत. पण त्यांची कावकाव पुण्याच्या ओंकारेश्वराजवळ गोळा झालेल्या कावळ्यासारखीच असते. जाति-उपजातीचे अंतर असेल तरच थोडा वेगळेपणा दिसतो. विकसित स्वरयंत्र असलेल्या बुद्धिमान मनुष्याचे असे का घडत नाही? या प्रश्नाचे उत्तर आपण कधी शोधले आहे काय? मनुष्य ज्या परंपरेत वा संस्कारात वाढतो, त्याला जसे शिक्षण लाभते, त्याचे परिणाम त्याच्या बोलण्यावर, त्याच्या वागण्यावर आणि विचार करण्यावरहि सतत होतात. मनुष्य बुद्धिमान खरा पण एखादा अपवाद वगळता तो प्रचाराला बळी पडतो. हे त्याहूनहि खरे आहे. त्यामुळे प्रकटने-प्रसिद्धके (जाहिराती) यांच्या आकर्षकतेचे मूल्य आणि महत्त्व केवळ मनुष्य समाजातच आहे. ते दिवसेंदिवस वाढत आहे. दूरदर्शनवरील प्रसिद्धकांचे मूल्य काही क्षणासाठी लाखालाखानी मोजावे लागते हे मनुष्याच्या बुद्धिमत्तेचे लक्षण म्हणावे काय? यासाठी विचार-स्वातंत्र्याचा विचार करताना ते कोणत्या कारणाने, कोणत्या परिस्थितीत, कोणत्या संस्काराने उत्पन्न झाले आहे ते शोधावे लागेल. आणि समाजाच्या शाश्वत हिताच्या दृष्टीने सुसंस्कार कसे घडवावेत व परिस्थिती कशी पालटावी हे ठरवावे लागेल. विविधता व काहीशी तरतमता राहूनहि तो वेगळेपणा वा भिन्नता परस्परांना बाधक होणार नाही; असाच विचार माणसाच्या अंत:करणात येत राहील, असे घडविणे संस्काराने शक्य आहे.

हे कुणाच्याच लक्षात आलेले नाही, वा असे कुणी करीत नाही असे मुळीच नाही. अनेक पक्ष प्रचार वा शिक्षण वा अभ्यासवर्गाच्या माध्यमातून किंवा ललित साहित्याच्या द्वारा समाज आपल्या मताचा बनेल अशी साधने वापरीत असतातच. साम्यवादी राष्ट्रे तर माणसांचा मेंदू धुवून काढून त्यावर आपल्या विचारांचा ठसा उमटविण्यासाठी सतत प्रयत्नशील असतात. आणि त्या साठी क्रूरतेच्या भयानक पातळीवरहि उतरतात.

भारतीय संस्कृतीने असा दुष्टपणा कधी केला नाही. अत्यंत समतोल विचाराने व प्रदीर्घ कालाच्या अनुभवाने, समाजाच्या धारणेच्या दृष्टीने हितकर काय, ते विवेकपूर्वक निश्चित केले आणि तदनूकूल विचार व्यक्तीच्या अंत:करणात निर्माण होतील अशी सुसंस्काराची व्यवस्था केली. शारीरिक अत्याचार व मानसिक छळ याचा अवलंब केला नाही. कुणी तसे केले म्हणत असेल तर ते अवास्तव आहे. प्रचारतंत्राचा तो 'गोबेल्सप्रणीत' प्रकार आहे.

असलेले भेद संघर्ष निर्माण करणारे ठरतील असे विचार आपल्या अंत:करणात परकीयांनी स्वत:च्या स्वार्थासाठी उत्पन्न केले. प्रत्येक विविधतेला

त्यांनी विषमतेच्या, आणि विरोधाच्या, पुढे संघर्षाच्या पातळीवर नेऊन पोचविले. सातत्याच्या अनेकमार्गी प्रचाराने दाम-दंड-भेदाचा उपयोग करून आमच्याच गळी उतरविण्यात ते यशस्वी झाले.

आपल्या काही घोर प्रमादांमुळे त्यांच्या या कृत्याला अनुकूल वातावरण उत्पन्न झाले. व निर्माण झालेले हे वैचारिक भूत आता पदोपदी आपल्या मानगुटीस बसत आहे. माणुसकीला यत्किंचितही बाध न आणता या संकटाचा परिहार करणे शक्य आहे. दीर्घकाळपर्यंत अनेक दिशांनी परस्पर सहकार्याने आणि समन्वयाची दृष्टी ठेवून प्रयत्न करावे लागतील. हे घडणे अवघड आहे, पण अशक्य नाही. समंजस विवेकी समर्थ संघटना हे कार्य सुखाने करू शकेल पण त्याकरिता स्वत्वाभिमानी प्रबोधनाची नितांत आवश्यकता आहे. परंपरेला पहिल्याच झटक्यात त्याज्य न मानता इतका दीर्घ काल ती टिकून राहिली आहे या मागेहि काही उपयुक्तता असली पाहिजे. ती शोधली पाहिजे इतकी जाणीव जरी विचार करू इच्छिणारांनी ठेवली तरी पुढचा मार्ग सरळ होईल.

आपल्या पुढचा आणखी एक विषय स्त्रीसंबंधीच्या भूमिकेचा आहे.

आधुनिक सुधारकांना खटकणारे **'न स्त्री स्वातंत्र्यमर्हति'** हे वाक्य मनुस्मृतीतील आहे मात्र स्वातंत्र्य शब्दाचा जो अर्थ आपण सध्या घेतो तो तेथे अभिप्रेत नाही. व हे लक्षात न घेतल्याने नाना प्रकारच्या शंका-कुशंका उगीचच निर्माण होतात. आणि मनूवर आक्षेप घेतले जातात. संपूर्ण श्लोक लक्षात घेतला तर स्वातंत्र्य शब्द कोणत्या अर्थाने वापरला जात होता ते समजेल. आणि कदाचित मनूवरचे मिथ्यारोप उणावतील. संपूर्ण श्लोक आहे तो असा.

**पिता रक्षति कौमारे भर्ता रक्षति यौवने।**
**पुत्रस्तु स्थविरे भावे न स्त्री स्वातंत्र्यमर्हति।।**

अर्थ असा- कुमारी असताना स्त्रीचे रक्षण पिता करतो. तरुणपणात नवरा तिचे रक्षण करतो. स्त्री वृद्ध झाल्यानंतर मुलगा तिचे रक्षण करतो. स्त्रीला स्वातंत्र्य योग्य नाही. म्हणजे तिला संरक्षण नाही अशी स्थिति कधीच असता कामा नये. यावरून आपण वापरतो, त्याअर्थी स्वातंत्र्य शब्द येथे आला नाही हे निश्चित होईल. पूर्वीच्या काळी स्वातंत्र्य शब्दाला फारसा चांगला अर्थ नव्हता. संरक्षणविहीन, स्वैर, अमर्याद वागणे अशा अर्थाने स्वातंत्र्य शब्द तेव्हा वापरला जात असे. कालिदासाचे शाकुंतल नाटक ज्यांनी वाचले असेल त्यांना हे पटेल. दुष्यंताने नाकारल्यामुळे कण्वशिष्यांच्या मागोमाग माहेरी परतू इच्छिणाऱ्या शकुंतलेला शारद्वत म्हणतो-

''किं स्वातंत्र्यं अवलम्बसे – मोकळी सुटलीस काय? स्वैर वागू इच्छितेस काय ? कोणत्याहि परिस्थितीत पतीचे घर न सोडणे हेच तुला योग्य आहे. ''

स्त्रीला संरक्षणाची नितांत आवश्यकता आहे आणि तीच स्थिति आपण सुधारलेला म्हणतो त्या ह्या काळातहि तशीच आहे. ज्या काळात पंतप्रधान झालेल्या वा राष्ट्रप्रमुखाच्या पदावर चढलेल्या तीन चार स्त्रिया आपल्याला माहित आहेत, त्याहि काळात परिस्थिति पालटलेली नाही. काही वर्षापूर्वी जागतिक महिला मंडळाच्या वतीने राष्ट्रसंघाकडे आवेदन केले गेले की जेव्हा कुठे युद्ध आरंभेल तेव्हा स्त्रियांच्या विशेष संरक्षणाची व्यवस्था राष्ट्रसंघाने (यूनोने) करावी. युद्धजन्य परिस्थितीत संबंधित लोकांवर अनेक प्रकारच्या आपत्ति येतच असतात. या लोकसमाजात स्त्रियाहि समाविष्ट असतात. तेव्हा राष्ट्रसंघाकडे आपल्या संरक्षणाची विशेष विनंती कशासाठी करावी? थोडा विचार केला तर कारण स्पष्ट होईल. पुरुषाच्या इच्छेविरुद्ध पुरुषावर लैंगिक अत्याचार मुळीच होऊ शकत नाही. पण स्त्री-शरीराचे वैशिष्ट्य असे आहे की, तिच्यावर तिच्या आत्यंतिक इच्छेविरुद्धहि पाशवी वृत्तीच्या पुरुषाकडून एकामागून एक असे अनेकहि अत्याचार होऊ शकतात. त्या प्रकारच्या संरक्षणाची आवश्यकता पुरुषाला नसते. (लैंगिक विकृतीचा विचार येथे करावयाचा नाही. तशी स्थिति अपवाद म्हणून संभवते) त्या प्रकारचे संरक्षण स्त्रीला असणे हे अत्यंत आवश्यक आहे. अर्थात तो संरक्षक असा असावा की, ज्याच्यावर त्या प्रकारचा अत्याचार संभवत नाही. म्हणजे स्त्री काही स्त्रीचे संरक्षण करू शकणार नाही. अर्थार्जनासाठी घराबाहेर पडलेल्या, कार्यालयीन कामे करणाऱ्या स्त्रीवर कोणत्या प्रकारच्या प्रसंगाला तोंड द्यावे लागते ते एका वृत्तपत्राच्या संपादकीयात स्पष्टपणे काहीशा विस्ताराने सांगितले गेले होते. एका समृद्ध देशाच्या राष्ट्राध्यक्षाचे किस्से त्या संदर्भात जगभर चर्चिले गेले होते. यावरून ध्यानी येईल की, विशिष्ट प्रकारचे संरक्षण आवश्यक आहे, तसे असेल तर त्याचे मूल्यहि तिने दिलेच पाहिजे. हे मूल्य कोणत्या प्रकारांनी द्यावे? त्याचा उल्लेख कोण्या संस्कृतीने केला असेल तर त्याला स्त्रियांच्यावर पारतंत्र्य लादले असे म्हणणे योग्य होणार नाही.

समजा एखाद्या गृहस्थाने आपल्या घरातील सोने चोरीला गेले असे आरक्षी ठाण्यावर नोंदविले. अधिकारी चौकशी करू लागले. त्यांनी विचारले, सोने कुठे ठेवले होते ? कोठून चोरीला गेले? गृहस्थाने सांगितले- अंगणात एका कोनाड्यात ठेवले होते. कोणाला कळणार नाही असे लपवून ठेवले होते, का उघडेच ?'' – अधिकाऱ्याने विचारले. उत्तर मिळाले, ''उघडेच!'' अधिकाऱ्याने चोरीचा शोध

पुढे काय केला असेल कोणास ठाऊक? पण गृहस्थाच्या आप्तेष्टांना त्याला वेड्याच्या रूग्णालयात पोचविण्यासाठी मात्र अवश्य सांगितले असेल. संरक्षण हवे तर काही तरी बंधने स्वीकारली पाहिजेत. मर्यादांचे पालन करावेच लागेल. अन्यथा संरक्षणच अशक्य होईल.

या संदर्भात एक प्रसंग लक्षणीय आहे. एका रसिक साहित्यिकाने आपल्या प्रवास वर्णनात तो उल्लेखिला आहे. स्त्री-स्वातंत्र्याची चळवळ आग्रहाने आणि निष्ठेने चालविणाऱ्या मंडळाच्या प्रमुखेला या लेखकांनी विचारले- बलात्काराचा प्रसंग ओढवला तर तो टाळण्यासाठी तुम्ही काय उपाय कराल? त्या प्रौढेने गंभीरपणे सांगितले म्हणे की आम्ही होकार देऊ. ही घटना परदेशातील आहे. बलात्कार या शब्दाचा प्रगट अर्थ टाळण्यासाठी स्वातंत्र्याच्या अनाठायी चळवळीतून निर्माण झालेला हा निर्लज्जपणा केविलवाणा आहे. पारतंत्र्याच्या निवारणाचे परिणाम असे हिडिस्स होत असतील तर त्या चळवळीला कोणता अर्थ राहतो !

योनिशुद्धतेच्या परंपरागत रूढ आणि अशास्त्रीय अपेक्षेतून स्त्रियांवर पारतंत्र्य लादले गेले आहे. स्त्रियांच्या पावित्र्याची ही धारणा अस्तित्वात आहे तोवर समाजाची प्रगती होणे अशक्य आहे, असे एका समाजवादी पुढाऱ्याने म्हटले आहे. हे मत अयोग्य आहे. पण त्याचा विचार आपणास सध्या कर्तव्य नाही. प्रश्न, इच्छेविरुद्धहि रतिक्रिया लादली जाण्याची शक्यता असते, त्यासाठी काय करावे हा आहे. स्त्रीला स्वातंत्र्य असू नये म्हणण्यात तिला संरक्षण असावे, ती असुरक्षित असू नये, हा भाव अभिप्रेत आहे.

स्त्री ही सापेक्षतः पुरुषापेक्षा दुर्बल आहे. स्त्री आणि पुरुष यांची शरीरे वेगळी आहेत. कारण प्रयोजने निराळी आहेत. त्यामुळे त्या शरीरांची जडण-घडणहि काही प्रमाणात वेगळी आहे. सर्वसामान्य पातळीवर पुरुषांचा मेंदू स्त्रीच्या मेंदूपेक्षा आकाराने मोठा आणि भाराने अधिक असतो. श्वासोच्छ्वासाचे जे स्वरूप आहे त्यात पुरुषांच्या श्वसनक्रियेत, पोटाची हालचाल छातीच्या मानाने अधिक होते; तर स्त्रीची श्वसनक्रिया पोटापेक्षा छातीच्या हालचालीने अधिक होते. अर्थात याचा लाभ गर्भधारणेच्या काळात मिळतो. पण अधिक शक्ति वापरावी लागणारी कामे करताना स्त्री, पुरुषाच्या अपेक्षेने लौकर थकते. शरीरातील स्नायूंची टोके हाडांशी जोडलेली असतात. आणि हे स्नायू जिथे जोडलेले असतात तिथे हाडावर त्यांचे ठसे उमटलेले असतात. पुरुषांच्या हाडावरचे हे ठसे स्त्रीच्या अस्थीवरील ठशांपेक्षा अधिक स्पष्ट असतात. स्त्रीचे त्यामानाने अस्पष्ट असतात,

पुसट असतात. या वैशिष्ट्यामुळे तज्ज्ञांना हाड स्त्रीचे आहे की पुरुषाचे हे ओळखता येते. पण ठसे पुसट असतात. याचा अर्थ स्त्रीचे स्नायुबंध पुरुषापेक्षा शिथिल असतात असा होतो. अर्थात त्यामुळे पुरुषांच्या स्नायूंची शक्ति अधिक असते. म्हणून तौलनिकदृष्ट्या पुरुष जितका भार उचलू शकतो वा वाहू शकतो तेवढा भार स्त्रीला पेलत नाही. सर्वसाधारणत: पुरुषाची उंची स्त्रीपेक्षा अधिक असते. पुरुषाची हाडेहि अधिक जड असतात. मासिक पाळीच्या तीन चार क्वचित पाच सहा दिवसात स्त्रीची शारिरिक वा मानसिक कार्यक्षमता उणावते. त्या काळात स्त्रीला अधिक विश्रांतीची आवश्यकता असते. या सर्व रचनाविशेषामुळे सामान्यपणे पुरुषापेक्षा स्त्री ही शरीराच्या दृष्टीने दुर्बल ठरते. एखाद्या विशिष्ट पुरुषापेक्षा एखादी विशिष्ट स्त्री शारीरिकदृष्ट्या सशक्त दाखविता येईल पण तो काही शास्त्राच्या दृष्टीने होणारा विचार नव्हे.

पुरुषाच्या या स्वाभाविक सशक्तपणाचे आणि स्त्रीच्या दौर्बल्याचे काही अनुषंगिक परिणामहि असतात. आणि ते स्वीकारण्यावाचून सामान्यत: गति नसते. म्हणून परदेशामध्ये काही चळवळ्या स्त्रियांनी पुरुषाशी ठेवावा लागणारा संबंध हाच सर्व पारतंत्र्याचा जनक असल्याने स्त्रियांनी स्त्रियांशीच संबंध ठेवून एकत्र राहावे असा प्रचार सुरु केला आहे व तसे प्रयोग होऊहि लागले आहेत. यामुळे अनैसर्गिक आणि विकृत पद्धतीने लैंगिक वासनेची पूर्तता करून घेता येईल. पण संतति कशी उत्पन्न होईल? मनुष्यजात एका पिढीतच संपावी अशी ही योजना आहे. दांपत्यजीवनातील समाधान या कृत्रिमतेने मिळेल काय? व हा नियम सामान्य म्हणून सर्व समाजासाठी उपयोगी पडेल काय?

गर्भधारणा आणि बालसंगोपन यामुळेहि स्त्रीला तथाकथित पारतंत्र्य भोगावे लागते. कोणत्याहि परिस्थितीत पुरुष काही त्यात वाटेकरी होऊ शकत नाही. बालसंगोपन हे राष्ट्रावर सोपवावे असाहि विचार काही स्वयंभू बुद्धिवाद्यांनी मांडला आहे. तशी व्यवस्था कार्यवाहीत आली तरी गर्भधारणा काही स्त्रीला टाळता येणार नाही. आणि त्यासाठी पुरुषांना नसलेल्या काही मर्यादा स्वीकाराव्याच लागतील. स्वाधीनता असल्यामुळे गर्भधारणाच मुळात नको अशी दक्षता स्त्रीने घ्यावयाचे ठरविले तर मानवी समाजाचे सातत्यच नष्ट होईल. ते परवडेल काय? हाहि विचार करावा लागेल. स्वातंत्र्याच्या खुळ्या कल्पनेतून आलेल्या या सर्व विकृति आहेत. त्यांचा परिणाम अंती घातकच होणार आहे.

मानसशास्त्रदृष्ट्याहि स्त्रियांची मनोवृत्ति अंकित राहण्यात अधिक समाधान मानणारी आहे, असे आढळून येत असल्याचे तज्ञांनी उल्लेखिले आहे. एका सुधारक मनोवृत्तीच्या घरात वाढलेल्या आणि पहिल्या वर्गात उत्तीर्ण होऊन एम.ए. झालेल्या माझ्या परिचयाच्या एका उपवर मुलीला मी विचारले– तुझ्यासाठी आता वरसंशोधन होत आहे. तुला तुझ्या मुठीत राहणारा नवरा हवा का तुझ्यावर अधिकार गाजविणारा नवरा हवा? ती मुलगी चटकन म्हणाली, माझ्यावर अधिकार गाजविणारा पुरुषच मला नवरा म्हणून आवडेल. ही मनोवृत्ती काही अपवाद सोडले तर सर्वत्र आढळून येते. स्वत:पेक्षा कमी शिकलेला, प्रकृतीने दुर्बल, उंचीने बुटका असा पुरुष कोण्यातरी स्त्रीला पती म्हणून योग्य वाटतो का? श्रीमंताची मुलगी एकवेळ निर्धनाला पत्करील, वासनेच्या भरात (फार तर प्रेमाच्या म्हणा) जातीचाहि विचार करणार नाही पण स्वत:पेक्षा बुटका, अशक्त आणि शिक्षणात मागासलेला नवरा काही पत्करणार नाही. आता जर पुरुष हा पत्नीपेक्षा उंच, सशक्त, अधिक शिकलेला असा असेल तर तो थोडा-बहुत अधिकार गाजविणारच. पतीने इतरांशी वागताना मात्र ताठ मानेने, स्वाभिमानाने, प्रभाव पाडीत, अधिकार गाजवीत वागावे आणि घरी पत्नीपुढे तेवढे मवाळ असावे हे कसे शक्य आहे? हे असे रसायन ब्रह्मदेवाला अजून तरी काही साधलेले नाही. काही वैगुण्य असेल, न्यूनगंड असतील, स्वार्थातिरेकाने आलेली लाचारी असेल तर गोष्ट निराळी.

एवंच, समाजधारणेच्या दृष्टीने कुटुंबसंस्था ही अपरिहार्य आहे. ती उध्वस्त झाली तर शांत, सुखी, समाधानी अशा समाजाची कल्पनाहि करावयाला नको. कुटुंबसंस्थेच्या अभावी समाजाचा भावी आधारस्तंभ असलेली लहान मुले पोरकी होतील आणि त्यांच्या मनोवृत्तीला विकृत वळण लागेल. रसेल सारख्या मुक्त-जीवनाला समर्थन देणाऱ्या आधुनिक बुद्धिमंतानेसुद्धा, मुले कुटुंबातच वाढली पाहिजेत, मुलांचे पांजरपोळ निर्माण होणे अयोग्य आहे, असे आग्रहाने प्रतिपादिले आहे. म्हणून कुटुंबसंस्था राखावयाची तर पति-पत्नीच्या नात्याला सार्थकता लाभेल अशा दृष्टीनेच स्त्री-पुरुषांना एकत्र राहावे लागेल. आणि स्त्रियांची जी वैशिष्ट्ये आहेत ती लक्षात घेऊनच त्यांचा जीवनक्रम आखावा लागेल.

अलिकडे बालकासाठी मातेच्या अंगावरील दुधाचे महत्त्व तज्ञांना पुन्हा एकदा नव्याने शोध लागल्यासारखे पटू लागले आहे. आणि त्याचा आता उदंड प्रचारहि होऊ लागला आहे. टपालावरहि ती घोषवाक्ये उमटवलेली असतात.

बालकाला मातेचे दूध हितकर असेल तर मातेला दूध येणे आवश्यक आहे. आणि त्यासाठी तिचे आहार-विहारहि दूध येण्याच्या दृष्टीने अनुकूल असले पाहिजेत. ज्या स्त्रियांना बौद्धिक श्रम जास्त करावे लागतात आणि मानसिक ताण-तणावाला तोंड द्यावे लागते, त्यांचे दूध उणावते वा नाहीसे होते. दूध उणावण्यामुळे वा नसण्यामुळे नव्या पिढीला हानी सोसावी लागते. हे होऊ नये असे वाटत असेल तर व्यवसाय निवडण्याच्या दृष्टीने काही बंधने स्वीकारावी लागतीलच.

भारतीय संस्कृतीने या गोष्टीचा खोलवर विचार करून पति-पत्नीचे नाते कसे असावे, या नात्यांनी स्त्री-पुरुषांनी कसे वागावे त्याचे धोरण सांगितले आहे. कुटुंब चालविण्याचे काम स्त्रीवर सोपविले आणि कुटुंब संरक्षणाचा भार पुरुषाने उचलावा असे ठरविले.

पत्नी म्हणून स्त्रीला पतीपेक्षा द्वितीय स्थान असले तरी माता आणि गृहिणी म्हणून कुटुंबात तिचा अधिकार मोठा आहे. तू सासू-श्वशुर, दीर, नणंदा यांची सम्राज्ञी हो. असा आदेश धर्माने विवाहाचे वेळीच दिलेला आहे. वागण्यातील सौजन्य आणि विनय हे अधिकार गाजविण्याचे साधन असल्याचे संस्कृतीने सांगितले आहे. मनूने, स्त्रीला सर्व दृष्टीने सुखी समाधानी ठेवावे, सर्वांनी सन्मानावे असे आवर्जून सांगितले आहे. दुःखी स्त्रीचे अश्रू घरादाराचा नाश करितात असे मनूच म्हणतो. म्हणून मनुविरोधी भूमिका घेणे अज्ञानाचे लक्षण ठरते. स्त्रीने बाळगावयाचे सौजन्य हे संरक्षणाकरिता तिने दिलेले मूल्य आहे. ते तिचे पारतंत्र्य नव्हे. आणि संरक्षण सुलभ जावे म्हणून तिने विनयाची मर्यादा ओलांडणे इष्ट नाही.

साहित्यिकांनी आणि कादंबरीकारांनी वस्तुत: अपवादभूत असलेल्या गोष्टीला प्राधान्य देऊन स्त्रियांच्या पारतंत्र्याचा आणि त्यांचेवर लादल्या गेलेल्या दास्याचा फार गवगवा केला आहे. मनोविश्लेषणाच्या नावाखाली साध्यासुध्या गोष्टींनाहि विकृतपणे रंगविले आहे. आणि सर्व दृष्टीने स्त्रीवर फार अन्याय होत आहे. असा प्रचार विपुलपणे चालविला आहे. 'स्त्रीने संघर्षाला उभे राहून सर्व बंधनाच्या पलिकडे गेले पाहिजे. आणि एक माणूस म्हणून आपला स्वाभिमान टिकविला पाहिजे. चूल आणि मूल यातच गुंतून राहून स्वत:चे व्यक्तिमत्व अविकसित ठेवू नये, स्वत्त्व मारू नये.' या अशा भडक चित्रणातून आधीच संस्कार सुलभ असलेले मनुष्याचे मन निराळा विचार करू लागले आणि वरवर विचार करणाऱ्या स्त्री-पुरुषाला अपराधीपणा जाणवू लागला. मग स्वैराचारी पुरुषांचे फावले पण स्त्रीने विनयाची मर्यादा झुगारून दिली, परिणामी स्त्री सुखी झाली आणि कुटुंबात

समाधान नांदू लागले, असे दिसते काय?

उथळपणे लिहिणारे साहित्यिक आणि स्त्री-स्वातंत्र्याचे प्रचारक कसे प्रतिपादन करतात याचे एक उदाहरण आपणास सांगतो. आगरकरांच्या काळात स्त्रीने घरातच गुंतून राहून आपले गुण कुजवू नयेत, तिने अर्थार्जन करण्यासाठी बाहेर पडावे आणि आपल्या ठायीच्या गुणाचा लाभ समाजाला द्यावा असे मांडले गेले. निबंध, कथा, कादंबऱ्या यातून हा विचार समाजाच्या गळी उतरविला जात असे. त्यावेळी अर्थार्जनासाठी बाहेर पडणाऱ्या स्त्रियांच्या संदर्भात सनातनी वृत्तीचे पुरुष असा आक्षेप घेत की स्त्री अशी नाना निमित्ताने घराबाहेर पडली तर तिचा अनेक पुरुषांशी संपर्क येईल. आणि मग तिचे चारित्र्य शुद्ध राहणार नाही. यावर सुधारक प्रतिवाद करीत की भारतीय स्त्री अशा मोहाला कधीहि बळी पडणार नाही. तिला आपले दायित्व चांगले समजते. ती घराबाहेर पडली तरी चारित्र्याने उज्ज्वलच राहिल. स्त्रीचे घराबाहेर पडणे हे तिच्या व्यक्तिमत्त्वाच्या विकासाच्या दृष्टीने आणि समाजाच्या दृष्टीने हिताचेच आहे. अलिकडे साहित्यिकांची भूमिका वेगळी आहे. बाहेर पडलेली स्त्री अनेक कारणांनी मोहाला बळी पडून (वा अगतिकपणे) आपले शील शुद्ध राखू शकत नाही, असे जाणवण्याइतक्या प्रमाणात आढळू लागले आहे. या परिस्थितीचे समर्थन करताना साहित्यिक म्हणत आहेत की 'जेव्हा स्त्री घराबाहेर पडत नव्हती तेव्हा ती अपेक्षेप्रमाणे शुद्ध राहणे शक्य होते. कारण स्वत:च्या पतिव्यतिरिक्त दुसरा कुणी डोळ्यापुढेच येत नसल्याने तुलना होणे, सरस-निरस ठरणे, आकर्षक वाटणे या गोष्टी संभवतच नव्हत्या. मिळवत्या स्त्रीला अनेक ठिकाणी वावरावे लागते, त्यामुळे नाना पुरुष दृष्टीसमोर येतात. मग तुलना होते आणि आकर्षण वाटते हे स्वाभाविक आहे. मिळवत्या स्त्रीला आपले स्थान-पद-प्रतिष्ठा टिकविण्यासाठी सहयोग मिळविणे, सहकार्य वाढविणे हे करावे लागते. आणि त्यातून मग स्नेहाचे कोमल संबंध निर्माण होतात. हे सर्व आता स्वाभाविक आहे. शील शुद्धीच्या परंपरागत कल्पना आता सोडाव्याच लागतील.'

साहित्यिकांनी येथे नेमकी कोलांटी उडी घेतलेली आहे. त्यामुळे सनातनी जे म्हणत होते तेच खरे ठरले. त्यांना जी शंका होती ती योग्यच होती असे म्हणावे लागेल. कुटुंबातील पति-पत्नी संबंधावर आक्षेप घेताना पुरुष हा स्त्रीकडे एक उपभोगाचे साधन म्हणून पाहतो. तो तिला केवळ दासी किंवा भोगदासी समजत असतो. असे प्रतिपादिले जाते आणि त्यासाठी अतिशयोक्तीचा अवलंब करून काही खरी-खोटी उदाहरणेहि आकर्षक भाषेत प्रस्तुत केली जातात. स्त्रीने केवळ

रांधा -वाढा -उष्टी काढा यातच गुंतून राहावे काय ? असेहि विचारले जाते. या संदर्भात दोन गोष्टी आपल्यापुढे विचारार्थ ठेवतो. स्त्री-शरीराचा आणि स्त्री सौंदर्याचा उपयोग प्रसिद्धी तंत्रासाठी करणे (जाहिरातीसाठी करणे) हे विज्ञानयुगाचे एक अपरिहार्य अंग झाले आहे. हे आपणास ठाऊक आहे ना? पुस्तकांची वेष्टणे, मासिकांची मुखपृष्ठे आणि सर्व प्रकारची प्रसिद्धके (जाहिराती) स्त्रियांच्या चित्रांचा उपयोग करतात. त्यात स्त्रियांच्या शरीराचे आणि सौष्ठवाचे हिडीस्स आणि ओंगळ प्रदर्शन असते. चित्रपटातहि स्त्री-शरीर अधिकात अधिक उघडे करून मिरविले जाते. असे असणे हाहि स्त्री शरीराचा उपभोगच नाही का? कार्यालयातून स्वागत करण्याच्या कामावर बहुधा स्त्रीचीच नियुक्ति होते. त्याचे कारण उघडच आहे.

व्यक्तिमत्त्वाचा विकास करू इच्छिणाऱ्या स्त्री-मुक्ति आंदोलकांना हे कसे बोचत नाही व त्याविरुद्ध उग्र संघर्ष का पेटवला जात नाही?

विमानात जी परिचारिका नियुक्त केली जाते, ती रांधत नसेल पण तिचे मुख्य काम वाढण्याचे आणि उष्टी काढण्याचेच असते ना! स्वत:च्या घरात आपल्याच माणसांना शिजवून वाढणे आक्षेपार्ह समजावे आणि साऱ्या गावांची उष्टी काढण्याच्या उद्योगाला प्रतिष्ठित मानावे. हे योग्य आहे काय? एखादा परदेशी विमान प्रवासी या परिचारिकेला बुद्धिपुरस्सर राबवित असतो. क्वचित अश्लील चाळेहि करतो. कधीकधी तो प्रवासी कुणी सामान्य नसतो. चांगला प्रतिष्ठित असतो. एखाद्या राज्याचा मंत्रीसुद्धा असतो. वेतनाच्या लोभाने कर्तव्याचा एक भाग म्हणून या बापडीला हे सर्व निमूटपणे सोसावेहि लागते. या तुलनेत स्वत:च्या घरात मुलामाणसांसाठी कष्ट उपशित असताना अनेक गृहिणींच्या मुद्रेवर समाधानाचे स्वाभिमानाचे जे तेज झळकत असते ते निश्चितच अधिक आदरणीय असते.

आर्थिक स्वातंत्र्य मिळविण्याच्या दृष्टीने स्त्रियांनी अर्थार्जन करावे असेहि स्त्री-स्वातंत्र्याचे पुरस्कर्ते प्रचारित असतात. आपल्या देशाच्या सद्य:स्थितीच्या दृष्टीने याहि प्रश्नाचा विचार केला पाहिजे. आपल्याकडे बेकारी भयावह प्रमाणात आहे. अशा स्थितीत (केवळ संधी आहे म्हणून) एका घरातील दोघांनी (पति-पत्नीनी) मिळवित राहावे, आणि त्यामुळे दुसरे एक घर मिळकतीची सोय नसल्याने दारिद्र्यात खितपावे हे सामाजिक न्यायाचा विचार करताना योग्य आहे काय? हे एका दृष्टीने अप्रत्यक्ष शोषणच आहे. माझ्या एका समाजवादी मित्राशी या विषयावर माझा वाद झाला. पतिपत्नी दोघेहि कट्टर समाजवादी विचाराचे. पति महाविद्यालयात प्राध्यापक, पत्नी एका माध्यमिक शाळेत अध्यापिका. दोघांचे मिळून प्रतिमासी

बावीसशे–तेवीसशे रुपये घरात येणार (ही गोष्ट तीसपस्तीस वर्षापूर्वीची आहे. पाचवा वेतन आयोग त्यावेळी कार्यवाहीत नव्हता.) मी माझ्या मित्राला म्हणालो, ‘‘अरे ! तुम्ही दोघे नोकरी करता. तुम्हाला एकच मूल आहे. तुम्हाला अडीच माणसांना दोन हजारापेक्षा अधिक रुपये मिळतात आणि तुमच्या इतकाच शिकलेला एक सुशिक्षित बेकार राहतो. तुमच्यामुळे बेकार राहतो. याचा तू कसा विचार करीत नाहीस ?’’ तो म्हणाला, ‘‘स्त्री–पुरुषांची समानता आम्ही मानतो. आणि समानता प्रस्थापित करणे हा आमचा सिद्धान्तच आहे.’’ मी म्हणालो, ‘‘ठीक आहे. मग दोघांपैकी कोणाचे तरी एकाचे वेतन घरी न वापरता संस्थेला दे, तुझ्या पक्षाला दे.’’ यावर त्याने काही उत्तर दिले नाही. नोकरी करणाऱ्या स्त्रियांच्यावर घरच्या आणि बाहेरच्या कामाचा ताण येतो. त्यामुळे बहुतेक स्त्रियांच्या प्रकृतीवर परिणाम झालेला दिसतो. सामाजिकदृष्ट्या याहि गोष्टीचा विचार झाला पाहिजे.

पूर्वी एका मासिकात स्त्रियांनी धूम्रपान करावे की नाही असा एक प्रश्न चर्चेस घेतला होता. त्यात एका महिलेने ‘पुरुषांनी धूम्रपान केले तर चालते मग स्त्रियांच्या संदर्भात हा प्रश्नच का निर्माण व्हावा ?’ असा प्रतिपश्न केला होता. हा प्रश्न विचारणे म्हणजे समता नाकारणे आहे असे या प्रतिप्रश्नातून सुचवावयाचे आहे. गर्भधारणेच्या काळात मूल प्रत्यक्ष मातेच्या रक्तावर पोसले जात असते. धूम्रपानातून रक्तात भिनणारे तंबाखूचे विष त्या अत्यंत कोवळ्या अवस्थेतील बालकाला किती तरी अधिक घातक होऊ शकते हे प्रतिप्रश्न विचारणाऱ्या त्या माउलीने लक्षात घेतले नसावे. मुलाला अंगावर पाजायचे म्हटले तरी धूम्रपान बालकाला बाधक होऊ शकते. स्त्री–शरीर तुलनेने पुरुषापेक्षा कोमल असल्याने तंबाखूच्या विषाचे दुष्परिणामहि पुरुषापेक्षा स्त्रियांना अधिक प्रमाणात भोगावे लागतील. समतेच्या घोषात या वस्तुस्थितीकडे दुर्लक्ष करू नये.

कोणावर हेतूचा आरोप करू नये हे खरे पण स्त्री स्वातंत्र्याचा आग्रहाने पुरस्कार करणाऱ्या काही पुरुषांच्या जीवनाकडे पाहिले की ते स्वत:च्या उद्दाम वासनांच्या तृप्तीसाठी हा प्रचार करीत आहेत की काय असा संशय येतो ! स्त्री जर घरातच राहिली तर अशा उद्दंड पुरुषांच्या अनाचाराला वावच राहणार नाही. म्हणून तर स्त्रीने बंधनातून मुक्त व्हावे असे प्रतिपादन तो नाना प्रकारच्या कौशल्याने करीत असतो.

योग्य त्या मर्यादेत राहूनही स्त्री सुखी आणि समाधानी राहू शकते अशी उदाहरणे अजून तरी आपल्या समाजात बहुसंख्य आहेत. सुगृहिणीच्या व्यक्तिमत्वाचे

एक अमूर्त बंधन सज्जन पुरुषालाहि जाणवत असते. आणि मग त्याचे वर्तनहि संयमी आणि सौहार्दपूर्ण राहते. बंधने स्वीकारणे अपरिहार्य आहे असे एकदा ठरल्यानंतर ती जाचक होणार नाहीत वा जाचक वाटणार नाहीत, असे वातावरण निर्माण करणे शक्य आहे. त्यासाठी विवेक, सौजन्य आणि कौशल्य याची आवश्यकता असते. त्यात स्त्रीने पुढाकार घेणे हे नैसर्गिक असल्याने अधिक सुलभ आहे आणि ते तिला भूषणावहहि आहे. मोहित होणे वा मोहात पडणे या गोष्टीचा व्यापक संदर्भात विचार केला तर मोहाला बळी पडणाऱ्या पुरुषांची संख्या अधिक, आणि मोहित करणाऱ्यामधे स्त्रिया कितीतरी पटीने वरचढ असेच आढळून येते.

मनुस्मृति, संतवाङ्मय इत्यादि स्थानी स्त्रियांची निंदा असते त्याचा अप्रत्यक्ष उद्देश पुरुषाचे दोष लक्षात घेऊन त्याला सावध करण्याचा प्रयत्न असतो हे लक्षात घेणे चांगले. बिघडलेली स्त्री बिघडलेल्या पुरुषापेक्षा अधिक घातक असते. समाजाच्या दृष्टीने हा विचार करावाच लागेल.

परंतु स्त्री पुरुषातील भेदाचे हे शास्त्रीय सत्य तथाकथित सुधारक दुर्लक्षितात वा दडपून टाकतात.

ख्रिस्तीन द लाकोस्ते या समाजशास्त्रज्ञ महिलेला एका चर्चासत्रात ‘ आजच्या राजकीय प्रवाहाची कल्पना असून तू असे (स्त्रीपुरुष भेदाचे) संशोधन प्रसिद्ध करण्याचे धाडस करतेसच कसे’ असा प्रश्न विचारण्यात आला. ‘या संशोधनाचा उपयोग स्त्रियांविरुद्ध, त्या पुरुषापेक्षा कमी दर्जाच्याच आहेत’ हे परंपरागत मत अधिक घट्ट करण्याकडे होईल अशी भीति बऱ्याच समाजशास्त्रज्ञांना वाटते आहे. (किस्त्रीम दिवाळी १९९३) आता ही विज्ञाननिष्ठाच म्हणावयाची का ?

आपल्या प्राचीन परंपरेला स्त्रीपुरुष भेदाचे हे सत्य आधीच आकळले असल्याने तिने कुटुंब आणि समाज यांचे शाश्वत हित लक्षात घेऊनच स्त्रीचे जीवन कसे असावे ते स्पष्टपणे सांगून ठेवले आहे. त्याविरुद्ध कांगावा करणे अनिष्ट आहे.

कोणतीहि सामाजिक व्यवस्था निरामय आणि संघर्षरहित चालावयाची तर त्यासाठी शासनव्यवस्थाहि चांगली असावी लागते. ती तशी नसेल तर अराजक निर्माण होते. आणि अराजक ही गोष्ट अतिशय घातक आहे. अराजकामध्ये व्यवस्था नावाची काही वस्तूच अस्तित्वात नसते. कोणाचेहि जीवित, वित्त सुरक्षित रहात नाही. समाजातील सर्व लहान मोठे घटक भयग्रस्त राहतात. त्यातूनच अन्याय, क्रौर्य, शोषण, निर्माण होते. निरनिराळ्या प्रकारे बलदंड झालेले लोक बलहीनांना सुखाने जगू देत नाहीत. निसर्गाचाहि तोल ढासळतो. मोठ्या माशाने

लहान माशाला खावे असा मात्स्यन्याय समाजाचे दैव (दुर्दैव) होऊन राहतो.

राजा या संस्थेची निर्मिती मनुष्यजातीचे शाश्वत हित साधावे यासाठीच झाली आहे. राजा ही खऱ्या अर्थाने कुणी व्यक्ति नाही. ते एक तत्त्व आहे. प्रचलित भाषेत या तत्त्वाला सोयीसाठी नेता या नावाने ओळखावे.

राजा कसा निर्माण झाला वा केला, ते पाहिले म्हणजे राजाच्या (नेत्याच्या) ठिकाणी कोणते गुण अपेक्षित आहेत. ते स्पष्ट होते. आणि लोककल्याणाच्या दृष्टीने त्याचे महत्त्वहि लक्षात येते.

इन्द्र, वायू, अग्नि, सूर्य, कुबेर या देवतातील दिव्य गुणांचे अंश एकत्र करून राजाला निर्माण केले आहे. संरक्षणाची अधिष्ठात्री देवता असलेल्या विष्णूचा तो अंश मानला जातो.

देवतांचा राजा इन्द्र हा पराक्रमी आणि सर्व गुणांनी संपन्न असा राजा आहे. त्याला सहस्र नेत्र असतात असे त्याचे वर्णन पुराणांनी केले आहे. या सहस्रनेत्र कल्पनेवर चाणक्याने केलेली एक टिप्पणी मोठी मार्मिक आहे. चाणक्याच्या अर्थशास्त्रात म्हटले आहे की, 'इन्द्रहि वास्तविक दोनच डोळ्यांचा आहे. पण तो आपल्या असंख्य राजपुरुषांच्या-शासन चालविणाऱ्या अधिकाऱ्यांच्या डोळ्यांनी प्रजेच्या रक्षणासाठी, प्रजेच्या हितासाठी आवश्यक त्या सर्व बारीकसारिक गोष्टींवर तीक्ष्ण दृष्टि ठेवून असतो. म्हणून त्याला सहस्रनेत्र म्हणतात.'

राजा ज्यावेळी स्वतःच्या उग्र तेजाने दुष्टांना जाळून टाकतो, त्यावेळी त्याचे ठिकाणी अग्नीचा अंश प्रगट होतो. राजा ज्यावेळी लोकांचे हित साधून देण्याच्या दृष्टीने आपल्या गुप्तचररुपी किरणांनी सर्वांचे अवलोकन करतो, पाण्याचे शोषण करण्याच्या स्वरुपात तो प्रजेकडून कर गोळा करतो, (सहस्रगुणमुत्स्रष्टुं आदत्ते हि रसं रविः) तेव्हा त्याचे ठिकाणचा सूर्याचा अंश प्रगट होतो. जेव्हा तो आचारभ्रष्ट जनांना नष्ट करतो, अधार्मिकाना दंड देतो, धार्मिकांचे रक्षण करतो, तेव्हा त्याचे ठिकाणचा यमाचा अंश व्यक्त होतो. जेव्हा तो प्रजेवर धनधान्याचा, सुखसमाधानाचा वर्षाव करतो, तेव्हा त्याचे ठिकाणी कुबेराचा अंश आहे, हे ध्यानात येते.

राजाच्या ठिकाणी असलेल्या देवतांच्या अंशाचे महाभारताने दिलेले हे स्पष्टीकरण फार मार्मिक आहे. राजाचे कार्यक्षेत्र, राजाची कर्तव्ये त्यावरून नीट उमगून येतात.

मनूने राजाच्या-राज्याच्या शासन व्यवस्थेच्या दृष्टीने सात प्रकृति सांगितल्या

आहेत. त्यात राजा–अमात्य–पुर (पौर–नागरिक–जानपद–ग्रामीण–एकूण सर्व प्रजा) राष्ट्र (भूमि–संस्कृति) कोश–सैन्य आणि मित्र (शेजारपाजारची अनुकूल राज्ये) यांचा समावेश होतो. प्रकृति म्हणजे सात अंगे वा राज्यातील सात प्रमुख घटक. श्रेष्ठतेच्या अनुक्रमाने राजा सर्वांत प्रमुख तर मित्रांचा क्रमांक शेवटचा. कारण सामान्यत: राजानेच इतरातील गुणदोषांची चर्चा करून त्यांच्या वागण्याबोलण्यावर नीट दृष्टी ठेवून योग्यायोग्य काय ते ठरवावयाचे असते. पण असे असले तरी राजा आणि अमात्यादि इतर मिळून सात ही सर्वच अंगे आपापल्या दृष्टीने महत्त्वाचीच आहेत.

राजा हा वर्णाने क्षत्रियच असावा. ही धारणा वेदाइतकी प्राचीन आहे. आणि ती छत्रपती शिवाजी राजापर्यंत प्रचारात होती. इतिहासाच्या विशालकार्यकाळात याला काही अपवाद आहेत, पण ते अपवादच आहेत. एकीकडून 'राजाला वंदनीय–श्रेष्ठ मानावे', 'त्याच्या आज्ञेत सर्वांनी राहावे' असे सांगितले असले, 'राजाची अवज्ञा कुणीहि करू नये' असा आग्रह धरला असला, तरी राजाने, अमर्याद सत्ता हाती असल्यामुळे, स्वैर वर्तनी होऊ नये. प्रजेला पीडा देऊ नये, प्रजेचे शोषण करु नये, असा आदेशहि मनूने राजाच्या संदर्भात वारंवार प्रगट केला आहे. राजाने धार्मिक वृत्तीने वागावे, सदाचारी विद्वानांचा आदर करावा, नम्रपणाने राहावे, त्याने आपल्या इंद्रियांवर परिपूर्ण नियंत्रण ठेवावे, सुखासक्त होऊ नये. पारध करणे (मृगयेस जाणे), द्यूत खेळणे, दिवसा झोपणे, इतरांची निंदा करणे, स्त्रियात मग्न होऊन राहणे, मद्यपान, नृत्यगायन, लोकप्रशंसा इत्यादीच्या आहारी न जाणे; या गोष्टी राजाने कटाक्षाने सांभाळल्याच पाहिजेत. राजा जर लोभाला बळी पडेल, तर त्यापायी संपत्ती, कीर्ति आणि विशेष कारणांनी जीव यांनाहि त्याला मुकावे लागेल असे मनु म्हणतो.

मनूने राजाची दिनचर्याहि सांगितली आहे. त्याने सकाळी लौकर उठावे. प्रातर्विधी आटोपल्यानंतर देवदर्शन करून सभेत प्रवेश करावा. प्रजाजनांची गाऱ्हाणी ऐकावी. त्यांचे समाधान करावे. नंतर गुप्त अशा स्थानी बसून मंत्र्यांच्या समवेत राज्यशासनाविषयी विशेष गोष्टींवर विचार–विनिमय करावा. ही चर्चा अत्यंत गुप्त राहावी. नंतर राजाने व्यायाम करून भोजन घ्यावे. अन्नात विष असणार नाही याची निश्चिती करून घ्यावी. भोजन शिजविण्या–वाढण्याशी संबद्ध असलेले सर्व सेवक वा आप्तहि अत्यंत विश्वासाचे असावेत. त्यांचेवरहि पूर्ण विश्वास टाकून असावध राहू नये.

आहाराविषयी आणि इतर सर्वत्रहि अत्यंत दक्ष असावे. भोजनानंतर राजाने अंत:पुरात जाऊन काही वेळ विश्रांति घ्यावी. तेथील सर्वजणहि विश्वासाचे असावेत. राजाने स्वत:च्या सर्वांगिण दक्षतेविषयी उत्तम व्यवस्था केलेली असावी (आज आपण लोकसत्ता मानतो, त्याकाळातहि राष्ट्राध्यक्ष, पंतप्रधान, मुख्यमंत्री, मंत्री इत्यादींच्यासाठीहि अशीच कडेकोट संरक्षण व्यवस्था राखीत असतो. त्यासाठी प्रत्येकी एकूण व्यय प्रतिदिनी लाखालाखानीहि होत असतो.) विश्रांतीत फार वेळ न रमता त्याने आपली दृष्टी राज्यकारभाराकडे वळवावी. मंत्र्यांशी बोलावे. सैन्य, शस्त्रास्त्रे, कोष यांची पाहणी करावी. संध्याकाळी थोडी उपासना करून, गुप्तचरांकडून आलेल्या वार्ता श्रवण कराव्या. शत्रूंच्या आणि मित्रांच्या हालचालींची माहिती करून घ्यावी. त्यादृष्टीने कराव्या लागणाऱ्या व्यवस्थेसंबंधी अधिकाऱ्यांना आदेश द्यावे.

संरक्षणव्यवस्थेसाठी मनूने अनेकप्रकारचे दुर्ग सांगितले असले तरी गिरिदुर्ग (डोंगरी किल्ला) हा अधिक महत्त्वाचा मानलेला आहे. (गिरिदुर्गाचे मनूने वर्णिलेले महत्त्व असामान्य आहे. शे-सवाशे वर्षापूर्वी पर्यंत ते अबाधित होते आज ते स्थान पाताळदुर्गानी (बंकर) घेतलेले आहे.) त्यांची सुस्थिति सर्वदृष्टीने राखली जाईल हे राजाने आवर्जून नीट पाहिले पाहिजे. राजाचे सर्व सैन्य-घोडदळ, हत्तीदळ, रथदळ आणि पायदळ या चारी अंगांनी आवश्यक त्या सर्व शस्त्रास्त्रांसह सदैव संपन्न आणि सुसज्ज असले पाहिजे. राजाचा शत्रूंना आणि दुष्टांना धाक असला पाहिजे. राजाचे मित्र संतुष्ट असले पाहिजेत. प्रजा सुखी आणि समाधानी असली पाहिजे.

चारहि वर्ण आणि चारहि आश्रम धर्माच्या आदेशाप्रमाणे आपापल्या अनुशासनात राहतील हे कटाक्षाने पाहणे हे राजाचे प्रमुख कर्तव्य आहे. त्यासाठीच ईश्वराने राजा निर्माण केला आहे. हे सर्व योग्यरीतीने घडावयाचे तर राज्यातील शासनव्यवस्था आणि न्यायसंस्था निर्लोभी, सत्यनिष्ठ, कर्तव्यदक्ष, ज्ञानसंपन्न आणि निस्वार्थी असली पाहिजे हे पाहणेहि राजाच्या कर्तव्याचा, राज्यकारभाराचा एक भागच आहे. त्यासाठी राजाने निरनिराळ्या विभागावर निरनिराळी कामे करण्यासाठी योग्य असे ज्येष्ठ आणि कनिष्ठ अधिकारी नेमले पाहिजेत. हे सर्व अधिकारी कर्तव्यदक्ष, निर्लोभी, त्या त्या विषयात तज्ज्ञ, आणि चतुर असले पाहिजेत. त्यांच्याकडून प्रजेचे पीडन वा शोषण होणार नाही, हे राजाने दक्षतेने पाहणे आवश्यक आहे. मनुष्य निर्लोभी आणि जाणता असेल तर त्याच्या हातातील लहानमोठी सत्ता प्रजाहितासाठी

अत्यंत उपयुक्त ठरते. सर्वांना न्याय मिळतो. अडचणींचा परिहार होतो. उलट शासकीय अधिकारी स्वार्थी, लोभी आणि कर्तव्यदक्ष नसेल तर तो, जनसामान्यांचे शोषण करणे, आणि त्यांच्यावर अन्याय करणे, याविषयात कोणत्याहि थरापर्यंत जाऊ शकतो. म्हणून राजपुरुषांना राजसत्तेचा धाक असला पाहिजे. कर्तव्यपालनात यत्किंचितहि चूक झाली तरी क्षमा होणार नाही, याची उत्कट जाण त्यांचे ठिकाणी असली पाहिजे. एरवी राजा व्यक्तिश: चांगला असला तरी प्रजेला त्रास झाल्यावाचून रहात नाही, आणि शेवटी तो दोष राजाकडेच येतो. म्हणून राजाने सगळीकडून सावधानता ठेवली पाहिजे. आणि कोणत्या ना कोणत्या प्रकारे प्रजेशी संपर्क राहील याची व्यवस्था ठेवली पाहिजे.

शासनव्यवस्थेच्या दृष्टीने प्रत्येक गावात एक पंचायत असावी आणि त्यावर एक प्रमुख ग्रामणी असावा. अशा दहा गावावर एक अधिकारी असावा. अशा दहा अधिकाऱ्यांवर एक ज्येष्ठ अधिकारी असावा. हे सर्व कुलीन आणि सदाचरणी असावेत एवढाच उल्लेख मनूने केला आहे. वर्णाचा वा जातीचा नामनिर्देश येथे नाही. मनूची शासनव्यवस्था अशी उपयुक्त तरी आटोपशीर होती. त्यामुळे आज होते आहे त्याप्रमाणे विकासाकरिता काढलेल्या रुपयातील पंचाऐशी पैसे व्यवस्थापनातच वेचले जात नव्हते. (आपल्या माजी पंतप्रधानांनीच ही वस्तुस्थिती सांगितली आहे.) आणि उरलेल्या पंधरा पैशातील भ्रष्टाचारी अपहरण किती, देवच जाणे.

न्यायव्यवस्थेसंबंधीहि मनूची धारणा व्यापक आणि स्पष्ट आहे. या न्यायव्यवस्थेत न्यायाधीश, त्याचे दोन-तीन सहकारी, वादी-प्रतिवादी, साक्षी, लेखी वा तोंडी पुरावे या सर्वांचा समावेश आहे. पण आज आहे त्या स्वरुपाचा अधिवक्ता(वकील) मात्र उपलब्ध नाही. न्यायाधीशाने स्वत:च साक्षी, वादी, प्रतिवादी यांच्या हालचाली, त्यांचे हावभाव, त्यांच्या मुद्रेवर उमटणाऱ्या भावना, त्यांच्या डोळ्यातून व्यक्त होणारे विकार, घाबरेपणा, रोमांचित होणे, घाम येणे, बोलण्यातील चढउतार, केलेल्या विधानातील विसंगति, स्वर-ध्वनि यांचे चढउतार, हे सर्व बारकाव्याने ध्यानात घ्यावे. पुराव्याची नीटप्रकारे छाननी करावी. आणि मगच सत्य ओळखून प्रामाणिकपणे न्यायदान करावे. न्यायालयापुढे येणारे वाद-प्रतिवाद सतरा अठरा प्रकारचे आहेत. आजची बहुतेक सर्व प्रकरणे त्यात येतात.

मनूच्या न्यायव्यवस्थेतील ही व्यापकता, दक्षता आणि सौष्ठव जगतातील सर्व न्यायवेत्त्यांनी आदरपूर्वक गौरविली आहे.

न्यायाधीश साक्ष देणाराला त्याने खरे तेच नेमके सांगावे, म्हणून ईश्वराची सर्वज्ञता, ईश्वराचे प्रभुत्व, सूर्य-चंद्राचे पाहणे, नीति-धर्म या सर्वांची आठवण करुन देतो. लोक परलोकाची जाणिव ठेवण्यास सांगतो. खोटे बोलल्यास होणाऱ्या शिक्षेचे भयहि दाखवितो. म्हणून ''खरे तेच बोल'' असा आदेश देतो. साक्षी म्हणून कोणास निवडावे, कोणाच्या बोलण्यावर भरंवसा ठेवावा, यासंबंधीहि मनूने काही नियम सांगितले आहेत. त्यात तो कुलीन असणे आणि सदाचरणी असणे या गुणांना प्राधान्य आहे.

अधिवक्ता(वकील) हा घटक नसल्याने न्यायदान कधीहि रेंगाळत नसे. योग्य तो न्याय त्वरित मिळे. 'न्यायास उशीर होणे म्हणजे अन्याय करणेच आहे' असे न्यायालयाच्या संदर्भात म्हटले जाते. याचे दायित्व खरे तर अधिवक्त्यावरच आहे. पुन:पुन: पुढचा दिवस मागून घेणे, न्यायाच्या कामकाजाचे दिवस वरचेवर पुढेपुढे ढकलणे, अनेक युक्त्याप्रयुक्त्यांचा अवलंब करून प्रश्नांच्या भडिमाराने, साक्ष देणारास गोंधळवून टाकणे, साक्षीस आधीच पढवून ठेवणे, अपराधी असला तरी त्याला निर्दोष ठरविण्यासाठी वाक्‌चातुर्याची पराकाष्ठा करणे, निर्बंधाचा कीस काढणे, पुराव्यांची चिरफाड करणे इत्यादी उद्योग हे अधिवक्ते करतात आणि मग न्यायदानाचे काय होते हे आज सर्वांना ज्ञात आहे. खालच्या वरच्या न्यायालयाचे निर्णय उलटसुलट होतात. त्यातील अंतर टोकाचे असते. खालच्या न्यायसंस्थेत निर्दोष गणलेला वर मृत्युदंडास पात्र ठरतो. तर खाली मृत्युदंड झालेला वर निर्दोष ठरतो. पुण्यातील एक अधिवक्ते ज्या आरोपीचा पक्ष घेतील तो प्रत्यक्षात हत्यारा असला तरी न्यायालयात निर्दोष म्हणून घोषित होत असे. फार तर संशयाचा लाभ मिळून त्याची सुटका होई. असे त्यांचे वैशिष्ट्य त्यांच्यावरील मृत्युलेखात गौरवाने उल्लेखिलेले होते. सर्वोच्च न्यायालयाचे एक पीठ ज्या आरोपीला अपराधी ठरवून पन्नास लाख रुपये दंडाची शिक्षा ठोठाविते, त्याच आरोपीला, त्याच सर्वोच्च न्यायालयाचे दुसरे पीठ, निर्दोष ठरवून घेतलेला दंड परत करावयास लावते! न्यायदान पद्धतीची ही खरे तर घोर विटंबना आहे.

आजच्या न्यायालयातील आणखी एक मोठा दोष म्हणजे सादर केलेल्या पुराव्यासंबंधीचा. न्यायालयापुढे एका आरोपीला हत्यारा म्हणून आणले गेले. त्याच्या विरुद्धचे पुरावे इतके सज्जड होते की त्याच्यावरील हत्येचा आरोप सिद्ध मानून त्याला मृत्युदंडाची शिक्षा देणे न्यायाधीशाला अपरिहार्य झाले. पण न्यायाधीशाला या खटल्यातील खरा हत्यारा दुसराच कुणी असल्याचे प्रत्यक्षपणे

ज्ञात होते. पुढे आलेल्या पुराव्यामुळे ते अगतिक झाले होते. त्यांनी निर्णय प्रगट करण्यापूर्वी त्या आरोपीला आपल्या कक्षात एकांतात बोलाविले. आणि ते आरोपीला म्हणाले–''ईश्वराला स्मरून खरे सांग की तू यापूर्वी कोणाची हत्या केली आहेस का?'' आरोपीने रडत रडत, पूर्वी एक सोडून दोन हत्या केल्याचे सांगितले. पण त्या दोन्ही वेळी त्याचे जवळ पुष्कळ संपत्ती असल्याने त्याने अत्यंत चतुर आणि प्रख्यात असे अधिवक्ते स्वत:करिता नियुक्त केले आणि आरक्षी विभागाला (पोलीस खात्याला) निरनिराळ्या पातळीवर पुष्कळ द्रव्य देऊन वश करून घेतले त्यामुळे तो त्या दोन्ही आरोपातून निर्दोष सुटला. कारण पुरावे पुढे ठेवताना आरक्षीने योग्य ती व्यवस्था केली होती.

यावरून असे लक्षात येते की केलेल्या अपराधातून सुटका झाली आणि न केलेल्या अपराधासाठी शिक्षा भोगावी लागली. पुराव्यासंबंधीचा निर्बंध कसा विचित्र आहे, ते यावरून स्पष्ट होते. निर्बंध जेवढे किचकट तेवढ्या त्यातील वाटा–पळवाटांची संभवनीयता वाढतच जाते. ही वर उल्लेखिलेली घटना श्री. हिराभाई ठक्कर या मूळ गुजराथी लेखकाच्या श्री. ब.शं.काशीकरांनी अनुवादिलेल्या 'कर्माचा सिद्धांत' या पुस्तकातील आहे.

या प्रकरणाच्या प्रारंभी त्यांनी फार वर्षापूर्वीची एक सत्य घटना असा उल्लेख केला आहे. (कर्माचा सिद्धांत –पृ.१०–११)

लेखकाने कर्मविपाकाचा सिद्धांत कसा वास्तविकातहि अनेकवेळा सत्य ठरतो. हे दाखवून देण्यासाठी वरील घटना उल्लेखिलेली आहे. न्यायाधीशाने त्याचा उल्लेख कथित आरोपीपुढेहि केल्याचे लिहिले आहे.

'अत्युत्कटै: पापपुण्यै: इहैव फलमश्नुते।' पाप किंवा पुण्य अतिशय उत्कट असेल, फार गंभीर असेल तर ते इहलोकातच, 'याचि देहि याचि डोळा' भोगावे लागते. त्यासाठी पुढच्या जन्माची वाट पहावी लागत नाही, असे शास्त्रवचन आहे. म्हणून मनूने हातून अपराध घडला तर तो उघडपणे मान्य करावा, लपवू नये. शेवटी तेच हितकर असते, असे यासाठीच सांगितले आहे. आजहि अपराध लपविणे हा वेगळा अपराध मानला जातो.

न्यायपद्धति ही आपल्याकडेहि फार प्राचीन कालापासून सुव्यवस्थितपणे अंगिकारलेली होती. इंग्रजांनी त्यांच्या पद्धतीची न्यायालये हिंदुस्थानात आणली आणि रुढ केली. पहिले इंग्रजी न्यायालय कलकत्यात स्थापित झाले. त्यावेळी त्या पहिल्या न्यायाधीशाने म्हटले आहे की 'येथे कुणी शपथ घेतल्यावर खोटे

बोलत नाही. त्यामुळे आपल्या पद्धतीचे न्यायालय येथे कितपत चालेल याची शंका वाटते'. पण मेकॉलेच्या शिक्षण पद्धतीने, इंग्रजी न्यायालये प्रस्थापित करून दाखविली आणि भरभराटीसहि आणली. स्वराज्य प्राप्तीच्या पन्नासाहून अधिक वर्षात आपण काहीहि सुधारणा करू शकलो नाही. इंग्रजी प्रथाच जशाच्या तशा चालू ठेवल्या. परंपरा काय आहे ते न पाहिल्याने हे असे झाले.

आधुनिक न्यायपद्धति अशी उपहासास्पद ठरते. याच्यामुळाशी वरवर मानवतावादी म्हणून गोंडस वाटणारा एक विचित्र नियम गृहीत धरलेला आहे. 'शंभर अपराधी दंडावाचून सुटले तरी चालतील, पण एकाहि निरपराध्याला शिक्षा होता कामा नये'. मनूचा नियम असा गबाळा नाही. 'अपराध्याला शिक्षा झालीच पाहिजे. आणि निरपराध्याला शिक्षा होताच कामा नये' असा मनूचा दंडक आहे.

खोटे बोलणार नाही. म्हणून पवित्र ग्रंथावर हात ठेवून शपथ घेणे आणि आवर्जून खोटे बोलणे, ही जणु आजच्या न्यायालयातील रुढी बनली आहे. अधिवक्ताच साक्ष देणारास त्याचे धडे देऊन ठेवीत असतो. इंग्रजांनी आपल्या सोयीसाठी करून ठेवलेले पुराव्यासंबंधीचे विधिनियम आपण न्यायालयात जसेच्या तसे अंगिकारलेले आहेत. त्यामुळे न्यायदान विश्वसनीय राहिलेले नाही. न्यायावरील विश्वास वाढावा म्हणून दोन-तीन सूचना लक्षात घेणे योग्य ठरेल.

१) मनुष्यहत्या, बलात्कार, देशद्रोह आणि दरोडा या अपराधातील आरोपीला संशयाचा लाभ मिळता कामा नये. त्याला प्रतिभू(जामिन) ही मिळता कामा नये. त्याला उण्याअधिक प्रमाणात पण कठोर वाटेल अशी शिक्षा झालीच पाहिजे.

२) उच्च न्यायालय आणि वरिष्ठ न्यायालय यांच्यातील निर्णय पूर्णपणे उलटसुलट होऊ नयेत. परस्परविरुद्ध होऊ नयेत. फारतर शिक्षेचे स्वरूप उणे अधिक व्हावे.

३) अधिवक्त्यांना तीनपेक्षा अधिक दिवस वाढवून मिळणार नाहीत असा नियम असावा. न्यायाधीश स्वतःच्या सोयीसाठी यानंतर एखाद-दुसरा दिवस वाढवू शकेल. पण ती सवड अधिवक्त्यास नसावी.

एवढे जरी केले तरी मनूच्या भूमिकेच्या बरेचसे जवळ जाता येईल. आणि तेच हिताचे ठरेल.

न्यायापुढे सर्व सारखे ही गोष्ट तत्त्वतः योग्य आहे. पण ज्याला धनाचे - बलाचे वा सत्तेचे सहाय्य आहे, त्याने केलेला अपराध आणि सामान्याने केलेला अपराध याचे मोजमाप सारखेच असणे अयोग्य आहे. खरे तर अन्याय्य आहे. धनादींचे बल ज्यांच्याजवळ आहे, त्याला अपराध करणे सहज शक्य असते,

आणि त्याच बळावर त्याला ते लपविताहि येतात. सामान्य माणसाला तशी संधी नसते. म्हणून न्याय सामान्यांच्या संबंधात सौम्य आणि बलदंडाच्याविषयी अधिक कठोर असला पाहिजे. मनूने हे धोरण नेमकेपणाने सांभाळले आहे. सामान्याने केलेल्या अपराध्याला एक कार्षापण दंड असेल तर तोच अपराध राजाने केल्यास त्यास हजारपट दंड केला पाहिजे, असे मनू म्हणतो. शूद्र, वैश्य, क्षत्रिय आणि ब्राह्मण यांना मनूने एकाच अपराधासाठी चढत्या शिक्षा सांगितल्या आहेत. ब्राह्मणाला तर शूद्राच्या चौसष्ट पासष्ट पट वा एकशेअठ्ठावीस पट शिक्षा सांगितली आहे. कारण ब्राह्मण चांगल्या वाईटाचे शास्त्रशुद्ध ज्ञान असलेला आहे. समाजापुढे सदाचरणाचा योग्य आदर्श ठेवण्याचे दायित्व त्याच्यावर आहे. म्हणून तो अधिक शिक्षेस पात्र समजला पाहिजे. असे मनू मानतो.

समाज सर्वकाळ सुस्थितीत रहावयाचा तर त्यासाठी समाजातील एक गट विद्वान्, निस्वार्थी, निर्लोभी, सात्त्विक आणि विवेकी असलाच पाहिजे. हे गुण काही केवळ बाह्य संस्काराने निर्माण होत नाहीत. त्याला अनुवंशाचाहि आधार असावा लागतो. मानवी स्वभाव लक्षात घेता हे सद्गुण गौरवास्पद आहेत, भूषणभूत आहेत, असे त्या व्यक्तीला स्वत:ला वाटत असले पाहिजे. इतरांनीहि तसे असणे आदरणीय मानले पाहिजे. तसे नसेल तर समाजात आदर्श म्हणून काही उरणार नाही आणि समाज विस्कळीत होईल, स्वार्थ बळावेल, संघर्ष वाढेल. ब्राह्मण हा असा गट आहे आणि तो तसाच राहण्यासाठी मनूने त्यास काही सुविधा –सोयी दिल्या आहेत. आणि त्याचा मान न राखणाऱ्यास शिक्षाहि सांगितल्या आहेत. कधीकधी त्या कठोरहि आहेत.

अपराध आणि दंड यांचे स्वरूप लक्षात घेता दंड जो जो कठोर तो तो अपराधाचे प्रमाण उणावत जाते. आणि दंड जो जो सौम्य तो तो अपराधातील क्रौर्य आणि अपराधातील प्रमाण वाढत जाते, असेच आढळून येते. आणि शेवटी मानवताच याची बळी ठरते. यास्तव मानवतेच्या रक्षणासाठीच दंडाची कठोरता स्वीकारणे योग्य आहे. अपराध्याकडे माणूस म्हणून पाहणे हे समष्टीच्या दृष्टीने हिताचे नाही. ही जाणीव मानवतावादी ठेवतील तर बरे! नाही तर आतंकवाद कसा बळावतो आणि त्यापायी निरपराध व्यक्ति किती भरडल्या जातात हे आपण प्रत्यही अनुभवीत आहोतच.

न्यायदान व्यवस्थित होत आहे की नाही, समाजातील सर्व घटक आपापल्या मर्यादेत वागत आहेत की नाहीत, हे पाहण्याचे कर्तव्य राजाचे आहे. अमात्यसंस्था

आणि गुप्तचरसंस्था यांच्याद्वारा राजा हे कर्तव्य पार पाडू शकतो.

धर्माला राजाचाहि राजा मानले आहे ते यासाठीच. अथर्ववेदात तर राजसंस्थेला सर्वतोपरि मान्यता देऊनहि शासनाचे नियंत्रण करणाऱ्या सभा, समिति, विदथ आणि नरिष्टा अशा लोकसंस्था उल्लेखिल्या गेलेल्या आहेत. पौरजनपदातून म्हणजे नागरिक आणि ग्रामिण लोकातून त्यातील सदस्य निवडले जात. ही एक प्रकारे लोकनियंत्रित राजसत्ताच आहे. नावे भिन्न असली तरी आजच्या लोकसत्तेचे स्वरूप तत्त्वत: तरी तसेच आहे. पण धर्मशास्त्राची मूलभूत तत्त्वे नाकारल्यामुळे, हत्यारे-डाकू-दुर्वर्तनी-क्रूर-भ्रष्टाचारी निवडून येतात. आणि सभास्थानी आरडाओरडा गोंधळ एवढेच नव्हे तर मारामारीहि होते, रक्तपातहि होतो. सामानाची मोडतोड होते ते निराळेच. कुल-शील-आणि सदाचरण न पाहण्याचा हा परिणाम आहे.

शासनव्यवस्था चालविणारातील प्रत्येक त्या त्या विषयाचा जाणकार कुलीन निर्लोभी सदाचरणी असावा असा कटाक्ष मनूने ठेवला आहे. ही कुलीनता शूद्रातिशूद्रातहि असू शकते.

हे सर्व एकत्र असले, राजापासून कनिष्ठतम अधिकाऱ्यापर्यंत सर्वांचीच वागणूक न्यायनीतीला धरून असली, हे सर्व आपापल्या विषयात तज्ञ आणि कर्तव्यदक्ष असले म्हणजे शासन उत्तमरीतीने चालते. प्रजाहिताला कोणताहि बाध येत नाही. व्यक्ति, कुटुंब आणि समाज आपापल्यापरीने प्रगत आणि समृद्ध राहू शकतो. शासनातील कोणत्याहि पदावरील अधिकारी कर्तव्यभ्रष्ट ठरला, भ्रष्टाचारी, शोषक, पीडक झाला तर त्याला पदावरून तत्काल खाली उतरवून योग्य ते शासन केले पाहिजे असे मनूने सांगितले आहे. महाभारताने तर 'जो राजा प्रजेचे रक्षण योग्यरीतीने करू शकत नाही, त्याला पिसाळलेल्या कुत्र्याला ठार करतात, त्याप्रमाणे सर्वांनी मिळून ठार मारावे'. असे अगदी स्पष्टपणे आदेशिले आहे.

आज आपण लोकसत्ता मानीत असल्यामुळे राजाला दूर करण्याचे साधन (हत्यार) मतपेटी हे आहे. तिचा नीटपणे उपयोग केला तर चांगली राजवट निर्माण करणे शक्य आहे. पण हेच घडत नाही. मतदाता कोणत्या ना कोणत्या लाटेबरोबर वहात जातो असे आढळून येते. सुबुद्ध व्यक्ति मतदानाकडे दुर्लक्ष करते. मत देतच नाही. झोपडपट्टीत राहणारे आणि तथाकथित अल्पसंख्य यांचे मतदान नव्वद-पंचाण्णव टक्के होते तर एकूण मतदान प्रतिशत पंचावन्नाच्या आसपास असते. यावरून मते न देणारा वर्ग कोणता ते सहज लक्षात येऊ शकेल. मत देणाराचेहि

कर्तव्य असते याची विस्मृति झाल्याचा हा परिणाम आहे.

अर्थ व्यवहाराच्या संबंधीहि मनूने केलेले मार्गदर्शन आजहि विचारात घेण्यासारखे आहे. आजच्या अर्थव्यवहारात स्पर्धा पूर्णपणे मोकळी आणि अनियंत्रित आहे. विज्ञान यंत्र-तंत्र यांच्यातील प्रगतीने आणि त्यातूनच निर्माण होणाऱ्या धनबलाने या स्पर्धेला समाजघातक स्वरूप आणून ठेवलेले आहे. गुंतवलेले भांडवल, उत्पादनासाठी होणारा व्यय, आणि मिळणारा लाभ, यात फार मोठे अंतर राहते. भांडवलाच्या मानाने लाभ पुष्कळच अधिक मिळतो. मिळणारा लाभ यंत्रतंत्राच्या स्वरुपाने गुंतवून पुन्हा अधिक प्रमाणात वाढविता येतो. येथे चातुर्य असते. पण ते व्यवस्थापनेचे! यामुळे सामाजिक विषमतेला शोषण आणि संघर्षाचे रूप प्राप्त होते. प्रगतीसाठी स्पर्धा आणि त्यासाठी संघर्ष यांच्यात पदोपदी वाढ होत जाते. आणि या स्पर्धेत विजयी होणे हे ज्याच्या पाठीशी प्रचंड धनबल आहे त्याला सहज साधते. व्यवसाय केन्द्रित होत जातात. नगरांची अमर्याद वाढ होते. चंगळवाद आणि उपभोक्ता वाद बळावतात. खेडी ओस पडत जातात. लहान-सहान उद्योग नष्टप्राय होऊ लागतात. छोट्या उद्योगाना बड्या उद्योगपतीच्या आधीन राहून त्यांच्या सोयीची, त्यांच्या कसोटीस उतरणारी निर्मिती करीत राहावे लागते. यंत्रापुढे वैयक्तिक कौशल्य निरुपयोगी ठरते. वस्तूचे मूल्य तिच्या गुणवत्तेवर न ठरता मागणी आणि पुरवठ्याच्या अस्थिर स्वरूपावर अवलंबून राहते आणि सर्व अर्थव्यवस्था तेजी-मंदीच्या लाटांवर हेलकावत राहते. सर्व सामान्य जनता त्यामुळे अस्वस्थ आणि भयभीत होऊन राहते. हस्तकौशल्याला, उद्योगप्रियतेला महत्त्व रहात नाही. स्वावलंबनाचा, स्वतंत्रतेचा बळी देऊन, कोठे ना कोठे, कोणत्या ना कोणत्या प्रकारची नोकरीच पत्करावी लागते. आणि स्वतंत्र व्यवसायातील कष्टापेक्षा ती सुखाचीहि वाटू लागते. स्वतंत्र व्यवसाय करावा, स्वावलंबी असावे याविषयीचा उत्साह मावळतो. आणि नोकरी एके नोकरी हेच ध्येय बनून राहते. शिक्षण एका विषयाचे आणि नोकरीचा विषय मात्र दुसरा असे घडते. याचा परिणाम सुशिक्षितांच्या बेकारीत होतो. नोकरी देणे न देणे हे संबंधित अधिकाऱ्याच्या इच्छेवर अवलंबून असते. आणि त्यामुळे तेथे भ्रष्टाचाराला उदंड वाव मिळतो. वाणिज्य वा साहित्य विषयाच्या पदवीधराला साठ-सत्तर हजार रुपये लाच देऊन बसमध्ये कंडक्टरची नोकरी मिळविणे अपरिहार्य होते. हे सर्व, वर्णव्यवस्थेमध्ये उद्योग व्यवसायाचे जे विकेंद्रीकरण आले आहे, त्याकडे दुर्लक्ष करण्याचे परिणाम आहेत.

वस्तूचे मूल्य 'मागणी आणि पुरवठा' यावर अवलंबून ठेवणे कितपत शास्त्रीय आहे हे माझ्या लक्षात आलेले नाही. मनोवेधक प्रसिद्धकांच्या बळावर मागणी वाढविता येते. आणि धनसंपत्तीच्या बळावर वस्तू गोठवून पुरवठा रोखता येतो. आणि मग वस्तूचे मूल्य अवाच्यासवा वाढत जाते. अर्थव्यवस्थेतील ही कोणती शास्त्रीयता? यात भरडले जातात ते सर्वसामान्य लोक. कोणत्याहि प्रकारची शाश्वती नसल्याने शेती परवडत नाही. नोकरी मिळत नाही. आणि उद्योग उभे करता येत नाहीत. अशा स्थितीत तरुण वर्ग भांबावून गेल्यासारखा झाला आहे. अस्वस्थ मनाच्या या तरुणांमध्ये संघर्ष पेटवून त्या तापल्या तव्यावर नेते मंडळी आपल्या पदप्रतिष्ठेची पोळी भाजून घेत आहेत. भ्रष्टाचाराच्या बळावर विपुल संपदा गोळा करीत आहेत.

चातुर्वर्ण्य व्यवस्थेत असलेल्या मानापमानाविषयीच्या भ्रांत कल्पनेने त्या व्यवस्थेस त्याज्य आणि निंद्य मानण्याची परंपरा बुद्धिमंतांच्या एका गटात आरंभ पावली आहे.

चातुर्वर्ण्य व्यवस्थेला एकीकडे सारण्याचे प्रयत्न चार्वाक, बौद्ध, जैन, महानुभाव, लिंगायत, यांनी साक्षेपाने केले. शिखांनीहि काही प्रमाणात तसे केले. काही सुधारणावाद्यांनी टोकाची भूमिका घेऊन मुसलमानासारख्या क्रूर, घातकी, धर्मांधांचे आक्रमणहि स्वागतार्ह मानले. त्याच कारणासाठी धूर्त आणि शोषक अशा इंग्रजांचेहि स्वागत झाले. चातुर्वर्ण्य व्यवस्थेला जातीचे स्वरूप येऊ लागले होते. त्यातील पुढारलेले उच्चवर्णीय मात्र या सुधारकी उपक्रमात प्रगत झाले, वाढीस लागले. ब्राह्मणासकट चारी वर्णात जाती आणि पोटजाती यांची संख्या वेगाने वाढू लागली. यात ब्राह्मण प्रथम आचारभ्रष्ट झाला आणि निरनिराळ्या व्यवसायात शिरला. त्यातील पुष्कळानी आपली मूळ मर्यादा ओलांडली आणि सर्व प्रकारचे उत्पादक व्यवसाय अंगिकारले, जे वस्तुतः वैश्य आणि शूद्रांचे होते. इंग्रजांनी केलेल्या बुद्धिभेदामुळे या मर्यादातिक्रमाला अधिकच वेग मिळाला. ब्राह्मणातील मोठा गट आर्थिकदृष्ट्या काहीसा संपन्न झाला, सुखावला आणि त्यांच्यातच गृहस्थ आणि भिक्षुक असे तट पडले. गृहस्थ स्वत:ला श्रेष्ठ समजू लागला. आणि भिक्षुकाची अवस्था दयनीय होऊ लागली. त्याची प्रतिष्ठा उणावली. त्याला मिळणारा मान धार्मिक कृत्यात केल्या जाणाऱ्या नमस्कारापुरता मर्यादित झाला. काही वेळा तर त्याला सांगकाम्याचीहि अवस्था आली. त्यांच्यातील विद्वत्तेची, पांडित्याची परंपराहि

झपाट्याने ओसरली. आणि त्याचे ज्ञान काही सामान्य पूजापाठादि करण्या इतके आक्रसले.

'पूर्वी शूद्रातिशूद्रांची, विशेषत: अतिशूद्रातील अस्पृश्यांची अवस्था फार दयनीय होती. तो सर्व समाज दैन्य दारिद्र्याने पीडलेला होता. शोषित होता'. असे वर्णन अलिकडे फार भडकपणे केले जाते. पण मुळामधे ते सर्व अतिशयोक्त आहे. आणि परंपरेविरुद्ध समाजमन कलुषित व्हावे या हेतूने हे सर्व केले जात आहे. ज्याला पोटापाण्याचा पुरेसा व्यवसाय नाही असा एकहि गट आपल्या वर्णव्यवस्थेत वा जातीव्यवस्थेत नव्हता. वर्ण संकराला अत्यंत तिरस्करणीय मानणाऱ्या मनूनेहि अनुलोम-प्रतिलोम या सर्व प्रकारच्या संकरातून निर्माण झालेल्या माणसांना एकेक समाजोपयोगी व्यवसाय, धंदा नेमून दिला होता. आणि ती प्रथा इंग्रजांची धूर्तदृष्टि हिंदुस्थानावर पडेपर्यंत बव्हंशी कार्यवाहित होती. संपत्तीचा चढउतार हा सामान्यत: सगळीकडे आढळून येत होता, पण उपाशीपोटी खंगण्याइतके दारिद्र्य कोणाच्याच वाट्यास येत नव्हते, आणि तसे केविलवाणे दारिद्र्य अगदी अपवादभूत होते. आणि ते ब्राह्मणाच्याहि वाट्यास येत असे.

तपश्चर्येच्या बळावर ब्राह्मणत्व मिळविलेल्या विश्वामित्राने दुष्काळाने त्रस्त झाल्यावर भुकेपोटी एका कुत्र्याची तंगडी मिळविली, पण ज्याच्या घरातून ती आणली तो चांडाळ होता. दुष्काळाने पीडलेला उषस्ती चाक्रायणासारखा विद्वान् ब्राह्मण उष्ट्या हुलग्यासाठीहि हपापलेला होता. पण हे उष्टे हुलगेहि त्याला मिळाले ते एका ईभ्याच्या, म्हणजे हत्तींची राखण करणाऱ्या शूद्राच्या घरात. या संदर्भात श्रीज्ञानेश्वर महाराजांच्या दोन ओव्या लक्षात घेण्यासारख्या आहेत. 'सांगे शूद्राघरी आघवी। पक्वान्ने आहाती बरवी। ती द्विजे केवी सेवावी । दुर्बळु जरी जाहला।।'(ज्ञाने.३-२२१) 'नाना चांडाळमंदिराशी। अवचटे आलिया संन्यासी । मग लाज होय जैसी। उत्तमा तया।।' (ज्ञाने.१६-१७६) ब्राह्मण दरिद्री आहे, भुकेला आहे. आणि शूद्राच्या घरात चांगले अन्न उपलब्ध आहे. तरी तो ते अन्न कसे खाणार?(अर्थात् ब्राह्मणधर्माला जागून हाल होत असले तरी तो ते खाणार नाही.)

दुसऱ्या एका ठिकाणी महाराज म्हणतात- भिक्षा मागायला निघालेला संन्यासी चांडालाच्या घरासमोर आला. घराजवळ येताच त्याला हे घर चांडाळाचे आहे हे उमगले. आणि मग त्यास फारच संकोचल्यासारखे झाले. यातील धार्मिकतेचा भाग सोडून देऊ. कारण हा संन्यासी, काही बंधने कडक असलेल्या गटातील

असणार. दंडी संन्यासी असेल म्हणून तो चमकला, संकोचला. पण चांडाळाचे घरहि सर्वसामान्य सवर्णाप्रमाणे सुस्थितीत होते. दारिद्र्याची अवकळा असलेली मोडकी तोडकी झोपडी नव्हती. श्रीज्ञानोबारायांनी चांडालाच्या घराला उद्देशून वापरलेला शब्द 'चांडालमंदिर' असा आहे. हे ध्यानात घेण्याजोगे आहे.

जुन्याकाळी गावगाड्याच्या राहाटीत सर्व जाति-उपजातींची, बलुत्याच्या रूपाने उपजीविकेची सोय होती. सुधारकांनी या बलुते व्यवस्थेची टर उडविली आहे. इंग्रजी राजवटीत प्राप्त झालेल्या अवकळेने त्यांना तसे करणे सोपे झाले.

सुतार, लोहार, तांबट, साळी, माळी, कोष्टी, धनगर, जिनगर, लमाणी-वंजारी यासारख्या भटक्या जमाती, या सर्वांना त्यांचे त्यांचे व्यवसाय होते. पण इंग्रजांनी या सर्वांचे उद्योगधंदे मारले. त्याला यंत्रयुगातील प्रगतीचे गोंडस नाव दिले. अलिकडच्या काळात श्री. राजीव दीक्षित या प्रख्यात अर्थतज्ञाने इंग्रजांचे हे कौटिल्य आपल्या व्याख्यानातून अनेकदा अनेक प्रकारे उघडकीस आणले आहे.

हा शूद्र समाज अशिक्षितहि नव्हता. गावोगाव पाठशाळा असत. त्यात सर्व वर्णांची मुले शिक्षण घेत. धर्मपाल नावाच्या एका गांधीवादी विद्वानाने या इंग्रजपूर्व शिक्षणपद्धतीवर चांगला प्रकाश टाकणारे एक पुस्तक प्रकाशित केले होते. त्यातील माहिती साधार आणि सविस्तर आहे. नुकताच त्याचा मराठीत अनुवादहि प्रसिद्ध झाला आहे. कोणताहि उद्योग कुणीहि करावा, त्यासाठी वर्णाची जातीची बंधने नसावीत हे म्हणणे वर वर गोंडस वाटते पण ते खरे नाही. तो तो उद्योग जे कोणी करीत असतील त्यांचा गट जणु एक 'जात' बनतो. आणि तो त्या धंद्यात आणखी कोणाला शिरण्यास विरोध करतो. पुण्यात एकदा तीनचाकी वाहकानी, 'आता नवीन तशा वाहनांना अनुमति देऊ नये. तीनचे जागी सहा व्यक्तीचे वाहन येऊ नये'. यासाठी आंदोलने केली होती. हे एक प्रकारे स्वजातीचे संरक्षण आहे. वर्णव्यवस्थेने ते केले आणि समाजाच्या अंगवळणीहि पडले होते.

उद्योगधंद्यांची विभागणी जातवार केल्यामुळे उपभोग्य वस्तूचे निर्माण कधी केंद्रित झाले नाही. त्यामुळे कुणी बेकारहि राहिले नाही. आणि वस्तूंच्या मूल्याची वध-घटहि अगदी मर्यादित राही. तांदुळ स्वस्त झाला म्हणजे तो कुणी शेरभर खाऊ शकत नाही. आणि महागला म्हणजे चिमूटभर पुरत नाही. तो भुकेसाठी लागावयाचा तितका लागतोच. पण तेजीमंदीच्या अर्थशास्त्रात हे दुर्लक्षिले जाते. प्रचंड उद्योगासाठी भाग भांडवल गोळा केले जाते. आणि अत्यंत अनुत्पादक

असा शेअर बाजार त्यातून फोफावतो. या धंद्यात एका दिवसात कोट्याधीशाचे भिकारी होतात. तर भिकारी लखपति होऊन बसतो. आधुनिक अर्थशास्त्रातले हे मोठे कुलक्षण आहे. पण त्याला आळा बसावा, अशी कल्पना कोणाच्या डोक्यात येत नाही. आली असली, तरी ती कार्यवाहीत येऊ शकत नाही. यामुळे धूर्तांचे फावते. आणि दांडगे सांड (बिगबुल) अर्थव्यवस्था कोलमडून टाकतात.

समाजाची कोणतीहि जाणीव न ठेवता यंत्रतंत्राच्या बळावर प्रचंड लाभ देणाऱ्या निर्माणी थाटण्याकडे उद्योगपतीचे लक्ष केंद्रित होते. त्यात प्रगतीचे जे स्वरूप उद्धृत केले आहे ते मोठे भयावह आहे.

एक व्यवस्थापन तज्ञ म्हणाला म्हणे की, 'आम्ही लौकरच अशी निर्माणी उभारू की जिची वार्षिक उलाढाल कोट्यावधीची असेल. पण तिथला सर्व कारभार यंत्राच्या सहाय्याने केला जाईल. आणि या अशा प्रचंड निर्माणीसाठी दोनच प्राणी लागतील. त्यातील एक असेल कुत्रा आणि दुसरा, त्या कुत्र्याला खाऊपिऊ घालणारा गडी!' ही धारणा जर सर्व उपभोग्य वस्तूंच्या निर्माणीच्या संदर्भात कार्यवाहीत आली तर त्या उत्पादित वस्तूंना हे व्यवस्थापन तज्ञ ग्राहक कुठून मिळवितील? का काही देशांना अविकसित राखून आपली विक्रीकेंद्रे चालवितील?

केंद्रित अर्थव्यवस्था हे उण्याअधिक प्रमाणात सर्व सामाजिक आर्थिक व्यवस्थेचे मूळ आहे. हे लक्षात घेतले तरच यातून बाहेर पडता येईल. कदाचित् त्याकाळी पुन्हा चातुर्वर्ण्य व्यवस्था स्वीकारण्याचा विचार गंभीरपणे करावा लागेल.

चातुर्वर्ण्य व्यवस्था जेव्हा बऱ्या प्रमाणात रूढ होती, त्या मुसलमानी आक्रमणाच्या पूर्वी हिंदुस्थान धनधान्याने संपन्न होता. 'घरोघरी सोन्याचा धूर निघत होता. तुपाचे मधाचे पाट वहात होते', अशा काहीशा काव्यमय शद्बात त्यावेळच्या परिस्थितीचे वर्णन केले जात असे.

मसाल्याचे पदार्थ, अत्यंत तलम अशी सुती –रेशमी वस्त्रे, चांदी भरलेली खोदकामाची तांब्या–पितळेची भांडी, दागिने ठेवण्याचे लाकडी व धातूचे डबे, लोकरीच्या शाली, अशा अनेक उपभोग्य वस्तूची निर्यात समुद्रमार्गे आणि स्थलमार्गे विपुल प्रमाणात होत असे.

व्यापाराच्या या सर्व वस्तूंची निर्मिती शूद्रोपशूद्रांच्या स्वाधीनच होती. विदेशातील श्रीमंत आणि राजेराजवाड्यांच्या स्त्रिया या वस्तू उह्लासाने वापरीत आणि त्यांचा संग्रह करण्यात भूषण मानीत. हे कलातील कौशल्य संबंधितांचे

अंगठे आणि बोटे तोडून इंग्रजांनी मारले. स्वार्थाकरिता केलेली ही दुष्टतेची परिसीमा होती. पण त्यांचा कडाडून निषेध कोण्याहि सुधारक म्हणविणाऱ्यांनी केलेला वाचण्या-ऐकण्यात नाही. ज्यांनी कोणी केला त्यांना खोटे ठरविण्यात आले. वा अनुल्लेखाने मारले. हिंदुस्थान, त्याकाळी तरी सर्व जगताच्या दृष्टीने, विज्ञानातहि चांगलाच प्रगत होता. सोळाशे वर्षांहून अधिक काळपर्यंत न गंजता उभा राहिलेला दिल्लीचा लोहस्तंभ या गोष्टीची उघड साक्ष देत आहे. अत्यंत प्रेक्षणीय म्हणून प्रसिद्ध असलेले दक्षिणेतील मंदिरांचे बांधकाम प्रामुख्याने अस्पृश्य करीत असत. ते आपल्या कलेत प्रशिक्षित आणि कुशल होते. म्हैसूरच्या राजाला पदच्युत करून राज्य बळकावलेल्या हैदरअल्लीने युद्धात पराजित झालेल्या एका परदेशी सेनानीचे नाक कापले होते. ते एका मागासवर्गातील हिंदू शस्त्रवैद्यांनी चांगले बांधून शिवून दिले. त्या सेनानीला ही गोष्ट मोठी अपरूप वाटली. ते तसे त्याने आपल्या मित्राला पत्राने गौरवपूर्वक कळविले. असे शिक्षण देणारी विद्यालये त्यावेळी पुष्कळ प्रमाणात होती. असाहि उल्लेख आधुनिक विद्याविभूषित श्री. राजीव दीक्षित यांनी आपल्या व्याख्यानात केला आहे.

त्यावेळी चातुर्वर्णातील सर्वांचीच घरे पुरेसा निवारा देणारी, दोन्ही वेळच्या जेवणाची उत्तम सोय असलेली आणि आवश्यकतेपुरत्या सोय-साधनांनी युक्त अशीच असत. आज वैज्ञानिक प्रगतीसवेच मनुष्याला आणि निसर्गजीवनालाहि अत्यंत घातक असलेले प्रदूषणहि घोडदौडीने वाढत आहे याचाहि विचार विचारवंतांनी करण्याची निकडीची वेळ आली आहे.

प्रजेवर असलेल्या कराचे प्रमाण तुलनेने सौम्य होते. आणि सामान्यत: सर्व कर स्थिर स्वरूपाचे असत. युद्धासारखे बिकट प्रसंग ओढवल्यासच राजा अधिक कराची मागणी करी. पण हे सर्व विनयाने आणि प्रजेला विश्वासात घेऊनच होत असे. कर, उत्पन्नाच्या एकषष्ठांश असे. व्यापाऱ्यावर वाहतूक कर इत्यादि अन्य करहि असत. पण ते व्यापार आणि व्यापारी यांचे सर्वांगिण स्वरूप विचारात घेऊन नियोजित केले जात.

खाण वनसंपदा यासाठीहि काही कर योजना असे. ज्यांचे पोट केवळ हातावर आहे, त्यांच्याकडून प्रतिमासी केवळ एक दिवसाचे काम घेतले जात असे. ब्राह्मणावर कर नसे, हे खरे पण जो ब्राह्मणवृत्तीने रहात नसेल त्याची करातून सुटका होत नसे. 'केवळ जन्माने ब्राह्मण असलेल्याला धार्मिक वृत्तीच्या राजानेहि वेठीस जुंपावे आणि त्याकडून योग्य तो करहि घ्यावा'. असे महाभारताने अगदी

स्पष्ट शब्दात उल्लेखिले आहे. महाभारत हे जणु विधिनिषेध स्पष्ट करणारे व्यवहारासाठी उपयुक्त असे मनुस्मृतीवरील भाष्यच आहे. म्हणून अनेकदा त्या दोन्ही ग्रंथांचा विचार एकत्र करणे आवश्यक असते.

निरनिराळ्या वस्तूंचा व्यापार करणारे सार्थवाह हिंदुस्थानात सगळीकडे आणि परदेशातहि पुष्कळ प्रवास करीत. त्यांचे लहान मोठे तांडे असत. सुरक्षेचीहि व्यवस्था बहुधा त्यांची त्यांनी केलेली असे. राज्याराज्यातून वाहतूक कर द्यावा लागत असे. पण हे सर्व धार्मिक अधिष्ठानावर होत असल्याने राज्यांतरे झाली तरी संरक्षण व्यवस्था आणि कर व्यवस्था यात अंतर पडत नसे. या सार्थवाहांच्या आश्रयाने इतर यात्रेकरूहि सुरक्षितपणे प्रवास करीत. या सार्थवाहांचा व्यापारामध्ये भांडवल गुंतवणुकीच्या दृष्टीने परस्पर सहभागहि असे. काही, भांडवलात सहभागी न होता स्वतंत्रपणे व्यापार करीत. पण त्या सर्वांचा विचार बहुधा एकजुटीने होत असे. या निर्यातीतूनहि विपुल संपत्ति हिंदुस्थानात येत असे. म्हणून तर हे आपले राष्ट्र सुवर्णभूमी मानले जात असे.

वाहतुकीच्या नावाहि आकाराने मोठ्या, शंभराहून अधिक वल्ही असलेल्या व चांगल्या शिडाच्या असत. व्यापाराच्या उपभोग्य वस्तूंची निर्मिती करणारे शूद्र वर्गातील असत. पण व्यापारी त्यांची पिळवणूक करीत नसत. कारण या देवघेवीवर राजाचे लक्ष असे. त्यामुळे कलाकौशल्य असलेल्या वा केवळ शारीरिक श्रम करणाऱ्या सर्व जातीचे लोक सुस्थितीत आणि समाधानी होते. 'महाराष्ट्राचा मुस्लीमपूर्व इतिहास' या पुस्तकात डोंगरांवर खोदल्या जाणाऱ्या लेण्यांच्या निर्मितीसाठी मागासलेल्या जातीनेहि द्रव्यदान केल्याचे उल्लेख शिलालेखातून आहेत, असे म्हटले आहे.

श्री.पां.वा.काणे यांनीहि आपल्या ''धर्मशास्त्राचा इतिहास'' या प्रसिद्ध ग्रंथात अस्पृश्यातील काही जाती इतर काही स्पृश्याहून सुखवस्तू असल्याचा उल्लेख केला आहे.

श्री.वासुदेव शरण अग्रवाल आणि मुंबईच्या 'प्रिन्स ऑफ वेल्स' या वास्तु संग्रहालयाचे अधीक्षक श्री.मोतीचंद्र या दोन प्रसिद्ध विद्वानांनी संस्कृतातील चार शृंगारिक प्रहसनांचे चतुर्भाणी नावाने एक पुस्तक संकलित केले आहे. त्यांच्या मते हे पुस्तक म्हणजे गुप्तकालीन शृंगारहाट आहे. त्याच्या भूमिकेत त्यांनी काही उल्लेख केले आहेत, त्यावरून शूद्रहि अन्न वस्त्र निवाऱ्याच्या दृष्टीने सुस्थितीत होते असे दिसते.

नरवाहनदत्त नावाचा एक श्रीमंत विलासी, संगीतातील तज्ज्ञ, एका गावातून जात असताना, त्याने शेतकरी, पशुपाल, कुंभार, सुतार, बुरुड यांना बीन वाजविताना रंगून गेलेले पाहिले. (भूमिका पृ.४८-४९) हे सर्व लोक शूद्रवर्गातीलच आहेत. अन्नोदक निवासाची चांगली सोय असल्यावाचून वाद्यवादनात आसक्त होऊन राहणे संभवनीय नसते. याच भूमिकेत पृष्ठ सत्तावन वर लेखकाने उल्लेख केला आहे की 'शूद्र आपल्या शिल्पादि कर्माने धन मिळवून नागरकवृत्त (नागरिकाचे विलासी जीवन) जगत असत'. येथेच लेखकाने ब्राह्मणहि दानदक्षिणा घेऊन याच वृत्तीने कालयापन करीत असे म्हटले आहे. यावरून उल्लेख करण्याइतके ब्राह्मणवर्गाचे अध:पतन झाले होते हेहि लक्षात येते.

महाभारतातहि लाक्षागृहातून कौशल्याने निसटलेले पांडव व्यासांच्या आदेशावरून द्रौपदी स्वयंवरासाठी पांचाल नगरीत आले होते. तेव्हा कुंतीसह हे सहा जण एका कुंभाराच्या घरी निवासाला होते असा उल्लेख आहे. यावरूनहि कुंभाराचे घर चांगले प्रशस्त असल्याचे दिसून येते. शोधितच बसले तर प्राचीन वाङ्मयातून असे अनेक उल्लेख सापडणे शक्य आहे. तेव्हा त्रैवर्णिकांनी विशेषत: ब्राह्मणांनी शूद्रांचे शोषण केले हा आरोप बिनबुडाचा आहे, उठवळ आहे, असे सिद्ध होते. तो 'आक्रोश निर्माण करण्याच्या विशिष्ट हेतूने केला असावा' असा तर्क करण्यास वाव आहे. परकीय आक्रमणानंतर समाज दरिद्री राहू लागला. त्यात मग सगळेच आले, तसे शूद्रहि आले. पारतंत्र्याच्या काळातील वाङ्मयात गटागटांच्या दारिद्र्याची, दैन्याची वर्णने येतात. त्यात शूद्रांप्रमाणे ब्राह्मणाचाहि समावेश आहे.

अपवाद सर्वकाळी आणि सर्वत्रच असतात. पण विचार करावयाचा असतो तो सर्वसामान्य परिस्थितीचा. पण 'प्रस्थापितांच्या विरुद्ध उठाव केलाच पाहिजे, त्यांच्याशी स्वत:चे साधून घेण्यासाठी झगडलेच पाहिजे. ते अपरिहार्य असे ऐतिहासिक कर्तव्य आहे', या साम्यवादाच्या भ्रांतसिद्धांताला बळी पडलेल्या सुधारणावादी विचारकांनी ही गोष्ट जाणीवपूर्वक दुर्लक्षिली. त्यांच्या विरोधात जो कोणी लिहील त्याला बुरसटलेला, परंपरावादी, स्वत: प्रस्थापित वा प्रस्थापितांचा समर्थक, प्रतिक्रियावादी, मूलतत्त्ववादी अशा विशेष सार्थ नसलेल्या नवीन शब्दांची निर्मिती करून सातत्याने विरोधिले. त्यासाठी प्रचारयंत्रणा निर्माण केली. प्रचारमाध्यमे हाताशी धरली. शिक्षणसंस्थातून स्थाने मिळविली, आणि खऱ्याखोट्या घटना उल्लेखून हिंदुस्थानच्या संस्कृति परंपरांना जितके नाकारता येईल, तिरस्कारिता येईल, तितके नाकारले-तिरस्कारिले. चातुर्वर्ण्यव्यवस्था विस्कळित झाली. शूद्रांच्या

लाभदायक व्यवसायात उच्चवर्णीय शिरले. अध्यापन आणि न्यायदान, काही प्रमाणात पौरोहित्य एवढेच उत्पादक व्यवसाय ब्राह्मणाकडे होते. त्यात काही प्रमाणात शूद्रांना सध्या वाव मिळाला आहे. हे व्यवसाय काही श्रीमंती पायाशी लोळवतील असे नव्हते. चातुर्वर्ण्यव्यवस्थेकडे दुर्लक्ष झाले नसते, तसे होणे भूषणाचे मानले गेले नसते, तर कोण्याहि ब्राह्मणाला नाना प्रकारच्या लोखंडी वस्तूंचे उत्पादन करून नावाजलेला उद्योगपती होता आले नसते. कोणी लोहाराने तसे व्हावयास पाहिजे होते. पण त्या बापड्याला अधिकात अधिक शिक्षक होता आले.

मुसलमानी आक्रमण जर अस्पृश्यांच्या दृष्टीने हिताचे होते, तर क्रूर, धर्मांध मुसलमानांची राजवट सात–आठशे वर्षे टिकून राहिली असताना, अस्पृश्य समाज एवढ्या मोठ्या प्रमाणावर अजूनहि टिकून राहिलाच कसा? त्या सर्वांनी धर्मांतरे करून आपली परिस्थिति चांगल्या प्रकारे सुधारून का घेतली नाही? तसे धर्मपरिवर्तन झाल्याची काही उदाहरणे डोळ्यापुढे असतानाहि तसे झाले नाही. यावरून अस्पृश्य समाज निदान त्यावेळी तरी दीन दरिद्री, शोषलेला, पीडलेला, गांजलेला नव्हता हेच सिद्ध होते. कर्ममेळ्यासारख्या भगवद्भक्ताचा पुत्र असलेल्या अस्पृश्य कवींची काही वचने दैन्य–दारिद्र्य–छळणूक यांचा उल्लेख करणारी आहेत. पण तो काळ अल्लाउद्दीन खिलजीने महाराष्ट्रावर आक्रमण केल्यानंतरचा आहे. या क्रूर आक्रमणाने सर्व महाराष्ट्रीय समाजच लुटला गेला होता. गांजलेला होता. होरपळलेला होता. तेव्हा भयभीत सवर्ण समाजाकडून अस्पृश्यांच्या वाट्याला अधिकच उपेक्षा आली असेल तर ते स्वाभाविक म्हणता येईल.

‘‘इंग्रजांच्या राज्यस्थापनेला आम्ही अस्पृश्यांनी सहाय्य केले, म्हणून इंग्रजांचा विजय झाला. त्यांना महाराष्ट्रात सत्ता प्रस्थापित करता आली. ‘आम्ही ब्राह्मणी जाचातून सुटलो’’ असे (दुर्दैवी) उद्गार अस्पृश्यांच्या काही पुढाऱ्यांनी काढलेले आहेत. इंग्रजांच्या काळात अस्पृश्यांचे धर्मांतरण त्यामानाने मोठ्या प्रमाणात झाले. पण त्यामुळेहि अधिकच दुर्दशा त्यांच्या वाट्यास आली. असे श्री.गायकवाडांनी लिहिलेल्या ‘ख्रिस्ती महार’ या पुस्तकातून प्रत्ययास येते. हे पुस्तक लेखकाच्या स्वत:च्या अनुभवावर आधारित आहे. तेव्हा इंग्रजी राजवटीचा कोणता अधिक लाभ अस्पृश्यांना झाला?

हिंदू धर्मात राहिल्याने मागासलेपणा पत्करावा लागतो, दारिद्र्य सोसावे लागते इत्यादी गाऱ्हाणी गाऊन जे मुसलमान व ख्रिश्चन समाजात धर्मांतरित झाले,

आता त्यांच्यासाठी आरक्षण मागण्याची नवी चळवळ उभी राहात आहे. तिला तेरेसासारख्या ख्यातनाम धर्मप्रसारिकेनेहि आग्रहपूर्वक अनुमोदन दिले आहे. ही सर्व परिस्थिति चातुर्वर्ण्य व्यवस्थेने निर्माण झाली का? याचा शांत डोक्याने तर्कशुद्धपणे विचार केला पाहिजे की नाही?

**मनुस्मृतीची ही प्रत सुज्ञ वाचकांच्यापुढे ठेवण्याचा खटाटोप केला आहे. आवर्जून केला आहे. तो चातुर्वर्ण्य व्यवस्थेच्या समग्रतेकडे, परिपूर्णतेकडे, उपयुक्ततेकडे, हितकारितेकडे, कुणीतरी मोकळ्या मनाने पहावे म्हणूनच! सर्व वर्णातील काही थोड्या लोकांना जरी येथे विचारात घेण्यासारखे काही आहे, एवढे जरी वाटले, तरी त्यात मला संतोष आहे.**

मनुप्रणीत समाजरचना आज कितीहि विस्कळित झाल्यासारखी दिसत असली तरी केव्हातरी बलशाली असलेल्या व्यक्तीने व्याधीने दुखणाइत व्हावे अशी ही स्थिति आहे. धीराने प्रयत्न करीत राहून योग्य ते उपचार करीत राहिले, तर या दुर्बल अवस्थेतून पुन्हा पूर्वीप्रमाणे समर्थ होणे अशक्य नाही. तसे झाले तर त्यावेळी भारत ही जगाची प्रभुसत्ता असेल. पण ही सत्ता शोषक, पीडक नसेल. ती भय निर्माण करणारी नसेल. आपल्या स्वार्थासाठी कुणी कितीहि गांजला गेला तरी त्याची क्षिती न बाळगणारी अशी नसेल. ही केवळ कल्पना नाही, वल्गना तर नाहीच नाही. त्यासाठी आशा ठेवण्यास प्रेरणा देतील अशी अनेक बीजे आजहि उपस्थित आहेत. ती इकडे तिकडे विखुरलेली आहेत. इतकेच काय ते! हेहि थोडेसे वाचकांच्या निर्देशनास आणून देतो.

महंमद इक्बाल या उर्दू कवीचे डोके ठिकाणावर होते, त्यावेळी त्याने हिंदुस्थानला उद्देशून 'यूनान मिस्र रोमा सब मिट गये जहाँसे। कुछ बात है कि हस्ती मिटती नही हमारी।।' असे मोठ्या गौरवाने लिहिले आहे. हे आपले भंग न पावणारे अमर अस्तित्व हिंदुस्थानात या ना त्या स्वरूपात आजहि दृग्गोचर होते. केरळपासून अरुणाचलम् पर्यंत, तामिळनाडूपासून काश्मीरपर्यंत, द्वारकेपासून जगन्नाथपुरीपर्यंत ब्राह्मण क्षत्रिय वैश्य शूद्र ही वर्णव्यवस्था कोणत्या ना कोणत्या स्वरूपात अस्तित्वात आहे. मिश्र विवाहाचा कितीहि पुरस्कार आकर्षकपणे केला जात असला तरी, त्याला नानाप्रकारची प्रलोभने दाखविली जात असली तरी, विवाहसंबंध अद्यापहि केवळ वर्णच नव्हे तर जाती-उपजाती पाहूनहि केले जात आहेत. त्यांचे प्रमाण पंच्चाण्णव प्रतिशताहून थोडे अधिकच असेल. महानगरात ते किंचित अधिक असेल. तर ग्रामीण भागात, मागासलेल्या वर्गात ते नगण्य

आहे असे म्हटले तरी चालेल.

शंकराची बारा ज्योतिर्लिंगे, शक्तीची महापीठे, विष्णूची प्रसिद्ध मंदिरे सर्व हिंदुस्थानभर विखुरलेली आहेत. या सर्व ठिकाणी भरणाऱ्या यात्रेतील भाविकांची संख्या लाखालाखाने मोजण्याइतकी प्रचंड असते. हे लोक देशाच्या सर्व कानाकोपऱ्यातून आलेले असतात. तीच स्थिति हरिद्वार-प्रयाग-उज्जैन-नाशिक याठिकाणी भरणाऱ्या कुंभमेळ्यांची. नुकत्याच पार पडलेल्या प्रयागच्या कुंभमेळ्याला तर दोन कोटीहून अधिक लोक एकत्र झाले होते. अनेक पक्षांच्या सर्वोच्च पुढाऱ्यांनी तेथे जाऊन आपल्या भाविकतेचे प्रदर्शनहि केले. साम्यवादी विचारांचे मंत्रीहि देवीच्या नवरात्रात कालीमातेच्या दर्शनाला जाणे आवश्यक मानतात. वरिष्ठ राजपत्रित अधिकारी आणि राजकारणातील प्रमुख नेते, या दोन जाती वगळल्या तर साधारण नगरातून आणि ग्रामिण विभागातून अनोळखी अतिथींचे स्वागतहि अगत्याने होते. स्वत:ची काहीशी अडचण सोसूनहि गृहस्थ त्या अतिथीची सोय शक्य होईल तितकी पाहतो. चार्वाक आणि चार्वाकमतानुयायी सुधारक म्हणविणारे विद्वान सोडले तर हिंदुस्थानातील सर्व पंथोपपंथातील व्यक्ति पूर्वजन्म, पुनर्जन्म यावर विश्वास ठेवणाऱ्या आहेत. अगदी सामान्य मनुष्यहि त्यादृष्टीने दैनिक व्यवहारातहि पापपुण्याचा-चांगल्या वाईटाचा विचार करीत असतो. शिक्षणाच्या आणि बुद्धिवादाच्या विरोधी असलेल्या वातावरणात अजुनहि या पापपुण्याच्या कल्पना पुष्कळ प्रमाणात टिकून आहेत. अंधश्रद्धानिर्मूलनवाद्यांच्या अथक प्रयत्नानेहि त्यांना यश आलेले नाही. जुन्या मंदिराची भरभराट होते आहे. तेथील दाटी वाढत आहे. नवीन नवीन मंदिरे जन्मास येत आहेत. त्यांची वाढणारी समृद्धि आणि संपत्ति आश्चर्यचकित करणारी आहे. तुरळकपणे का होईना पण वेदपाठशाळा देशभर विखुरल्या आहेत. संस्कृत भाषा जीव धरून आहे. तिच्यात आजहि महाकाव्ये निर्माण होत आहेत. नियतकालिके निघत आहेत. सांख्य, न्याय, व्याकरण, वेदांत या जटिल शास्त्रांचे अध्ययन अध्यापन होत आहे. नामवंत कीर्तनकार प्रवचनकारांची संख्या मोठी आहे. त्यांचे भरगच्च कार्यक्रम सर्व देशभर वारंवार होत असतात आणि त्यासाठी दहा हजार ते दहा लाख पर्यंतचा श्रोतृगण उपस्थित असतो. लाखो रुपयांची उलाढाल होत असते. धार्मिक ग्रंथांची विक्री झपाट्याने वाढते आहे. त्यांच्या आवृत्त्यावर आवृत्त्या प्रसिद्ध होत असतात. त्यांना कोठे पारितोषिके मिळत नाहीत. पण विक्री भरपूर असते. नानाप्रकारची पुरश्चरणे आणि महायज्ञ

देशभर मधूनमधुन होत असतात. अलिकडे वृत्तपत्रातून आणि साप्ताहिकातून सुद्धा संतसाहित्यासाठी काहीसे स्थान नियमितपणे राखून ठेवलेले असते. आपापल्या संप्रदायाप्रमाणे सोवळे पाळणाऱ्या आणि त्यादृष्टीने जातीच्या मर्यादेत राहणाऱ्या लोकांची संख्या पुष्कळ अंशाने टिकून आहे. चंगळवाद, उपभोक्तावाद यांना गेल्या आठदहा वर्षापासून वृत्तपत्रेहि निंद्य, त्याज्य मानू लागली आहेत. वाढत्या प्रदूषणाचे ते एक महत्त्वाचे कारण आहे. विज्ञानप्राप्त सुखसोयींची घोडदौड प्रदूषण, विलासीवृत्ति याना जन्म देत आहे हेहि आता विचारी लोकांच्या लक्षात येऊ लागले आहे. कुटुंबसंस्था त्यातहि पतिपत्नीसंबंध फारसे विस्कळीत झालेले नाहीत.

व्यक्तिव्यक्तीच्या जीवनात आणि कुटुंबात धार्मिक स्वरुपाची धर्मकृत्ये आवर्जून होतात. समारंभाने होतात. उल्हासाने होतात. त्यासाठी येरवी सभातून ब्राह्मणावर आग पाखडणाऱ्या पुढाऱ्यांनाहि, त्यांच्या घरातील धर्मकृत्यासाठी ब्राह्मण लागतो. तो चांगला (तज्ञ आणि मद्यमांसाचे सेवन न करणारा) असावा अशी त्यांची अपेक्षा असते. (बऱ्याच वर्षापूर्वी श्री. श्रीपाद जोशी यांनी एका नियतकालिकात असा लेख लिहिला होता.) नास्तिक म्हणून मिरविणारे समाजवादीहि आणि निधार्मिकपणाचे भूषण मिरविणारे राजकीय पक्षाचे नेते हेहि याला अपवाद नाहीत. वास्तुशांतीसारखे अगदी सामान्य काम्य-कर्महि नास्तिक म्हणविणारे आवर्जून करतात. मुलगा दुखणाइत झाला तर कुलदेवतेला नवस करून तो समारंभाने फेडतातहि. अंधश्रद्धानिर्मूलनाचा हिरिरीने प्रचार करणारे स्वत:च्या रुग्णालयात सत्यनारायणाची पूजा प्रतिवर्षी करतात. रुग्णालयातील मूठभर कर्मचाऱ्यांच्या समाधानासाठी अशी पूजा केली जाते, असे वर सांगितले जाते. देवधर्माची टिंगलटवाळी सभेतून, व्याख्यानातून उघडपणे करणारे नास्तिक विद्वान, स्वत:च्या मुलाची मुंज थाटामाटाने करतात आणि त्यासाठी समाजवादी पक्षाने दिलेली दूषणेहि निमूटपणे स्वीकारतात. 'तुम्ही नास्तिक, मग उपनयन संस्कार का केलात?' असे विचारले तर आईच्या, पत्नीच्या आग्रहासाठी असे करणे भाग झाले असे म्हणतात. आई आणि पत्नी यांच्या श्रद्धेच्या जपणुकीची भावना बाळगणाऱ्या नास्तिकाला समाजातील पंचाण्णव प्रतिशताहून अधिक असलेल्या लोकांच्या भावना कटु शब्दाने दुखविण्याचा अधिकार कसा प्राप्त होतो, हे कळत नाही. ही दांभिकता विलक्षण आहे! ज्याला पत्नीचे, आईचे मतहि स्वत:च्या मताला अनुसरून वळविता येत नाही, त्याने प्रथा, परंपरांवर कटु शब्दात सातत्याने

आघात करीत राहून लोकभावना दुखवीत राहण्याचे कार्य आवर्जून स्वीकारणे इष्ट नाही. काही असो, पण देवधर्माचे कर्मकांडात्मक संस्कार समाजामध्ये या ना त्या प्रकारात अजून टिकून आहेत ही गोष्ट महत्त्वाची. पद टिकावे, निवडणूक जिंकता यावी, यासाठी ज्योतिषशास्त्रावर भरवसून नानाप्रकारची अनुष्ठाने करणाऱ्या राजकीय नेत्यांची संख्याहि थोडी थोडकी नाही. परकीयांच्या दारुण पारतंत्र्याच्या सहस्रवर्षाच्या कालखंडातहि हिंदूंचे अस्तित्व टिकून राहिले, त्यात जातिसंस्थेप्रमाणेच या व्यक्तिव्यक्तीच्या अंत:करणात असलेल्या धार्मिक श्रद्धेचाहि फार मोठा वाटा आहे, हे विसरता येणार नाही.

या गोष्टीचा सर्वांगीणरीत्या, संकलित विचार, समन्वयाची दृष्टी ठेवून एकत्रपणे केला म्हणजे मनूने मनुष्याच्या चरित्रनिर्माणासाठी दाखविलेला मार्ग अजूनहि बऱ्याच प्रमाणात रुळलेला आहे. दोहीकडून होणाऱ्या स्वार्थी अतिक्रमणाने काहीसा संकुचित झाला असला तरी, त्यावरून होणारी ये-जा काहीशी मंदावली असली तरी थांबलेली नाही हे मोकळ्या मनाच्या माणसांच्या सहज लक्षात येईल.

काही शूद्रातिशूद्रांच्या संदर्भात मनूची विधाने आज आपणास कठोर वाटतात हे खरे. पण वर्णसंकराचे विशेषत: जातिसंकराचे हे प्रमाण जवळजवळ नाहिसे झाले असल्याने तशी कठोर वागणूक ठेवण्याचे कारण आज उरलेले नाही. कारण आवश्यकतेप्रमाणे वागण्याचे आदेश स्वत: मनूनेच दिलेले आहेत. ''परित्यजेदर्थकामौ यौ स्यातां धर्मवर्जितौ। धर्मं चाप्यसुखोदर्कं लोकसंक्रुष्टमेव च। धर्माच्या मर्यादेला सोडून असलेल्या अर्थाचा आणि कामाचा त्याग करावा, आणि काही धर्महि जर लोकभावनेच्या विरुद्ध, लोकनिंदित, असतील, ज्यांच्या पालनाविरुद्ध लोकात आक्रोश असतील, तर ते धर्महि मनुष्याने आचरणात आणू नयेत.'' मनूची ही धारणा लक्षात घेतली म्हणजे मनुस्मृतीच्या विरोधात बंड करून उठण्याचे कोणाला कारणच राहणार नाही. अर्थात् येथेहि मनुष्यस्वभावाप्रमाणे काही वादविवाद राहतीलच. पण समजुतीने घेतले तर समष्टीच्या दृष्टीने समाजात, समुदायात सौजन्य निर्माण होणे, ते टिकून राहणे, सहज शक्य आहे. यातील पुष्कळसा भाग केवळ सुधारकातच नव्हे तर सनातनी प्रवृत्तीच्या धार्मिक लोकांच्या वागण्यातहि बिनबोभाटपणे उतरलेला आहे. त्यामुळे आता आपण कुठे आहोत, कसे आहोत, कोणत्या परिस्थितीत आहोत हे सावधपणे पाहून 'असाल तेथून पुढती चला, असाल तेथून वरती चढा' या विचाराने, आहे त्या परिस्थितीतून उन्नती होण्याच्यादृष्टीने कसे वागावे याचा विचार आपणापुढे ठेवतो.

व्यष्टि आणि समष्टि, व्यक्ति आणि समाज, यांचे संबंध सर्व क्षेत्रात सौजन्याचे असावेत त्यासाठी धार्मिक, राजकीय, व्यावसायिक, अर्थशास्त्रीय, शैक्षणिक अशा सर्व क्षेत्रात आपणास परिस्थिति कशी असावी यासंबंधात विचार करावयाचा आहे.

आज उद्योग व्यवसायाच्या दृष्टीने नसले तरी जातिप्रथा बव्हंशी टिकून आहे. विवाहसंबंध आणि क्वचित् अन्नग्रहणहि यात या प्रथा टिकून आहेत. ते सूत्र धरून आपणास पुढे चालावे लागणार आहे.

विवाहसंबंधाच्या दृष्टीने जातिप्रथांचा विचार प्रत्येक व्यक्तिव्यक्तीने अवश्य करावा. पण हट्ट न करता पोटजातीमध्ये विवाहसंबंध होत असतील तर त्याला आनंदाने मान्यता द्यावी. कोणत्याहि प्रकारचे परधर्मीयाशी होणारे विवाह निग्रहाने टाळावेत. क्वचित् तसे कुठे घडल्यास त्यांना शुद्ध करून पुन्हा हिंदू धर्मात घ्यावे, आणि त्यांच्या मूळ जातीत त्यांचा समावेश करावा. त्याकरिता सोप्या स्वरूपाचे प्रायश्चित्तविधि आचरणात आणावे. मनुष्यमात्रामध्ये स्वभाव, इतर बरेवाईट गुणधर्म यांच्या दृष्टीने अनुवंशाचे महत्त्व फार मोठे आहे. वंश-कुलांचे संस्कारहि मनुष्याच्या मनबुद्धीवर प्रभाव टाकणारे असतात. म्हणून विवाहाच्या संबंधात समान जाति-वर्ण आणि शक्यतो तदंतर्गत कुलसंस्कार यांची उपेक्षा करणे हे परिणामी हानिकारक आहे, हे लक्षात ठेवावे. वरवरच्या क्षणिक मोहाला बळी पडून, प्रेमाचे महत्त्व गाऊन, कुठेहि कोणाशीहि विवाह करू नयेत. प्रत्यक्षात हे असेच आहे. पण सुधारकांच्या प्रचाराला याविषयी उधाण आले असल्याने थोडे स्पष्टपणे पुन्हा एकदा लिहिले आहे.

समानतेच्या नावाखाली जातीजातींच्या विरोधात अखंड आरडाओरडा करणारे सुधारक, निवडणुकीच्यावेळी मात्र मतदारांचा समुदाय आणि इच्छुक (उमेदवार) यांच्या जातीचाच नव्हे तर उपजातीचाहि हटकून विचार करतात. लोकसत्ता मानणारांना याच्याविरुद्ध आक्रोश करावा असे वाटत नाही. कोणताहि राजकीय पक्ष याला अपवाद नाही. निवडणुकांना नुकताच आरंभ झाला होता, त्या पहिल्या एकदोन निवडणुकात गुणवत्तेचा विचार बऱ्याच प्रमाणात झाला होता. पण हा चांगुलपणा लौकरच ओसरला. यासाठी विवाहाव्यतिरिक्त इतर कोठेहि जातीचा थोडासुद्धा विचार करु नये. विचार करावयाचा तो केवळ गुणवत्तेचाच करावा.

जातीवरून दिली जाणारी कोणत्याहि प्रकारची आरक्षणाची प्रथा ही

दीर्घकाल लांबविणे इष्ट नाही. अगदी प्रारंभी काही काळ तिची आवश्यकता होती, पण पंधरा वर्षापेक्षा ती अधिककाळ लांबवू नये, असे त्या वर्गाच्या नेत्याने त्याचवेळी उद्घोषिले होते. पण पन्नास वर्षे झाली तरी आरक्षण टिकून आहे. आणि त्याची व्याप्तीहि वाढत आहे. वंशपरंपरेने हा अधिकार चालू राहतो आहे. नवीन नवीन गट आम्हाला आरक्षण द्या म्हणून आग्रह धरताहेत. त्यासाठी आंदोलने होत आहेत.

समाजहिताच्या दृष्टीने ही गोष्ट अत्यंत अनिष्ट अशीच आहे. हिंदुस्थानातील विचारधारा व्यष्टि-समष्टि, सृष्टी-परमेष्ठी यांचे एकत्रितपणे आकलन करणारी आहे. यात मागच्यापेक्षा पुढचीचे अधिक महत्त्व मानले पाहिजे. असे उपदेशिले जाते. एका संस्कृत वचनात हाच भाव अधिक स्पष्ट रीतीने उल्लेखिला आहे. 'त्यजेदेकं कुलस्यार्थे ग्रामस्यार्थे कुलं त्यजेत्। त्यजेत् ग्रामं हि देशार्थे आत्मार्थे पृथिवीं त्यजेत्।।'

कुलाच्या हिताच्याकरिता एका व्यक्तीचा बळी दिला तरी चालेल. याचप्रमाणे ग्रामासाठी कुलाचा, देशासाठी गावाचा त्याग करावा. नि:संकोचपणे तसे करावे. त्यात मानवतेची हानी नसून मानवतेच्या वाढीचा, मानवता स्थिरपद करण्याचा तो एक नव्हे, एकुलता एक हितावह असा राजमार्ग आहे. 'आत्मार्थे पृथिवीं त्यजेत्' या ओळीचा अर्थ मात्र नीट समजून घेतला पाहिजे. तेथे आत्मा शब्दाने एक व्यक्ति गृहीत धरावयाची नाही. तेथील आत्मा शद्बाचा अर्थ हृदयस्थ ईश्वर, परमात्मा, परमेष्ठी असा आहे. त्याच्या प्राप्तीसाठी साधना म्हणून अहंकाराचा त्याग करावा आणि सर्व प्रकारचे ममत्व सोडावे. पृथ्वी हे ममत्वाच्या व्यापकतेचे प्रतीक आहे. म्हणून व्यक्तीने परमात्म्याच्या प्राप्तीसाठी म्हणजे मोक्षासाठी वैराग्याने सर्वप्रकारच्या लौकिकापासून स्वत: दूर व्हावे. त्यासाठीच क्रमाने वा आपल्या प्रकृति-प्रवृत्तीला अनुसरून कर्म-भक्ति-ज्ञान-योग यातील इष्ट त्या मार्गाचा स्वीकार करावा. लौकिक सुखसोय देणारी साधने, स्त्री-पुत्रादि ममत्व उत्पन्न करणारी नाती, या ना त्या प्रकारे उपभोग्य असलेल्या वस्तू आणि मानसन्मान, प्रतिष्ठा यांच्या मोहास, आसक्तीस, आकर्षणास शक्यतो दूर सारीत प्रामाणिकपणे स्वीकारलेल्या साधनांचा अभ्यास सतत करावा. थोडक्यात सर्व लौकिकापासून वृत्तीने तरी वेगळे व्हावे, लांब राहावे. वृत्तिसंन्यास स्वीकारण्याचा प्रयत्न करावा. पण या गोष्टीस धर्मशास्त्राने एक विलक्षण अट घातली आहे. 'ऋणानि त्रीणि अपाकृत्य मनो मोक्षे निवेशयेत्। अनपाकृत्य मोक्षं तु सेवमानो व्रजत्यध:।।' देवऋण, ऋषिऋण आणि पितृऋण योग्य रीतीने फिटल्यानंतरच आत्मप्राप्तीच्या मार्गास लागावे. तसे केले नाही तर

व्यक्तीची उन्नति न होता तिचा अध:पात होतो. ही चेतावणी गंभीर आहे. म्हणूनच समर्थांनी 'आधी प्रपंच करावा नेटका। मग घ्यावे परमार्थ विवेका।' असे निक्षून सांगितले आहे. पण हा विषय येथे वाढविण्याचे कारण नाही. धर्मशास्त्राने मुख्यत: समष्टीचा विचार करून व्यक्तीवर नाना प्रकारची बंधने का टाकली, ते लक्षात आणून देण्यासाठीच पार्श्वभूमी म्हणून वरील विचार येथे थोडक्यात मांडला.

भांडवलवादाने व्यक्तीला पूर्ण स्वातंत्र्य दिले तर साम्यवादाने समाज गृहीत धरून व्यक्तीची पार गळचेपी केली. इतकेच नव्हे, तर व्यक्ति-समाजाची जोड घालून देणारी मानवी भाव भावनेतील बीजभूत सत्प्रवृत्ती वाढीस लावणारी कुटुंब व्यवस्थाच या साम्यवादाने अतिरेकीपणाने नाकारली. सुदैवाने त्यांच्या या धारणेस यश आले नाही ही गोष्ट वेगळी!

हिंदू तत्त्वज्ञानाने समाजहितासाठीच व्यक्तिस्वातंत्र्यास मर्यादा घातल्या पण व्यक्तीची गळचेपी होणार नाही याची काळजीहि दक्षतेने घेतली. अशी कोणती शासन व्यवस्था असते वा आहे, की जिच्यात व्यक्तीला पूर्णपणे स्वातंत्र्य आहे, वा असते? शासन व्यवस्थेत समाविष्ट होणारी न्यायालये, निर्बंध, आरक्षीगण (पोलीस), सैन्य, शासनातील निरनिराळ्या प्रकारचे अधिकारी हे सर्व विभाग कोणत्या ना कोणत्या प्रकारे व्यक्तीच्या स्वातंत्र्याला मर्यादा घालणारे आहेत. 'स्वातंत्र्य स्वैर नाही शिस्तीत जन्म घेई' असे कोण्या अलीकडच्या मराठी कवीने म्हटले आहे. ही शिस्त व्यक्तीव्यक्तीला पुष्कळ वेळा नकोशी वाटते, जाचक वाटते. तरी तिचे पालन मात्र करावेच लागते. लक्षात यावे म्हणून एक साधे उदाहरण सांगतो. रस्त्यारस्त्यावर पूल, शाळा, आगाडीचे लोहमार्ग, वळणे, इत्यादींच्या मागेपुढे गतिरोधके असतात. त्याचे प्रकारहि सगळीकडे एकसारखे नसतात. स्वयंप्रेरणेने चालणाऱ्या चारचाकीतून प्रवास करणारा, या प्रत्येक गतिरोधकाचे वेळी, कष्ट मानतो. गाऱ्हाणे गातो. पण अगतिकपणे त्याला आपल्या गाडीचा वेग उणा केल्यावाचून चालत नाही. परेच्छेने गाडीच्या वेगाचे नियंत्रण करावे लागणे, हे खरे तर नको वाटणारे पारतंत्र्यच आहे. पण वाहतूक, वाहतुकीतील अपघात, उणावण्याच्या दृष्टीने ही गतिरोधके अपरिहार्यच असतात. काही पूल केवळ दुचाकी वाहनासाठीच राखून ठेवले जातात. त्यानी त्याच पुलाचा उपयोग करावा. दुसऱ्या पुलावरून जाऊ नये. चारचाकी वाहनासाठी हे पूल बंद असतात. हे नियम मोडल्यास दंड होतो (ही एकप्रकारे जाती प्रथाच आहे). एकमार्गी रस्ते असल्याने कित्येकांना लांबचे वळण घेऊन जावे लागते. ते जाचक वाटते. सार

गोष्ट अशी की कोणत्या ना कोणत्या स्वरूपाच्या मर्यादा, बंधने स्वीकारल्यावाचून समाज व्यवस्था सुरळीत राहत नाही. नाना प्रकारचे चढते वाढते कर हे सुद्धा स्वातंत्र्यावरील बंधनेच आहेत. यासाठी 'चातुर्वर्ण्यव्यवस्थेमुळे व्यक्तीस्वातंत्र्याची गळचेपी होते' हा कांगावा अनाठायी आहे, अनिष्ट आहे. चातुर्वर्ण्य व्यवस्थेत कोणताहि गट असा नाही की ज्याला कोणत्या ना कोणत्या प्रकारची बंधने नाहीत! ब्राह्मणावरील बंधने तर अधिक कठोर आहेत. कुटुंबसंस्थेच्या दृष्टीने स्त्रीजीवनावरहि काही मर्यादा घातल्या आहेत. ते केवळ समाजहित लक्षात घेऊनच.

चातुर्वर्ण्यव्यवस्था आणि समाजधारणेला पायाभूत असलेली कुटुंब व्यवस्था चांगली म्हणून स्वीकारली की मग आज कुणी कसे वागावे हे ठरविता येणे शक्य आहे.

ब्राह्मण व्यक्तीने धर्माचरण, सदाचरण, निर्लोभता, निर्मत्सरता, आणि विद्याव्यासंग हे सात्त्विकगुण आपल्या ठिकाणी विकसित होतील असा प्रयत्न करावा. कोणाची अगदी शासनाचीहि नोकरी शक्यतो स्वीकारु नये. जेवढे साधेल त्या प्रमाणात स्वावलंबी राहूनच व्यवसाय करावेत. शासनाचे पद नोकरीच्या रूपाने स्वीकारलेच तर हातातल्या सत्तेचा दुरुपयोग करु नये. अन्यायाने वागू नये. सुविधाशुल्कासाठी कोणास अडवू नये. भ्रष्टाचारापासून सर्वथा दूर राहावे. स्वतंत्र व्यवसाय करावयाचा तर तो निदान मद्यमांसाच्या उत्पादनाचा वा विक्रीचा असू नये. विक्रीसाठी खोटी मापे वापरु नयेत. कोणत्याहि प्रकारची भेसळ करु नये. 'हा ब्राह्मण आहे. हा अशा गोष्टी करणार नाही' असा विश्वास सामान्य जनांना वाटला पाहिजे. पण दुर्दैवाने ब्राह्मण आपली ही प्रतिष्ठा राखू शकला नाही. या दृष्टीने माझा एक खेदकारक अनुभव आपणापुढे ठेवतो.

मुंबईच्या रस्त्यावर टॅक्सीने जात होतो. एक तिशीच्या आसपासचा तरुण हेलपाटत गाडीपुढे आला. सारथ्याने कौशल्याने त्याला चुकविले. तेव्हा मी म्हणालो, ''हा दारु प्यायलेला दिसतो''. सारथी म्हणाला ''बाबूजी! हा ब्राह्मण असला पाहिजे.'' ते ऐकून मी जरा तीव्र स्वराने म्हटले की, ''असे कसे रे म्हणतोस?'' तेव्हा सारथी मात्र शांतपणाने उद्गारला की ''बाबूजी, आम्हीहि येरवी दारु पितो. पण हा श्रावण मास आहे. श्रावणात आम्ही दारुला स्पर्शहि करीत नाही.'' ही संभवनीयता नाकारणे शक्य नव्हते! मला अगतिकपणे चूप बसावे लागले, कारण ही शक्यता मान्य करावी लागणारी दुसरी एक गोष्ट मी विश्वसनीय रीतीने ऐकली आहे. एक शास्त्रीबुवा, जन्माने ब्राह्मण. न्यायमीमांसादि शास्त्राचे तज्ञ. चांगले विद्वान म्हणून प्रसिद्ध असलेले. स्वत:ला सुधारक

म्हणविणारे. राजकीय क्षेत्रात सन्मान मिळालेले. असे चांगले नामवंत होते. ते एका सहकार क्षेत्रात काही समारंभाच्या निमित्ताने गेले असताना, त्यांच्यासाठी आवर्जून शिजविलेले शाकाहारी जेवण नाकारून त्यांनी इतर प्रतिष्ठितांसाठी असलेले मांसाहारी भोजनच आग्रहाने मागून घेतले. तो दिवस चुकून एकादशीचा होता. हे त्यांचे वागणे त्यांच्या अनेक प्रतिष्ठित सहकाऱ्यांनाहि मनातून भावले नाही. पण ते प्रगट न करता त्यांनी शास्त्रीबुवांची इच्छा पूर्ण केली. या शास्त्रीबुवांना मद्यपानाचेहि चांगलेच व्यसन होते. संध्याकाळी उशीरा त्यांना भेटावयास जाण्याची सोय नव्हती. असे त्यांच्याच जवळच्या परिचितांनी मला स्वत:ला सांगितले आहे. त्यांनी पत्नीचे और्ध्वदेहिक अगदी परंपरागत पद्धतीने शास्त्रशुद्धरीतीने केले. असो.

ब्राह्मणातहि काही मांसाहारी उपजाती आहेत. शक्तीचे उपासक म्हणून काही संप्रदायात मद्यपानाचीही प्रथा होती, पण त्यांना बहुधा मद्याचे व्यसन नसते. देवीचा प्रसाद म्हणून प्रसंगविशेषी ते मद्याचा स्वीकार करतात. ब्राह्मण म्हणून स्वाभिमान असणाराने तरी मद्य आणि अंड्यासकट सर्व प्रकारचे मांस कटाक्षाने वर्ज्य मानावे. ब्राह्मणव्यक्तीने सर्वप्रकारचे ज्ञान, यंत्र तंत्रातील कौशल्य प्रयत्नपूर्वक अभ्यासावे, सदैव वाढवीत असावे. पण त्याचा फार मोठा लाभ देणारा धंदा करू नये. समर्थांनी सांगितल्या प्रमाणे 'जे जे काही आपणास ठावे। ते ते हळू हळू शिकवावे। शहाणे करून सोडावे। सकळ जन।।' या वृत्तीचा कटाक्षाने अवलंब करावा. सदाचरणाची कास पकडून वागावे. धर्मशास्त्राने सांगितलेली मर्यादा लक्षात घेतली तर ब्राह्मणापुढे शिक्षक, न्यायाधीश, संशोधक, समादेशक (सल्लागार) येवढ्याच क्षेत्रातील नोकऱ्या खऱ्या अर्थाने उपलब्ध आहेत. त्याने वैद्यक, स्थापत्य, शिल्प, संशोधन यातील उत्तम ज्ञान संपादन करून त्या त्या विषयाचे शिक्षक व्हावे पण व्यवसाय म्हणून ती क्षेत्रे स्वीकारु नयेत. भवनकार (बिल्डर) हा धंदा फार लाभदायक आहे पण त्यासाठी कौशल्यापेक्षा लटपटी खटपटी करून स्थिरपद व्हावे लागते, दंडेली आणि भ्रष्टाचार यांचाहि अवलंब करावा लागतो. म्हणून ब्राह्मणाने तरी या व्यवसायात न शिरणे बरे! शिरलेच तर ग्राहकाची लुबाडणूक फसवणूक होणार नाही एवढा तरी कटाक्ष त्याने ठेवावा. वर सांगितलेल्या चार गोष्टींव्यतिरिक्तची क्षेत्रे वैश्य शूद्रांची आहेत. त्यांच्यासाठीच ती मोकळी राहतील अशी दृष्टी शासनाने ठेवावी. समाजानेहि ती अंगिकारावी.

ब्राह्मणाने उपजीविकेकरिता वरील धोरण लक्षात घेऊन कोणताहि व्यवसाय

पत्करला तरी चैनीचा, विलासी जीवनाचा थोडाहि मोह धरु नये. त्याचे आचार-विचार, राहणीमान, वेषभूषा, आहारविहार साधे, संयमी, सात्त्विक, शक्यतो परंपरेला संभाळणारे असे असावेत.

क्षत्रिय शद्वाचा अर्थ 'क्षतात् त्रायते' -आघातापासून रक्षण करतो तो, असा आहे. म्हणून क्षत्रियाचे मुख्य काम राजाचे, देशाचे, प्रजेचे, पौरजानपदाचे रक्षण करणे हे आहे. म्हणून क्षत्रियाने रक्षण-संरक्षणाचे काम जेथे कोठे असेल त्या विभागातच स्वत:चे श्रम कारणी लावावेत. सेनेचे भूदल, नौदल, आकाशदल, असे तीनहि विभाग, सीमासैनिक विभाग, अर्धसैनिकदल, आरक्षी दल, राजकीय क्षेत्रातील शासनाधिकाराची पदे, उद्योग व्यवसाय निर्माणी याकरिता लागणारे प्रहरी पहारेकरी, हे भाग स्वत:च्या उपजीविकेसाठी निवडावेत. त्याने स्वत: अन्याय करू नयेत. पण अन्याय सहनहि करु नये. इतकेच नव्हे तर कोणावर अन्याय होतो आहे असे कळले तर तेथे आपण होऊन धावून जावे, आणि दुर्बलांचे रक्षण करावे. नानाप्रकारची शस्त्रे त्याला उत्तमरितीने वापरता आली पाहिजेत. त्याचे शरीर सुदृढ, काटक, बलिष्ठ आणि चपळ राहील असा व्यायाम, आणि त्यासाठी योग्य तो भरपूर आहार त्याने अवश्य घ्यावा. मांसाहार हा मनुष्याचा नैसर्गिक आहार नसला तरी क्षत्रियाने मांस वर्ज्यच मानले पाहिजे असे नाही. त्याची दृष्टी सगळीकडे दक्षतेने असावी. केव्हा-कुठे-कसा बलप्रयोग करावा याचे चातुर्यहि त्याने संपादन करावे. युद्धासाठी उपयोगी पडणारे सर्व प्रकारचे शिक्षण त्याने आवर्जून घ्यावे. संरक्षणासंबंधी सर्व प्रकारच्या विभागात शिक्षण आणि नियुक्तीसाठी त्याला प्राथमिकता असावी. तीस चाळीस वर्षापूर्वी अनेक जाति स्वत:ला भूषणाने क्षत्रिय म्हणवून घेत. पण आज आरक्षणाच्या मोहाने पुष्कळ जाती स्वत:ला मागासलेल्या वर्गात गणावे असा आग्रह धरीत आहेत. ही गोष्ट इष्ट नाही. मराठे, रजपूत, ठाकूर, ही खरे तर क्षत्रिय कुले आहेत. रेड्डी-नायर हेहि क्षत्रियच होत. आज ते स्वत:ला काय म्हणवून घेतात, माहीत नाही. शिख संप्रदायातील लोकहि क्षत्रियच मानले पाहिजेत. कारण गुरु गोविंदसिंगानी आवर्जून शिखांचेवर क्षत्रियांचे संस्कार केले. परवापरवा पर्यंत शिखांना सैन्यात भरती होण्याचे आकर्षण होते. क्षत्रियांचे व्यवसाय अनुत्पादक असल्याने प्रतवारीने का होईना पण त्यांच्या वेतनाची चांगली सोय असली पाहिजे. सेनेच्या निरनिराळ्या विभागात काम करणारांना समाजामधे प्रतिष्ठा असली पाहिजे. तसे असेल तरच तरुणांना सेनेत भरती होण्याचे आकर्षण वाटेल.

दुर्दैवाने आज सारी प्रतिष्ठा–मानसन्मान–संपत्ति–समृद्धि, नटनट्या, खेळाडू, नाटक कादंबऱ्यादि लिहिणारे ललित साहित्यिक, गायक–वादक–नर्तक यांनाच प्राप्त होत आहे. सारी प्रसिद्धीमाध्यमे त्यांच्याच भोवती गुंजारव करीत फिरतात. नियतकालिकाच्या पुरवण्या तर जणु त्यांनाच समर्पित असतात. घटकाभर मनोविनोदन आणि करमणूक यापलिकडे जीवनात ज्यांना विशेष स्थान असू नये, तोच वर्ग अल्लड मुलामुलींपुढे आदर्श होऊन राहिला आहे. हे व्यवसाय बिनभांडवली आहेत. अनुत्पादक आहेत. पण त्यांची मिळकत वर्षाकाठी कोटीकोटीने मोजावी लागते, अशी प्रचंड असते. तू कोण होणार म्हणून चांगल्या घरातील मुलामुलींना विचारले तर ती अजाण बालके कोण्या तरी नट–नटीचे वा खेळाडूचे नाव घेतात. समाजाच्या बौद्धिक मानसिक विकासाच्या दृष्टीने ही अवस्था अहितकारक आहे. पण विचारवंत म्हणविणारे कोणीहि या प्रश्नाकडे गंभीरपणे पहात नाहीत. नटनट्यादींना मिळणारी प्रसिद्धी, लाभणारी लोकप्रियता, आणि सुलभ झालेली संपन्नता पाहून होतकरु तरुणांना तोच आदर्श वाटू लागतो. आणि समाजाच्या खऱ्या उपयोगाची क्षेत्रे पोरकी होत रहातात. ही स्थिती समाजाचे पतन घडविणारी आहे.

शेती–गोपालन–व्यापार–सावकारी हे वैश्यांचे अधिकृत व्यवसाय. त्यातील शेती आणि गोरक्षण यापासून वैश्यवर्ग जवळजवळ दुरावत चालला आहे म्हटले तरी चालेल. व्यापार आणि सावकारी अद्यापहि बव्हंशी वैश्याकडे आहे. परंतु तेवढ्यावरच समाधान न मानता या वर्गानेहि उद्योगाच्या नावाखाली शूद्रांच्या अनेक प्रकारच्या धंद्यांवर आक्रमण केले आहे. वैश्याने शक्यतो निरनिराळ्या वस्तूंचा व्यापार करावा. क्रयविक्रयावर स्वामित्व प्रस्थापित करावे. सावकारी करावी. जिथे पैशाची देवघेव होते अशाच व्यवसायातील सेवाचाकरी स्वीकारावी. हस्तव्यवसायांना उत्तेजन द्यावे. त्यासाठी आवश्यक ते भांडवल पुरवावे त्यातून निर्माण झालेल्या वस्तूंचा व्यापार करावा. पण त्या व्यवसायावर स्वत:चे स्वामित्व प्रस्थापित करू नये. हे स्वामित्व ज्याचे हस्तकौशल्य त्याचेकडेच, म्हणजे शूद्राकडेच असावे. मात्र असा व्यापार करताना त्या त्या मालाचा जो उत्पादक त्याची पिळवणूक होणार नाही, हे दक्षतेने पहावे. अशी पिळवणूक होणे हे दोषास्पद समजावे. धार्मिक भाषेत तेहि एक पाप आहे, हे ध्यानी घ्यावे. व्यापार विनिमयाचे एक रूप आहे. पण ज्या वस्तूंचा व्यापार होतो, त्या वस्तू जे निर्माण करतात त्यांचे महत्त्वहि तेवढेच आहे, हे विसरले जाऊ नये. वस्तूचे अधिकमूल्य व्यापारी, अडते, आणि प्रसिद्धि करणारे, तिचे वितरण करणारे, यांना लाभते. वस्तूंच्या

विक्रीकरता प्रचंड प्रमाणात आकर्षण निर्माण करणारी प्रसिद्धके प्रगट करावी लागतात. वस्तूसाठी आवश्यक असलेली वेष्टने साधी असून चालत नाहीत. ती नानारंगी, नानाढंगी ठेवावी लागतात. वस्तू वापरासाठी काढली की दुसऱ्याक्षणी जी वेष्टणे कचराकुंडीत जावयाची असतात, त्यांचे साठी एवढ्या आकर्षणाची आवश्यकता असते का? वस्तूची मागणी वाढविण्यासाठी करावा लागणारा हा दिखावू प्रयत्न, खरे तर मनुष्याच्या बुद्धीचा अपमान आहे. आणि अशा लाजिरवाण्या अपमानाला समाज मोठ्या संख्येने बळी पडत असताना तथाकथित बुद्धिवादी परंपरेतील मानापमानाच्या भ्रांत कल्पनांवर तुटून पडतात, आणि एकप्रकारे शोषण करण्याऱ्या अनेक खुळ्या कल्पनांना वाढविण्यास सहाय्यभूत होतात. वस्तूची निर्मिती आणि विक्री ही वस्तूच्या मूलभूत उपयुक्ततेवर आधारलेली असावी. प्रसिद्धि माध्यमाच्या आकर्षणावर आणि व्यापकतेवर तिचे मूल्य अवलंबून ठेवले म्हणजे निर्मितीमूल्यांपेक्षा चौपट-पाचपटीपेक्षा कितीतरी अधिक पटीत वस्तूचे मूल्य वाढते. औषधाच्या संदर्भात तर हे प्रमाण भयानक आहे. नाडून शोषण करण्याची ही पद्धती घातक आहे. क्रूर आहे. हे सर्व व्यापाराला लागलेल्या अनिष्ट वळणामुळे घडते.

'संपत्ती मी उत्पन्न करतो, मी मिळवतो, माझ्या चातुर्याचा- कौशल्याचा तो परिणाम आहे', हे अमर्यादपणे गृहीत धरण्याचा हा परिणाम आहे. भांडवलवादी प्रणालीचे मूळ, याच गृहीतकृत्यात आहे. धर्मशास्त्राच्या मर्यादा ओलांडण्याचा हा परिणाम आहे.

एकेकाळी सावकार हा साम्यवादी विचारवंतांच्या निंदेचे लक्ष्य होता. वैयक्तिक सावकारी निर्बंधनाने अतिनियंत्रित केली. परिणामी ती नष्ट झाली. सहकारी पेढ्या-पतपेढ्या फोफावल्या. पण त्यामुळे सावकारी वृत्तीच्या लोकांची संख्या वाढली आणि त्यांनीहि सहकाराच्या नावाखाली गरजवंताचे अधिक प्रमाणात शोषणच केले. वैयक्तिक सावकारी भूमीगत झाली. ती गुंड बनली. आणि शोषणाला भयाचे एक नवीन वळण लागले.

आमचे दादा (श्री.दासगणू महाराज) जुन्या काळातील सावकारांच्या दोन तीन त्यांनी अनुभवलेल्या गोष्टी सांगत. एका सावकाराने आपल्या कुळाच्या विरोधात न्यायालयाकडून जप्तीचा आदेश मिळविला होता. जप्तीची कार्यवाही करण्यासाठी ती.दादांना सांगून सकाळी तो बाहेर पडला, तीन-चार कोसावरील शेजारच्या गावी त्याला जावयाचे होते. त्याला परत येण्यासाठी संध्याकाळी उशीर

होणार होता, वा तो दुसरे दिवशी परतणार होता. पण हा सावकार दुपारी बारा–साडेबारा वाजता जेवणाच्या वेळेपूर्वीच परतला. आश्चर्य वाटून ती.दादांनी त्याला कारण विचारले, तेव्हा तो सावकार अगदी साधेपणाने म्हणाला की ''महाराज! त्याचे घरी आज संध्याकाळी लग्न लागावयाचे आहे. पाहुणेरावळे, सोयरे दायरे जमलेले होते. तेव्हा जप्ती कशी टाकणार? मी त्याला न भेटताच परत आलो.'' वास्तविक जप्तीच्या लाभाच्यादृष्टीने लग्नघर अधिक उपयुक्त ठरले असते. पण सावकारातल्या माणुसकीने ते होऊ दिले नाही. सावकार खऱ्या अर्थाने साहुकार, साधुकार ठरला. ज्यांच्या धर्मात कुणीहि कोणत्याहि प्रकारे व्याज घेणे पूर्णपणे निषिद्ध आहे, त्यांच्यातीलच कडव्या मनोवृत्तीच्या लोकांनी 'पठाणी व्याज' हा शब्द आपल्या कर्तृत्वाने भाषेत रूढ केला. अर्थात् त्यांच्यातून श्री.रविंद्रनाथ टागोरांना एखादा काबुलीवालाहि भेटला, पण तो अपवाद.

स्मृतिकारांनी व्याज घेणे या व्यवसायाला वैश्यापुरते मर्यादित केलेले आहे. इतरांना तो व्यवसाय त्याज्य ठरविला आहे. ब्राह्मण, क्षत्रियासाठी तर तो अधिकच त्याज्य आहे. चातुर्वर्ण्य व्यवस्थेत प्रत्येक व्यवसायाला वर्णाची, जातीची एक मर्यादा घालून दिली असल्यामुळे कोणताहि व्यवसाय क्रूर शोषणाच्या पातळीवर कधी उतरला नाही. त्यातील माणुसकी कधी भंग पावली नाही. विनयाच्या संस्कारित कल्पनेने सौजन्याला म्हणावा असा तडा गेला नाही.

व्यक्तिविशेषाने बोलण्याची पद्धती फटकळ, तुटक, क्वचित् अरेरावी आढळली तरी तिला प्रत्यक्षात परपीडनाचे अमानवी रूप प्राप्त झाले नाही. हा धर्माचा, निर्णयात राहण्याच्या वृत्तीचाच परिणाम होता.

धर्मशास्त्राने, स्मृतीने काही मर्यादा घातल्या, म्हणजे 'लोकांना त्या दडपणाखाली वागावे लागते, त्यांचे स्वातंत्र्य लुबाडून घेतल्यासारखे होते, लोकमानसाचा विचार करता हे अयोग्य आहे.' अशासारखे कुभांड (तर्कदुष्ट–अतिशयोक्त–आरोप) आधुनिक बुद्धिवादी वारंवार करीत असतात. धर्मशास्त्राविरुद्ध तर्क करताच कामा नये, असे स्मृतिवचन त्यासाठी काढून दाखविले जाते. पण ते निराळ्या स्वरुपात आजहि जसेच्या तसे मान्य करावे लागते. हे दुर्लक्षून चालणार नाही.

दक्षिणेकडील एका प्रांताच्या निवडणुका नुकत्याच पार पडल्या. निवडणुकीचा निर्णय आश्चर्याचा धक्का देणारा होता. ज्या कुण्या पक्षाचे नेतृत्व करणाऱ्या व्यक्तीला निवडणूक आयोगाने निवडणुकीस उभे राहण्यास अपात्र ठरविले होते, तिचा पक्ष

मात्र प्रचंड बहुमताने निवडून आला. आधीच्या सत्ताधारी पक्षाची फट्फजिती झाली. आणि निवडणुकीस उभीहि न राहू शकलेली व्यक्ति राज्यपालपदावरील व्यक्तीला पटवून मुख्यमंत्रीपदाची शपथ घेऊन घाईगडबडीने सिंहासनारूढहि झाली. अर्थात् विरोधी पक्षाने हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयाकडे नेले. तेथे ते प्रकरण त्यामानाने त्वरित निर्णयास आले आणि सिंहासनारूढ व्यक्तीला पदाचा मोह सोडून खालच्या मानेने पदभ्रष्ट होणे मान्य करावे लागले.

न्यायालयाच्या कार्यपद्धतीचा विचार करता इतक्या त्वरित निर्णय लागणे हे असंभवनीय वाटण्या इतके आश्चर्यकारक आहे. दांडगाईने सिंहासनारूढ व्यक्तीचा पाच वर्षाचा अधिकृत काल व्यावहारिकरित्या परिपूर्ण झाल्यानंतरच मग 'तुम्ही पदावर आरूढ होण्यास अयोग्य आहात' असा आदेश निघावयास हवा होता. तीच न्यायालयाची सामान्य रीत आहे कारण मुख्यमंत्री होण्याची घाई झालेल्या व्यक्तीवर न्यायालयात भ्रष्टाचाराचे अनेक खटले आहेत. त्यातील एकाच्या निर्णयावरून ती व्यक्ती निवडणुकीस अपात्र ठरली होती. त्या प्रकरणातहि पुनर्न्यायाकरिता वरिष्ठ न्यायालयात आवेदन करण्यात आले आहेच. तेथे ती व्यक्ती निर्दोष ठरली तर पुन्हा अधिक ताठ मानेने सिंहासनारूढ होणारच नाही असे नाही. (तसे झालेच)

प्रचंड बहुमताचा पाठिंबा असताना लोकसत्तेतहि स्वीकृत निर्बंधाच्या मर्यादाच अगतिकपणे स्वीकाराव्या लागल्या, असाच या घटनेचा अर्थ आहे. आणि तो धर्मशास्त्राने उल्लेखिलेल्या नियमास धरूनच आहे. तेव्हा जाता येता स्मृतिशास्त्राची अवहेलना करून आपले पुरोगामीपण सिद्ध करणे आणि तेच लोकहिताचे असल्याचा दुराग्रह धरणे किती उथळ आहे, ते यावरून लक्षात येईल. असो.

आपले प्रस्तुत विवेचन वैश्यवर्गाच्या आचार-विचाराच्या दृष्टीने आहे. वैश्यवर्ग हा लोकहितासाठी आवश्यक असलेल्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे तो सुदृढ असणे अपरिहार्य आहे. म्हणून तेथेहि आपल्या परंपरेप्रमाणे विकेंद्रिकरण अत्यावश्यक मानले पाहिजे.

वैश्याने वस्तू उत्पन्न करणाऱ्या निर्माणीचे शक्यतो स्वामी होऊ नये. निर्माण होणाऱ्या वस्तूंचा व्यापार-विनिमय करावा. फारतर निर्माणीचे व्यवस्थापन करावे. पूर्वी व्यापाऱ्यांच्याकडेच मुनिम म्हणून एक पद असे. वैश्याने समाजाचे तसे मुनिम व्हावे.

व्यापाराची स्थिती 'साचेमें तो जग नहीं, झूटा मिले न राम' अशी असते. मनूनेहि व्यापाराला सत्यानृत असेच म्हटले आहे. या व्यवसायात तीन गोष्टी खोट्या होतात. माप खोटे दिले जाते, प्रकार खोटा वा भेसळीचा असतो, आणि लाभावर दृष्टी ठेवून मूल्य पुष्कळच चढे लावले जाते. यात पहिल्या दोन गोष्टी व्यापार करणाऱ्या कुणीहि पूर्णपणे वर्ज्य मानाव्या. मूल्य चढवून सांगणे क्षम्य मानावे. 'समर्घिची विकणे महर्घी वस्तू' (ज्ञानेश्वरी १८.८८१) हेच व्यापाराचे स्वरूप असते. सांगितलेला भाव कुणी ग्राहक सहसा मान्य करीत नाही. यासाठी व्यापाऱ्याला उंचावरूनच आरंभ करावा लागतो. आणि 'तुमच्यासाठी म्हणून थोडा खाली येतो' असे आर्जवाने सांगून सौजन्य प्रगट करावे लागते. व्यापाऱ्याने वाटेल ते चढे भाव सांगून ग्राहकाचे शोषण करू नये यासाठी मूल्य निर्धारणावर शासनाने योग्य ते लक्ष दिलेच पाहिजे. पूर्वी त्याचा उल्लेख केलाच आहे.

सेवा करणे हा शूद्राचा धर्म आहे, असे शास्त्र सांगते. यातील सेवेचा अर्थ हीनता दर्शक घेऊ नये. हे पूर्वी सांगितलेच आहे. शिल्प, स्थापत्य आणि केवळ शारीरिक श्रम हे शूद्राच्या उपजीविकेचे साधन आहे. लोहार, सुतार, शिंपी, विणकर, सूतकताई, धातूंची भांडी करणे, खोदकाम, बांधकाम, इत्यादि सर्व व्यवसाय तसेच चित्रे रंगवणे, गायन, वादन, नर्तन, हस्तकौशल्याची व शारीरिकश्रमाची सर्व कामे हे असे शूद्रांचे व्यवसाय होत. त्यात त्याने अधिक अधिक प्राविण्य मिळवावे. सेवा शब्दाने शूद्राकडून हेच सर्व अपेक्षित आहे. वरील बहुतेक सर्व कामांची विभागणी जात, उपजातींच्या द्वारा होत असे. त्यामुळे ही कामे वंशपरंपरेने चालत येत. स्वाभाविकपणेच त्या करिता निरनिराळ्या प्रशिक्षणाची आवश्यकता नसे. त्यासाठी शासनाला वा कुटुंबाला वेगळा व्यय आवर्जून करावा लागत नसे. बापाच्या हाताखाली मुले चांगली कुशल कर्मचारी होत. त्यांचे हे शिक्षण प्रात्यक्षिकासह विनायास होत असे. आणि बहुधा वयाची अठरावर्षे पूर्ण होण्यापूर्वीच मुले बापाच्या योग्यतेने काम करु लागत. आणि पोटापुरते वा अधिकहि स्वतंत्रपणे मिळवीत. एक उदाहरण म्हणून सांगतो, नांदेड जनपदातील लोहा या ग्रामाजवळ माळाकोळी ग्राम आहे. या गावात तिडके आडनावाचे लोक मंदिराचे शिखर बांधण्याचा व्यवसाय पिढ्यान्‌पिढ्या करितात. दोन ते पंचवीस लाखांचे या कामाचे ठेके घेतात. त्यांचे सर्व शिक्षण प्रशिक्षण घरच्या घरीच होते. अठरा एकोणीस वर्षाचा मुलगाहि स्वतंत्रपणे कामे घेतो.

या स्थितीमुळे औद्योगिक शिक्षणासाठी वेगळी विद्यालये नव्हती. शासनाला निरनिराळ्या शिक्षणासाठी कोणताहि भार सोसावा लागत नसे. आज हे विभाग प्रचंड व्ययाचे होऊन बसले आहेत. त्याचा पुनर्विचार करण्याची वेळ आली आहे. आणि त्यातील उच्चप्रतीचे पदवीधर धनलोभाने बहुधा परदेशी जात आहेत. तेथे स्थिरावत आहेत. तेथे ते आपली संस्कृतीसुद्धा टिकवून ठेवीत नाहीत, यात आपण मायभूमीची वंचना करतो आहोत असे त्यांना वाटत नाही. ही स्थिती समाजात बौद्धिक आणि आर्थिक दारिद्र्य निर्माण करणारी आहे. या दुर्दशेतून क्रमाक्रमाने बाहेर पडले पाहिजे.

आजच्या प्रख्याती पावलेल्या आणि स्थिरपद झालेल्या यंत्रयुगात यंत्रे, त्यांचे सुटे सुटे भाग निर्मिणे, आणि यंत्रांची जोडणी करणे, त्यांच्यात निर्माण झालेले दोष दूर करणे हाहि एक स्वतंत्र व्यवसाय झाला आहे. तोहि शूद्रांच्याच हातात असला पाहिजे. त्याचे मात्र काही प्रमाणात तरी प्रशिक्षण मिळणे वा घेणे अपरिहार्य आहे. तशी व्यवस्था शासनाने करणे आवश्यक आहे.

शूद्रांच्या बहुतेक सर्व व्यवसायांचे इंग्रजांच्या काळात केंद्रीकरण झाले. साम्यवादी विचार त्यात पालट करू शकला नाही. वीस वीस वर्षे ओळीने राज्यशासन स्वाधीन असतानाहि साम्यवाद भांडवली स्वरूपाचे केंद्रित उद्योग, नाहीसे करू शकला नाही. कर्मचाऱ्यांना संपावर जाण्याचे स्वातंत्र्य मात्र विशेषरीतीने मिळाले. परिणामी काही ठिकाणी तरी उद्योग व्यवसायांची आणि पर्यायाने कर्मचाऱ्यांचीच हानी झाली. तेव्हा कोणत्याहि निर्माणी फार मोठ्या नसतील आणि त्या एकवटणार नाहीत अशी काळजी घेतली गेली पाहिजे. विदेशी आयातीवर नियंत्रण असले पाहिजे. काही प्रमाणात तरी स्वदेशी वस्तूंची निर्यात वाढविली पाहिजे आणि नागरिकांनी वा ग्रामिणांनी स्वदेशीवर आत्मीयतेने भर दिला पाहिजे. दुर्दैवाने उदारीकरणाच्या नावाखाली हे सर्व विसरले जात आहे. त्याचा पहिला फटका कर्मचाऱ्यांना म्हणजे शूद्रांनाच बसणार आहे. हिंदुस्थान निसर्गत: समृद्ध असल्यामुळे आणि तुलनेने त्याचे क्षेत्रहि मोठे असल्याने उदारीकरणामुळे होणारी हानी वा भोगावा लागणारा आघात प्रत्यक्षपणे लक्षात येण्यास थोडा अवधी लागेल. खरे तर उतरणीस आरंभ झालाच आहे. पण राष्ट्रीय ऋणे पुष्कळ असल्याने आणि ती वाढती असल्याने उदारीकरणाचे दुष्परिणाम दिसण्यास विलंब लागणे स्वाभाविक आहे. पण विचारवंतांनी या विषयात तटस्थ भूमिका स्वीकारणे योग्य नाही. दुर्दैवाने द्यावे तसे लक्ष या विषयाकडे दिले गेले नाही. उलट उदारीकरण हे

प्रगतीचे-विकासाचे प्रतीक मानले जात आहे. त्यादृष्टीच्या अर्थशास्त्रज्ञासच जागतिक कीर्तीची पारितोषिके मिळत आहेत. आणि स्वदेशी विचारसरणीचे अर्थशास्त्रज्ञ उपेक्षिले जात आहेत. त्यांची भाषणे अरण्यरुदन ठरत आहेत.

शूद्रवर्ग हा संख्येने सगळ्यात मोठा असल्याने त्याने संघटित होऊन या उदारीकरणा विरुद्ध दंड थोपटून उभे राहिले पाहिजे. पण त्यांच्यातील बहुसंख्यांकांच्या मागासलेपणाचा लाभ घेऊन स्वार्थी पुढारी शूद्रांचा हा आक्रोश भलतीकडेच वळवीत आहेत. उदारीकरणाने वरवर दिसणारा लाभ श्रीमंतांच्या वा उच्चमध्यमवर्गीयांच्या पदरात पडत आहे. आणि त्यात वैश्यांचा, वैश्यवृत्तीने जगणाराचा भरणा अधिक असल्याने त्यांच्या विरुद्ध जातीय स्वरूपाची ओरड करणे पुढाऱ्याना शक्य होत आहे. हाहि अंततोगत्वा चातुर्वर्ण्य विस्कळित झाल्याचाच परिणाम आहे.

कृषि आणि गोरक्षण हे खरे तर वैश्यांचे व्यवसाय. पण ते प्रत्यक्षात शूद्रांच्या स्वाधीन आहेत. त्याचे स्वामित्व बव्हंशी क्षत्रियांच्याकडे आहे. शासनाने शेती प्रत्यक्षपणे कष्ट करणाराच्या हातात राहावी यादृष्टीने काही निर्बंध केले. पण सामंतीवृत्तीने त्यातून पळवाटा शोधून आपले स्वामित्व अबाधित ठेवण्याचा प्रयत्न केला. आणि त्याला पुढे बरेचसे यशहि मिळाले. या स्थितीत सुधारणा होणे आवश्यक आहे. शेती विकेंद्रित आहे. ती तशी राहणारच. राहिली पाहिजे. पण शेतीच्या विकासाचे स्वरूप मात्र भांडवलवादी होत चालले आहे. ते इष्ट नाही. रासायनिक खते आणि फवारण्या यांचे जणू बंड माजले आहे. त्यामुळे शेताचा अर्थात् शेतभूमीचा पोत उणावत आहे. उपजाऊपणा खालावत आहे. अन्नातील प्रदूषण वाढते आहे, ही आपत्ती निराळीच. द्राक्षे-आंबा-केळी यासारख्या फळांसाठी ती लवकर पिकावीत वा त्यांचा आकार, स्वाद आणि रंग आकर्षक वाटावा यासाठी विषारी रसायनांचा उपयोग केला जातो आहे. आरोग्याच्या दृष्टीने विषारी रसायनांच्या प्रयोगापासून दूर राहणे अत्यावश्यक आहे.

श्री.मनोहर परचुरे यांच्यासारखे कृषितज्ञ आज याच्या विरोधात धीटपणे उभे आहेत, आणि अनेक यशस्वी शेतकरी नैसर्गिक खते, स्वावलंबी बियाणे यांचा अवलंब करीत आहेत. फवारणीसाठी विषारीद्रव्ये सोडून गोमूत्र, कडुलिंब यांच्या सारख्या परिणामकारक पण प्रदूषण न वाढविणाऱ्या द्रव्यांचा उपयोग करीत आहेत.

दूध वाढविण्यासाठी संकराचा प्रयोग होतो आहे. या संकरित गायी प्रमाणतः दूध पुष्कळ देतात. पण मानवी आरोग्याच्यादृष्टीने ते दूध सदोष असते. संकरित गायी प्रकृतीने दुर्बल असतात. त्या वरचेवर दुखणाइत होतात. आणि त्यांना बरे करण्यासाठी आधुनिक जंतुप्रतिरोधकांचा मारा करावा लागतो. त्यामुळेहि त्यांचे दूध दूषित होण्यास सहाय्य होते.

आपल्याकडे निरनिराळ्या जातींच्या चांगल्या गावरान गायी (संकरित नसलेल्या) उपलब्ध आहेत. त्यांच्या खाण्यापिण्याची योग्य व्यवस्था ठेवली आणि त्यांचे प्रजनन अधिक दूध देणाऱ्या गायीच्या वासरातून क्रमाने करीत गेले, तर या गायी वेळेवर दहा-पंधरा शेर दूध देणाऱ्या होऊ शकतात. अल्पठिकाणी तसे यशस्वी प्रयोग झाले आहेत. गायीना चरण्यासाठी चांगली गायराने उपलब्ध असली पाहिजेत. आणि ही दक्षता शासनाने घेतली पाहिजे. आयुर्वेदाने सकाळी काढलेले दूध आणि संध्याकाळी काढलेले दूध यात पचनाच्या दृष्टीने अंतर दाखविलेले आहे. गाय दिवसभर रानात चरुन आल्याने संध्याकाळचे दूध अधिक चांगले असे आयुर्वेदशास्त्र सांगते. म्हणून गायींसाठी गायराने असलीच पाहिजेत. आजच्या दुधाळ गायी-म्हशी जवळ जवळ स्थानबद्धच असतात. हे त्या पशूंच्या आरोग्याच्यादृष्टीनेहि चांगले नाही. हा दुधाचा व्यवसायहि केंद्रित होऊ नये. तो शक्य तितका विकेंद्रितच असावा. दुधाचा धंदा स्वतंत्रपणे करणारी गवळी नावाची एक जात आपल्याकडे होती आणि आहेहि. यांचे लहानमोठे भटके तांडेहि अद्यापि कोठे कोठे आढळतात. गायीचे मूत्र आणि शेण ही द्रव्येहि फार औषधोपयोगी आहेत. त्यामुळे गाय भाकड झाल्यावरहि निरुपयोगी होत नाही. म्हणून गोरक्षणावर भर देणे राष्ट्रहिताचे आहे.

गुराढोरांची कातडीहि मनुष्याच्या उपयोगाची वस्तू आहे. त्यांचा व्यवसाय करणारे ढोर आणि चांभार या जाती आपल्याकडे होत्या. अजूनहि आहेत. त्यांना सहाय्य देऊन हे उद्योग चांगले धन मिळवून देणारे करता येणे शक्य आहे.

सारांश सर्व प्रकारचे उत्पादक व्यवसाय स्वाधीन असलेला शूद्र वर्ग उपजीविकेच्या दृष्टीने मागासलेला व दुर्बल राहण्याची आवश्यकता नाही. तो सुखी, समाधानी आणि सुशिक्षित जीवन जगू शकतो. मात्र तो साम्यवादाच्या मागे लागून संघटितपणे उर्वरित समाजाचे शोषण करणारा होणार नाही याची दक्षता शासनाने ठेवली पाहिजे. मनूने त्यादृष्टीनेच आदेश दिले आहेत. त्यावर जातीयवादाचा आरोप करणे हे अज्ञानाचे आहे.

हे सर्व प्रकारचे उत्पादक व्यवसाय वैयक्तिक वा सहकारी स्वरुपाचे असावे. त्यांचे बळाने समुदायीकरण वा शासकीकरण होऊ देऊ नये. रशियाने शेती सामुदायिक करण्या करिता विरोध करणाऱ्या शेतकऱ्यांची प्रचंड प्रमाणात हत्या घडवून आणली. परिणामी गव्हाचे कोठार असलेला तो देश धान्याच्या दृष्टीने दीन दरिद्री झाला. एका दिवसाचा पाव मिळण्यासाठी कोसाकोसाच्या रांगा लागण्याचा प्रसंग त्या देशात ओढवला. या आणि इतर कारणांनी तो देश विस्कळीत झाला. दीन झाला. शूद्रांचे अधिराज्य स्थापन करण्याच्या प्रयत्नामुळे हे असे झाले. तेव्हा समाजव्यवस्थेच्या दृष्टीने वेगळ्या प्रकारचा विचार करणे आवश्यक आहे आणि त्यासाठी उपयुक्त विचार मनुस्मृति देऊ शकते.

आपल्याकडेहि स्वराज्य प्राप्तीनंतर समाजवादाच्या नावाखाली उद्योग व्यवसायांचे शासकीकरण करण्याचे प्रयोग झाले. पण बहुधा सर्व उद्योग लाभप्रद ठरले नाहीत. तेथे होणारी हानी लाखांनी, कोटींनी मोजण्याचा प्रसंग वर्षानुवर्ष भोगावा लागला. आता उलट निजीकरणाची लाट उसळते आहे. तसे सुखासुखी होईल अशी लक्षणे मात्र दिसत नाहीत. असो.

वर्णव्यवस्थेच्या पुनर्निर्माणाच्या दृष्टीने वाटचाल करण्यासाठी कोणत्या क्रमाने कसे वागावे लागेल त्याचे निवेदन थोडक्यात केले आहे. येथे काही मतभेद होऊ शकतात. याची जाणिव मला आहे. सांगोपांग विचाराने योग्य तो निर्णय विचारवंतांना घ्यावा लागेल. त्यासाठी आरंभी आरंभी तरी काही कठोर निर्णय घ्यावे लागतील पण शाश्वत हिताच्या दृष्टीने तसे करणे भाग आहे. एवढ्यापुरती जरी विचारवंतांमध्ये सहमती उत्पन्न झाली तरी पुष्कळ झाले असे मी म्हणेन.

आता महत्त्वाचा असा एकच विषय चर्चिण्याचा राहिला. तो म्हणजे स्त्रीजीवनाचा विचार कसा करावा हा! त्यासंबंधी मागे या भूमिकेच्या सामान्यत: चव्वेचाळीस ते पन्नास या पृष्ठांवर बराच उहापोह केला आहे. तो काहीसा तात्त्विक स्वरूपाचा आहे. प्राप्त परिस्थितीत व्यावहारिक दृष्टीने यातून मार्ग काढण्याच्या दृष्टीने काय करता येईल ते थोडक्यात पाहू. मनूने ज्या प्रमाणे चातुर्वर्ण्य पुरस्कारिले आहे, त्या प्रमाणेच चार आश्रमांचाहि एक भाग सामाजिक हिताचा म्हणूनच सांगितला आहे. त्यात संन्यासी वंदनीय मानला असला तरी माहात्म्य सांगितले आहे, गौरव केला आहे तो गृहस्थाश्रमाचा. गृहस्थाश्रम पतिपत्नीच्या संबंधातून साकारावयाचा असतो. पत्नीने गृहिणीधर्माने वागावे

असा आग्रह मनूने धरला आहे हे खरे, पण त्यामागची भावना स्त्रीला तुच्छ लेखण्याची नसून कुटुंबव्यवस्था उत्तम रीतीने चालावी, ती बळकट असावी ही आहे. मनू पत्नीला पुरुषाचे अर्धे अंग मानतो. पत्नी ही पुरुषाची श्रेष्ठ सखा आहे. धर्म-अर्थ-काम या तीन पुरुषार्थांची ती मूलाधार आहे. स्वत:ची उन्नति करून घेण्याची इच्छा असलेल्या पुरुषासाठीहि श्रेष्ठ स्वरूपाचा आधार त्याची पत्नीच होऊ शकते, असेच मनूने म्हटले आहे. तेव्हा स्त्रियांनी कुटुंबाचे रक्षण करण्याच्या कामात आपला वाटा सिंहाचा आहे, हे लक्षात ठेवून वागावे. वैयक्तिक आणि सामाजिक दृष्ट्या तेच हिताचे आहे. स्त्री-पुरुष समानतेची चर्चा कितीहि हट्टाने आणि नानाप्रकारचे तर्क लढवून केली तरी ते सर्व एका मर्यादेतच सत्य आहे. स्त्री काय किंवा पुरुष काय दोघेहि माणूसच असल्याने त्यांच्यात माणुसपणासाठी लागणारी काही सादृश्ये असणारच. तेथील तो सारखेपणा नाकारण्याचेहि कारण नाही. पण गर्भधारणा, बालसंगोपन यासाठी असलेले स्त्रीशरीराचे वैशिष्ट्य दुर्लक्षिता येणार नाही. प्रजेच्या माध्यमाने मनुष्याला अमृतत्त्व मिळावयाचे असते. वंशसातत्याची परंपरा अक्षुण्ण राहावी लागते. एका पिढीत कधी सर्व संपावयाचे नसते. गुणवत्तेच्या अहंकारी उन्मादात एखादी स्त्री, 'बालसंगोपनाशी संबंध ठेवणार नाही, मूल होऊच देणार नाही', असा आग्रह धरु शकेल पण तो वैयक्तिक अपवाद असला पाहिजे. सर्व सामान्य स्त्रीपुढे तो काही आदर्श नसावा. कुठेतरी लेखनिक, स्वागतिका, परिचारिका होऊन अनेकांची अनेक प्रकारे मने सांभाळण्याचा खटाटोप अगतिकपणे करीत राहण्यापेक्षा सुगृहिणी होणे हेहि अधिक प्रतिष्ठेचे आहे. हा नैसर्गिकतेवर आधारलेला सिद्धांत स्त्रियांनी भूषणाने आत्मसात केला पाहिजे. तेच कुटुंबव्यवस्था सुदृढ राहण्याच्या दृष्टीने उपयुक्त आहे.

कुटुंब हे गृहस्थाश्रमाचेच नामांतर आहे. कुटुंब हा समाजधारणेचा मूलभूत घटक आहे. त्याची सुस्थिति राहील असा प्रयत्न आवर्जून केला पाहिजे. आणि हे सर्व करण्यासाठी स्त्रीनेच तत्पर राहिले पाहिजे. घराला घरपण येते ते गृहिणीच्या बळावर. मानवी भावभावनांचे पोषण होते, माणुसकीचे प्राथमिक धडे मिळतात, ते अशा कुलीन घरातच. लहान बालकांची जोपासना मातेच्या छत्राखालीच उत्तम प्रकारे होते. माता-पिता विशेषत: माता, तीच उदासीन झाली, स्वत:च्याच नादात रमली, तर मुले सरळमार्गी निघत नाहीत, ती अपराधी प्रवृत्तीची बनतात, असे समाजशास्त्राचा विचार करणारांनी उद्घोषून

सांगितले आहे. तिकडे दुर्लक्ष करणे अनिष्ट आहे. म्हणून स्त्रियांनी सुगृहिणी होणे, सुमाता होणे हेच महत्त्वाचे मानले पाहिजे. मनूने त्यादृष्टीने स्त्रियांसाठी काही मर्यादा घालून दिल्या आहेत त्यातील वरवरचे काही शब्द पाहून, मनूचा रागराग करण्यात अर्थ नाही. मनू हा समाजशास्त्रज्ञ आहे. समाजाच्या देशाच्या हिताचे, धर्माचे नीतिनियम सांगणारा आहे. काल्पनिक संघर्ष निर्मून त्यातच रमणारा कुणी ललित साहित्यिक नाही. एखादी गोष्ट एखाद्या व्यक्तीने न करणे जर महत्त्वाचे असेल, तर तसा केवळ नियम असून भागत नाही. तशी सोयच उपलब्ध असणार नाही, अशी व्यवस्था ठेवावी लागते. आगगाडीचा सारथी (ड्रायव्हर), नियामक (गार्ड) यांच्यासाठी फारतर लहान घडवंची (स्टूल) असते. आरामखुर्ची तर काय पण साधी पाठीची खुर्चीहि तेथे ठेवली जात नाही. हे ध्यानी घेतले तर मनूचे धोरण समजू शकेल.

काहीतरी विशेष करून दाखविण्याची, कर्तृत्व गाजविण्याची इच्छा अगदी प्रबळच झाली तर कुटुंब विस्कळित होणार नाही, मुलाबाळांची आबाळ होणार नाही, घराचे घरपण टिकून राहिल येवढे कटाक्षाने पहावे. आणि मग जमेल ते करावे. घर संसाराचा पाश गळ्यात आहे तोवर स्त्रियांना स्वत:ची इष्ट ती प्रगती करून घेता येणारच नाही म्हणून त्यांनी हे पाश तोडून घराबाहेर पडलेच पाहिजे असे प्रतिपादिणारे, सुधारक म्हणविणारे, देशी-विदेशी लेखक अगदीच थोडे नाहीत. पण त्यांच्या नादाने स्त्रियांकडून बहकले जाऊ नये. तसे होणे व्यक्तीच्या आणि समाजाच्या दृष्टीनेहि फार घातक आहे.

काही कारणाने स्त्रियांना अर्थार्जन करणे भागच असेल तर तिच्या कामाच्या वेळा घर सांभाळून करता येईल अशा स्वरूपाच्या असाव्या. हा विचार आधुनिक विदुषीनेच मांडलेला आहे. त्याचा अवलंब महिला वर्ग करील तर ते समाजाच्या दृष्टीने मोठे उपकारक होईल.

चार पुरुषार्थातील अर्थ-काम स्त्रियांच्या स्वाधीन आहेत. मनूने त्यासाठी काही नियम घालून दिलेले आहेत. त्या नियमांनाच धर्म असे नाव आहे. घर सुस्थितीत राखण्यासाठी करावे लागणारे अर्थाचे व्यवस्थापन गृहिणीच्या स्वाधीन असावे अशी मनूची धारणा आहे. स्त्रीधनावर तर दुसऱ्या कोणाचाच अधिकार नाही असेच मनूने आग्रहाने सांगितले आहे. स्त्रीला सर्वतोपरी सुखात ठेवावे असाच आदेश मनूने पुरुषांना दिला आहे. स्त्रीचे दु:खाश्रू भूमीवर सांडले तर त्या कुलाचा विनाश होतो असा धाकहि मनूने घातला आहे. तेव्हा मनूने स्त्रियांना

उपेक्षित, शोषित, पीडित, कुंठित ठेवले हा आरोप हेतूप्रेरित आहे. कोणत्या ना कोणत्या प्रकारची बंधने स्वीकारल्यावाचून अनियंत्रित, अमर्याद स्वातंत्र्य हे, समाजात रहावयाचे, प्रजा म्हणून रहावयाचे तर कोणालाहि भोगता येणार नाही. प्रत्येक निर्बंध, प्रत्येक नियम कोणाला ना कोणाला तरी जाचक वाटणाराच असतो. व्यक्तीस्वातंत्र्याचा पुरस्कार अनिर्बंधपणे करावयाचा तर कोण्याहि अपराध्याला कोणतेहि शासन नैतिक दृष्टीने, तार्किक पद्धतीने करावयाचा अधिकार कोणासहि उरणार नाही. ते खरोखरीच परवडेल का? शाश्वत सुख देणारे होईल का? समाजातील व्यक्तींना शांततामय सहजीवन जगता येईल का? याचा मूलभूत विचार जाणत्यांनी शांतपणे केला पाहिजे. तसे करावयाचे ठरविले तर मनूने सांगितले तसेच नियम भाषा पालटून करावे लागतील. 'जुने ठेवणे मीपणे आकळेना' असे जसे समर्थांनी म्हटले आहे. तशी दशा विचार करणाराची होईल.

आपण आज शासनव्यवस्थेसाठी लोकसत्ता सर्वश्रेष्ठ म्हणून स्वीकारली आहे. गेल्या पन्नास वर्षांचा आपल्या स्वराज्याचा इतिहास पाहिला तर लोकसत्तेचे चांगुलपण कोणत्या प्रकारे सिद्ध करता येईल? हा प्रश्न फारच अडचणीचा ठरेल. अधिनायकी (हुकुमशाही) सत्तेत गाढवालाहि गर्दभराज वा खरेतर वाजिराज अगतिकतेने म्हणावे लागते. लोकसत्तेत गाढवाला फार तर गाढवा, गधड्या म्हणण्या इतपत लोकांना मोकळीक मिळू शकते, असे म्हणता येईल. आपले स्वराज्य स्थापन झाले तेच मुळी निवडणुकीतील आश्वासने पार धाब्यावर बसवून. नेहरु-पटेलांची राष्ट्रसभा (काँग्रेस) सुप्रतिष्ठित होती. बहुसंख्य जनता विशेषे करून हिंदू जनता, नेहरु-पटेलांच्या लुभावणी भाषेला भाळलेली होती. गांधीजींच्या सत्य-अहिंसेवर विश्वास ठेवून स्वत:चे हिंदूपण नाकारून हिंदी झाली होती. कोणत्याहि परिस्थितीत पाकिस्तान देणार नाही अशी निवडणुकीची घोषणा होती. गांधीजी तर 'पाकिस्तान माझ्या प्रेतावरून होईल' असे वारंवार उद्घोषित असत. कार्यक्षम असलेली एक हिंदूंची संघटना आणि तिचे साधुशील प्रमुख, गांधीजींच्या सत्य-अहिंसेच्या आग्रहातून व्यक्त होणाऱ्या साधुत्वावर विश्वसून फाळणी होणे शक्य नाही असे गृहीत धरून वागत होती. प्रत्यक्षात मात्र अगदी विपरीत झाले. निवडणुकीतील घोषणांना हरताळ फासला गेला आणि फाळणीची दुर्दैवी तशीच आजहि पीडादायक असलेली घटना स्वीकारावी लागली. लोकसत्तेचा आरंभच असा अपशकुनी आणि भयंकर त्रास देणारा घडला. पुढे जे विश्वासपात्र ठरतील असे वाटत होते, त्यांनाहि जागतिक कीर्तीच्या शांतता पारितोषिकाच्या मोहाने

क्रूर आतंकवाद्यापुढेहि संघर्ष-विराम प्रगट करावा लागला. परिणामी शांतता प्रस्थापित झाली नाहीच. क्रौर्याला मात्र संधी मिळाली. किरातार्जुनीयातील भारवीचे एक वचन सर्वच प्रजाजनांनी लक्षात ठेवण्यासारखे आहे. भारवी म्हणतो, 'अमर्षशून्येन जनस्य जंतुना न जातुहार्देन न विद्विषादर:।' यातील भाव असा की ज्याला पीळ नाही, चीड नाही, ज्याच्या पाठीचा कणा ताठ नाही, त्या पुरुषाचा विशेषत: पुढाऱ्याचा त्याच्या मित्रांना विश्वास वाटत नाही आणि शत्रू त्याचा धाक बाळगीत नाहीत. लोकसत्ता पन्नास-पंचावन्न वर्षे टिकवून धरली असा अभिमान बाळगणाऱ्या हिंदुस्थानच्या वाट्याला आलेली अवस्था दयनीय आहे. जवळपासचे छोटे छोटे देशहि हिंदुस्थानला काय वाटेल याची पत्रास ठेवीत नाहीत. हिंदुस्थानला खिजविण्यात हाती लागलेल्या सीमा सुरक्षादलातील सैनिकांना विटंबून ठार मारण्यात या कृतघ्न देशांना खंतहि वाटत नाही. चुकले म्हणून क्षमा मागण्याची तर गोष्ट दूरच राहिली. असो.

आपण लोकराज्यपद्धति स्वीकारलीच आहे. तर तिची कार्यवाही प्रजाहिताचीच ठरेल यासाठी काही नियम आपणापुढे ठेवतो.

१) निवडणुकीत इच्छुक म्हणून मान्यता देण्यासाठी ती व्यक्ति कोणत्याहि अपराधाच्या आरोपाखाली आरक्षींच्याकडे नोंदविली नसावी. यातहि काही लोक सूडबुद्धीने वागतील. खोटेपणाने एखाद्याला अपात्र ठरविण्याचा प्रयत्न करतील. पण त्यासाठी तीन माणसांची एक समिती नेमून शासनाने प्रथमदर्शिनी तरी आरोप ठेवण्यासारखे आहेत का नाहीत, या निर्णयाला यावे. आणि पूर्ण निर्दोषी सिद्ध होईपर्यंत व्यक्तीला कोणत्याहि लहानमोठ्या निवडणुकीस अपात्र ठरवावे.

२) ज्या व्यक्तीला कोणत्याहि लहानमोठ्या लाच, चोरी, फसवणूक, भ्रष्टाचार, हत्या, बलात्कार, देशद्रोह या अपराधासाठी शिक्षा झाली असेल, तिला खरे तर नित्यासाठी निदान बारा वर्षेपर्यंत निवडणुकीस आणि मतदानासहि अपात्र ठरवावे.

३) इच्छुकाचे वय विधानसभा लोकसभेसाठी तरी तीस पूर्ण असावे. मतदात्याचे वय एकवीस पूर्ण असावे. आणि त्याला त्याच्या प्रांताच्या, राज्याच्या मान्य भाषेत स्वभाषेचे चांगले लिहिता वाचता येईल एवढे तरी ज्ञान असावे. मतदान न करणे हा अपराध समजून त्यासाठी जाणवेल इतकी शिक्षा असावी.

४) आंधळे, पांगळे, मुके, बहिरे, वेडे यांना मतदानाचा अधिकार नसणे योग्य पण अतिमानवतावाद्यांना ते योग्य वाटले नाही तर त्यांच्यासाठी स्वतंत्र मतदान केंद्रे स्थापून त्यावर योग्य निरीक्षकाच्या नियंत्रणाखाली त्यांचे मतदान व्हावे.

५) निवडून आलेल्या कोणत्याहि सभागृहाच्या सभासदास आरडाओरडा, मारामारी, आपले स्थान सोडून अध्यक्षापुढे उभे राहून घोषणा देण्यास पूर्णपणे बंदी असावी. सभागृहाच्या शांततेचा थोडाहि भंग करणारास निष्कासित करावे. निलंबित करावे. वा त्याचे सदस्यत्व पूर्णपणे काढून टाकावे. सभाध्यक्षाच्या आदेशाचा, आज्ञेचा भंग हा मोठा अपराध मानावा. सभेतील कार्यवाही ज्याला संमत नसेल त्याने एकट्याने, वा त्याच्या गटाने, लेखी निषेध नोंदवून निमूटपणे सभात्याग करावा. सभेतील शांततेचा थोडाहि भंग होणार नाही याची दक्षता त्याने घ्यावी.

६) सदस्यांची सभेतील अनुपस्थिती स्वैर असू नये. तिला संख्येचे नी अध्यक्ष- उपाध्यक्षांच्या पूर्वानुमतीचे बंधन असावे.

७) मंत्र्यांची निवड करताना तो तो त्या त्या विभागाचा तज्ञ असावा. वर्ण व्यवस्थेशी मंत्रीपदाची सांगड घालता येईल तो दिवस भाग्याचा ठरेल. तसे खरे घडून आले तर राष्ट्राध्यक्ष, पंतप्रधान, गृहमंत्री, संरक्षणमंत्री हे क्षत्रियच असावेत. कुलीन असावेत. शिक्षणमंत्री, न्यायमंत्री, प्रसारमाध्यममंत्री, मानवसंसाधनमंत्री ब्राह्मण असावा. उद्योगमंत्री, अर्थमंत्री, आरोग्यमंत्री वैश्य असावा. आगगाडीमंत्री, दळणवळणमंत्री, खाणमंत्री हे सर्व शूद्र असावेत. विदेशमंत्री क्षत्रिय किंवा ब्राह्मण असावा. वनविभाग पर्यावरण इत्यादि इतर लहान मोठ्या विभागणीसाठी तारतम्याने नियुक्ती करावी.

काही झाले तरी मंत्रीमंडळातील प्रत्येक जण कर्तव्यतत्पर, त्या त्या विषयाचा अभ्यासू, चतुर, निर्लोभी, कुलवंत आणि सदाचरणी असावा. कुलवंतपणाचा ठेका काही उच्चवर्णियांना दिलेला नाही. शूद्रातिशूद्रातहि पुष्कळ कुलवंतच आहेत. निगर्वी असणे, सदाचारी असणे, परपीडक नसणे हा सर्वसामान्यांचा गुण असला पाहिजे.

कोणत्याहि अधिकार पदावरची व्यक्ति राष्ट्राभिमानी असलीच पाहिजे. भ्रष्टाचार व देशद्रोह यांची शंका जरी आली तरी त्या व्यक्तीला पदावरुन आधी निलंबित करून मग खऱ्याखोट्याचा निर्णय करीत बसले पाहिजे. संशयाचा लाभ मिळून नव्हे, तर पूर्णपणे निर्दोष ठरल्यासच पूर्वपदावर नियुक्ती करावी. अन्यथा

अपराधाच्या प्रमाणात त्या अधिकाऱ्यास कठोर शिक्षा द्यावी.

शासन व्यवस्थेचा राजा हा प्राण असला तरी इतर सर्व शासनाधिकारी वा राजपुरुष हे त्या शासनप्रमुखाचे अवयव होत असे जाणून ते सर्वच शरीराच्या आंगोपांगाप्रमाणे सशक्त, कार्यक्षम, अनलस, सहिष्णु, धीराचे, उत्साही आणि कर्तव्य तत्पर असले पाहिजेत. तरच राष्ट्र, समाज, कुटुंब, व्यक्ती सुस्थितीत समृद्ध आणि समाधानी राहू शकते. हे त्या व्यक्तीपासून त्या त्या पातळीवरील सर्वांचे कर्तव्य कर्म आहे. ते दक्षतेने करणे हेच ईश्वराचे पूजन आहे. प्रत्येक व्यक्तीला वा गटाला काही अधिकार असतात. पण अधिकार लालसेने कर्तव्य भावनेला थोडाहि धक्का लागणार नाही, कोणीहि अल्पांशानेहि कर्तव्यच्युत होणार नाही अशी भावना प्रत्येकाने स्वत:शी प्रतिज्ञापूर्वक बाळगली पाहिजे. निर्बंध आणि नियम त्या दृष्टीने केलेले पाहिजेत. मनुष्याच्या ठिकाणी अधिकाराची भावना, स्वार्थ प्रेरणेने स्वाभाविकपणेच राहते. कर्तव्य पालनासाठी मात्र त्याला प्रयत्नाने सुसंस्कृत करावे लागते. सहसा अनुभवास न येणारा म्हणून न पटणारा कर्मविपाकाचा सिद्धांत प्रामाणिक श्रद्धेचा विषय असेल तर कर्तव्य भावनेचे संस्कार करणे आणि कर्तव्य पालनाचे प्रशिक्षण देणे सहजपणे शक्य होते. स्वधर्मावरील निष्ठेने हे कार्य पुष्कळच सोपे होऊन जाते.

आपणावर कोणाचे तरी चांगले लक्ष आहे, ही जाणीव माणसाला कर्तव्य तत्पर करणारी आणि स्वधर्माचरणास प्रोत्साहन देणारी आहे. शासनाच्या दृष्टीने सक्षम, चतुर, निर्भय, साहसी अशी गुप्तचर यंत्रणा व्यवस्थित आणि सदा सावध असणारी असावी लागते. कोणत्याहि प्रकारच्या शासन व्यवस्थेत तिच्याकडे दुर्लक्ष करून चालत नाही. शासन व्यवस्थेचे गुप्तचर हे डोळे आहेत, ते मंद आणि निस्तेज असून चालणार नाहीत.

सुबुद्ध वाचकांना शेवटी एक आग्रहाचे सांगणे आहे की भूमिकेचे लेखन बरेच लांबले असले तरी आपण तिचा विचार सखोलपणे आणि सांगोपांगरीतीने करावा. कुठले तरी एखादे वाक्य वा एखादा परिच्छेद वेगळा काढून वाद विषय करू नये. आणि वाद करावयाचा तर तो या भूमिकेत मांडलेल्या विषयाला धरूनच असावा. त्यासाठी मनूच्या संहितेतील एखाददुसरा श्लोक वादासाठी घेऊ नये.

मला विश्वास वाटतो की या सर्व लेखनोद्योगामुळे मनुस्मृतीकडे पाहण्याचा दृष्टिकोन पुष्कळसा सहानुभूतीचा राहील. चिरंतन हितासाठी स्वीकारण्यासारखे मनुस्मृतीत पुष्कळ काही आहे. हे वाचकांना पटेल. त्यासाठी उदार अंत:करणाने

आणि शांत बुद्धीने विवेकावर आधारलेला विचार करण्याची आवश्यकता आहे हे पुन्हा एकदा सांगावयास नको.

श्रीसद्गुरु ती. दादांच्या विठ्ठलस्तोत्रातील मागणीचा उल्लेख करून मग इत्यलम् म्हणतो.

**राष्ट्रदैन्य वार, तार भाविकांप्रति सदा।**
**ब्राह्मणांचिया निवार दु:ख दैन्य आपदा।।**
**देई क्षत्रियास शौर्य भीरुता निवारुनी।**
**वैश्य शूद्र ठेव सुखी संपदेस देऊनी।।**
**स्थान वर्णसंकरास मात्र येतुले न दे।**
**जाति शुद्ध राखुनीच एकी शीघ्र होऊ दे।।**
**आर्यभूस मानिलेस प्रीय तूच श्रीहरी।**
**तीच काय लोटिलीस आज दु:खसागरी।।**
**धर्म-रीतभात आमुची न जावी मोडली।**
**हीच गोष्ट मुख्य यात पाहिजेस ती दिली।।**
**स्थान द्वेषमत्सरा मिळो न आमुच्या मनी।**
**हिंदवासिया सुखी करी तू सर्व बाजुनी।।**

।। इति शम्।।
।। मर्यादेयं विराजते।।

**वि.आ.प.स्वा.**
**वरदानंदभारती**

# परिशिष्ट

*(आक्षेपांना उत्तरे देण्यासाठी लागणारे संदर्भ शोधणे व मांडणे अतिशय अवघड! पण अत्यंत साक्षेपाने त्या संदर्भाची व आधारवचनांची मांडणी पू. स्वामीजींनी परिशिष्टांमध्ये केली. ही भूमिका वाचणाऱ्यांना त्याची थोडीशी कल्पना येण्यासाठी त्यातील काही निवडक संदर्भ येथे वानगीदाखल दिले आहेत. यातील साऱ्या तपशीलांसाठी आपण 'श्रीमनुस्मृति-सार्थ-सभाष्य' हा मूळ ग्रंथ पहावा. ही विनंती.)*

***– अध्यक्ष.***

**१) प्राचीन भारतातील समाज सुसंस्कृतशील संपन्न होता :**

मेगॅस्थेनिस : भारतीयांच्या मध्ये आढळणाऱ्या प्रामाणिकपणाचा अल्पांशदेखील इतर कोठे आढळणे शक्य नाही.

**अबुलफझल :** हिंदू मनुष्य हा एकंदरीत सज्जन आणि मायाळू असतो. जगातील इतर कोणत्याहि माणसाशी तंटा करण्याची त्याची बुद्धि नसते.

**मॅक क्रिडल :** न्यायबुद्धि, प्रामाणिकपणा आणि सरळपणा हे हिंदूंचे विशेष सद्गुण आहेत.

**दिनोवास्का** (पोलीश युवती): उपजत दयार्द्रता आणि अंत:करणाची सुंदर ऋजुता यांच्यामुळे हिंदूंच्या ठिकाणी खरा बंधुभाव उत्पन्न होतो.

**बर्नाड शॉ :** यू इंडियन हॅव फेसेस, वुइ हॅव ओन्ली मास्क्स्.

**ब्राह्मण एक राष्ट्रीय प्रश्न– पं. अप्रबुद्ध.**

**ॲर्नाल्ड टॉयनबी** (सूक्ष्म निरीक्षणपूर्वक) : मानवी इतिहासातील प्रचंड धोक्याच्या क्षणी मनुष्यमात्राच्या मुक्तीचा एकमेव मार्ग भारतीय मार्ग हाच आहे. अखिल मानव जातीला एका एकसंध, एकजीव परिवारामध्ये परिवर्तित होणे शक्य होईल अशी प्रवृत्ति व हिंमत आपल्याला तेथेच सापडेल आणि या अणुयुगामध्ये आत्मघातापासून वाचण्याचा येवढा एकच पर्याय आहे.

**पुराणे, इतिहास व संस्कृतिकोष– डॉ. श्री. द. कुलकर्णी**

**२) सगळे चांगले असतांना दैन्य का आले?**

मी आजवर जे पाहिले आहे, ऐकले आहे, इतिहासात शोधले आहे, अनुभवले आहे, आजहि तेच करीत आहे. त्यावर दीर्घकालपर्यंत गंभीरपणे चिंतन केले आहे. त्याचा परिणाम म्हणून आपणास दृढनिष्ठेने सांगतो की चातुर्वर्ण्य, जातिप्रथा, कुटुंबव्यवस्था, ब्राह्मणाला द्यावा म्हणून सांगितलेला मानसन्मान, पुरुषप्रधानसंस्कृति, ईश्वरावरील श्रद्धा, पूर्वजन्म-पुनर्जन्माची धारणा, परलोकास मान्यता, यातील काहीहि, अगदी काहीहि आपल्या दुर्दैन्याचे कारण नाही. आपल्या दुर्दैन्याची कारणे मुख्यत:

शास्त्रग्रंथाचा अवमान करण्यात वा त्यांच्याकडे दुर्लक्ष करून स्वार्थ साधण्यात, राजनीतीचे आकलन न होण्यात, राजकारणातील चातुर्य गमावण्यात, स्वार्थलोलुपतेत, स्वयंकेंद्रितपणात, व्यापक हिताची जाणीव नसण्यात, भाबड्या विचारात आणि सद्गुण विकृतीत आहेत. व्यक्ति आणि समाज यांच्या पातळीवर देशहित लक्षात घेऊन व्यष्टि-समष्टिचे धर्माधर्म वेगळे असतात. क्वचित परस्पर विरोधीहि असतात. पण याकडे आपण द्यावे तसे लक्ष दीर्घकालात दिले नाही. महाभारतीय युद्धानंतर दोन-अडीच हजार वर्षांची जी दीर्घकालीन शांतता आपणास लाभली, परमेश्वराच्या कृपेने सुजलां-सुफलां असलेली निसर्गसमृद्ध मातृभूमि आपणास मिळाली, त्यामुळे आपण सुखासीन झालो, सुखलोलुप झालो, आळशी झालो. स्वयंकेंद्रित झालो. व्यष्टिसमष्टीचा विचार गंभीरपणे करण्याची आपणास आवश्यकता राहिली नाही.

त्यातहि समाजाच्या रक्षणासाठी सर्वांना वैचारिक प्रबोधन करण्याचे दायित्व ज्याच्या शिरावर होते, तो ब्राह्मणवर्गहि ज्ञाननिष्ठ, तपस्वी, विद्याप्रेमी बहुतांशाने तरी राहिला नाही. तोहि इतरांसवे सुखासीन आणि सुखलोलुप झाला. आदर्शांचे यथाशक्य पालन, स्वधर्माची यथासंभव आचारनिष्ठा तोहि राखू शकला नाही. आणि मग 'विवेकभ्रष्टानां भवति विनिपात: शतमुख:' अशी स्थिति हिंदुस्थानच्या वाट्यास आली. आपले आदर्श चुकीचे नव्हते. आदर्शाप्रत पोचण्याची साधनेहि यथायोग्य होती. चूक झाली ते आपण अदूरदर्शी झालो, आचाराच्यादृष्टीने पुष्कळप्रमाणात शिथिल राहिलो, यामुळे सगळे चांगले असताना आपल्या वाट्यास हे दैन्य आले.

**विचार चिंतन**

### ३) मनु व मनुस्मृती विषयी :

ब्रह्मदेश, फिलीपिन्स, थायलंड, बालिद्वीप, चंपा (दक्षिणी व्हिएतनाम), इंडोनेशिया, कांबोडिया, मलेशिया, सिंहलद्वीप (श्रीलंका) या देशात जे शिलालेख मिळालेले आहेत, आणि ज्यांच्या प्राचीन इतिहासात असे उल्लेख सापडतात की त्या त्या ठिकाणी मनुस्मृतीवर आधारलेली समाजव्यवस्था पुष्कळ प्रमाणात होती. तेथे मनुस्मृतीला सर्वोच्च महत्त्व दिले जात होते. आणि मनूच्या विधानाला अनुसरूनच न्याय दिला जात असे. काही ठिकाणच्या शिलालेखातून मनूचे श्लोक कोरलेले आढळतात. तेथील प्राचीन राजे लोक स्वत:ला मनूचे अनुयायी 'मनुमार्गगामी' म्हणवून घेण्यात भूषण मानीत असत.

**मनूका विरोध क्यों? -डॉ. सुरेंद्रकुमार.**

नीत्शे हा एक जर्मन पंडित आणि तत्त्ववेत्ता होता. मनूचा त्याच्यावर विलक्षण प्रभाव आहे. मनूने त्याच्या मतांना विशिष्ट वळण लावून त्याला समाधान प्राप्त करून दिले. 'मानव आत्मप्रयत्नाने आपल्या दैवाचा शिल्पकार बनू शकतो', हा मनूचा

विचार त्याला एकदम पटला. 'बायबल' पासून जी स्फूर्ति त्याला मिळू शकली नाही, ती स्फूर्ति त्याला 'मनू' कडून मिळाली. तो जाहीरपणाने प्रतिपादन करू लागला की, 'बायबल बंद करा आणि मनुस्मृति उघडा!' एका ग्रंथात तो लिहितो– मनुस्मृतीत जीवनाबद्दल महान् आदर्श दर्शविला आहे. प्रजोत्पादन, स्त्री, विवाह, इत्यादी ज्या गोष्टींचा विचार ख्रिस्ती धर्म गावंढळपणे दडपून टाकतो, त्या सर्वांचे मनुस्मृतीत गंभीरपणे विवेचन करण्यात आले आहे. मला तर मनूच्या ग्रंथावाचून दुसरा ग्रंथच माहीत नाही, की ज्यात स्त्रीविषयी प्रेमपूर्ण व दाक्षिण्ययुक्त अशी इतकी विपुल वचने सापडतील.

मॉरिस मेटरलिंक हा बेल्जिअन पंडित आपल्या 'दि ग्रेट सीक्रेट' या ग्रंथात लिहितो, – 'मनूच्या नीतिशास्त्राच्या संबंधात आश्चर्याची गोष्ट ही आहे की, त्याने प्रतिपादिलेले नीतीनियम आध्यात्मिक स्वरूपाचे आहेत. या नियमांच्या पालनाला बक्षिस आणि उल्लंघनाला शिक्षा स्वतःच्या अंतःकरणातच मिळते.'

**विचार चिंतन**

मनू केवळ वर्णाचाच विचार करीत नाही. तो संपूर्ण समाजाचे सूत्रबद्ध वर्गीकरण करतो. प्रत्येक वर्णासाठी अगदी बारकाव्यासह आचारसंहिता तयार करतो. परंतु तो इथेच थांबत नाही. या व्यतिरिक्त राजा, राजधर्म, कायदा, सुव्यवस्था, न्यायालय यांचा देखील विचार करतो. या विचारांना पुन्हा अध्यात्माची बैठक देतो.... परंतु दुर्दैवाने वर्णाश्रमविरोधी टीकेच्या गदारोळात मनूचे इतर मूलगामी विचार झाकोळलेले दिसतात. निदान महाराष्ट्रात तरी वर्णाश्रमाखेरीज मनूच्या इतर तत्त्वज्ञानाकडे टीकाकारांनी दुर्लक्ष केलेले दिसते.

काही शिक्षणशास्त्रज्ञांच्या मते शिक्षणाचा हेतू विशिष्ट समाजाची उभारणी करणे हा आहे. तर काहींच्या मते शिक्षणाचा हेतू व्यक्तीची विशिष्ट प्रकारची घडण करणे हा आहे. ...मनू आपल्या शिक्षणपद्धतीद्वारा या दोन्ही उद्दीष्टांचा पाठपुरावा करण्याचा प्रयत्न करताना दिसतो. मनूला एका आदर्श समाजाची उभारणी करावयाची आहे. त्याचबरोबर शिक्षणाद्वारे माणसाला अंतिम सत्याचे दर्शन घडवून तो मोक्षाप्रत कसा जाईल हे देखील पहावयाचे आहे.

मनुप्रणीत शिक्षण पद्धती अनेक बाबतीत आदर्श अशीच आहे. खऱ्या अर्थाने विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा संपूर्ण विकास व्हावा यासाठी मनूची तळमळ आहे. आणि म्हणून तो शिक्षणपद्धतीची खास आखणी करतो आणि काही अवधानेही पाळतो.

**मनुस्मृती एक समालोचन – डॉ. सावंत.**

वर्णभेद आणि जातीय व्यवस्था मानूनहि वैदिक आर्यांच्या सामाजिक एकात्मतेला कधी बाध आलेला नाही. व्यवस्थेच्या दृष्टीने कितीहि भिन्नता, विविधता वा भेद

असले तरी ते सर्व एकाच शरीराचे वेगवेगळे अवयव असतात. त्याप्रमाणे होते. या विविधतेतील ऐक्याच्या धारणेमुळेच हिंदू संस्कृतीवर आतून बाहेरून पुष्कळ आघात झाले तरी हिंदूसंस्कृती आपले वैशिष्ट्य राखून ठेवू शकली.

**जस्टिस वुड्रॉफ– (भारतीय समाजशास्त्र – राजवाडे)**

मी स्त्रीरोगतज्ञ (गायनॅकॉजिस्ट) म्हणून गेली पस्तीस वर्षे व्यवसाय करीत आहे. माझ्याकडे विशेषेकरून उच्चभ्रू समाजातील स्त्रिया येतात. परंतु गेल्या ३०–३५ वर्षात, ''मूल नको! संगोपन नको! माझे 'करिअर' करण्यातच मला रस आहे!'' असे म्हणणारी एकहि स्त्री मला भेटली नाही.

**डॉ. लीला तेलंग, पुणे**

आईच्या वाढत्या वयाबरोबच मृत्युसंख्येचाहि धोका वाढतो म्हणून प्रसूतीचे कार्य तरूणपणाच्या आरंभीच्या काळातच घडून येणे इष्ट आहे. 'मॉरटॅलिटी रिस्क्स् इनक्रिजेस वुइथ एज ऑफ दि मदर अँड देअरफर चाइल्ड बेअरिंग शुड बी अंडरटेकन इन दि अर्लीयस्ट इयर्स ऑफ मॅरिड लाइफ'

**(मेडिकल जर्नल – १२/७/३०)**

तारुण्याच्या आरंभीच्या काळात आलेले गर्भारपण आई आणि बालक दोघांच्याहि दृष्टीने सुखावह असते.

आईचे वय जितके आधिक तरुण, तितके मूल अधिक सुदृढ.

प्रौढ विवाह रूढ आहेत पण ती प्रथा सामाजिकदृष्ट्या हितकारक नाही. कोणत्याही दृष्टीने पाहिले तरी हे मनुष्यजातीला सदोष करणारेच आहेत. बालविवाह हाच नियम असला पाहिजे. तरुण स्त्रीपुरुषामध्ये एका बलवान तेजस्वी शक्तीचा निवास असतो. त्या दांपत्यापासून निर्माण झालेली संतती ही अप्रतिहत अशा रोगनिवारक शक्तीने संपन्न असलेली निर्माण होते.

**(भारतीय समाजशास्त्र–राजवाडे)**

**४) इतर :**

काँग्रेसमध्ये महत्त्वाची पदे दिलेल्या मौलाना अब्दुल कलम आझाद यांनी १९२१ मधे अल् हिलाल मधे लिहिले होते की तुर्कस्थानची प्रतिष्ठा समाप्त होणे हे मुस्लिम जगताची शवयात्रा निघण्यासारखे आहे. इस्लामी देशावर जेव्हा कधी कुणाचे आक्रमण होई तेव्हा त्याच्या प्रतिकारासाठी जिहाद (धर्मयुद्ध) पुकारणे हे प्रत्येक मुस्लिमाचे कर्तव्य आहे.

इंग्रजांच्या कठोर भूमिकेमुळे खिलाफत चळवळ पूर्णपणे पराभूत झाली. मुसलमान हताश झाले. पण त्याचा राग त्यांनी हिंदूंच्यावरच काढला. केरळमधे मोपला या

स्थानिक मुसलमानांनी हिंदूंच्यावर अनन्वित अत्याचार केले. बायका-मुले म्हातारेकोतारे यासह सहस्रावधि हिंदू क्रूरपणाने ठार मारले गेले. सहस्रावधि बळाने बाटविले गेले. स्त्रियांच्यावर बलात्कार झाले. गांधीजींनी तर या क्रूर कृत्याची भलावण केली. गांधी म्हणाले- 'धर्मभीरू वीर लोक आहेत. त्यांच्या विचाराने जो धर्म आहे त्यासाठी ते युद्ध करीत आहेत. ते ज्या पद्धतीने युद्ध करीत आहेत ती पद्धतीहि त्यांच्या विचाराप्रमाणे धर्म संमतच आहे.' गांधीजींचे हे महाभयंकर विधान डॉ. आंबेडकरांनीच उल्लेखिले आहे.

**मुस्लिम तुष्टीकरणाची मृगमरीचिका- डॉ. नित्यानंद**

गांधीजींचे निष्ठावंत अनुयायी मगनभाई देसाई यांनी 'तीस जानेवारी' ही आपली कविता सत्याग्रहि या साप्ताहिकाच्या १/२/१९६९ च्या अंकात छापली आहे. तीत ते म्हणतात- 'कोण म्हणे नथुरामे वधिले त्याने तर दिधले अमरपण । परि वधिले नंतर सकलांनी नुसता केला कार्यविनाश ।।'

आज दलितांना पूर्वीच्या मानाने काहीशी सुस्थिति प्राप्त झाली आहे, तिला केवळ आंबेडकरांचे संघर्षवादी व्यक्तिमत्व कारणीभूत आहे असे जे मानले जाते ते यथार्थ नाही. स्वा. सावरकर, गांधीजी, विठ्ठल रामजी शिंदे यांच्यासारख्या व्यक्ति, जर हरिजनांच्या वतीने कार्यप्रवण झाल्या नसत्या, श्री. म. माट्यांसारख्या अनेक कार्यकर्त्यांनी पदरमोड करून अस्पृश्यता विरोधी चळवळ चालवली नसती तर एकट्या आंबेडकरांचे प्रयत्न यशस्वी ठरणे अशक्य होते.

**विचार चिंतन**

संसदीय लोकसत्तेतील खुणेचा शब्द 'उत्तरदायित्व' हा सत्ताधाऱ्यांच्या राजकीय शब्दकोशातून जवळजवळ तडीपारच झाला आहे. संसदेतील बहुसंख्येमुळेच आपल्याला (उत्तरदायित्व न स्वीकारण्याचा) नैतिक अधिकार प्राप्त झाला आहे, असे मानणारांचा एक नवाच पंथ उदयास आलेला दिसून येतो.

तंत्रवैज्ञानिक क्रांतीमुळे समाजरचनेतील विविध वर्गांचे स्वरूप व त्यांचे नाते कसे पालटते आहे हे अमेरिकेच्या उदाहरणावरून स्पष्ट होते. आज अमेरिकेत शरीरश्रमाची कामे करणारांचे अथवा 'निळ्या गळपट्टीच्या' कामकऱ्यांचे प्रमाण एकूण कर्मचाऱ्यांच्या एकतृतीयांश झाले आहे. युरोपियन औद्योगिक समाजात एकद्वितीयांश आहे. संगणकाच्या वापराचे प्रमाण वाढले तर ते प्रतिवर्षी ५ लाखाने घटेल. (आता हे असे प्रचंड प्रमाणात बेकारी निर्माण करणारे तंत्रज्ञान राष्ट्राच्या आणि एकूण समाजाच्या दृष्टीने किती उपयोगाचे?)

**तिसऱ्या पर्यायाकडे- दत्तोपंत ठेंगडी**